(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ.शी.: अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकाचे झालेले नुकसान

मु.शी.: अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकाचे झालेले नुकसान यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, रामदास कदम, विनोद तावडे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री चंद्रकांत पाटील, किरण पावसकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

चर्चा पुढे सुरु .....

उपसभापती : सभागृहात नियम 97 अन्वये चर्चा सुरु होत आहे. काल देखील या चर्चेत काही सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले. आज मात्र कुठल्याही परिस्थितीत ही चर्चा दुपारी 12.00 वाजेपर्यंत संपवावयाची असून त्यानंतरचा अर्धा तास माननीय उप मुख्यमंत्र्यांना उत्तरासाठी द्यावयाचा आहे. हे लक्षात घेऊन जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल व सदस्यांनी देखील आपले विचार ठराविक मुद्यांवर व मुद्देसूद व्यक्त करावेत, अशी मी विनंती करतो. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे या ऑन लेग असून त्यांनी आपले भाषण पुन्हा सुरु करावे.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, काल सभागृहात कापसाच्या पिकाच्या संदर्भात आपण चर्चा करीत होतो. विशेषत: ज्या सखल जमिनी आहेत त्यातील कापसाच्या पिकाची उंची वाढलीच नाही तसेच उताराच्या जमिनीमधील कापसाचे पीक न वाढण्याचे कारण त्या जमिनीतील कस वाहून गेला त्यामुळे कापसाचे पीक येऊ शकले नाही. बाजरीच्या संदर्भात बोलायचे तर बाजरीचे पीक उगवले परंतु त्याला कणसेच आली नाहीत, अशी परिस्थिती आहे. कारण बाजरी कमी आणि गवत जास्त अशी या पिकाची गत झाली आहे. तशीच परिस्थिती तुरीच्या पिकाची सुध्दा झालेली आहे. तुरीला ज्यावेळी फुलोरा येतो तो फुलोराच संपुष्टात आल्यामुळे तुरीचे पीक धोक्यात आले आहे. सुर्यफुलाचे पीकही धोक्यात आलेले आहे. संकरित ज्वारीचे पीक ठिकठिकाणी धोक्यात आहे. ज्वारी आणि बाजरीच्या पिकाला कुबड्या लावलेल्या होत्या पण त्या जागेवरच सडून गेल्या आहेत. जनावरांना स्वत:च्या तोंडाने चरुन खाण्यासाठी चारा सध्या असला तरी सुध्दा तो चारा संपल्यानंतर उन्हाळ्या जनावरांच्या चाऱ्याचे काय करावे असा प्रश्न शेतकऱ्यासमोर निर्माण झालेला आहे. गवत लागवडीच्या संदर्भात शेतकरी गांभीर्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

घेत नसल्याने त्याची ही दुरवस्था झाली आहे. फळबागांच्या संदर्भात मी असे सांगणार आहे की, राज्यात द्राक्ष, डाळिंब, संत्रा तसेच केळी ही सर्वच फळ पिके धोक्यात आली आहेत. सुसाट्याच्या वाऱ्याने फळबागा मोडून पडल्या आहेत. त्याचबरोबर फुलांच्या बागा देखील संपलेल्या आहेत. कोकणात भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे अशी एकंदर संपूर्ण राज्याची परिस्थिती आहे. अशा रितीने खरीप पीक तर अडचणीत आलेलेच आहे पण ठराविक शेतकऱ्यांना रब्बीच्या पिकाची आशा होती, जेणेकरुन त्यावर तरी त्याला गुजराण करता येईल. वास्तविक रब्बीच्या पिकाखाली राज्यात अत्यंत कमी क्षेत्र आहे आणि खरिपाचेच क्षेत्र जास्त आहे. खरिपाचा शेतकरी तर उपाशी मेलाच पण रब्बीच्या शेतकऱ्याला सुध्दा ऑक्टोबरमध्ये सतत पाऊस असल्यामुळे शेतीची मशागत करता आली नाही, जमिनी अतिवृष्टीमुळे कडक पडल्या, दगडासारख्या झाल्या. वेळेवर ज्वारीची पेरणी करता आली नाही. गव्हाची पेरणी साधारणत: नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात केली जाते परंतु या पिकासाठी आवश्यक असलेली थंडी चांगल्या प्रकारे पडली नसल्याने ती सुध्दा करता आली नाही.

सभापती महोदय, या अवकाळी पावसाच्या संदर्भात फक्त एकाच जिल्ह्याचे मी उदाहरण अंदाज म्हणून देणार आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये 8693 हेक्टर खरिपाच्या पिकाचे नुकसान झालेले आहे. लाखो एकर जमिनीवरील खरीप पीक वाया गेलेले आहे. या निमित्ताने मला एवढेच सुचवावयाचे आहे की, कृषी विकासाचा दर 4 टक्के करण्यासंबंधीचा निर्णय केंद्रशासनाने घेतला, देशातील शेतकऱ्यांना 72 हजार कोटीची कर्जमाफी देण्याचा निर्णय घेतला, ठिबक व तुषार सिंचन अशा वेगवेगळ्या योजना कृषी विकासासाठी अंमलात आणल्या तरी सुध्दा आज ज्या पध्दतीने शेतकरी जगायला पाहिजे त्या पध्दतीने तो जगत नाही. आपल्याला अन्नधान्याची जेवढी गरज आहे तितके अन्नधान्य गेल्या वर्षी कोरडा दुष्काळ पडल्यामुळे निर्माण करता आले नाही. यावर्षी मात्र ओल्या दुष्काळामुळे तीच अडचण निर्माण झाली आहे. मागील वर्षी धान्य साठा मोठ्या प्रमाणात झाला होता त्यामुळे कदाचित यावर्षीची अन्नधान्याची गरज भागेलही पण परिस्थिती अशी आहे की, कृषीला जोपर्यंत उद्योगाचा दर्जा आपण देत नाही, पाण्याचे नियोजन करीत नाही शेतात आणि घरावर पडणाऱ्या पाण्याचा थेंब अन् थेंब अडवित नाही तोपर्यंत शेतकऱ्याची जमिनी सिंचनाखाली येऊ शकणार नाही. निसर्गावर अवलंबून राहण्याची वेळ त्यांच्यावर येणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. शोभा दराडे ....

राज्याचा विचार केला तर पश्चिम महाराष्ट्रातील 46 टक्के जमीन ओलिताखाली आली आहे परंतु विदर्भातील केवळ 28 टक्के व मराठवाडयातील 26 टक्के जमीनच ओलिताखाली आलेली आहे. खरे म्हणजे 100 टक्के जमीन ओलिताखाली आली पाहिजे. मराठवाडा आणि विदर्भाचा बॅकलॉग भरुन काढणे गरजेचे आहे. शासनाने मराठवाडा आणि विदर्भाचा बॅकलॉग 1994 पर्यंत भरुन काढलेला आहे. परंतु जोपर्यंत मराठवाडा आणि विदर्भाचा भौतिक बॅकलॉग भरुन येत नाही तोपर्यंत मराठवाडा आणि विदर्भाचा विकास होऊ शकणार नाही.

सभापती महोदय, शेतीमध्ये सेंद्रीय खताचा वापर मोठया प्रमाणात करणे आवश्यक आहे. शेतामध्ये सेंद्रीय खताचा वापर वाढला तर अतिवृष्टी झाली तरी जमीन सेंद्रीय खतामुळे भुसभुशीत राहते व पर्यायाने बियाणे खराब होत नाही व पीक सुध्दा चांगले येते. त्यामुळे सेंद्रीय खताचा वापर वाढवण्यासाठी शासनाने शेतक-यांना मदत करणे आवश्यक आहे. मागील वर्षी जे फयान वादळ आले होते, अतिवृष्टी झाली होती त्यामध्ये राज्य शासनाने व केंद्रशासनाने शेतक-यांना तसेच राज्यातील जनतेला मोठया प्रमाणात मदत दिली होती. मागील वर्षी जशी शासनाने मदत केली होती तशाच प्रकारची मदत शासन यावेळीही देईल असा आशावाद व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यामध्ये ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यात मोठया प्रमाणात अवकाळी पाऊस,अतिवृष्टी, वादळ, पूर, समुद्राची भरती व भरतीमुळे समुद्रात पाणी न गेल्यामुळे सर्व राज्यामध्ये मोठया प्रमाणात शेतीचे नुकसान, मनुष्यहानी, पाळीव जनावरांचे नुकसान,फळबांगाचे नुकसान तसेच कोकण पट्टीवर बांध घातल्यामुळे पावसाचे पाणी समुद्रात जाऊ न शकल्यामुळे मोठया प्रमाणात घरांचे नुकसान झाले. राज्यामध्ये अवकाळी पावसामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. सिंधुदुर्ग ते गोंदियापर्यंतचा पट्टा अवकाळी पावसामुळे बाधित झाला. अवकाळी पावसामुळे धानाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले. ऑक्टोबर महिन्यात अवकाळी पाऊस पडल्यामुळे सोलापूर, बीड, नागपूर, चंद्रपूर, बुलढाणा या जिल्हयामध्ये इतर जिल्हयाच्या मानाने थोडे जास्त नुकसान झाले आणि बाकी इतर जिल्हयामध्ये कमी अधिक प्रमाणात नुकसान झाले. अवकाळी पावसामुळे सोयाबीन,उडीद, कापूस ही पिके ऑक्टोबर महिन्यातच बाधित झाली. नोव्हेंबर महिन्यात अतिवृष्टी, अवकाळी पावसामुळे वादळ मोठया प्रमाणात आले आणि प्रचंड हानी संपूर्ण महाराष्ट्रात झाली. फयान वादळ केवळ एकच दिवस आले व मोठया प्रमाणात नुकसान करुन गेले. परंतु नोव्हेंबर महिन्यात 6-7 दिवस अतिवृष्टी व अवकाळी पावसाने थैमान घातल्यामुळे प्रचंड प्रमाणात हानी झाल्यामुळेच या सदनात चर्चा उपस्थित झालेली आहे. शासनाने हा विषय गांभीर्याने घेतलेला आहे.

मागील वर्षी फयान वादळामुळे जे नुकसान झाले त्यासाठी राज्य शासनाने तसेच केंद्र शासनाने मोठया प्रमाणात मदत दिली होती.

यानंतर श्री. अजित...-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

फयान वादळामुळे शेतकऱ्यांचे जे काही नुकसान झाले त्याबाबत नुकसानी संदर्भात असलेले निकष बाजूला ठेवून शासनाने मदत देण्याची भूमिका घेतली होती. ही मदत देत असताना काही ठिकाणी उशिरा सर्व्हे झाला त्यांच्याकडून नुकसानीबाबत मागणी करण्यात आली. ही मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी वेगवेगळ्या माध्यमातून लावून धरली. शासनाने जाहीर केलेली मदत खालच्या स्तरावर पाठविण्यात आली आणि त्याप्रमाणे शेतकऱ्यांना त्याचे वाटप करण्यात आले. परंतु ज्या शेतकऱ्यांचा उशिरा सर्व्हे झाला त्यांना मदत मिळाली नाही. तेव्हा त्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत नव्याने तरतूद करण्याची आवश्यकता होती. उर्वरित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी अशी विरोधी पक्ष तसेच सत्ताधारी पक्ष अशा दोन्ही बाजूच्या सदस्यांची मागणी होती. मी याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे आभार मानतो कारण त्यांनी जे शेतकरी मदतीपासून वंचित राहिले होते त्यांना मदत करण्यासाठी 250 कोटी रुपये देण्याचे जाहीर केलेले आहे. त्यामुळे आता एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही अशी भूमिका आमच्या आघाडी सरकारने घेतलेली आहे.

याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम उपस्थित नाहीत. त्यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी, "या विषयावर चर्चा करण्याऐवजी शेतकऱ्यांना काय मदत देणार आहात ते अगोदर सांगावे", "हे सरकार शेतकऱ्यांना मदत देऊ शकत नाही" अशा प्रकारची वक्तव्ये केली होती. मी या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो की, विदर्भ आणि मराठवाड्यात कापसावर पडलेल्या रोगामुळे कापसाची बोंडे काळी झाली होती. त्यावेळी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यांना नुकसान भरपाई मिळावी म्हणून आम्ही पदयात्रा काढली होती. ही गोष्ट नागपूर अधिवेशनातील आहे. त्यावेळी युतीचे सरकार होते. आमचे नेतृत्व माननीय श्री.शरद पवार करीत होते. आम्ही सभागृहात सतत तीन दिवस मागणी करीत होतो. अखेर तिसऱ्या दिवशी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी 2500 रुपये व चार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

हेक्टरपर्यंत नुकसान भरपाई देण्याची मागणी मान्य केली. ही मदत जाहीर केल्यानंतर त्याबाबतचा जी.आर.काढण्यात आला. जिल्हाधिकाऱ्यांनी नुकसानीचा आढावा घेऊन शेतकऱ्यांना मदत देण्यास सुरुवात केली. अमरावती, नागपूर व इतर दोन अशा एकूण चार जिल्ह्यांचे पैसे रिलिज करण्यात आले. परंतु यवतमाळ जिल्ह्याचे 40 कोटी रुपये, वाशिम जिल्ह्याचे 25 कोटी रुपये तर अकोला जिल्ह्याचे 35 कोटी रुपयांचे तसेच मराठवाड्यातील जिल्ह्यातून नुकसान भरपाईचे प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आमच्याकडे निधी नाही, आम्ही प्रति हेक्टरी 2500 रुपयांप्रमाणे मदत करु शकत नाही, आपण तडजोड करावी असे युती सरकारने जाहीरपणे सांगितले.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

श्री.मनोहर जोशी यांना आमचे शिष्टमंडळ भेटावयास गेले होते त्यावेळी त्यांनी आमच्या बरोबर तडजोड केली त्यांनी आम्हाला असे सांगितले की, 5 कोटी रुपयांचा युरिया तुमच्या जिल्हयाला देण्यात येईल एक किंवा दोन पोते युरिया शेतक-यांना वाटून टाका. सध्या तिजोरी खाली झालेली आहे. युती शासनाच्या काळात जे दोन मंत्री होते ते आता या सभागृहाचे सन्माननीय सदस्य आहेत त्यावेळच्या सरकारने शेतक-यांना दिलेली मदत आणि आघाडी सरकारने शेतक-यांना दिलेली मदत याची जाणीव आपल्याला झाली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय. फयान वादळामुळे ज्या शेतक-यांच्या शेतीचे नुकसान झाले होते त्यांना नुकसान भरपाई दिली होती परंतु त्यातील शिल्लक राहिलेले शेतकरी, अतिवृष्टीची मदत देतांना शिल्लक राहिलेले शेतकरी आणि सोयाबीनवर रोग पडला म्हणून त्याना मदत देण्यात आली होती परंतु त्यातील शिल्लक राहिलेले शेतकरी अशा तीन प्रकारातील शेतक-यांना मदत देण्यासाठी 250 कोटी रुपये देण्याची घोषणा आघाडी सरकारने केली आहे. कोणताही शेतकरी मदती शिवाय राहता कामा नये यासाठीच ही मदत देण्यात आली आहे. युती शासनाच्या वेळी दिलेली मदत आणि आघाडी सरकारने दिलेली मदत यातील फरक किती आहे हे राज्यातील जनता पाहिल्याशिवाय राहणार नाही. युती शासनाच्या वेळी किती मदत देण्यात आली होती याची आकडेवारी आपण काढून पहा. माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती आपल्याला उपलब्ध होऊ शकेल. तेव्हा माहितीच्या अधिकाराखाली आपण ही माहिती जरुर काढून पहावी. युती शासनाच्या पाच वर्षात जी विविध संकटे आली होती त्यावेळी आपण किती मदत केली होती आणि मागच्या तीन चार वर्षाच्या कालावधीत आघाडी सरकारने किती मदत केली होती यातील फरक जर आपण पाहिला तर आपण त्यावेळी दहा टक्केसुध्दा मदत शेतक-याला केलेली नव्हती असे दिसून येईल. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आघाडी सरकार संयुक्तपणे चालविले जात आहे आणि शेतक-याची जाण असलेले हे सरकार आहे. त्याच भूमिकेतून आम्ही राज्य कारभार करीत आहोत. तशा प्रकारे सातत्याने आपल्याकडून सुध्दा प्रयत्न व्हावयास पाहिजे होता. नुकसानग्रस्त शेतक-यांना जास्तीत जास्त मदत कशी मिळेल हे आपण सर्वानी पाहिले पाहिजे. त्याचबरोबर जे योग्य आहे त्या पध्दतीची मदत मिळवून देण्याची भूमिका आपल्या सर्वाची असली पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

सभापती महोदय, प्रत्येक भागातील जनतेच्या भावना व्यक्त करण्यासाठी हे सभागृह आहे. सुरुवातीला विरोधी पक्षाकडून असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता की शेतक-यांसाठी आताच मदत जाहीर करण्यात यावी. परंतु या पूर्वी असे कधीही घडले नव्हते. शेतक-यांच्या प्रश्नासबंधी सभागृहात अगोदर चर्चा करावयास पाहिजे परंतु आपल्याला चर्चा का नको ? घटनेतील तरतुदीनुसार हे सभागृह निर्माण झालेले आहे घटनेने आपणा सर्वांना अधिकार दिलेले आहेत. प्रत्येक भागातील मतदारसंघातील सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचे अधिकार घटनेने आपल्याला मिळालेले आहेत त्यानुसार आपण सभागृहात चर्चा केली पाहिजे. राज्यातील वेगवेगळया ठिकाणचे चित्र वेगळे आहे. कोकणातील चित्र वेगळे आहे अतिवृष्टीमुळे पनवेल जवळ सिडकोने जो बांध बांधला होता त्याच्या मागच्या बाजूला पाणी भरले आणि 30 ते 40 किलोमिटर्स अंतरापर्यंत सगळीकडे पाणी पसरले होते त्यामुळे हजारो घरे बाधित झाली होती. नाशिकमध्ये सुध्दा फळ बागांचे, द्राक्षाचे नुकसान झाले होते. विदर्भातील धानाचेसुध्दा मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते. पश्चिम विदर्भ आणि कोकणातील धानाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले होते. संपूर्ण राज्यात कापूस, सोयाबीन इत्यादी पिकांचे विविध ठिकाणी नुकसान झाले होते. जनावरे मृत्युमुखी पडली होती तसेच मनुष्य हानीसुध्दा झाली होती तेव्हा या सर्व बाबीची चर्चा होते त्यावेळी व्यापक स्वरुपात माहिती घेऊन व अभ्यास करुन शासनाला उत्तर द्यावे लागते. शेतीचे किती नुकसान झाले होते याची माहिती शासनाकडे आली पाहिजे. ती माहिती आली आहे किंवा नाही हे पाहूनच मदत जाहीर करावी लागते. परंतु अगोदर मदत जाहीर करा असा अट्टाहास ज्यावेळी धरला जातो त्यावेळी चर्चा होऊ न देता या विषयाचे राजकीय भांडवल करणे या पेक्षा त्याचा वेगळा अर्थ निघत नाही असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. वास्तविक पाहता दोन दिवस अगोदरच ही चर्चा व्हावयास पाहिजे होती . आमच्या करता सभागृह काय करीत आहे, सरकार काय करीत आहे, विरोधी पक्ष कशा प्रकारची भूमिका मांडत आहे हे सर्व राज्यातील जनता पहात होती परंतु दोन दिवस त्या जनतेला काहीही कळत नव्हते. शासन शेतक-यांना काही मदत देत नाही की, विरोधी पक्ष खरोखरच काही मागत नाही काय या बाबतीत दोन दिवस जनतेला काहीही कळत नव्हते. दोन दिवस विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचा वेळ वाया घालवला

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

असा प्रकार या पुढे होता कामा नये असे मला वाटते. राज्य सरकारकडून नुकसानग्रस्त शेतक-यांना , आर्थिक दृष्टया अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना वा विदर्भात जे शेतकरी आत्महत्या करतात त्यांना पॅकेज दिले गेले . पश्चिम महाराष्ट्रातील काही शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत, नाशिक जिल्हयात देखील काही शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत असे वृत्त वर्तमानपत्रात आले होते. त्यांच्या कुटुबियांना मदत करण्याचा विचार करुन ज्या ज्या ठिकाणी नुकसान झालेले आहे त्या ठिकाणच्या शेतक-यांना मदत देण्याची भूमिका आघाडी सरकारने आणि राज्य सरकारने घ्यावी अशा प्रकारची विनंती करुन तसेच मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.धन्यवाद .

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये सुरु असलेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भातील चर्चेमध्ये भाग घेत असतांना अत्यंत कमी वेळात माझे मुद्दे मांडणार आहे. या चर्चेमध्ये मी कोणते विषय मांडणार आहे यापेक्षा शासन या विषयाला न्याय देण्यासाठी किती गांभीर्याने सामोरे जात आहे व शेतकऱ्यांना किती दिलासा देणार आहे हा या चर्चेचा महत्वाचा भाग आहे. अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे किती नुकसान झाले याबाबत शासकीय पातळीवर वेगवेगळे आकडे प्रसृत केले जात आहेत. त्याचप्रमाणे माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीमध्ये मी फक्त विदर्भाची आकडेवारी सांगणार आहे. कारण या सदनामध्ये राज्याच्या वेगवेगळया भागामधून माननीय सदस्य प्रतिनिधित्व करीत आहेत. त्यांच्याकडे त्या भागातील माहिती आहे. यावर्षी 6 लाख हेक्टरमध्ये धान उत्पादकांनी लागवड केली होती, सोयाबीनची लागवड 4 लाख हेक्टरमध्ये करण्यात आली होती. कापूस गेल्या वर्षी 20 हजार हेक्टरमध्ये लावण्यात आला होता, यावर्षी 40 हजार हेक्टरमध्ये म्हणजे दुप्पट लावण्यात आला होता. परंतु त्यामधून 3 ते 4 क्विंटल इतके कापसाचे उत्पन्न हाती आले. त्याचा उत्पादन खर्च एकरी 20 हजार रुपयांपर्यंत गेला आहे. माझ्या या आकडेवारीमध्ये खूप नाही परंतु 500 रुपयांपर्यंत फरक पडेल, त्यापेक्षा जास्त पडणार नाही हे सत्य आहे. त्यामुळे कापसाचे एकरी 20 हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस झाल्यामुळे सोयाबीनचे एकरी 2 ते 3 क्विंटल पीक निघाले. त्याचा उत्पादन खर्च एकरी 12 हजार रुपये इतका होता.

सभापती महोदय, धानाचे नुकसान पूर्व विदर्भामध्ये प्रचंड प्रमाणात झाले आहे, त्याचप्रमाणे कोकणामध्ये सुध्दा प्रचंड प्रमाणात धान आडवे झाले आहे. त्याबद्दल कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. त्यामुळे धानाचे उत्पादन घेण्यासाठी प्रचंड प्रमाणात हेक्टरी खर्च झाला. त्यासाठी सरसकट किती मदत देणार आहात हे मी आपणाकडून जाणून घेऊ इच्छितो. यावर्षी जे काही सर्वात वाईट घडले आहे ते आपण या सभागृहामध्ये मांडले असते तर बरे झाले असते. मजुरीचा खर्च प्रचंड वाढला असतांना सुध्दा आज शेतावर मजूर मिळत नाहीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अवकाळी पावसाच्या चर्चेचा विषय याठिकाणी असतांना मान्सूनच्या हंगामामध्ये सुध्दा या विदर्भामध्ये प्रचंड पाऊस झाला. इतका पाऊस झाला की, जुलै-ऑगस्टच्या दरम्यान लागवड केलेली शेती उगवली. एवढे चांगले पीक उभे रहात असतांना सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या व्हावयास लागल्या. पाऊस पडत असतांना शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या कां होत आहेत? यांची पहाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

करण्याकरिता ऑगस्ट महिन्यात मी विदर्भाचा दौरा केला. मी वाशिम जिल्हयातील गणेशपूर, कोटी, पिंपळपूरी, गोटी आणि पारवा या गावामध्ये गेलो होतो. त्याठिकाणी सुध्दा 4 शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या होत्या. माननीय सदस्य श्री. माणिकरावजी ठाकरे यांच्या यवतमाळ जिल्हयातील उत्तर वाडवडा, सोनवाडवडा, सोनकाश, मेटीखेडा, म्हाळदा या गावामध्ये मी जाऊन आलो. त्याठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्या होत्या. शेतामध्ये पीक उभे राहिले आहे, पाऊस धो-धो पडत असतांना शेतकरी आत्महत्त्या करीत आहेत. हे हातचे पीक येण्यासाठी माणूस जगला पाहिजे. प्रचंड पाऊस झाल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकऱ्याला त्याच्या शेतामध्ये जाता आले नाही, काहीही काम करता आले नाही हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. बी.टी. कॉटन हे कापसाचे बियाणे शे्तामध्ये पेरल्यानंतर त्याला प्रचंड प्रमाणात बोंडे येण्याची अपेक्षा असतांना प्रत्येक झाडावर केवळ 3 ते 4 बोंडे लागली आहेत, बाकीचे पीक उद्ध्वस्त झाल्याचे डोळयासमोर दिसत होते आणि त्यामुळे हे वाया गेलेले पीक आपल्या हाती येणार नाही म्हणून शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या. अशाप्रकारची धक्कादायक परिस्थिती यामधून निर्माण झाली असल्यामुळे शासनाकडून त्याबाबत खुलासा करण्यात आला पाहिजे. याचे कारण भविष्याच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्वाचा आहे. गेल्या वर्षी मजूर मिळत नव्हते म्हणून काही लोकांनी शेतामध्ये तणनाशक फवारणी केली. शेतामधील तन काढण्यासाठी मजूर मिळत नाहीत म्हणून हे विषारी द्रव पदार्थ गेली चार वर्षे विदर्भामध्ये वापरले जाते. गेल्या वर्षी 60 हजार लिटर तणनाशक वापरले गेले. यावर्षी 12 लाख लिटर तणनाशक वापरले गेले. अशाप्रकारे वापरले गेलेले 12 लाख लिटर तणनाशक विषारी द्रव जमिनीमध्ये मुरले आहे. हे विषारी द्रव जमिनीमध्ये मुरल्यामुळे जमिनीचे काय होणार आहे? हा कृषी विद्यापीठाच्या संशोधनाचा विषय आहे. या निर्माण झालेल्या प्राप्त परिस्थितीमधून शेतीमध्ये आव्हान निर्माण झाले आहे. त्यामुळे केवळ शेती उद्ध्वस्त झाली हा आपल्यासमोर विषय नसून जमिनीमध्ये मुरलेल्या विषारी द्रवपदार्थामुळे भविष्यात शेतीचा प्रश्न निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, या अवकाळी पावसाबद्दल चर्चा करीत असतांना आमच्या ताईंनी तुरीचा विषय मांडला आहे. गेले दोन महिने मी या विदर्भामध्ये फिरत आहे. माझ्या डोळयासमोर टवटवीत असलेली, फुले आलेली व शेंगा येत असलेली तूर उभी राहिलेली दिसत होती. मला वाटले की, यावर्षी बंपर क्रॉप होऊन त्यामधून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान भरुन निघेल. परंतु दुर्दैवाने

श्री. दिवाकर रावते ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अवकाळी पाऊस आणि ढगाळ आकाशामुळे तूरीच्या पिकावर अळी पडली. त्यामुळे 50 टक्क्यापेक्षा कमी तूर हाती लागेल अशी परिस्थिती आहे. अशाप्रकारे या नगदी पिकाची सुध्दा उद्ध्वस्तता निर्माण झाली आहे. सभापती महोदय, मी याठिकाणी आकडेवारी सांगून सभागृहाचा वेळ घेणार नाही. याचे कारण असे की, मी परवा माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे एका वेगळया गोष्टींसाठी गेलो होतो . त्यावेळी या अवकाळी पावसाच्या संदर्भामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी असे मत व्यक्त केले की, ही परिस्थिती यावर्षी निर्माण झाली आहे असे म्हणून चालणार नाही. ही परिस्थिती प्रत्येक वर्षी निर्माण होणार आहे आणि ती जर प्रत्येक वर्षी निर्माण होणार असेल तर त्यादृष्टीने तुम्ही काय उपाय योजना करणार आहात? यावर्षी प्रति हेक्टरी आपण मदत दिल्यानंतर आपले काम संपले काय? ग्लोबल वार्मिगमुळे दरवर्षी अशी परिस्थिती निर्माण होणार असेल तर त्यासाठी आपल्याला नक्की काय करावे लागेल यादृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विचार मांडला आहे, तो फार महत्वाचा आहे. मला याठिकाणी सांगतांना खूप दु:ख होत आहे. या राज्यामध्ये आत्महत्त्या केलेला शेतकरी दारु पित होता म्हणून त्याने आत्महत्त्या केली असे म्हणून मदत नाकारली जाते हे दुर्दैव आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या माणसाच्या पत्नीला प्रश्न विचारतात की, तुझा नवरा दारु पित होता काय ? त्यावर ती सांगते की, ते कधी-कधी दारु पित होते. आता गावामध्ये कधी-कधी लोक दारु पितात. परंतु म्हणून तो माणूस दारुडा असेल असे नाही. कधीतरी दारु पिणे आणि दारुडा असणे यामध्ये फरक आहे. परंतु तो माणूस पित होता असे लिहीले जाते आणि त्यांना मिळणारी मदत नाकारली जाते. पण या राज्यामध्ये दारुच्या बाबतीत अबकारी कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न पाहिले तर मला दुर्दैवाने येथे नमूद करावेसे वाटते आणि मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना विचारु इच्छितो की,तुमच्या सरकारचा किती अभिमान बाळगावा ? 2001 मध्ये या राज्यामध्ये 2 लाख लिटर दारुचे उत्पन्न होते, परंतु 2009 मध्ये प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार ते 24 लाखावर गेलेले आहे म्हणजेच या राज्यातील इतक्या लोकांना दारुडे बनविलेले आहे आणि तरीही त्यांना मदत नाकारण्याची हिंमत दाखवत आहात अशी परिस्थिती आहे.प्रत्येक जिल्हाधिकारी साधारणपणे 10 ते 15 लायसन्सवर सही करतो आणि बाकीची नाकारली जातात. मग संबंधित व्यक्ती वरच्या पातळीवर जाऊन ती मंजूर करुन घेतात आणि मग अशा वेळी आपल्या माननीय मंत्री महोदयांचा लायसन्स देताना हात आखडत नाही. मात्र दुसरीकडे आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याने दारु प्यायली या सबबीखाली त्याला मदत देण्याचे नाकारले जाते. अशा वेळी आपण कोणाकडे पहावयाचे असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून शासनाने यासंदर्भातील धोरण निश्चित केले पाहिजे.

सभापती महोदय, जेव्हा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी माहिती दिली, त्यावेळी माझ्या पुढे जे काही प्रश्न निर्माण झाले,ते मी मांडणार आहे.मघाशी आम्ही सेंद्रीय खताबद्दल बोलत होतो.त्यावेळी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी माती कशी भुसभुशीत रहाते याबाबत सांगितले.मला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तराची अपेक्षा आहे.या विदर्भामध्ये खास करुन पश्चिम विदर्भात झालेल्या आत्महत्यांच्या संदर्भात शेतकऱ्यांच्या सबलीकरणासाठी केंद्र शासनाच्या कडून विश्व बँकेच्या आणि टाटा ट्रस्टच्या माध्यमातून 700 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत.मी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना सांगू इच्छितो की, अमरावती व यवतमाळ जिल्ह्याचाही समावेश आहे. तुम्ही माहितीच्या अधिकाराखाली सांगत असता म्हणून मी तुम्हाला मुद्दाम सांगत आहे. या संदर्भातील एका कार्यक्रमामध्ये माननीय मुख्यमंत्री होते आणि माननीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब हे प्रमुख पाहुणे असतानाही ते येऊ शकले नाहीत. त्याची

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

कारणे काहीही असतील. मात्र ते आले नाहीत. शेतकऱ्यांच्या सबलीकरणाबाबतची जी योजना आहे, त्यामध्ये सामुदायिक शेती, शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीची क्षमता वाढविणे आणि त्यांना सेंद्रीय शेती करावयास लावणे हा यातील महत्वाचा मुद्दा आहे. तसेच ही योजना नवीन नाही. परंतु आतापर्यंत त्यावर फक्त 122 कोटी रुपये खर्च करण्यात आले.परंतु 122 कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी खर्च करण्यात आलेले नाही तर ते पगारासाठी खर्च केले.विश्व बँकेकडून शेतकऱ्यांसाठी पैसे आलेले आहेत आणि ते पगारासाठी खर्च केले.त्यातील एक रुपया देखील शेतकऱ्यांसाठी खर्च झाला नाही आणि मी हे याठिकाणी अधिकृतरित्या बोलत आहे.आपण याबाबत माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेऊन पुढच्या वेळेस सभागृहामध्ये सांगावे.आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी योजना तयार केली असताना, तुम्ही जर राज्यकर्ते म्हणून ती राबविण्याची क्षमता ठेवत नसाल आणि केवळ दुसऱ्यांकडे बोटे दाखवत असाल तर याबाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. आज अशी स्थिती आहे की, जे काही मिळालेले आहे ते सुध्दा तुम्हाला वापरता येत नाही. तरी देखील आपण येथे कौतुक केले, आनंद आहे. तुम्हाला जे करता आले नाही, त्याबाबत माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सन्माननीय सदस्यांच्या आग्रहाला बळी पडून, राज्यकर्ते म्हणून शेवटी घोषणा केली आणि त्यावेळी असे सांगितले की, शेतकऱ्यांना तीन वर्षापूर्वीचे 250 कोटी रुपये द्यावयाचे राहिलेले आहेत, ते मार्च पर्यंत देतो. तुम्ही याबाबत मेहेरबानी केली नाही. पण तुम्ही येथे कौतुकाने सांगितले की, शासनाने 250 कोटी रुपये देण्याचे जाहीर केले. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या यवतमाळ जिल्ह्यातील खरडून गेलेल्या जमिनीच्या संबंधात मागील तीन वर्षाचे पैसे माननीय उप मुख्यमंत्री यांनी केलेल्या घोषणेमुळे मार्च मध्ये शेतकऱ्यांना मिळतील. मी आपल्याला आव्हान दिले होते. तसेच पिकावर लाल्या रोग पडल्यामुळे जे नुकसान झाले, त्याचे राहिलेले पैसे देखील आम्हाला माननीय उप मुख्यमंत्री यांनी घोषणा केल्यामुळे मिळणार आहेत. तुम्ही असे काही सांगितले की, शासनाने 250 कोटी रुपये दिले, त्यामुळे आता त्यांना काही उत्तर द्यावयास नको आहे.

अशुद्धलिखित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला मनापासून समाधान आहे की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी किमान आघाडी सरकारच्या उपमुख्यमंत्र्यांनी जी घोषणा केली त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. मला याठिकाणी सन्माननीय सदस्यांना एवढेच सांगावयाचे आहे की, आघाडी सरकार शेतकऱ्यांना देते पण युती सरकारच्या वेळी शेतकऱ्यांचे 550 कोटी रुपये दिले नव्हते .

श्री. दिवाकर रावते : आपण किती दिवस दुसऱ्यांकडे वाकून बघणार. मी त्या पुढचे बोलत नाही.आपल्याला ते कळले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे कौतुक केले. म्हणून मी या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या बद्दलही सांगतो. चांगले सांगतो. सन्माननीय सदस्यांमध्ये हिम्मत नाही. राष्ट्रीय काँग्रेसचे ते राज्याचे अध्यक्ष आहेत. ते असे म्हणाले की, आमची राष्ट्रवादी आणि काँग्रेसची सत्ता आहे. मला आनंद झाला. त्यांना राष्ट्रवादी काँग्रेसला सन्मान द्यावा लागला. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी गाईंचे जे प्रकरण या सभागृहात मांडले ते मी दोन वर्षापूर्वी या सभागृहामध्ये उपस्थित केले होते. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांना आठवत असेल. त्यावेळी त्यांच्याकडे ते खाते नसताना सभागृहात उभे राहून सांगितले होते की, "होय, ही सरकारची जबाबदारी आहे. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल." मी त्यासंबंधीचे रेकॉर्ड या ठिकाणी दाखविण्याची आवश्यकता नाही. आता ते ही कारवाई करु शकतील. पण त्यावेळी त्यांच्याकडे ते खाते नसताना त्यांनी सभागृहात उभे राहून हिंमत दाखविली आणि सांगितले की, "शासन कारवाई करील" पण दुर्दैवाने ती कारवाई आजपर्यंत झालेली नाही. हे सर्व रेकॉर्डवर आहे. कारवाई झाली असेल तर आपण ती आम्हाला सांगावी. उणे-दुणे सगळीकडे काढता येते. ते याठिकाणी काढण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, मी जास्त खोलात जात नाही. आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी अशी भावना व्यक्त केली की, हे संकट भविष्यात येऊ शकते. त्यादृष्टीने काही उपाययोजना मी या ठिकाणी सांगणार आहे. कापसाचे आणि धानाचे उत्पन्न मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या या दुर्दैवी आत्महत्या आहेत. जूनमध्ये 62 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. जुलैमध्ये 56, ऑगस्टमध्ये 58, सप्टेंबरमध्ये 52, ऑक्टोबरमध्ये 62, नोव्हेंबरमध्ये 78 आणि काल हे अधिवेशन चालू असताना 17 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आठ तासाला एक आत्महत्या या गतीने

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

या भागामध्ये आत्महत्या होत आहेत. तुम्हाला आणि आम्हाला एकमेकांचे उणे-दुणे काढावयाचे नाही. आपल्याला हे भूषणावह नाही. या राज्याचे लोकप्रतिनिधी म्हणून ही बाब आपल्याला भूषणावह नाही. या आत्महत्या कशा थांबवाव्यात याकरिता आपण या सभागृहात चर्चा करतो. एकमेकांची उणी-दुणी काढण्यासाठी चर्चा करणे हा विषय असू शकत नाही. आत्महत्या थांबल्या पाहिजेत. आतापर्यंत मी कधीही शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर राजकारण केले नाही आणि भविष्यातही राजकारण करणार नाही. कारण आत्महत्या हा राजकारणाचा विषय असू शकत नाही. सहा जिल्हयाकरिता अडीच हजार कोटी रुपयांची मंजुरी दिली असताना डॉ. पंतगराव कदम आपण सहकार मंत्री होतात. आपल्याला माहीत आहे की, अडीच हजार कोटी रुपयापैकी फक्त 1860 कोटी रुपये वाटण्यात आले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे आणि मलाही माहीत आहे की, महाराष्ट्रातील शेतकऱ्याला कर्जाची कमी उपलब्धी झाली. आंध्र प्रदेशमध्ये एनआरएचएम ही संस्था शेतकऱ्यांना लोन देते. "मनीपुरम गोल्ड" या संस्थेने शेतकऱ्यांना प्रचंड प्रमाणात लोन दिले आणि आता हे लोन वसूल करण्याकरिता ते मोटारसायकल वरुन शेतकऱ्याच्या दारोदार फिरत आहेत. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर झालेली आहे. आज या क्षणाला मोटारसायकल घेऊन शेतकऱ्यांच्या दारोदार वसुलीकरिता ते फिरत आहेत. शेतकऱ्यांच्या डोक्यावर सावकाराचे लोन आहे. या संस्थेकडून मिळालेले लोन त्यांच्या डोक्यावर आहे. मी परवाच याबबत सांगितले की, शेतकऱ्यांच्या डोक्यावर ही दोन लोन आहेत आणि आता ते शेतकरी पैसे देऊ शकत नाहीत.

माननीय उपमुख्यमंत्र्यांनी चांगली भावना व्यक्त केली की, विजेचे चालू बिल भरले तर शासन शेतकऱ्यांचे विजेचे पंप चालू करील. पण शेतकरी विजेचे चालू बिल भरु शकत नाहीत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी परवाच्या चर्चेत असे मान्य केले की, "होय, परिस्थिती गंभीर आहे." अर्थात माननीय उपमुख्यमंत्री आणि माननीय मुख्यमंत्र्यांची याबाबत चर्चा झाली असेल. पण ही चांगली घोषणा आहे. आम्हाला अपेक्षा आहे. घोषणा करुन शासनाने श्रेय घ्यावे पण शेतकऱ्याला वाचविण्यात यावे अशी आमची प्रामाणिक भूमिका आहे. माननीय उपमुख्यमंत्री नक्की ती भूमिका पार पाडतील. माननीय मुख्यमंत्र्यांनी जी भूमिका मांडली त्याचा आम्हाला आनंद आहे. परिस्थिती गंभीर आहे म्हणून शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाचे कनेक्शन सुरु करण्यात यावेत असा आमचा आग्रह

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या संबंधीचा आग्रह त्याचसाठी केला. वसुली आज ना उद्या होईल. पण आज आपण शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाचे कनेक्शन सुरु कराल अशी आम्हाला खात्री आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशनमध्ये डॉक्टरांची भरती झालेली नाही. औषधे मिळत नाहीत. पैसे नाहीत हे सर्व आपल्याला बघावे लागणार आहे.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

नुसती शेती आडवी झाली, शेतकरी मेला, वीज गेली असा विषय नाही. पैसे नसताना डॉक्टर सुध्दा मिळत नाही. आरोग्य सेवेसाठी लॅपटॉप वाटले. त्यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये छापून आले. तसेच दूरदर्शनवर दाखविण्यात आले की, एका बॅगेमधून लॅपटॉप ऐवजी फरशा म्हणजे लाद्या निघाल्या. म्हणजे किती भ्रष्टाचार आहे ? लॅपटाप आला नाही. त्याऐवजी फरशी आली. यामध्ये कोणाला दोषी धरावयाचे ? हे राज्य कसे चालणार आहे ?

सभापती महोदय, आज विवाहाचा खर्च वाढलेला आहे. आरोग्य सुविधांचा प्रश्न निर्माण झाला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधांचा प्रश्न आहे. शासनाने 50 टक्के फी देतो असे सांगितले. हा विषय शेतकऱ्यांच्या जगण्याचा आहे की नाही ? आता ओबीसीची फी 70 हजार रुपये आहे. त्यातील 30 हजार रुपये शासनाकडून दिले जातात आणि 30 हजार रुपये विद्यार्थ्यांना भरावे लागतात. गेल्या दहा वर्षापूर्वीची फी आणि आताच्या फीमध्ये फरक पडलेला आहे. विद्यार्थी फीचे 30 हजार रुपये कोठून देणार ? हा विषय आपण हाताळणार आहात की नाही ? हे सगळे प्रश्न निर्माण झालेले आहेत. अवकाळी पाऊस आला आणि शेती आडवी झाली एवढाच प्रश्न नाही. उत्पन्न नसल्यामुळे पुढचे सहा महिने शेतकरी कसा टिकेल आणि रब्बीचे पीक घेण्याकरिता शासन कोणती व्यवस्था करणार आहे ? याबाबत शासनाकडून उत्तर येणे आवश्यक आहे. आता पाण्याचे नियोजन करावे लागेल.

सभापती महोदय, माझी शासनाला एक विनंती आहे. शासन मुलीच्या लग्नासाठी 10 हजार रुपये देते पण मध्यप्रदेशमध्ये 1 लाख रुपये मुलीच्या लग्नाला दिले जातात. मध्यप्रदेशच्या धर्तीवर या शासनाने शेतकऱ्यांना तो तरी आधार द्यावा अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो. कोरडवाहू शेतकऱ्यांना आपण कमीतकमी अन्न आणि डाळ जर दिली तर त्याचा उपयोग होईल. बियाणांची मदत, खताची मदत हा विषय आहेच. परंतु आता आपण बीपीएलखाली 2 रुपये, 3 रुपये दराने जे धान्य देणार आहात ते जर या उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना दोन चार महिन्यांकरिता दिले तर तो शेतकऱ्यांना आधार ठरणार आहे.

सभापती महोदय, मी काय करतो, तुम्ही काय करता, आमची सत्ता होती, तुमची सत्ता

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

होती असे म्हणून आपण किती दिवस एकमेकांची उणीदुणी काढत बसणार हा जरी विषय असला तरी सुध्दा मी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांना एवढेच सांगू इच्छितो की, त्यावेळची रुपयाची परिस्थिती आणि आजची रुपयाची परिस्थिती यामध्ये जमीनअस्मानाचा फरक आहे. त्यावेळची 5 रुपयाची मदत असेल तर त्या ठिकाणी आता 50 रुपये द्यावे लागतात. म्हणून आपण जर आणेवारीमध्ये मोजत असाल तर त्यावेळेला त्या शासनाकडून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना 1 लाख रुपये देण्यास सुरुवात झाली. आपण गाडी अडविली होती हे मला माहीत आहे. हे आपल्याला आठवते का ? आपण ते मान्य केले पाहिजे. पूर्वीचे सरकार बोंड अळीच्या बाबतीत पैसे देत नव्हते. बोंड अळीच्या संदर्भात पैसे देण्याची पध्दत युती सरकारने सुरु केली. त्यामुळे काही गोष्टी केल्या, काही गोष्टी केल्या नाहीत. पण गेली दहा वर्षे आपण सत्तेत आहात. गेली पंधरा वर्षे कसली उदध्वस्तता निर्माण करीत आहात ? 7 हजार आत्महत्येचे पाप डोक्यावर घ्या. प्रत्येक वेळेला उणीदुणी काढणे बरोबर नाही. मी कधी शेतकऱ्यांच्या विषयावर अशा पध्दतीने बोललो नाही. इतर वेळी मी कधीही बोलेन. पण शेतकऱ्यांच्या संदर्भात बोलत असताना शेतकरी कसा जगेल याकरिता तुम्ही आणि आम्ही एकत्रितपणे उभे राहिले पाहिजे आणि त्यासंदर्भात बोलले पाहिजे. ज्या उणिवा असतील त्या आम्ही तुम्हाला सांगितल्या पाहिजेत. जर चांगले केले असेल तर ते पुढे नेण्याकरिता आपण सर्वांनी फिल्डमध्ये जाऊन राबले पाहिजे. अशी भूमिका आपण जर स्वीकारली तर शेतकरी उभा राहील. म्हणून मी आपल्याकडे अपेक्षेने पाहात आहे. वीज पंपाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात आहे. त्याबाबतीत मदत होईल. आपण वीज पंपाचा प्रश्न सोडविला. माननीय उपमुख्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, आपण उपमुख्यमंत्री झाल्यापासून ज्या पध्दतीने कामाला सुरुवात केली आहे त्याचा सन्मान होईल अशी माझी अपेक्षा आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी सांगितले की, या ठिकाणी दोन दिवस गोंधळ झाला आणि कामकाजाचा वेळ फुकट गेला. खरी गोष्ट आहे. पण या ठिकाणी आमची मागणी काय होती ? आमची मागणी अशी होती की, शासनाने आधी मदत जाहीर करावी आणि ती मदत अपुरी वाटली तर आम्ही चर्चा करु. कारण गेल्या दहा पंधरा वर्षामध्ये ज्या मदती दिल्या गेलेल्या आहेत त्या घेण्यासाठी शेतकरी आलेच नाहीत. या राज्यातील शेतकऱ्यांना शासनाने मदत जाहीर केली पण शेतकरी मदत घेण्यासाठी आलेच नाहीत. आता दोन वर्षे शासनाने जी मदत जाहीर केली त्यामध्ये एका गुंठ्याला 10 रुपये, अडीच हेक्टरला 1 हजार रुपये अशी मदत राज्य शासनाने दिली. या ठिकाणी गोंधळ झाला. आम्ही हे मांडत होतो आणि माननीय उपमुख्यमंत्र्यांना ते पटले असते. आपण नक्की घोषणा केली असती.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

पण येथे गोंधळ झाल्यामुळे आम्हाला बोलण्याची संधी मिळाली नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे संपूर्ण महाराष्ट्रात फिरतात. मी माझ्या पक्षाचा सरचिटणीस झाल्यानंतर राज्यातील विदर्भ, मराठवाडा व कोकणामध्ये फिरलो आहे. विदर्भातील अकोला, बुलढाणा, अमरावती, मराठवाडयातील हिंगोली, परभणी, बीड या सर्व भागात फिरलो आहे. सभापती महोदय, मी ठराविक भागाची नुकसानीची आकडेवारी देणार आहे. उपमुख्यमंत्रीपदी सन्माननीय श्री.अजित पवार यांची निवड झाल्यामुळे लोकांच्या अपेक्षा वाढलेल्या आहेत. राज्य कारभारात बदल होईल, जुन्या परंपरा मोडीत निघतील आणि सभागृहात मदतीची घोषणा झाल्यानंतर अधिकारी त्याची अंमलबजावणी करतात त्यामध्ये बदल होईल असे माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना वाटत आहे. राज्यात 50 वर्षानंतर पहिल्यांदाच पाऊस इतका लांबला आहे. गेल्या 50 वर्षामध्ये कमी जास्त पाऊस पडल्याचे आपल्याला माहीत आहे. परंतु यावर्षी जून महिन्यापासून सुरु झालेला पाऊस डिसेंबर महिना उजाडला तरी पडत आहे. हे 50 वर्षात कधी घडले नव्हते, हे प्रथम घडत आहे. हे सर्व खरे असले तरी सरकारला याची कल्पना नव्हती असे नाही. शासनाने मे महिन्याच्या बातम्या काढून पहाव्या. या वर्षी भरपूर पाऊस पडणार आहे तसाच तो लांबणार आहे असा अंदाज वेधशाळेने वर्तविला होता. सध्या सगळयांच्या मनात ग्लोबल वार्मिंगचा विषय आहे. त्याची ही एक झलक आहे, त्यादृष्टीकोनातून केंद्र व राज्य सरकारने विचार करणे आवश्यक आहे. म्हणून आम्ही अशी विचारणा केली होती की, शासनाने अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेतला आहे काय ? सन्माननीय कृषी मंत्र्यांचे वर्तमानपत्रातून आलेले निवेदन आम्ही वाचले आहे. टी.व्ही.वरील बातम्या सुध्दा पाहिल्या आहेत. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी टी.व्ही.वरुन केलेले निवेदन सुध्दा ऐकले आहे. विधिमंडळाच्या कामकाजाची तयारी करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे राज्यातील सर्व जिल्हाधिका-यांशी संवाद साधून पाहणी केली, अभ्यास केला हे सुध्दा वाचले आहे. शासनाने इतकी तयारी केलेली असल्यामुळे आमची मागणी होती ती योग्य होती आणि त्या मागणीचा मी पुनरुच्चार करणार आहे.

सभापती महोदय, काल आपले सभागृह सुरु होण्यापूर्वी एक तास अगोदर मी खालच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

सभागृहातील प्रेक्षक गॅलरीत बसलो होतो. आमच्या पक्षाचे नेते व खालच्या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांनी त्यांचे विचार मांडताना असे सांगितले की, मदत व पुनर्वसन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली जाते, ती समिती शासनाने अद्याप नेमलेली नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे की, ती कमिटी नेमलेली आहे. माननीय मंत्री महोदयांचे म्हणणे खरे असेल तर ही कमिटी केव्हा नेमण्यात आली, नागपूरला नेमली की, मुंबईला नेमली आहे ते त्यांनी सांगावे. माझ्या माहितीप्रमाणे याठिकाणी चर्चा व गोंधळ झाल्यानंतर कमिटी नेमली असावी. ज्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री बदलतात त्यावेळी शासनामध्ये बदल होतो. त्यामुळे पूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व कमिटया बरखास्त होतात. माननीय मुख्यमंत्र्यांनी शपथ घेतल्यानंतर याबाबतची कमिटी नेमण्याची गरज होती. परंतु शासनाने ती कमिटी नेमलेली नाही. त्यामुळे शासन या प्रश्नाकडे किती गांभीर्याने पहात आहे ते दिसून येत आहे.

सभापती महोदय, यासंदर्भातील मी केवळ 2-3 प्रमुख मुद्दे मांडणार आहे. सभापती महोदय, 50 टक्क्यापेक्षा जास्त शेतीचे नुकसान झाले तर संबंधिताला इन्शूरन्स मिळतो.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील...

या ठिकाणी सर्कल निहाय, तालुका निहाय नुकसानीचा आढावा घेतलेला आहे. त्या दृष्टीने या इन्शुरन्स कंपन्याकडून सरकारला जलद गतीने पैसे कसे मिळतील हे बघण्याचे काम आपण केले तर निश्चितपणे शेतक-याला दिलासा मिळेल. राज्यातील 22 जिल्ह्यांमध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त पिकाचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे या नुकसानीचा इन्शुरन्स आपल्याला मिळू शकतो. गेल्यावर्षी इन्शुरन्स उतरविला गेला. पण नुकसानीचे पंचनामे राज्य सरकारच्या अधिका-यांनी इन्शुरन्स कंपनीला वेळेवर दिले नाहीत म्हणून 31 मार्च पूर्वी जी नुकसान भरपाई मिळायला पाहिजे होती ती मिळाली नाही. तेव्हा नुकसानीचे पंचनामे कसे जलद गतीने होतील आणि इन्शुरन्स कंपनीला पंचनाम्यांचे कागदपत्रे वेळेवर कशी मिळतील हे आपण पाहिले पाहिजे. शेतकरी शेतामध्ये काम करीत असताना काही अपघात झाला, विंचू, साप चावला तर त्यासंदर्भात शेतक-याला नुकसान भरपाई मिळावी यासाठी राज्य सरकाराने सर्व शेतक-यांचा विमा उतरविलेला असून त्या विम्याचे पैसे राज्य सरकार इन्शुरन्स कंपनीकडे भरत असते. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना मी सांगू इच्छितो की, ते ज्या नाशिक जिल्ह्यातील आहेत त्या नाशिक जिल्हयातून नुकसान भरपाई मिळण्यासंबंधीचे 200 प्रस्ताव पाठविले होते आणि त्यातील फक्त 4 मंजूर झाले. रायगड जिल्ह्यातून 150 प्रस्ताव पाठविले होते, त्यातील फक्त 8 प्रस्ताव मंजूर झाले. इन्शुरन्स कंपनी असे सांगते की अधिका-यांनी योग्य त्या कागदपत्रांची पूर्तता केलेली नाही, वेळेवर पंचनामे केले नाहीत, कृषी अधिका-यांचे दाखले दिले नाहीत त्यामुळे नुकसान भरपाईचे प्रस्ताव मंजूर झाले नाहीत. मग सरकार इन्शुरन्स कंपनीला शेतक-यांच्या विम्याचे जे पैसे देते ते कंपनीच्या फायद्यासाठी की शेतक-यांच्या हितासाठी देते असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून या विषयी माननीय मंत्री महोदयांनी अभ्यास करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी शेतीचे जे नुकसान झाले त्यासंदर्भात देण्यात आलेल्या नुकसान भरपाई बाबतची परिस्थिती काय आहे ? शासनाने देऊ केलेली नुकसान भरपाई घेण्यासाठी शेतकरी येण्यास तयार नाही. कारण शेतक-याला फक्त 400 किंवा 500 रुपये इतकी नुकसान भरपाई दिलेली आहे. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, आताच्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची गेल्या दोन वर्षापूर्वी जशी मदत केली त्याप्रमाणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...

मदत करणार असाल तर ती मदत देऊ नका. कारण ती मदत घेण्यासाठी शेतकरी येत नाहीत. ती मदत तशीच राहाते. अधिवेशनामध्ये मोठी चर्चा होते. सरकार देखील मोठमोठया घोषणा करते. अधिवेशन संपले की केलेल्या घोषणा सरकार विसरते आणि आम्ही देखील त्यांचा पाठपुरावा सोडून देतो. शासनाने शेतक-यांना दिलेल्या नुकसान भरपाईचे 8 ते 9 कोटी रुपये जिल्हा बँकेमध्ये पडून आहेत. रायगड जिल्हा बँकेमध्ये साडेचार कोटी रुपये पडून आहेत. नुकसान भरपाईचे 500 रुपये घेण्यासाठी शेतक-याला 100 रुपये खर्च करुन तालुक्याच्या ठिकाणी यावे लागते. बँकेत खाते उघडण्यासाठी वेगळा खर्च येतो. म्हणून अशा प्रकारची मदत सरकार शेतक-यांना कशासाठी देते असा प्रश्न मला सरकारला विचारावासा वाटतो. तेव्हा या सगळया परिस्थितीचा सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी अभ्यास केलेला नाही. त्यांनी शासनाची बाजू येथे सांगितली. परंतु शेतकरी प्रत्यक्षात नुकसान भरपाई घेण्यासाठी येतात की नाही हे त्यांनी पाहिलेले नाही.

सभापती महोदय, राज्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे काही तरी वेगळा निर्णय करतील अशी अपेक्षा आहे. माननीय उपमुख्यमंत्री हे स्पष्ट वक्ते आहेत. त्यामुळे मदत देता येणार नसेल तर त्यांनी "नाही" म्हणून सांगावे, आम्हाला वाईट वाटणार नाही. सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही...(अडथळा)...

मी टोलच्या मुद्यावर या सभागृहामध्ये बोलणार आहे. टोल वसूल करणा-या कंत्राटदाराना शासनाने 10 हजार कोटी रुपयांची सवलत दिलेली आहे. मला हे सांगावयाचे आहे की, राज्य सरकार पैसे उपलब्ध करुन ते शेतक-यांना देऊ शकते. या चर्चेच्या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने तातडीने दोन गोष्टी केल्या पाहिजेत. जे पिकलेले भात शेतक-यांच्या दारामध्ये आहे ते मार्केटिंग फेडरेशनच्या माध्यमातून ताबडतोब खरेदी केले पाहिजे. एजन्सीकडून 70 टक्के उतारा दिला जातो. हा उतारा राज्य सरकारने केन्द्राकडून 45 ते 50 टक्के करुन घेतला पाहिजे.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीपाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

शासनाने वेळोवेळी काळी ज्वारी खरेदी केलेली आहे. कोकणातील भात पावसामुळे भिजला आहे, तो खरेदी करण्याची कामगिरी राज्य शासनाकडून झाली पाहिजे. राज्यातील काही भागात भिजलेला कापूस आहे तो शासनाने खरेदी केला पाहिजे. या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाने या संदर्भातील धोरण सभागृहात जाहीर करावे अशी मी या ठिकाणी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी व माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

अवकाळी पावसाच्या निमित्ताने ही चर्चा उपस्थित झालेली आहे. एकीकडे अस्मानी संकटाने शेतकरी मरतो आहे आणि दुसरीकडे सुल्तानी संकटाने दिवसेंदिवस कर्जाच्या डोंगरामध्ये आकंठ बुडत आहे. सरकार केवळ घोषणा करते की, आम्ही शेतकऱ्यांना मदत करणार आहोत. मला संशय आहे, आजपर्यंत ज्या पध्दतीने विदर्भामध्ये घोषणा होऊन शेतकरी लुबाडला गेला त्याच पध्दतीने शेतकऱ्यांची फसवणूक होते की काय? शासनाने जो जी.आर.काढला आहे तो अतिवृष्टीसंबंधीचा आहे. अतिवृष्टी आणि अवकाळी पाऊस यामध्ये फरक आहे. अतिवृष्टी म्हणजे पावसाळ्यात झालेल्या पावसाचा तो अंदाज असतो आणि अवकाळी पाऊस म्हणजे पावसाळ्याचा कालावधी संपल्यानंतर झालेला पाऊस असतो. म्हणून अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात वेगवेगळे जी.आर.काढले पाहिजेत. यापूर्वी गारपीट झाली होती, फयान वादळ आले होते त्यावेळी शासनाने स्वतंत्र जी.आर.काढले होते. परंतु अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत वेगळा जी.आर.काढलेला नाही. अतिवृष्टीसंबंधी काढलेल्या जी.आर.मधील अटींमध्येच सामावून घेण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही यावर आमचा ठाम विश्वास आहे.

सभापती महोदय, 24 तासात किमान 65 मि.मि.पाऊस झाला तर अतिवृष्टी झाली असे समजण्यात येते. याठिकाणी अतिवृष्टीचा प्रश्नच उपस्थित होत नाही. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत पाऊस झालेला नव्हता. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवडयात आणि नोव्हेंबर महिन्यात प्रचंड पाऊस झाला. 30 सप्टेंबरपर्यंत पावसाळ्याची मुदत असते ती संपल्यानंतर पाऊस झाला. उभ्या पिकाच्या नुकसानीची आकडेवारी गोळा करण्याबाबत जी.आर.मध्ये नमूद केले आहे. अवकाळी पावसामुळे कुठेही उभे पीक अस्तित्वात राहिलेले नाही. सर्व पीक आडवे झाले आहे. तहसीलदारांना विचारले की, शेतामध्ये असलेले पीक आडव्या स्थितीत आहे, उभे पीक नसल्यामुळे नुकसानीची आकडेवारी कशी गोळा करणार? त्यांचे म्हणणे असे की, आम्ही केवळ उभ्या पिकाची नोंद घेणार आहोत. या वादात शेतकरी आडवा होणार आहे. त्यामुळे नव्याने जी.आर.काढणे आवश्यक आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. सर्व्हे कसा करणार आहात?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे धान पीक उद्ध्वस्त झाले. धान पीक जमिनीवर आडवे पडले. तीन दिवस सतत पाऊस झाला होता. परंतु 24 तासात 65 मि.मि.पाऊस झालेला नव्हता. तीन दिवसात झालेल्या पावसाचे मोजमाप करणारी यंत्रणा सरकारकडे उपलब्ध नाही. 24 तासात 65 मि.मि.पाऊस झालेला नाही. तीन दिवसात खूप पाऊस झाल्यामुळे फार मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. धानाचे पीक मातीमध्ये दबले गेले. त्याला कोंब आले, भात काळा पडल्यामुळे कोणी खरेदी करायला तयार नाही. आता शासनाकडून सांगितले जाईल की, भात काळा पडल्यामुळे दारु निर्मिती करणाऱ्या कारखान्यांकडे पाठवावा. तो भात दारु निर्मिती करणाऱ्या कारखान्याकडे गेला तरी शेतकरी मात्र उपाशी मरणार आहे. त्याचा विचार करायला कोणी तयार नाही. अद्याप सर्व्हे झालेला नाही. कितीही म्हटले तरी सरकारकडे उपलब्ध झालेली आकडेवारी बोगस आहे. याचे कारण असे की, कृषि आयुक्तालयाने नोव्हेंबर महिन्यात आराखडा घोषित केला. तो आराखडा माननीय कृषिमंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे सादर करण्यात आला. मंत्रीमहोदयांसमवेत पुणे येथील मुख्यालयामध्ये बैठक झाली. त्या आराखड्यामध्ये राज्यातील पाच जिल्हयांचा उल्लेखच केलेला नाही. यवतमाळ, चंद्रपूर, वाशिम, अकोला व बुलढाणा हे ते पाच जिल्हे आहेत. या जिल्हयांमध्ये अवकाळी पाऊस झालेला नसल्यामुळे नुकसान झालेले नाही असे कृषि आयुक्तालयाचे म्हणणे आहे. सगळ्यात जास्त नुकसान धान पिकाचे झाले आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील हे जाहीरपणे सांगितले आहे. असे असूनही कृषि आयुक्तालयाने या पाच जिल्हयांचा आराखड्यामध्ये समावेश केला नसेल तर आम्हाला न्याय कोण देणार? आता सर्व्हे कसा करणार आहात? याचे स्पष्टीकरण सभागृहाला दिले पाहिजे. आडव्या पिकाचा सर्व्हे करणार आहात की, झालेल्या नुकसानीचा सर्व्हे करणार आहात? शासन कशा पध्दतीने शेतकऱ्यांना न्याय देणार आहे? अत्यंत दु:खाने सांगावे लागते, शेतकरी एवढा हतबल झाला आहे की, शासनाकडून न्याय मिळेल याची त्याला शाश्वती नाही. पहिल्यांदा शेतकरी अतिवृष्टीमुळे मेला आणि आता अवकाळी पावसामुळे मरतो आहे. अद्याप शेतकऱ्यांच्या नुकसानीचा सर्व्हे झालेला नाही.

नंतर एल.1...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

या अतिवृष्टीमुळे आमच्याकडे जवळपास 221 घरे पडली व घर मालकांनी मागणी केली की तीन दिवसाच्या पावसामुळे आमची घरे पडली म्हणून नुकसान भरपाई देण्यात यावी. तहसीलदारांनी सांगितले की, 24 तासात 65 मि.मि. पाऊस पडलेला नसल्याने आपल्याला मदत करु शकत नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी कसे जगावे. राज्यात 70 टक्के शेतकरी असून त्याला न्याय मिळत नसेल तर त्याने जगावे तरी कसे ? याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. आज राज्यात खरिपाचे पीक नष्ट झाले आहे. आमच्याकडे लाखोली डाळीची लागवड केली जाते, गव्हाची पेरणी करतात पण अतिवृष्टीमुळे ही पेरणी करणे शक्य झाले नाही. तसेच पावसाचे प्रमाण जास्त झाल्यामुळे पाण्याची थोडी सुबत्ता असली तरी रब्बीचे पीक घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या विजेचे कनेक्शन्स तोडण्यात आले आहेत. मी प्रामाणिकपणे सांगू इच्छिते की, शेतकऱ्यांची विजेची बिले माफ करण्याबाबत सन 2004 मध्ये शासनाने घोषणा केली होती व त्यापोटी 15 हजार कोटीची रक्कम अजुनही वीज मंडळाला दिलेली नसल्याने वीज मंडळाने शेतकऱ्यांच्या विजेचे कनेक्शन्स तोडून ही वसुली सुरु केली असल्याचे विजेचे अधिकारी सांगतात, परंतु शासन मान्य करीत नाही. ही गोष्ट आम्हाला मान्य आहे कारण वर्तमानपत्रातूनच यासंबंधीची घोषणा झाली होती व एमएसईबीचे अधिकारी सुध्दा सांगतात की आम्हाला शासनाकडून ही रक्कम मिळाली नसल्याने विजेचे कनेक्शन्स तोडून वसुली सुरु केलेली आहे. राज्यात अशी किती वीज बिले असतात ? याचाही आढावा घेतला पाहिजे. माझ्या माहितीनुसार राज्यात एकूण 28 लाख शेतकऱ्यांकडे फक्त 28 टक्के एवढीच वीज वापरली जाते आणि या 28 टक्के शेतकऱ्यांना कोणीच गॉड फादर नाही म्हणून त्याला कोणी मदत करणार नाही. त्यामुळेच त्याची विजेची कनेक्शन्स कापण्यासाठी एमएसईबीचे अधिकारी धावतात. पण 46 टक्के विजेचा वापर करणाऱ्या लोकांची कोट्यवधीची बिले थकित असताना त्यांच्याकडे जाण्याची कोणाचीही हिंमत नाही. ज्याप्रमाणे यज्ञात बळी बोकडाचा असे आपण म्हणतो तीच परिस्थिती आज शेतकऱ्याची झाली असून त्यात ग्रामीण भागातील युवक व शेतकरी यांचाच बळी जात आहे. अशा प्रकारे अन्याय करण्याची साखळी सतत राहिली तर या शेतकऱ्याला कोण वाचविणार आहे ? तो आत्महत्त्या करणार नाही तर काय करणार आहे ? याचा विचार शासनाने केला पाहिजे. बाकीच्यांना इज्जत नसेल पण शेतकरी हा इज्जतदार आहे आणि तो डोक्यावर कर्ज घेऊन मरायला तयार आहे. कोणताही शेतकरी खुशीने आत्महत्त्या करीत नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

पण त्याला वाटते की, मी मेल्यानंतर समाजामध्ये किमान माझ्या मुला-बाळांना तरी स्थान मिळणार, म्हणून तो आत्महत्त्या करतो. मला दाखवा कोणत्या उद्योजकाने आत्महत्त्या केली, कोणत्या लिडरने आत्महत्त्या केली ? आमचा शेतकरी सुध्दा आत्महत्त्या करायला तयार नसतो पण त्याच्यावर तशी परिस्थिती आणली जाते म्हणून नाईलाजाने त्याला आत्महत्त्या करावी लागते, ती त्याला टाळता येत नाही.

सभापती महोदय, सहकारी बँकांच्या बाबतीत शासनाने घोषणा केली. त्यानुसार 30 जूनपर्यंत जो कर्जाची रक्कम भरेल त्याला जुलै महिन्यात 50 हजार रुपयापर्यंतचे कर्ज बिनव्याजी मिळणार, त्यावरील संपूर्ण व्याज माफ करणार. यासंदर्भात मी एक तारांकित प्रश्न टाकला होता की शासनाने घोषणा केल्यानुसार कोणत्याही बँकांकडे आवश्यक तो जी.आर. पाठविलेला नाही अथवा बँकांना पैसे मिळाले नाहीत. परंतु मला उत्तरात असे सांगण्यात आले की, शासनाने जी घोषणा केली ती सन 2009-10 व सन 2010-11 साठी नसून सन 2011-12 साठी लागू होत आहे. अशा प्रकारे सन 2011-12 साठी आपण घोषणा करीत असाल तर ती रक्कम आमचे श्राध्द करायला आम्ही मागत आहोत, की मरायच्या अगोदर जिवंत ठेवण्यासाठी मागत आहोत ? हे स्पष्ट झाले पाहिजे. अशा प्रकारच्या फसवणूक करणाऱ्या घोषणा शासन कशाला करीत आहे याचे उत्तर देणे आवश्यक आहे. कारण शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेले पॅकेज शेतकऱ्यापर्यंत पोहचत नाही त्यामुळे शासनाने केलेली एकही घोषणा शेतकऱ्याला जीवदान देण्याच्या लायकीची राहत नाही. आजही शासनाकडून घोषणा होत आहेत परंतु त्या घोषणांवर जनतेचा आता विश्वास राहिलेला नाही. कारण आम्हाला अशा घोषणांमुळे मदत मिळेल, ओला दुष्काळ जाहीर होईल आणि आपली तोडलेली कनेक्शन्स पुन्हा जोडण्यात येतील एवढाही विश्वास शेतकऱ्यांचा व जनतेचा शासनावर राहिलेला नाही. हा विश्वास शासनाला पुन्हा संपादन करावयाचा असेल तर ताबडतोब ओला दुष्काळ जाहीर करावा आणि अवकाळी पावसाने नुकसान झाल्यामुळे मदत देण्यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करावा अशी माझी सूचना आहे. अशी मदत देत असताना एकरी 10 हजारपेक्षा कमी असणार नाही याची दक्षता घेऊन शेतकऱ्याला जीवदान द्यावे. असे केले नाही तर हा 70 टक्के शेतकरी मरेल आणि शेतकरी मेला तर जनता सुध्दा शिल्लक राहणार नाही याचाही विचार शासनाने करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसैन दलवाई (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, गेल्या दोन दिवसांपासून या सभागृहात अवकाळी पावसाने राज्यात झालेल्या नुकसानीबाबत चर्चा सुरु आहे. खरे म्हणजे पहिल्या दिवसापासूनच ही चर्चा सुरु झाली असती तर बरे झाले असते पण त्यावर मी बोलणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचे भाषण अतिशय चांगले झाले. त्यांना अधिक वेळ मिळाला असता तर बरे झाले असते. या अवकाळी पावसाच्या संबंधात त्यांनी एक मुद्दा उपस्थित केला तो बरोबर आहे. अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टी यामध्ये फरक झाला पाहिजे असे माझेही म्हणणे आहे. यावेळचे संकट आसमानी संकट आहे. विशेष करुन एक-दोन जिल्हा अथवा एखादा विभाग एवढेच मर्यादित हे संकट नाही तर आमच्या सावंतवाडीपासून चंद्रपूरपर्यंत सर्वच जिल्हे त्यात येतात, काही जिल्हेच येतात असे नाही....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ D/ KGS/ MMP/ KTG/ प्रथम श्री.खर्चे.... 11:00

(सभापतीस्थानी मा.तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)

श्री. हुसेन दलवाई...

सभापती महोदय, अशा त-हेचे संकट महाराष्ट्रावर यापूर्वी आलेले मी तरी पाहिले नाही. या अवकाळी पावसामुळे द्राक्ष, भात, कापूस अशा किती तरी पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. एवढया मोठया प्रमाणात झालेले नुकसान लक्षात घेऊन शासनाने पॉझीटीव्ह भूमिका घेतल्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो, स्वागत करतो. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांनी चांगले मुद्दे उपस्थित केलेले आहेत परंतु तशा प्रकारची उदारता तुकच्याकडे नसल्यामुळे तुम्ही हे मान्य करु शकणार नाही. आपल्याकडे जर उदारता असती तर त्यांचे म्हणणे तुम्ही मान्य केले असते. आपल्याकडे हळू हळूका होईना उदारता येईल अशी आका करतो. अवकाळी पाऊस सर्व राज्यात पडल्यामुळे काल या सदनात माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी असे जाहीर केले की, मागील जी काही बाकी राहिलेली आहे मग ती युती सरकाच्या काळापासून राहिलेली असली तरी सुध्दा ती देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. जी काही 250 कोटी रुपयांची थकबाकी आहे ती मार्च महिन्याच्या अगोदरपर्यंत दिली जाईल असे आश्वासन माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या ठिकाणी जे आश्वासन दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, कोकणातील भाताचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. कोकणामध्ये भाताचा दाणा मिळणार नाही अशी अवस्था आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी सांगितले की, विदर्भात अवकाळी पावसामुळे भात शेतीचे तसेच धानाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. अतिवृष्टीमुळे धान आणि भात काळा पडला आहे. परंतु आमच्या कोकणात भात काळा पडला नसून औषधाला सुध्दा मिळणार नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कोकणामध्ये हळवे भात पिकाचे नुकसान झाले आहे तसेच मागास भाताचे सुध्दा संपूर्ण नुकसान झालेले आहे. कोकणामध्ये आता औषधालाही भात शिल्लक राहिलेला नाही. कोकणामध्ये भाताचा दाणा सुध्दा आज शिल्लक राहिलेला नाही. त्यामुळे कोकणातील भाताचे अब्जावधी रुपयांचे नुकसान झालेले आहे. सभापती महोदय, संपूर्ण राज्यात जी अतिवृष्टी झाली,पाऊस झाला त्याबाबत मला एक एसएमएस आलेला आहे तो मी आपल्याला वाचून दाखवतो. "There is a technical problem- there won't be winter & summer this year; rainy-season will last up to September, 2011. Please co-operate. -God."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई...

ग्लोबल वॉर्मिंगमुळे निसर्गाचे संतुलन बिघडत चालले आहे. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात काही तरी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यात जी अतिवृष्टी झाली त्याबाबत शासनाने भरीव मदत करणे गरजेचे आहे. शासनाने शेतक-यांना भरीव मदत करावी हे मी पुन्हा पुन्हा सांगतो आहे.

सभापती महोदय, शेतक-यांच्या विजेची कनेक्शन्स जोडणीच्या संदर्भात काहीच केले नाही असे म्हणणे चुकीचे होईल. विजेची वसुली होता कामा नये अशी भूमिका घेणे योग्य होणार नाही. उद्योग धंद्यावाल्यानी विजेचे बिल भरले नाही तर शासनाने सुध्दा त्याबाबत कडक धोरण स्वीकारलेले आहे. विजेचे बिल भरले नाही तर एमएसईबी जिवंत राहणार नाही. त्यामुळे विजेच्या संदर्भात सूचना करु इच्छितो की, महाराष्ट्रावर अनन्य साधारण संकट आल्यामुळे रब्बीचे पीक जोपर्यंत येत नाही तोपर्यंत विजेची कनेक्शन तोडली जाऊ नये, व आता जी काही वीज कनेक्शन्स तोडलेली आहेत ती त्वरित जोडण्यात यावी व रब्बीचे पीक येईपर्यंत ती तोडली जाऊ नये. शेतक-याचे रब्बीचे पीक आल्यानंतर म्हणजे एप्रिल, मे नंतर तुम्हाला काय करावयाचे ते करा परंतु रब्बीचे पीक येईपर्यंत शेतक-याचे वीज कनेक्शन्स तोडले जाऊ नये. या ठिकाणी मी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्याची शासनाने जरुर ती नोंद घ्यावी अशी विनंती आहे. या ठिकाणी विजेच्या संदर्भात मी जो काही मुद्दा मांडला आहे तो मुद्दा माझ्या अगोदरच्या कोणत्याही वक्त्याने मांडलेला नाही त्यामुळे या मुद्याची शासनाने नोंद घ्यावी व शेतक-यांना मदत करावी अशी माझी कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये आंबा पिकाचे मोठया प्रमाणात उत्पादन होत असते. कोकणात पडलेल्या अतिवृष्टीमुळे आंब्याला आलेला मोहर गळून पडल्यामुळे आता जे काही आंब्याचे पीक आलेले आहे ते फार कमी प्रमाणात आलेले आहे. कोकणात अतिवृष्टीमुळे हापूस आंब्याचे फार मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे.

यानंतर श्री. अजित...

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखाची नाही

श्री.हुसेन दलवाई.....

कोकणातील माणसाप्रमाणे कोकणातील आंबा फळ देखील सेन्सेटीव्ह आहे. तो अशा संकटांना तोंड देऊ शकत नाही. भात, द्राक्ष, कापूस इत्यादी शेतींच्या नुकसानी बाबत निर्णय घेत असताना कोकणातील आंबा शेतीचा सुध्दा विचार झाला पाहिजे. याठिकाणी सांगण्यात आले की, शेतकऱ्यांना किमान 10 हजार रुपयांप्रमाणे मदत मिळाली पाहिजे. माझी सरकारला अशी विनंती आहे की, शेतकऱ्यांना आणि फळ बागायतदारांना पुन्हा उभे करण्यासाठी त्यांना भरघोस मदत करावी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधानपरिषद नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेवर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, "पावसाची नजर आणि पावसाची लहर, निसर्गाची दया आणि निसर्गाची माया" यावर शेती अवलंबून आहे. "नेमिची येतो मग पावसाळा" या उक्तीप्रमाणे शेतीच्या संदर्भात प्रतिवर्षी आपण येथे चर्चा करतो. याठिकाणी माननीय कृषी मंत्री उपस्थित आहेत. राज्याचे कृषीचे बजेट एकूण बजेटच्या अर्धा ते एक टक्का आहे आणि शेतीवर 70 टक्के लोक अवलंबून आहेत. दोन-तीन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात एक आकडेवारी प्रसिध्द झाली होती. त्यामध्ये नमूद करण्यात आले होते की, हजार लोकांची संख्या विचारात घेतल्यास कृषीवर 450 लोकांना रोजगार मिळतो. उद्योगामध्ये हजार माणसांमागे 180 लोकांना रोजगार मिळतो, सेवाक्षेत्रात हजार माणसामागे 78 लोकांना रोजगार मिळतो, बांधकाम क्षेत्रात हजार माणसामागे 78 लोकांना रोजगार मिळतो. ही आकडेवारी लक्षात घेतल्यास हजार माणसामागे 450 जणांना रोजगार देणाऱ्या शेतीच्या बाबतीत आपण कोणता निर्णय घेणार आहोत या दृष्टीने सरकारने विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांना दुष्काळामध्ये,ओल्या दुष्काळामध्ये किंवा अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे, हे ठीक आहे. परंतु हा त्यावर कायम स्वरुपी उपचार नाही. याठिक्राणी माननीय कृषी मंत्री उपस्थित आहेत. अशा प्रकारच्या उद्भवणाऱ्या परिस्थितीवर कायम स्वरुपी तोडगा काढण्यासाठी दोन्ही सभागृहातील सदस्यांना एकत्र आणून याबाबत कसा तोडगा काढता येईल किंवा शेतीत कशाप्रकारे सुधारणा करता येईल याबाबत विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, विलंबाने येणारा पाऊस, गणपती सणानंतर न येणारा पाऊस,अनियमित पाऊस, एकाच दिवशी फार पडणारा पाऊस, दोन पावसानंतर काही दिवसाच्या अंतराने पडणारा पाऊस, अवकाळी पाऊस, लांबलेला पाऊस याचे उत्तर जसे शेतकऱ्यांकडे नाही तसेच ते सरकारकडे देखील नाही, हे उत्तर शोधावयाचे आहे.

सभापती महोदय, शेती करणे हा सर्वात मोठा जुगार आहे. शेतकरी शेतीमध्ये पैसे टाकतो. परंतु त्याला नांगरणीसाठी बैल मिळत नाहीत, ट्रॅक्टर महाग झालेले आहेत. औत 500-600 रुपयांना देखील मिळत नाही. शेतीसाठी मजूर मिळत नाही. मजूर शोधण्यासाठी आदल्या दिवशी बाहेर पडावे लागते आणि अशा परिस्थितीमध्ये पावसाने झोडपले तर शेतकऱ्यांनी जायचे कोठे ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे भात शेतीचे नुकसान झाले. भात पीक आडवे झाले. त्याचा आपण पंचनामा करु शकत नाही अशी परिस्थिती आहे. तशीच परिस्थिती कापसाच्या बाबतीत आहे. पावसामुळे कापसाचा बोंड काळा पडला. कापसाचे उत्पादन झाले परंतु बोंड काळा पडल्यामुळे त्याचा भाव गेला. या अवकाळी पावसामुळे कांदा, द्राक्ष पिकांचे देखील नुकसान झालेले आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे म्हणाले की, कोकणात आंब्याचा मोहोर येतो, परंतु अवकाळी पावसामुळे आता आंब्यास मोहोर येणार नाही, तेव्हा आंबा शेतकऱ्यांना शासन कशी मदत करणार आहे ?

यानंतर श्री.गायकवाड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

आज कोकणात आंबा येणार नाही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली तर त्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत देखील शासनाने विचार केला पाहिजे. असे मला त्यांनी सांगितले होते. जळगाव जिल्हयातील काही तालुके असे आहेत की त्या तालुक्यामध्ये दोन तीन महिन्यातून वादळ येत असते. रावेर, यावल,चोपडा आणि शिरपूर या तालुक्यामध्ये सतत वादळ येत असते त्या सदर्भात शासन अभ्यास करणार आहे किंवा नाही या बाबतीत या सभागृहात दोन तीन वेळा विचार मांडले होते .जळगाव जिल्हयात तीन चार महिन्यातून सतत वादळ, गारपीट, महापूर, अवकाळी पाऊस येतो आणि शेतक-याच्या पिकांचे आणि फळाचे मोठया प्रमाणावर नुकसान होत असते परंतु शासन असे म्हणते की वर्षातून फक्त एकदाच मदत दिली जाईल. एकदा वादळ झाले आणि नुकसानग्रस्त शेतक-यांना मदत दिली त्यानंतर दोन महिन्याने पुन्हा वादळ आले तर संबंधित शेतक-यांना नुकसान दिले जाणार नाही. कोणत्याही राज्यात कोणत्याही पक्षाचे सरकार जरी असले तरी शेतक-यांना संपूर्ण नुकसान भरपाई देऊ शकत नाही परंतु या बाबी लक्षात घेऊन या बाबतीत काय करता येईल हे पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, जळगाव जिल्हयात केळीचे पीक मोठया प्रमाणावर घेतले जात होते पंरतु आता या जिल्हयातील शेतकरी केळी ऐवजी आले पिकवायला लागले आहेत. गारपीटीमुळे केळीचे नुकसान मोठया प्रमाणावर होते. आले पिकविण्यासाठी एकरी एक लाख रुपये खर्च येतो परंतु त्यातून तीन ते चार लाख रुपये उत्पादनसुध्दा मिळते. गारपीटीमुळे केळीचे नुकसान होते म्हणून केळी पिकवावयाच्याच नाहीत काय ? कापसाचे नुकसान होते म्हणून कापूस पिकवावयाचा नाही काय ? या सदर्भात आपण कसे पुढे जाणार आहोत याचा विचार केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, अमळनेर, रावेर आणि चोपडा या तीन तालुक्यामध्ये 11 जानेवारी 2010 रोजी शेतीचे जे नुकसान झाले होते त्या शेतक-यांना अद्यापी नुकसान भरपाईचे पैसे मिळालेले नाहीत या संबंधीची अर्धा तास चर्चा कालच्या कामकाज पत्रिकेमध्ये दाखविण्यात आली होती. अशा प्रकारे एक एक वर्ष नुकसान भरपाईचे पैसे मिळत नाही. केळीच्या एका झाडाचे नुकसान झाल्यावर पाच रुपये आर्थिक सहाय्य दिले जाते आणि शेतातील केळीचे झाड ट्रॅक्टरने बांधावर आणण्यासाठी पाच रुपये मजुरी द्यावी लागते अर्थात हा खर्च सरकारने द्यावा असे मी म्हणत नाही परंतु या सदर्भात शासन काही उपाययोजना करणार आहे किंवा नाही या संबंधी शासन काही

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी ...

निर्णय घेणार आहे किंवा नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे. शेतकरी काही भिकारी नाही. तो रस्त्यावर येऊन भीक मागत नाही परंतु आम्ही लोकप्रतिनिधी म्हणून या विषयासंबंधीची चर्चा सभागृहात उपस्थित करीत असतो. या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय कृषी मंत्र्यांना असे सांगावयाचे आहे की ,महाराष्ट्राची कृषी अर्थ व्यवस्था बळकट करणे ही काळाची गरज आहे या संदर्भात शासनाचे प्रयत्न अपुरे पडतात असे मला वाटते. अवकाळी पावसामुळे राज्यातील 26 जिल्हयामध्ये शेतीचे कोटयावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. हजारो किंवा लाखो रुपयांची मदत त्याकरता मिळेल व त्यासाठी जी.आर काढावा लागेल असेही सांगण्यात आले. अवकाळी पावसाच्या संदर्भात या पूर्वी कधीही चर्चा झालेली नाही. मी जवळजवळ 25 वर्षा पासून खालच्या आणि वरच्या सभागृहाचा सदस्य आहे परंतु या दोन्ही सभागृहात अवकाळी पडलेल्या पावसासंबंधी कधीही चर्चा झाल्याचे मला आठवत नाही या दृष्टीकोनातून मी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती करतो की, कृषी विभागाचे बजेट वाढविण्यात आले पाहिजे. तसेच महाराष्ट्राची कृषी अर्थ व्यवस्था बळकट करण्यात आली पाहिजे, तसेच शक्य असेल तर कृषीसाठी वेगळा अर्थसंकल्प तयार केला गेला पाहिजे अर्थात ही बाब सोपी नाही याचे कारण असे की, कृषी विषय म्हटल्यानंतर त्यामध्ये ऊर्जा, पाटबंधारे हे विभागसुध्दा येतील, शेताकडे जाणा-या रस्त्याचासुध्दा विषय त्यात येईल. हे सर्व विषय एकत्रित कसे करता येईल हे पाहण्यासाठी त्याचा अभ्यास करण्यात यावा असे मला सांगावयाचे आहे. रेल्वेचा अर्थसंकल्प वेगळा असतो परंतु 70 टक्के लोक ज्या शेती व्यवसायावर अवलंबून आहेत आणि दर हजारी 450 लोकांना या व्यवसायातून रोजगार मिळतो त्याकरता मात्र वेगळा अर्थसंकल्प सादर केला जात नाही तेव्हा कृषी विभागासाठी स्वतंत्र अर्थसंकल्प सादर केला पाहिजे आजच्या अर्थसंकल्पात कृषीकरता एक टक्क्या पेक्षा जास्त निधी दिला जात नाही कालच माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार यांनी 250 कोटी रुपयाचे देणे ताबडतोब देण्यात येईल असे सांगितले आहे. या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की नुकसानीचे पंचनामे झाल्यानंतर दोन महिन्याच्या आत शेतक-याला आर्थिक सहाय्य देण्यासंबंधीचा कायदा करण्यात यावा. आर्थिक मदत देण्याच्या बाबतीत केवळ जी.आर.न काढता कायदा करणे आवश्यक आहे आणि पंचनामे झाल्यानंतर 60 दिवसाच्या आत संबंधित शेतक-याला नुकसान भरपाईचे पैसे मिळाले पाहिजेत. आज अशी स्थिती आहे की, एक एक वर्ष शेतक-यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नुकसानभरपाईचे पैसे मिळत नाहीत मागच्या वेळी जे नुकसान झाले त्याचे अद्याप मिळालेले नाहीत मागचा खरीप हंगाम गेला. त्यानंतर रब्बीचा हंगाम गेला तरीसुध्दा पैसे मिळालेले नाहीत. माननीय कृषी राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांना मला असे सांगावयाचे आहे की, ठिबक आणि तुषार सिंचनासाठी शेतक-यांना सबसिडी देण्यात येते अल्प भू धारक शेतक-यांना 90 टक्के सबसिडी दिली पाहिजे. त्याचबरोबर शेतीसाठी ॲशुअर्ड वॉटर ॲन्ड ॲशुअर्ड इलेक्ट्रीसिटी मिळाली पाहिजे.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

हे अस्मानी व सुल्तानी संकट आपल्या हातामध्ये नाही, परंतु त्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

माझी आपणास विनंती आहे की, आकस्मिकता निधीमधील रक्कम कमी पडत असेल तर ती रक्कम आपण वाढविली पाहिजे. त्याचा आपण विचार करावा. त्याचप्रमाणे ड्राऊट रेझिस्टन्स सीड बाबत मी मध्यंतरी आपणास विनंती केली होती. एकदा पाऊस पडल्यानंतर पुढे महिनाभर पाऊस पडला नाहीतरी त्या शेतामध्ये पीक येईल, त्या शेतामध्ये बियाण्यांची पुन्हा पेरणी करण्याची आवश्यकता भासणार नाही अशाप्रकारचे सीड निर्माण करण्याच्या संदर्भात संशोधन होणे अत्यंत महत्वाचे आहे. अवकाळी पाऊस आला किंवा पाऊस कमी-जास्त आला तरी ते पीक टिकेल. अशाप्रकारचे बियाणे आपल्याला कसे निर्माण करता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्याचप्रमाणे वेधशाळेला अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. राज्य सरकारने दिवसातून तीन वेळा टी.व्ही. चॅनेलवर पुढील तीन दिवसांमध्ये राज्याचे हवामान कशाप्रकारचे रहाणार आहे हे सांगितले पाहिजे. तीन दिवसानंतर जर खानदेशामध्ये पाऊस पडणार असेल तर कापसाची वेचणी करण्याचा प्रयत्न सरकार करील. तुम्ही "महाराष्ट्र माझा"सारखा कार्यक्रम टी.व्ही. वर पहाता. त्यामुळे या चॅनेलवर पुढील तीन दिवसाचे विदर्भातील हवामान कसे रहाणार आहे गारपीट होणार आहे काय, पाऊस पडणार आहे काय, वादळ येणार आहे काय? अशाप्रकारचे वृत्त दिवसातून तीन वेळा सांगितले गेले पाहिजे. शेतकऱ्याने अवकाळी पाऊस पडण्यापूर्वी शेतामधील कापूस वेचून विकला तर त्याला रु.4500 चा भाव मिळतो व पाऊस पडल्यानंतर तिसऱ्या दिवशी कापूस विकला तर त्याला 4 हजार रुपये भाव मिळतो. त्याचबरोबर शेतकऱ्याचा काही माल खराब झाल्यामुळे ते विकू शकले नाहीत. त्याकरिता टी.व्ही. चॅनेलवाल्यांनी व शासनाने याबाबत विचार करावा अशी विनंती करतो.

दुसरा महत्वाचा विम्याच्या संदर्भातील भाग आहे. शासनाने विमा पध्दत मजबूत केली पाहिजे. राज्यामध्ये आर्थिक संकट येऊ दे नाहीतर अस्मानी व सुल्तानी संकट येऊ दे. त्या शेतकऱ्याला विम्याच्या माध्यमातून नुकसान भरपाईचे पैसे मिळाले पाहिजेत. महाराष्ट्र ॲग्रिकल्चर क्रॉप इन्शुरन्स ॲक्ट हा आपल्याला तयार करता येतो काय, त्याला केंद्र सरकारची मंजुरी लागते काय, हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीतील आहे की, केंद्र सरकारच्या अखत्यारीतील आहे की, कंकरन्स लिस्टमधील आहे, याचा आपण एकदा अभ्यास तरी करु या. आम्ही केळीच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. अरुण गुजराथी...

एका झाडाचा दहा ते पंधरा रुपयांचा प्रिमियम भरण्यास तयार आहोत. परंतु आपणाकडून विम्याची मजबूत व्यवस्था केलेली नाही. म्हणून त्याकरिता विमा व्यवस्था आपण मजबूत केली पाहिजे. प्रत्येक वेळी संकट आले की, शासनाने नुकसान भरपाई वाढवून दिली पाहिजे अशी दोन्ही बाजूंनी मागणी केली जाते. परंतु या संदर्भात एकदा आपण हा महत्वाचा निर्णय घेतला पाहिजे. शेतकऱ्यांच्या संदर्भातील या तीन-चार महत्वाच्या बाबी लक्षात घेतल्या तर आपण त्यांच्यासाठी काहीतरी करु शकलो याचे समाधान आपल्याला मिळेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांचे लक्ष या चर्चेकडे लागले आहे. दरवर्षी विदर्भामध्ये हे अधिवेशन भरविले जाते. या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा केली जाते व त्यानंतर या विदर्भासाठी एक पॅकेज जाहीर केले जाते. त्या जाहीर केलेल्या पॅकेजचा फायदा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला असेल असे समजून आपण याठिकाणी बोलत असतो आणि त्यानंतरच्या येणाऱ्या मार्च महिन्यातील अधिवेशनामध्ये आपल्यासमोर जी माहिती येते, ती जर पाहिली तर या अधिवेशनामधून आपण नक्की काय साध्य करीत आहोत असा प्रश्न उपस्थित करावासा वाटतो?

सभापती महोदय, दै. देशोन्नतीमध्ये या अवकाळी पावसाच्या संदर्भात छापून आलेले वृत्त अतिशय महत्वाचे आहे. त्याबाबत विरोधी पक्षाकडे पुरेशी माहिती असल्यामुळे या जाहीर झालेल्या वेगवेगळया पॅकेजमधील निधी योग्य प्रकारे वापरला जात नसल्याचे दिसते. विदर्भासाठी जाहीर झालेला 1193 कोटी रुपयांचा निधी पडून आहे, तो युती सरकारच्या काळापासून आहे काय? असे मघाशी माननीय सदस्य म्हणाले आहेत. परंतु मला त्यांच्या गैरसमजावर प्रकाश टाकण्यासाठी सांगावयाचे आहे की, माजी मुख्यमंत्री माननीय श्री. अशोक चव्हाण साहेबांनी गेल्या वर्षी अमरावती विभागासाठी 4800 कोटी व नागपूर विभागासाठी 5200 कोटींच्या पॅकेजची घोषणा केली होती. प्रत्यक्षात सन 2009-10 या वर्षामध्ये 1838 कोटी व चालू वर्षामध्ये 1158 कोटी रुपये देण्यात आले. त्यापैकी नागपूर विभागाने गेल्या दोन वर्षात केवळ 1800 कोटी रुपये खर्च केले आणि जलसंपदा विभागाकडे 916 कोटी रुपये खर्च न केल्यामुळे पडून आहेत.

सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न असा निर्माण होतो की, एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत असतांना आपण पॅकेजमध्ये जे पैसे जाहीर करतो त्यांचे प्रत्यक्षात वितरण होत नसेल तर...

(अपूर्ण यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा वेळी शेतकऱ्यांना कशा प्रकारे न्याय मिळणार आहे. म्हणून आमची अशी मागणी होती की, अगोदर सरकारने स्वत:च्या कामाचे मूल्यमापन जाहीर केले पाहिजे. खरेतर डिसेंबर मध्ये अधिवेशन झाल्यानंतर मार्च महिन्यामध्ये अधिवेशन होत असते, त्यानंतर जुलै महिन्यामध्ये अधिवेशन होते. अशा वेळी अनेक सन्माननीय सदस्य आणि मी स्वत: देखील विदर्भातील काही प्रश्न उपस्थित करतो. परंतु केवळ याठिकाणी प्रश्न विचारले आणि निघून गेले असे होऊ नये म्हणून मार्च अधिवेशनामध्ये नागपूर अधिवेशनातील अनेक प्रश्नांच्या बाबतीत मी स्वत:पाठपुरावा करीत असते. इतर सन्माननीय सदस्य देखील पाठपुरावा करीत असतात. परंतु जे पॅकेज जाहीर करण्यात आले होते, त्यापैकी शेतकऱ्यांपर्यंत किती पोहोचले आणि किती पोहोचले नाही याबाबत सरकारकडून कधीही समाधान कारक उत्तर मिळत नाही. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना अशी अपेक्षा होती की, आतापर्यंत सरकारने याबाबतीत कशा प्रकारे मॉनेटरींग केलेले आहे किंवा श्री.नरेंद्र जाधव समितीसाठी सोशल ऑडीट होणार होते, त्याचे पुढे काय झाले आहे याची आम्हाला माहिती मिळावी आणि त्यानंतर या विषयावर चर्चा होणे अपेक्षित होते. पण दुर्दैवाने राजकारणामध्ये वेगवेगळया चर्चा केल्या जातात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे असे म्हणाले की, "युती सरकारच्या काळामध्ये काय झाले हे तुम्ही विसरला असाल." पण मी त्यांना सांगू इच्छिते की, युती सरकारच्या काळामध्ये काय झाले हे आमच्या चांगले लक्षात आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि सन्माननीय सदस्य श्री.सतीश चतुर्वेदी हे लाऊड स्पीकरवर काय बोलत होते, ते आमच्या कानापर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे ते परत नव्याने कोणाला विचारण्याचा प्रश्न नाही. म्हणून विरोधी पक्षावर टीका करीत असताना स्वत: आपण कशा पध्दतीने माणसे गोळा करतो आणि काय करतो व त्या माध्यमातून आपण नक्की कोणता मॅसेज देतो, या सगळया विषयांकडे आमचे देखील लक्ष आहे.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांनी 1 डिसेंबर रोजी जे विधान केले आहे, ते आम्ही "दैनिक सकाळ" च्या नागपूर आवृत्तीमध्ये वाचले. त्यांनी असे म्हटलेले आहे की,शेतकऱ्यांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले.सुमारे 6 हेक्टर शेती पिकाचे 50 टक्क्यापर्यंत आणि 3 लाख 75 हजार हेक्टर शेती पिकाचे 50 टक्क्याहून अधिक नुकसान झाले आहे. जर शासनाचे माननीय मंत्री महोदय "दैनिक सकाळ"या नागपूर आवृत्तीमध्ये राज्यातील ....

. . . .क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेतकऱ्यांचे 50 टक्क्याहून अधिक नुकसान झालेले असे म्हणत असतील तर आमची जी मागणी आहे, त्यानुसार 50 टक्क्यावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची पीक कर्जे माफ करावीत. याबाबतीत सरकारने धोरणात्मक कोणता निर्णय घेतलेला आहे किंवा कशा पध्दतीने निर्णय घेतला जाणार आहे याची माहिती द्यावी, याकडे मला लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब म्हणजे एकरी 25 हजार रुपयापर्यंत नुकसान भरपाई देण्यात यावी.मात्र अशा वेळी मला फळबाग पिकांच्या बाबतीत लक्ष वेधावयाचे आहे. हिवाळी अधिवेशनासाठी विदर्भामध्ये, नागपूर मध्ये आल्यावर प्रत्येक बोर्डवर असे लिहीलेले आहे की,"संत्रा नगरीमध्ये आमदारांचे स्वागत".परंतु प्रत्यक्षात या संत्र्याच्या पिकाची काय परिस्थिती झाली आहे त्याची जर आम्हाला काही खंत, खेद ..... मी पुढचे शब्द वापरत नाही. पण तसे काही वाटत असेल तर संत्रा या फळाचा समावेश नोंदीमध्ये "फळबाग" म्हणून करण्यात आलेला नाही. पीक विम्यामध्ये देखील संत्र्याचे फळ वगळलेले आहे. येथील तीव्र पाणी टंचाई आणि किडीचा प्रादूर्भाव यामुळे संत्रा पिकाचे प्रचंड मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे सरकार संत्रा पिकाच्या बाबतीत कशा प्रकारे नुकसान भरपाई देणार आहे, याबाबत सरकारकडून कोणतीही भूमिका स्पष्ट करण्यात आलेली नाही. धानाचे, तांदूळाचे,कांद्याचे इ.विविध प्रकारच्या शेतीचे नुकसान झालेले असताना, या संत्रा उत्पादकांच्या संदर्भात मदत करण्याच्या दृष्टीने सरकारने ठोस भूमिका जाहीर करावी आणि या पिकाचा फळबागांमध्ये समावेश करावा याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. येथे आमदारांचा फक्त संत्रा ज्यूस पिण्यापुरता संबंध आहे असे घडता कामा नये.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्र्यांची माननीय उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आम्ही 20 तारखेला भेट घेतली. त्यावेळी देखील आम्ही त्यांचे याकडे लक्ष वेधले होते की, सर्व्हेक्षणाची जी पध्दत आहे, त्याबाबतीत नंतर सन्माननीय सदस्यांकडून खूप मोठया प्रमाणात नाराजी व्यक्त होत असते. विशेषत: 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झाल्याबाबत जर माननीय कृषी मंत्री महोदयांनी विधान केले असेल तर त्याबाबत सांगावयाचे तर आज देखील मुळशी तालुक्यामधील माजी आमदार श्री.शरद ढमाले यांनी जे सर्व्हेक्षण केलेले आहे, त्याची आमच्याकडे माहिती आलेली आहे. त्यानुसार 50 टक्क्यापेक्षाही जास्त प्रमाणात शेतीचे नुकसान झालेले आहे. पाऊस पडून जवळजवळ 3 आठवडे होऊन गेले तरी प्रत्यक्षात पंचनामे करण्याच्या बाबतीत काय....

. . . .क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थिती आहे की ती फक्त नजरअंदाज घेण्यापुरतीच मर्यादित आहे हे कळले पाहिजे. अनेक ठिकाणी पालेभाज्यांची पिके सडून गेली आहेत आणि ज्यांनी-ज्यांनी संस्थाकडून कर्ज पुरवठा घेतला होता, त्या संस्थांची परिस्थिती देखील अतिशय वाईट झाली आहे. म्हणून मी आपले लक्ष वेधू इच्छिते की, फळबागांसाठी हेक्टरी 50 हजार रुपये यापध्दतीने मदत देण्याचे जाहीर करावे आणि त्यामध्ये संत्रा, केळी आणि इतर फळबागांच्या संदर्भात देखील विचार करावा. तसेच द्राक्ष उत्पादक सुध्दा आत्महत्या करीत आहेत.त्यामुळे याबाबत देखील सरकारने लवकरात लवकर घोषणा करावी. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी घोषणा करु नये. पण दुर्दैवाने बहुतेक वेळेला शेवटच्या दिवशी घोषणा करुन सरकार येथून निघून जाते .....

श्री.रामदास कदम (खाली बसून) : सरकार पळून जाते ....

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम असे सांगत आहेत की, सरकार पळून जाते आणि ती वस्तुस्थिती आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

मला असे वाटते की, सरकारने या अल्पकालीन चर्चेच्या बाबतीत विरोधी पक्षावर बाजू पलटवण्यासाठी आम्हाला चर्चा मान्य नाही असे म्हटले नाही. नापास असणाऱ्या सरकारचा कोरा पेपर आम्हाला बघायचा नव्हता म्हणून आम्हाला शासनाकडून प्राथमिक परिचय पाहिजे होता. परंतु या चर्चेला संपूर्ण कलाटणी देण्यासाठी वेगवेगळया पध्दतीची विधाने करण्यात येत आहेत. विधानसभेच्या काही सन्माननीय आमदारांचे निलंबन झाल्यानंतर मी काल सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे स्टेटमेंट वाचले. त्यांनी असे म्हटले आहे की, "झाली ती शिक्षा कमीच आहे." म्हणजे विरोधी पक्षाचे अस्तित्व संपवावयाचे आहे की काय? ही कोणती हुकुमशाही आणि आणीबाणीची पध्दत काँग्रेसच्या मनामध्ये आहे याबाबत मला या ठिकाणी प्रश्न उपस्थित करावासा वाटतो. मला या सभागृहाला सांगावेसे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई शिवाय सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांचे विधानपरिषदेत कोणीही समर्थक नाहीत. त्यामुळे त्यांनी या ठिकाणी सारखे बोलू नये. हे सगळे राजकारण करण्यात येऊ नये. यवतमाळमधील जमीन हडपल्याचे एक प्रकरण उघडकीस आले आहे. त्यावर विधानपरिषदेत चर्चा होईल त्यावेळी आपण सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे यांच्या बाजूने कसे उभे रहाता हे मला बघावयाचे आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मुझे इस विषय पर बोलना है. आप बोलने वाले माननीय सदस्यों के नाम पढ़कर बता दीजिए.

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : या अल्पकालीन चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी त्यांची नावे दिली होती त्याप्रमाणे आज सकाळी या सभागृहाचे नेते आणि सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे या सगळयांनी एकत्र बसून बोलणाऱ्या सदस्यांची यादी फायनल केलेली आहे. त्याप्रमाणे दुपारी 12.00 वाजता उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावयाची आहे. या अल्पकालीन चर्चेत सहभागी होणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी यादी फायनल झालेली आहे.

श्री. सय्यद जमा : आपकी यादी में कौन से माननीय सदस्यों के नाम हैं, यह तो बता दीजिए.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही तरी चालेल पण विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली पाहिजे. सत्ताधारी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य या अल्पकालीन चर्चेत सहभागी होऊ इच्छितात त्यांना त्यांच्या सरकारवर विश्वास नाही काय? अवकाळी पावसाच्या संदर्भातील चर्चा दुपारी 12 वाजता संपवायची असे सांगून विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांची कोंडी करण्यात येऊ नये. विरोधी पक्षाला आपली भूमिका मांडू द्यावी.

श्री. सय्यद जमा : आपके द्वारा पेश किए गए प्रस्ताव पर मुझे बोलने का अधिकार है. विरोधी पक्ष के माननीय सदस्य एक घंटा भाषण करते हैं. हमें इस प्रस्ताव पर बोलने के लिए पूरा समय चाहिए.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या सभागृहाचे दोन दिवस फुकट गेलेले आहेत. आम्हाला आपापल्या भागातील विधायक सूचना सरकारला करावयाच्या आहेत. त्यामुळे आम्हाला या अल्पकालीन चर्चेवर बोलू द्यावे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे -पाटील : सभापती महोदय, आजच्या कार्यक्रम पत्रिकेवर या चर्चेसाठी दुपारी 12.45 पर्यत वेळ देण्यात आलेला आहे. 12.30 पर्यंत सन्माननीय सदस्यांना बोलू दिले तरी दुपारी 12.30 ते 1.00 वाजेपर्यंत उत्तराच्या भाषणासाठी वेळ मिळेल. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्यासाठी वेळ दिला पाहिजे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, हमें बोलने के लिए समय चाहिए. जो भी माननीय सदस्य इस विषय पर बोलना चाहते हैं, उन सभी को बोलने का अवसर दीजिए.

तालिका सभापती : 12.00 वाजता उत्तराच्या भाषणाला सुरुवात करण्याचे ठरलेले आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

तालिका सभापती : सभागगृहाचा वेळ वाया चालला आहे. 12.00 वाजता उत्तराच्या भाषणाला सुरुवात करावयाची आहे. सकाळी या सभागृहात सन्माननीय सदस्य, सभागृहाचे नेते आणि सगळे प्रतोद सभागृहात उपस्थित होते. त्या सर्वांनी एकत्र बसून हा निर्णय घेतलेला आहे. काही सन्माननीय सदस्य सभागृहात उशिरा आलेले आहेत. त्यामुळे त्यांना याबाबतची माहिती नाही. त्यामुळे जे ठरलेले आहे त्याप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालवू देण्यात आपण मला मदत करावी.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, आपण म्हणालात ते खरे आहे. काही सन्माननीय सदस्य सभागृहात उशिरा आलेले आहेत. सकाळी 10.00 वाजता ज्यावेळी सभागृहाचे कामकाज सुरु झाले त्यावेळी ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिली होती ते बोलणार होते. सभापती महोदय, मी सकाळी 10.00 वाजता या सभागृहात येऊन परत गेलो आणि पुन्हा या ठिकाणी आलो आहे. कारण मला सुध्दा या विषयावर बोलावयाचे आहे. अवकाळी पाऊस हा कुठच्या विशिष्ट जिल्हयापुरता मर्यादित पडलेला नाही.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

अवकाळी पाऊस संपूर्ण महाराष्ट्रभर पडलेला आहे आणि कोकणातील चारही जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले होते. त्यामुळे आमच्या सूचना शासनापर्यंत पोहोचावयास पाहिजे. जर त्यामध्ये काही अयोग्य असेल तर आपण आम्हाला थांबवावे. आपण सांगितले की, जे सन्माननीय सदस्य उपस्थित होते तेवढेच बोलतील. आमचाही तेवढाच अधिकार आहे. काल महापालिकेच्या संदर्भात छोटेसे विधेयक चर्चेला होते. काल त्या विधेयकावर अडीच तास चर्चा केली. त्या विधेयकावरील चर्चा आपण ऑन लेग ठेवली. अवकाळी पावसाच्या बाबतीत गेले तीन चार दिवस हे अधिवेशन सुरु झाल्यापासून सगळीकडे एक वातावरण निर्माण झाले आहे. बळीराजा शेतकरी वाट पाहात आहे. आम्हाला सुध्दा आमच्या भावना आणि सूचना व्यक्त करण्याची संधी द्यावी अशी आमची विनंती आहे.

श्री. दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, आम्ही अपक्ष सदस्य आहोत. आम्ही बोलण्यासाठी नावे दिलेली आहेत. त्यामुळे आमचा सुध्दा विचार व्हावयास पाहिजे. आम्ही सुध्दा शेतकरी आहोत. आमच्याही भावना आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहामध्ये कोणत्याही प्रस्तावावर चर्चा करीत असताना विरोधी पक्ष, सत्ताधारी पक्ष आणि अन्य पक्ष यांना ठराविक वेळ ठरवून दिलेला असतो. त्या त्या पक्षाच्या प्रतोदांनी जी नावे दिलेली असतील त्या सदस्यांना बोलण्याची संधी द्यावयाची असते. जो वेळ ठरवून दिलेला आहे तो कसा विभागून द्यावयाचा हा त्या त्या पक्षाचा प्रश्न आहे. या सभागृहात आणखी काही सदस्य आहेत त्यांना जो वेळ उरेल त्यातील किमान वेळ दिला पाहिजे आणि सभागृहात मधल्या भागातील जे सदस्य आहेत त्यांनाही बोलण्याची संधी दिली पाहिजे.

तालिका सभापती (श्री. रमेंश शेंडगे) : सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी आपले भाषण सुरु करावे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यात आली आहे त्या चर्चेमध्ये भाग घेत असताना अवकाळी पावसामुळे जे नुकसान झालेले आहे त्यासंदर्भात माझे मत मांडण्यासाठी मी उभा आहे. कोकणामध्ये सरासरी 2700 ते 2800 मिलीमीटर पाऊस पडतो. चालू वर्षी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये जवळपास पाच हजार मिलीमीटर पाऊस पडला. कोकणामध्ये सर्वात जास्त भाताचे पीक घेतले जाते. त्या भातपिकाचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. लोकांना भाताची कापणी सुध्दा करता आली नाही. शासनाने जो सर्व्हे केला त्यामध्ये 9300 हेक्टर क्षेत्रामध्ये 50 टक्के नुकसान झाले असे दाखविले आहे. माझी अशी विनंती आहे की, सरसकट सर्व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जवळपास 78 हजार हेक्टरमध्ये भाताची लागवड होते. त्याचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले. त्याचप्रमाणे बाकीच्या पिकांचेही नुकसान झाले आहे. आंबा, काजू, जांभूळ, करवंद या फळांवर सुध्दा मोठ्या प्रमाणात परिणाम होणार आहे. आंब्याचा विचार केला तर आतापर्यंत मोहोर आलेला नाही. कारण आतापर्यंत पाऊस पडत होता. यानंतर मोहोर आला तरी 10 ते 20 टक्के पीक येईल आणि जून-जुलैमध्ये त्याचे पीक तयार होईल. पण त्याचा काही उपयोग होणार नाही. म्हणून आज या ठिकाणी चर्चा करीत असताना नुसत्या भातशेती पुरताच विचार करुन चालणार नाही तर आंब्याच्या बाबतीत पुढच्या काळात काय करणार याबाबत विचार झाला पाहिजे. कोकणामध्ये काजूचे पीक मोठ्या प्रमाणावर येते. कोकणामध्ये साधारणत: साडेचार लाख हेक्टर मध्ये या फळांची लागवड होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये 29 हजार हेक्टरमध्ये आंब्याची आणि 50 हजार हेक्टरमध्ये काजूची लागवड होते. लागवडीचे प्रमाण आणि त्या ठिकाणी होणारे नुकसान याचे प्रमाण पाहिले तर आंबा बागायतदारांना, काजू बागायतदारांना तसेच जांभूळ, कोकम, करवंद या सगळ्या पिकांसाठी शासन काय नुकसान भरपाई देणार आहे ? त्या शेतकऱ्यांना आणि बागायतदारांना शासन कशी मदत देणार याचा विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, गेल्या वेळी जी नुकसान भरपाई दिली त्यामध्ये आंब्याला हेक्टरी 6 हजार रुपये दिले आणि भातशेतीसाठी हेक्टरी 1 हजार रुपये दिले. आता झालेल्या नुकसानीचा विचार करता शेतीच्या बाबतीत हेक्टरी किमान 25 हजार रुपये सर्वसामान्य शेतकऱ्यांना भातशेतीसाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली.....

मिळाले पाहिजेत आणि फळ बागायतदारांना हेक्टरी किमान 50 हजार रुपये मिळाले पाहिजेत. तरच सर्वसामान्य शेतकऱ्यांना आपण थोडासा दिलासा देऊ शकू. दरवर्षी आपण ऊसाला, कापसाला मदत देतो. त्यांना नुकसान भरपाई देऊ नका असे मी म्हणणार नाही. ऊस जास्त झाला तर नुकसान भरपाई देतो. ऊस कमी झाला तरीही नुकसान भरपाई देतो.

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली.....

जर कोकणाबाबत विचार केला तर शासनाला मी निश्चित धन्यवाद देईन. कारण गेल्या 10 वर्षात शासनाने आंबा उत्पादकांना दोन वेळा नुकसान भरपाई दिलेली आहे. हे नाकारुन चालणार नाही. सभापती महोदय, मी कोकणातील प्रतिनिधी असल्यामुळे माझी आपल्यामार्फत शासनाला विनंती राहील की, या अवकाळी पावसामुळे फळ बागायतदारांचे व भात उत्पादक शेतक-यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असल्यामुळे त्यांना भरीव नुकसान भरपाई देण्यासंबंधी शासनाने प्रथम विचार करावा अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, 2008 साली केंद्र सरकारने अशा नैसर्गिक आपत्तीसाठी मदत देण्याचे जाहीर केले होते. ती मदत शेतक-यांपर्यंत अद्याप पोहोचलेली नाही. मी माननीय कृषी मंत्र्यांना सुध्दा भेटलो आहे. त्यावेळी 27 कोटी रुपयांची मदत मंजूर झाली होती. आपल्या हुशार अधिका-यांनी शेतकऱ्यांना खतांची खरेदी करण्यासाठी पैशाचे वाटप केले असे सांगितले, परंतु ती मदत खरीप हंगामापर्यंत मिळालेली नव्हती. आता ते खतांचे परमीट्स स्वीकारत आहेत. त्यावेळी 27 कोटी रुपये मंजूर झाले होते, त्या निधीतून आता बियाण्याच्या स्वरुपात शासनाने मदत देण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत केवळ 53 टक्के मदतीचे वाटप झाले आहे. 2008 साली जाहीर केलेल्या मदतीची ही अवस्था आहे. (अडथळा) मी या सभागृहात वस्तुस्थिती सांगत आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आपण दोन दिवस या सभागृहाचे वाया घालविले आहेत. शेतकरी या सभागृहात होणाऱ्या निर्णयाकडे डोळे लावून बसला आहे. परंतु तुम्ही सर्वजण या विषयाचे राजकारण करीत आहात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही दोन दिवस वाया घालविले नाही. जोपर्यंत सरकारवर योग्य दबाव येत नाही, तोपर्यंत सरकार जागे होत नाही. सरकारकडून प्रत्येक वेळी नकारात्मक भूमिका घेतली जाते ती त्यांनी घेऊ नये, यासाठी विरोधी पक्षाच्या वतीने दबाव निर्माण करण्यात आला होता. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली हे काँग्रेस पक्षात नवे आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, 2008 मधील मदत शेतक-यांना अद्याप मिळालेली नाही. याबाबत त्यांनी त्यांच्या पक्षाच्या अध्यक्षांना सांगितले पाहिजे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.राजन तेली : सभापती महोदय, आपल्याकडे असताना काय होत होते ते मला माहीत आहे. सभापती महोदय, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासून चर्चेची तयारी दाखविली होती, मदतीची तयारी दाखविली होती. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी सुध्दा सरकार चर्चेसाठी तयार असल्याचे सांगितले होते. आता कोणतेही कारण शिल्लक न राहिल्यामुळे तुम्ही चर्चेला सुरुवात केली. असो.

सभापती महोदय, कोणत्याही परिस्थितीत शेतक-यांना नुकसान भरपाई मिळाली पाहिजे, अशाप्रकारची भावना सगळयांची आहे. कोकणातील शेतकऱ्याच्या 7/12 वर घरातील ब-याच जणांची नावे असतात. प्रत्यक्षात जो शेती करतो त्याला मदत मिळत नाही. म्हणून माझी पहिली विनंती अशी आहे की, जो प्रत्यक्षात शेती कसतो त्याला मदतीचे पैसे कसे मिळतील यादृष्टीने शासनाने कार्यवाही करावी. आता जी मदत दिली जाईल ती रोख स्वरुपात दिली जावी याचाही विचार होणे आवश्यक आहे. वस्तू स्वरुपात मदत देण्याचे कबूल केले जाते परंतु प्रत्यक्षात ती शेतक-यांपर्यंत पोहोचत नाही. वाहतुकीच्या व खरेदीच्या नावाखाली अधिकारी काय करतात ते सर्वांना माहीत आहे. यापूर्वी खरेदी केलेल्या वस्तू अद्याप शेतक-यांपर्यंत पोहोचलेल्या नाहीत. त्याला जे अधिकारी जबाबदार असतील त्यांच्यावर कारवाई करणे आवश्यक आहे असे मला वाटते. सरकारला यावेळी काही प्रमाणात वस्तू स्वरुपाने मदत करावयाचीच असेल तर ती बायो-फर्टिलायझर व बायो-पेस्टिसाईडच्या स्वरुपात द्यावी. कारण सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा जिल्हा असल्यामुळे याची काळजी घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कोकणात मागील 25-30 दिवसांपासून मुसळधार पाऊस पडल्यामुळे चा-याचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यामुळे चा-याबाबत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे आणि भविष्यात बी-बियाण्याचा प्रश्न सुध्दा निर्माण होणार आहे. या गोष्टीचाही विचार होणे आवश्यक आहे. या पुढील काळात शासन गुरांना चारा कसा उपलब्ध करुन देणार आहे आणि पुढील खरीप हंगाम कसा सुरु होईल या दृष्टीकोनातून नियोजन केले पाहिजे. शेतक-यांकडे असलेले पारंपरिक बियाणे वाया गेलेले आहे.

यानंतर श्री.शिगम

अशोधित प्रत / शोधित प्रत नाही

कोणत्याही प्रकारचे बियाणे शेतक-याकडे शिल्लक राहिलेले नाही. तेव्हा शेतक-यांना बियाणे आणि गुरांना चारा देण्याच्या बाबतीत तातडीने निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे. राज्याच्या 22 जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालेले आहे. 10 लाख शेतक-यांच्या शेतीचे नुकसान झालेले आहे. शेतीचे नुकसान झालेले क्षेत्र 1 कोटी 5 लाख हेक्टर आहे. कोकणामध्येही मोठ्या प्रमाणावर भात पिकाचे, फळबागांचे नुकसान झालेले आहे. म्हणून ज्या शेतक-यांच्या भात शेतीचे नुकसान झालेले आहे त्यांना हेक्टरी 25 हजार रुपये आणि फळबागायतदारांना हेक्टरी 50 हजार रुपये मदत करावी अशी मी शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, अवकाळी पावसाच्या अतिशय गंभीर विषयावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आम्ही मुंबईचे आमदार असल्यामुळे आमचा शेतीशी काय संबंध असा लोकांमध्ये काहीसा गैरसमज असतो. परंतु मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आम्ही सर्व शेतक-यांची मुले आहोत. या अवकाळी पावसासंबंधी चर्चा होत असताना मी सांगेन की हा अवकाळी पाऊस राज्याच्या विशिष्ट भागामध्येच पडला असे नाही तर तो राज्याच्या सर्व भागात प्रचंड प्रमाणावर पडला आणि त्यामुळे झालेले नुकसान प्रचंड आहे आणि ते समजून घेण्याची गरज आहे. सर्वसाधारणपणे नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर मदत देण्यासंबंधी केन्द्र शासनाचे काही निकष आहेत. त्याचप्रमाणे राज्य शासनाचे देखील काही निकष आहेत. त्या निकषाच्या चष्म्यातून आपण पाहिले तर शेतक-याला आणि बागायतदाराला आपल्याला न्याय देता येणार नाही. कारण ते निकष जुने असल्यामुळे कालबाह्य झालेले आहेत. हा अवकाळी पावसाचा प्रश्न ग्लोबल वॉर्मिंगशी निगडित आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे तापमानामध्ये वाढ होत आहे, ऋतूचक्र बदलत आहे. त्यामुळे मदत करण्याचे निकष देखील बदलले पाहिजेत आणि भविष्यात नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागले तर त्या बदलेल्या निकषानुसार मदत केली पाहिजे. सर्वसाधारणपणे ऑगस्ट महिना संपला की ऑक्टोबर महिना सुरु होतो. "ऑक्टोबर हिट" हा परवलीचा शब्द आपल्याला त्या महिन्यामध्ये ऐकायला मिळतो आणि त्या महिन्यातील उष्मा देखील अनुभवायला मिळतो. हे वातावरणामध्ये होत असलेले बदल तुम्ही आम्ही अनुभवतोय. आता ऑक्टोबर संपून डिसेंबर महिना आला तरी ती हिट सुरु आहे.

ऑक्टोबर महिना संपल्यानंतर नोव्हेंबरमध्ये थंडीचे वातावरण निर्माण होते. आपण डिसेंबर महिन्यामध्ये नागपूरला अधिवेशन घेतो त्यावेळी थंडी असते. त्यामुळे त्या अधिवेशनाला आपण हिवाळी अधिवेशन असे म्हणतो. परंतु या डिसेंबरमध्ये आपल्याला थंडीचा मागमूसही अनुभवायला मिळत नाही. खरे तर या अधिवेशनाला "हिवाळी अधिवेशन" म्हणण्या पेक्षा "पावसाळी अधिवेशन" म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही, इतका बदल वातावरणामध्ये झालेला आहे. म्हणून आपण नैसर्गिक आपत्ती जुन्या मोजमापामध्ये मोजली तर आपणाला कोणालाही न्याय देता येणार नाही. तेव्हा या संदर्भात सरकारने काय करायला पाहिजे तर अवकाळी पावसाच्या संदर्भात जी.आर. काढला पाहिजे. हा जी.आर.काढला तरच शेतक-यांना न्याय देता येईल असा माझा समज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पूर्वीच्या जी.आर.चा आपण आग्रह धरला तर या विषयाला न्याय देता येईल असे मला वाटत नाही. मी राज्याच्या इतर विभागाची फारशी चर्चा करणार नाही. कारण सन्माननीय विरोधी पक्षनेते, शिवसेनेनेचे नेते, काँग्रेस पक्षाचे सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे या सर्वांनी आपापल्या विभागाचा आणि राज्याचा संपूर्ण आढावा घेतलेला आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

सभापती महोदय, माझे सहकारी माननीय सदस्य श्री.राजन तेली यांनी काही मुद्दे याठिकाणी मांडण्याचा प्रयत्न केला. मला याठिकाणी फक्त कटू अनुभव सांगावयाचा आहे. फयान वादळामुळे प्रचंड नुकसान झालेला कोकणपट्टा होता, तेथील कोळी बांधव असतील, गाबित समाजाचे बांधव असतील, नागरिक असतील ते त्यातून सावरलेले नाहीत. त्यातून सावरतात न सावरतात तोपर्यंत अवकाळी पावसाचा फटका कोकण परिसराला बसला आहे. यादृष्टीने त्या भागाकडे बघण्याची गरज आहे. राज्याच्या इतर भागांमध्ये दुबार पिके घेतली जातात. कोकणामध्ये तशी परिस्थिती नाही. कोकणामध्ये एकमेव धानाचे पीक घेतले जाते. त्याच्या क्षेत्रफळामध्ये मी जाऊ इच्छित नाही. परंतु आज कोकणामध्ये परिस्थिती इतकी वाईट आहे की, फयान वादळामुळे झालेल्या नुकसानीतून सावरतात न सावरतात तोच अवकाळी पावसामुळे मोठे संकट ओढवले आहे. कोळी बांधव छोट्या छोट्या खाचरामध्ये भातशेती करतात. त्यांना निसर्गाचा मोठा फटका सहन करावा लागला आहे. धानाच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. पाऊस आल्यानंतर शेतात असलेले उभे पीक काढता आले नाही. कोकणातील पावसाळ्याबद्दल मी सांगण्याची आवश्यकता नाही. देशामध्ये सगळ्यात जास्त पाऊस चेरापुंजी येथे पडतो आणि दुसऱ्या क्रमांकाचा पाऊस कोकणामध्ये पडतो. पावसाने जाता जाता कोकण परिसराला मोठा दणका दिलेला आहे. त्यामुळे उभ्या भात पिकाची नासधूस झाली. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, आर्थिक मदतीबद्दल जे प्रचलित नॉर्म्स आहेत त्यामध्ये बदल करावे लागतील.

सभापती महोदय, मी शासनाचे मन:पूर्वक आभार मानतो. मागील वेळेला फयान वादळामुळे जे नुकसान झाले त्याबद्दल मदत जाहीर करताना प्रती हेक्टर 6 हजार रुपये आर्थिक मदत जाहीर केली गेली. ती आर्थिक मदत काही प्रमाणात प्राप्त झाली आहे. सभागृहाच्या नेत्यांनी या ठिकाणी जाहीर केले की, मागील वर्षाची आर्थिक मदत शिल्लक राहिली आहे ती 31 मार्च, 2011 पूर्वी देण्यात येईल.

सभापती महोदय, कोकणामध्ये भात पिकानंतरचे नगदी पीक म्हणजे आंबा फळाचे आहे. फयान वादळ आणि अवकाळी पाऊस याचा परिणाम वर्षभर भोगावा लागणार आहे. एक तर आंबा पीक प्रतिवर्षी येत नाही. एक वर्ष आड करुन पीक येते. त्यात झालेले नुकसान विचारात घेता मागील वर्षी 6 हजार रुपये प्रती हेक्टर आर्थिक मदत जाहीर केलेली असली तरी यावेळेला आंबा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप.....

पिकाचे नुकसान झालेले आहे, काजू पिकाचे नुकसान झालेले आहे किंवा कोकणातील इतर फळफळावळांचे जे नुकसान झालेले आहे त्याचा विचार करता प्रती हेक्टरी 50 हजार रुपये आर्थिक मदत जाहीर केली पाहिजे. 6 हजार रुपये प्रती हेक्टर आर्थिक मदत दिली गेली तर एका आंब्याच्या झाडाला 600 रुपये आर्थिक मदत दिली जाईल. एका आंब्याच्या झाडाची मशागत करावयाची झाल्यास वर्षभरात किमान 5 हजार रुपये खर्च येतो. खते आणि औषध फवारणी करण्यासाठी हा खर्च करावा लागतो. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की, हेक्टरी 6 हजार रुपये मदत देण्याचे जे नॉर्म्स आहेत ते बदलून 50 हजार रुपये प्रती हेक्टरी मदत दिली जावी. फयान वादळाच्या बाबतीत आणि नुकसान भरपाईच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडताना फार वाईट अनुभव याठिकाणी सांगितले आहेत. आम्हाला सुध्दा वाईट अनुभव आलेला आहे. सरकारने आपल्या परीने जो प्रयत्न केला त्या तत्परतेबद्दल आमच्या मनामध्ये अजिबात शंका नाही.

नंतर डब्ल्यू.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

काही शेतकऱ्यांना 500 रुपये मदत मिळाली तर काहींना 50 रुपयाचे धनादेश सुध्दा मदतीच्या स्वरुपात देण्यात आले आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन शासन या उत्तराच्या माध्यमातून जी नुकसान भरपाई जाहीर करणार आहे ती जाहीर करताना कोकणाबाबत विशिष्ट लक्ष देण्यात यावेही अशीही विनंती करणार आहे. राज्याच्या सर्वच भागाकडे लक्ष द्यायला पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. कारण ठिकठिकाणी कापूस, सोयाबीन, धान वगैरे विकांचे नुकसान झालेच आहे. पण कोकणामध्ये विशिष्ट प्रकारचा निसर्गाचा कहर म्हटले तरी चालेल तो लक्षात घेऊन मदत देण्याबाबत प्रकर्षाने विचार करावा. वास्तविक सर्व पंचनामे अथवा प्राथमिक स्वरुपाची माहिती शासनाने मिळविलेलीच आहे व त्यावरुन 50 टक्केपर्यंत अथवा त्यापेक्षा जास्त नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली आहे. जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी, तहसीलदार अथवा गाव पातळीवरील तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्या माध्यमातून जी आकडेवारी अथवा आणेवारी काढली जाते त्या अनुषंगाने माझी अशी सूचना आहे. कोकणाचा विचार करताना हे देखील लक्षात घ्यावे की, एखाद्या शेतकऱ्याची फक्त दहाच झाडे असतात व त्यावर तो जगत असतो. अशा सर्व गोष्टींचा विचार करावा. केवळ मोठ्या बागायतदारांना गृहित धरुन आकडेवारी काढत असाल तर ती योग्य होणार नाही म्हणून सर्वंकष विचार करुन शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे अशी विनंती करुन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले पुन्हा आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सभागृहात जी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा सुरु आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती : सभागृहात अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असून अपेक्षा अशी आहे की, दुपारी 12.00 वाजेपर्यंत ही चर्चा संपवावी. पण अजुनही 13 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्याने माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सर्वांना संधी मिळेल असा विचार करुन प्रत्येकाने आपले भाषण थोडक्यात व मुद्देसूद होईल याची काळजी घ्यावी. आता डॉ. दीपक सावंत यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

डॉ. दीपक सावंत : महोदय, या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार व्यक्त केले असून त्यात अनेक गोष्टी पुढे आल्या आहेत. आपण सतत अवकाळी पावसाबद्दल सभागृहात बोलत असतो, गारपिटीबाबाबत बोलत असतो, वाढणाऱ्या उष्णतेबाबत अथवा दिवसेंदिवस वाढत असलेल्या तापमानाच्या संदर्भात विचार व्यक्त करीत असतो. त्याचा परिणाम पिकांवर, सर्वसामान्य माणसाच्या व शेतकऱ्याच्या जीवनावर होत असतो असे विचारमंथन यातून सुरु आहे असे मी समजतो. आज अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसंबंधी बोलत असून कदाचित पुढील अधिवेशनात वेगळ्याच विषयावर बोलण्याची वेळ येऊ शकते. त्यात सुध्दा शेतकऱ्याचे नुकसान कशामुळे झाले, कदाचित गारपीट झाल्यामुळे अथवा उष्णतेमुळे भूगर्भात होणाऱ्या बदलांमध्ये अथवा पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे असे वेगळेच विषय येऊ शकतात त्यावर आपण बोलणार. यातून हा ग्लोबल वॉर्मिंगचा प्रकार आहे असे यापूर्वीच्या अनेक वक्त्यांच्या भाषणातून पुढे आले आहे. खरोखरच या विषयाबाबत आपण काही बोलत आहोत काय, चर्चा करीत आहोत काय, किंवा त्यावर उपाययोजना तरी करीत आहोत काय ? आज शेतकऱ्याला आपण हेक्टरी मदत करणार, विजेचे कनेक्शन्स तोडले ते जोडणार अशा सर्वच प्रकारे मदत करणार पण ही केवळ त्या त्या वर्षापुरती मलमपट्टी आहे असे वाटत नाही काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

यावर राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सुदैवाने आपल्याला हायटेक मुख्यमंत्री आणि डॅशिंग उपमुख्यमंत्री लाभले आहेत त्यामुळे त्याचा फायदा घेऊन यासंदर्भात धोरण आखणे आवश्यक आहे. पुढील 5 वर्षामध्ये येणा-या समस्या ॲन्टीसिपेट केल्या पाहिजेत. हवामानातील बदलावर लक्ष ठेवले पाहिजे, त्याचे संशोधन केले पाहिजे परंतु दुर्दैवाने आपण केवळ मेरी आणि टेरीवरच अवलंबून आहेत. मेरी आणि टेरी जसे सांगते तसे आपण करतो परंतु ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात कोणतीही संस्था वर्षभर अभ्यास करीत नाही, काम करीत नाही केवळ तात्पुरते काम करते, ग्लोबल वॉर्मिंगवर आपण तात्पुरते काम करुन हा विषय सोडून देतो. हवामानाच्या बदलामुळे, अवकाळी पावसामुळे, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पिकावर काय परिणाम होतो यावर कोणतेही कृषी तज्ज्ञ किंवा कोणतेही कृषी संशोधन केंद्र काम करीत नाही.

सभापती महोदय, मागील वर्षी संत्रा पिकावर नवीनच रोग आल्यामुळे संत्रापिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते परंतु या रोगावरील औषध मात्र साडेतीन महिन्यानंतर बाजारामध्ये आले होते या औषधाची किंमत दहा हजार रुपये लिटर असल्या कारणाने हे औषध कोणताही शेतकरी फवारु शकला नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भाई सांवत व सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितले आहे की, पुढील वर्षी आंब्याला मोहरच येणार नाही. त्यामुळे या संदर्भात आजच आपण उपाययोजना केली नाही तर त्याचा काय फायदा होणार आहे ? आपण एकमेकावर आरोप प्रत्यारोप करीत राहिलो तर यामध्ये शेवटी शेतक-याचेंच मरण होणार आहे अशी प्रामाणिक भावना मी सभागृहाच्या माध्यमातून व्यक्त करीत आहे. अवकाळी पाऊस का पडला याच्या मागचे मुख्य कारण हे हवामानातील व ऋतुमानातील बदल हे आहे. परंतु याकडे आपण दुर्दैवाने बघत नाही. त्यामुळे पुढील पाच वर्षात काय करावयास पाहिजे याची आखणी आपण करु शकलो नाही तर आपण शेतक-यांना कसा काय न्याय देऊ शकणार आहात ? भारतातील 65 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले आहे की, दर हजारी साडेचारशे लोकांना आपण शेतीतून रोजगार उपलब्ध करुन देतो. परंतु जर शेतीच टिकली नाही तर या साडेचारशे लोकांचे काय होणार याचा आपण अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

सभापती महोदय, माझी राज्य शासनाला विनंती आहे की, कृषी तज्ज्ञ, हवामानाचा अभ्यास करणारे तज्ज्ञ, संशोधक, या सभागृहातील सदस्य व शासनातील अधिका-यांचा या समितीमध्ये समावेश केला पाहिजे. कृषी विभागातील अधिकारी काम करीत आहेत परंतु त्यांना देखील हवामानाविषयी काहीही माहिती नाही, त्यांचे नॉलेज अपडेट नाही. पूर्वीचे आराखडे बांधूनच जनतेला माहिती दिली जात आहे. या सिस्टममध्ये आमूलाग्र बदल होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये मी गेलो होतो त्यावेळेस तेथे कलेक्टर आणि आपल्या अधिका-यांनी कसा सर्व्हे केला ते मी सांगणार आहे. या अधिका-यांनी कणकवलीच्या हायवेवर गाडी उभी केली व तेथून त्यानी शेतीचे किती नुकसान झाले ते ठरवले. सभापती महोदय, शेतीचे नुकसान किती झाले हे पाहण्याची ही पध्दत आहे ? कणकवलीमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी नुकसान झालेले आहे असा सर्व्हे तुमच्या अधिका-यांनी काढलेला आहे. अशा प्रकारे सर्व्हे काढण्याची अधिका-यांची मानसिकता असेल तर आमचा गरीब शेतकरी कसा काय जगू शकेल ? त्यामुळे पंचनामे काढण्याची जी सिस्टीम आहे त्या सिस्टीमने ज्यावेळेस अशा प्रकारची आपत्ती येईल त्यावेळेस फायर ब्रिगेडसारखे काम केले पाहिजे. ज्या प्रमाणे आग लागल्यावर फायर ब्रिगेड धावते त्याप्रमाणे आमचा शेतकरी अवकाळी पावसात सापडला तर फायर ब्रिगेडसारखे त्वरित पंचनामे झाले पाहिजेत व जनतेला तातडीने मदत उपलब्ध करुन दिली पाहिजे. परंतु दुर्दैवाने असे कधी झालेले नाही. एकदम मदत जाहीर करा असे आम्ही सांगत नाही. इंग्रजीमध्ये म्हण आहे की, "नेव्हर टू लेट". आजपासूनच सुरुवात करु या.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

आपणास भाषांतर कळले नसेल तर पुन्हा एकदा सांगतो, आपण आजपासूनच सुरुवात करु या. आपणास या चर्चेचे फलित काढावयाचे असेल तर सरकारने एक समिती गठीत करुन शेतीमध्ये बदल करता येईल का, शेतकऱ्यांनी कोणत्या प्रकारची खते व औषधे वापरावीत इत्यादींचा अभ्यास करुन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करुन त्यांना दिलासा द्यावा. त्याचप्रमाणे हवामानात पुढील चार दिवसांत कोणत्या प्रकारचे बदल होणार आहेत याबाबतीत माहिती सर्व वाहिन्यांवर द्यावी. अशाप्रकारचे निर्णय सरकारने घेतल्यास या चर्चेचे फलित होईल अन्यथा ही चर्चा वांझोटी ठरेल एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चेवरील माननीय उपमुख्यमंत्र्यांचे दुपारी 12.00 वाजता भाषण सुरु होणार होते. परंतु अजून 12 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तेव्हा माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी दोन-दोन मिनिटांमध्ये फक्त मुद्दे मांडल्यास माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण दुपारी 12.30 वाजता सुरु करता येईल.

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या प्रमाणे मी प्रत्येक विषयावर बोलत नाही. मला शेतकऱ्यांच्या विषयावर बोलण्यासाठी वेळ द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, माझ्या नशिबाने माझे भाषण ऐकण्यास माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार सभागृहात उपस्थित आहेत. माझ्यासाठी ही लॉटरीच आहे.

गेले दोन दिवस ही चर्चा थांबण्या मागचे कारण म्हणजे आपण येथे चर्चा करतो. त्यावर सरकार घोषणा करते. घोषणेनंतर सरकार शेतकऱ्यांना मदत करीत नाही व अधिवेशन संपल्यामुळे आम्हाला बोलता येत नाही. म्हणून अगोदर घोषणा मग चर्चा अशी आमची मागणी होती.

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतून सध्या एकच मागणी येत आहे, ती मागणी म्हणजे शेतकऱ्यांची विजेची कनेक्शन्स कापण्यात येत आहेत. मोगल आणि इंग्रज राजवटीला लाजवेल असे वर्तन सरकारकडून होत आहे. आज ट्रान्सफॉर्मरमधून वीज तोडली जात आहे. माननीय उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री श्री.अजितदादा पवार यांचा ऊर्जा विभागावर काही धाक राहिला नाही किंवा त्यांना ही बाब माहीत आहे की नाही हे मला माहीत नाही....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल याठिकाणी जो मुद्दा मांडत आहे तो मुद्दा सन्माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मांडलेला आहे. तेव्हा त्यांनी तोच मुद्दा रिपीट करु नये. त्यांनी नवीन मुद्दा मांडावा अशी माझी त्यांना आपल्यामार्फत विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मी मुद्दे रिपीट करीत नाही. माझी मागणी आहे की, शेतकऱ्यांची वीज कनेक्शन्स मार्च महिन्यापर्यंत तोडू नयेत. तोडलेली वीज कनेक्शन्स ताबडतोब जोडण्यात यावीत. आम्ही करीत असलेली मागणी सरकारने अगोदरच घोषित केली असती तर सर्व शेतकरी या सरकारला डोक्यावर घेऊन नाचले असते. माझी दुसरी मागणी आहे की, शेतकऱ्यांकडून विजेचे बिल भरण्याबाबत सक्ती करु नये, कारण शेतीच्या नुकसानीमुळे त्यांच्या हातात पैसे नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांच्या घरी मी गेलो होतो.त्यांचे घर पाहिले तर हा माणूस दादांना नक्की सांगू शकतो असे वाटले. वीज तोडल्यामुळे शेतकऱ्यांना काय दु:ख होते हे फक्त काही जणांनाच माहीत आहे. आपण नशिबाने येथे आलेलो आहोत अन्यथा एखाद्या माळावर राहिलो असतो असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते.

याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी यांनी सांगितले की, कृषीवर हजार माणसामागे 450 लोकांना रोजगार मिळतो. "नेमिची येतो मग पावसाळा" या उक्तीप्रमाणे आम्ही प्रत्येक वर्षी शेतकऱ्यांना श्रध्दांजली वाहण्याचे काम करायचे काय ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

ही श्रध्दांजली जर आपल्याला वहायची नसेल तर मी ज्या काही चार पाच बाबी सांगणार आहे त्याचा शासनाने विचार करावा.आता साखेरवर लेव्ही लावली आहे . ही लेव्ही कोणावर लावली आहे ? सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांच्यावर लावली की सन्माननीय मंत्री श्री बाळासाहेब थोरात यांच्यावर लावली की सन्माननीय मंत्री श्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर लावली आहे ? ही लेव्ही त्यांच्यावर लावण्यात आली नाही तर एक एकर वा दोन एकर ऊस ज्या शेतक-यांनी लावला आहे त्या शेतक-याच्या साखरेवर लेव्ही लावण्यात आली आहे. या गोष्टी कशासाठी करण्यात येत आहेत हे मला काही कळत नाही. या निमित्ताने मला माननीय उप मुख्यमंत्री श्री अजित दादा पाटील यांना दोन तीन बाबी सांगावयाच्या आहेत. आपल्याला
शेतक-याना खरोखर मदत करावयाची असेल आणि दर वर्षी याच गोष्टीवर रडावयाचे नसेल तर मी जे काही सांगतो त्याची अंमलबजावणी शासनाने करावी . शेती मालाच्या उत्पादन खर्चामध्ये कौटुंबिक मजुराची संकल्पना सांगण्यात आली आहे.एका शेतक-याची दहा एकर शेती असेल आणि त्याच्या घरात पाच माणसे असतील तर ती माणसे शेती सोडून इतर कामासाठी जातच नाहीत. याचा अर्थ असा की 365 दिवस ही 5 माणसे शेतीमध्येच राबतील.शेती मालावरील उत्पादन खर्चा संबंधी जे पुस्तक माझ्याकडे आहे ते माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित दादा पवार यांनी वाचून पहावे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, ही अल्पकालीन चर्चा अतिवृष्टीच्या संदर्भात आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, दर वर्षी प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या प्रश्नावर अश्रू ढाळावयाचे आहेत काय ? शेतक-यांचे जे प्रश्न मांडण्यात आले होते ते पुन्हा पुन्हा मांडू नका असे जर आपण म्हणत असाल आणि शेतक-यांचे खरे प्रश्न काय आहेत हे जर या ठिकाणी सांगावयाचे नसतील तर मी काहीही बोलत नाही. केवळ उडीद,मूग,सोयाबीन,केळी इत्यादी पिकाचे किती नुकसान झाले याची आकडेवारी सांगून शेतक-यांना काय मिळणार आहे ?

सभापती : आजची अल्पकालीन चर्चा फक्त अतिवृष्टीसबंधी आहे.

श्री. पाशा पटेल: सभापती महोदय, अतिवृष्टीसंबंधी बोला असे आपण सांगत आहात त्याचबरोबर सन्माननीय उपमुख्यमंत्री मुद्याची पुनरावृत्ती करु नका असे सांगत आहेत अशा वेळी मी

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

काय करावयाचे ? त्यापेक्षा या विषयावर बोलूच नये असे मला वाटते.मी तर कोणत्याही विषयावर बोलण्यास तयार आहे.

एक सन्माननीय सदस्य (बसून) : आपण आत्महत्तेवर बोलावे.

श्री. पाशा पटेल : तो विषय तर फारच सोपा आहे.सन्माननीय सदस्यांनी गाव सोडले नसते तर लिंबाच्या झाडाला त्यांनासुध्दा लोंबकळावे लागले असते.तुमचे नशीब चांगले आहे म्हणून ही वेळ तुमच्यावर आली नाही. सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांना मी सांगू इच्छितो की,शेतक-यांची परिस्थिती सुधारण्यासाठी निश्चित काही तरी केले पाहिजे. मघाशी डॉ. दीपक सावंत यांनी सांगितले की, शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समिती नेमून काही प्रश्न सुटणार नाही.शासनाला जर खरोखर हे प्रश्न सोडवावयाचे असतील तर माझ्या दृष्टीने ज्या महत्वाच्या दोन चार बाबी आहेत त्या मी येथे मांडतो त्यावर शासनाने गांभीर्याने विचार करावा. सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांना मला एक विनंती करावयाची आहे की, आता मी जे वाक्य सांगणार आहे ते आपण लक्षपूर्वक ऐकावे. बदल करणार आहोत असे आपण सांगितले असल्यामुळे नेमका कोणता बदल करण्यात येणार आहे ? राज्यातील शेतकरी व जनता आपल्याकडे मोठया अपेक्षेने पहात आहेत. आपण दोन तीन महत्वाचे चांगले निर्णय घेतले असल्यामुळे मला प्रथम आपले अभिनंदन करावयाचे आहे.रस्त्यात जर खड्डे आढळून आले तर त्या खड्डयास जबाबदार असलेल्या माणसाला खड्डयात घालण्यात येईल असे आपण सांगितले जर आपण खरोखर तसे केले तर माणसेच शिल्लक राहणार नाहीत कारण सर्वच रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत.ही गोष्ट फार अवघड आहे. मला एकच बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, शेतात काम करणा-या मजुराची मजुरी 84 रुपये धरली आहे.आज शेतात काम करणा-या मजुराला 250 रुपये मजुरी द्यावी लागत असतांना आपण फक्त 84 रुपये मजुरी धरली आहे.2007 साली उत्पादन खर्च काढण्यात आला होता तो खर्च पाहिला असता असे आढळून आले की 66 रुपये मजुराची मजुरी धरली होती आणि 84 रुपये मालकाची मजुरी धरली होती. या वर्षी मजुराची मजुरी 84 रुपये आणि मालकाची मजुरीसुध्दा 84 रुपये धरली आहे.रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुराला 125 रुपये मजुरी देण्यात येत आहे. 2007 साली जर 66 रुपये मजुराची मजुरी आणि 84 रुपये मालकाची

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

मजुरी धरली होती आणि या वर्षी मात्र मजुराला आणि मालकाला फक्त 84 रुपये मजुरी धरण्यात आली आहे. या वर्षी रोजगार हमी योजनेत काम करणा-या मजुराला जर 125 रुपये मजुरी मिळत असेल तर ही माणसे कशी जगतील ? त्यांना जर जगवावयाचे असेल तर शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. शासनाने जर या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला तरच ही माणसे जगणार आहेत नाही तर प्रत्येक अधिवेशनामध्ये आपल्याला रडावेच लागेल.

सभापती महोदय, शेतीच्या बाबतीत आणखी एक महत्वाचा प्रश्न आहे. आज गावामध्ये शेतीसाठी बैल मिळत नाहीत. त्यामुळे गावातील सर्व शिवारात एकाच वेळी पेरणी करता येत नाही .एकाच व्यक्तीचे बैल चार चार शेतकरी वापरु लागले आहेत. या वर्षी शेतात अशी अवस्था निर्माण झाली आहे की, काही शेतक-यानी पेरणी केली आहे, काही लोक पेरणी करणार होते परंतु पाऊस सुरु झाला आणि तो थांबलाच नाही त्यामुळे 25 टक्के शेतक-याच्या शेतात गवत वाढले आणि त्याला गवत काढता आले नाही त्यामुळे त्याने शेत पेरले नाही अशा शेतक-याला किती नुकसान भरपाई देण्यात येणार आहे ? ज्वारी काळी पडल्यामुळे ही ज्वारी कोणीही घेण्यास तयार नाही ज्वारीमध्ये तूर पेरण्यात आली होती त्या तुरीचे सुध्दा नुकसान झाले आहे.शेतक-याची किती थट्टा केली जाते हे आपण लक्षात घ्यावे.उत्पादन खर्च काढत असतांना ज्वारीच्या शेत मालकाची मजुरी 84 रुपये धरली आहे आणि तुरीच्या शेत मालकाची मजुरी 79 रुपये धरली आहे.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनी नोंदी

श्री. पाशा पटेल...

तुमच्याकडे आणि आमच्याकडे असलेल्या आकडेवारीमध्ये फार काही फरक नाही. आमच्याकडे पेरणी करतांना चार ओळी ज्वारीच्या आणि दोन ओळी तूरीच्या असतात. आज तुरीच्या शेतामध्ये काम करणाऱ्या माणसाला 79 रुपये मजूरी आणि रोजगार हमी योजनेच्या कामावर काम करणाऱ्या माणसाला 125 रुपये मजूरी हा पोरकटपणा सुरु आहे. याकडे आपल्याला गंभीरपणे बघावे लागेल.

सभापती : माननीय सदस्यांनी आपले भाषण एक मिनिटात संपवावे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी एका मिनिटामध्ये आपणास सांगणार आहे. काल माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी सांगितले की, भाजप आणि सेनेच्या आमदारांना तुरीच्या आणि बाभळीच्या शेंगामधील अंतर कळत नाही. आमच्या लोकांना खूप चांगले कळते असे त्यांना वाटते. तुमच्या लोकांना खूप चांगले कळते असे जर तुमचे प्रमाणपत्र असेल तर मला आपणाला एकच विनंती करावयाची आहे की, खालच्या अधिकाऱ्याला मदत वाटतांना लाज वाटणार नाही एवढी मदत आपण जाहीर करावी. मागील तीन वर्षातील मदत यावर्षी वाटावी लागत असेल तर आता जाहीर झालेली मदत कधी मिळेल हे मला सांगता येत नाही. त्यामुळे आपण मागील आणि चालू हंगामातील मदत दिली तर आपण नक्कीच मुख्यमंत्री झाल्याशिवाय राहणार नाही. तुम्ही मुख्यमंत्री व्हावे अशी आमची इच्छा आहे. त्यामुळे आपणास जर निकषामध्ये बदल करावयाचे असतील तर अशा पध्दतीने करावेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री श्री. प्रकाशदादा सोळंके हे गोदा नदीच्या काठावर झालेल्या नुकसानीच्या वेळी माझ्याबरोबर पहाणी करण्यासाठी आले होते. माननीय श्री. प्रकाशदादा आपण मंत्री झालात, परंतु खालच्या लोकांपर्यंत मदत मिळाली नाही. आता मदत आणि पुनर्वसन मंत्री तुम्हीच आहात. त्यामुळे किती फरक पडतो ते आपल्याला बघावयाचे आहे. तेव्हा आपल्या अखत्यारीत असलेल्या या विषयाकडे सुध्दा आपण गांभीर्याने पहाण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, याठिकाणी प्राप्त परिस्थितीवर बोलायचे की मूळ रोगावर बोलायचे याचा मला खेद होतो. या संदर्भात मला न्याय मिळावयास पाहिजे होता मिळाला नाही म्हणून मी जड अंत:करणाने सर्व विषय इथेच ठेवून खाली बसतो. जय हिंद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर व अन्य माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली आहे. त्या चर्चेमध्ये माझे मत व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या संपूर्ण राज्यामध्ये जुलै आणि ऑगस्ट महिन्यामध्ये अतिवृष्टी झाली. विदर्भाच्या अमरावती विभागातील अकोला,बुलढाणा व अमरावती या जिल्हयामधील खारपाण पट्टयामध्ये जास्त पाऊस झाल्यामुळे पिकांची खूप नासाडी झाली आहे ही वस्तुस्थिती आहे. अति पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या शेतामधून मूग आणि उडीद ही पिके आणता आली नाहीत. याचे कारण त्यांना रस्त्यांने जाता येत नव्हते. इतका पाऊस पडत होता की, अनेक शेतकऱ्यांच्या शेतामधील मूग आणि उडीदाचे पीक शेतामध्येच सडले. त्यामुळे त्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, खारपाण पट्टयामध्ये कोणतीही बागायत शेती होत नाही. त्याठिकाणी जलसिंचनाची कोणतीही व्यवस्था नाही. तेथील संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते. अशा भागामध्ये रब्बी हंगामामध्ये हरभऱ्याची पेरणी केल्यानंतर व हरभऱ्याचे पीक उगवल्यानंतर नोव्हेंबर महिन्यामध्ये अवकाळी पाऊस झाल्यामुळे त्या पिकाचे नुकसान झाले आणि ज्याठिकाणी पीक उगवले त्याठिकाणी पिकावर बुरशी पडून ती शेती निकामी झाली आहे. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अतिवृष्टी झाली आहे असे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्यामुळे त्याबाबत मी पुनरुक्ती करणार नाही.परंतु मी याठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये चार कृषी विद्यापीठे आहेत. या विद्यापीठामार्फत हरभऱ्याच्या पिकाची किंवा अन्य पिकाची दुबार पेरणी झाली असतांना त्याठिकाणी दुसरे कोणते पीक घ्यावयाचे याबाबत कृषी विद्यापीठामार्फत शेतकऱ्यांपर्यंत माहिती पोहोचलेली नाही. त्यादृष्टीने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे, याची आपण दखल घेतली पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे .. . .

दुसरी महत्वाची बाब म्हणजे माझ्या गावातील शेतकऱ्यांची वीज तोडण्यात आली. माझ्या भागातील अनेक लोक येथे आलेले आहेत, त्यांनी मला माहिती दिल्यानंतर मी संबंधित अभियंता यांना फोन केला. त्यावेळी असे सांगण्यात आले की, आम्हाला वरुन आदेश देण्यात आलेले असल्याने वीज तोडण्यात आलेली आहे. पण मला एवढेच सांगावयाचे आहे की, आमचे शेतकऱ्यांचे जीवन आहे, त्यामध्ये अडचणी आहेत. आज विहिरीमध्ये पाणी आहे, पण वीज नसल्यामुळे आम्हाला गहू किंवा इतर धान्याची पेरणी करता येत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे विजेचे कनेक्शन ताबडतोब जोडून शेतकऱ्यांना जास्तीतजास्त मदत करावी अशी मी आदरणीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो आणि माझे मनोगत संपवितो.

. . . .2 बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण याठिकाणी अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्याना त्यांच्या भावना व्यक्त करण्याची संधी दिलेली आहे, त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, भात असेल, कपाशी असेल, ऊस असेल किंवा फळबागामध्ये येणारी फळे म्हणजे आंबा असेल, द्राक्ष असेल, डाळींब असेल, आले असेल इ.बाबत माझ्या भावना व्यक्त करीत असताना मी आपल्या मार्फत या सभागृहाचे नेते आणि संबंधित विभागाचे माननीय मंत्री यांचे लक्ष वेधू इच्छितो. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबत मदत उपलब्ध करुन देत असताना शासनाने निकष लावलेले आहेत.पण ते करीत असताना राज्यामध्ये कृषी विभागाने केलेले पंचनामे हे योग्य प्रकारे करण्यात आलेले नाहीत.

तसेच द्राक्ष बागेच्या बाबतीत सांगावयाचे तर त्यासाठी भांडवली गुंतवणूक मोठया प्रमाणात करण्यात आलेली आहे. या सभागृहामध्ये अनेक वर्षे सभापती म्हणून कामकाज पहाणारे माननीय कै.वि.स.पागेसाहेब यांनी राज्यामध्ये रोजगार हमी योजना आणली. परंतु आमच्या परिसरात रोजगार हमी योजना सुरु नाही. उलट द्राक्ष बागायतदार किंवा बागायत शेतकरी असतील ते आमच्या परिसरातील मजुरांना काम देत नाहीत तर परराज्यातील मजुरांना मोठया प्रमाणात काम देत आहेत. तरी द्राक्ष बागायतदारांप्रमाणे त्या परिसरातील मजुरांच्या बाबतीत देखील विचार करणे गरजेचे आहे.द्राक्ष बागयतदारांनी भांडवली गुंतवणूक केलेली आहे, अवकाळी पावसामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे, त्यांना त्याप्रमाणात भरपाई मिळावी. मी या सदनाचे एका गोष्टीकडे वेधू इच्छितो की, ज्याप्रमाणे इतर पिकांच्या बाबतीत विचार केला जातो, त्याप्रमाणे द्राक्ष, डाळींब आणि कडधान्य इ.पिकांच्या बाबतीत मोठया प्रमाणात भांडवली गुंतवणूक करण्यात आलेली आहे, त्याचाही विचार करुन जे नुकसान झालेले आहे, त्याप्रमाणात त्यांना मदत मिळावी अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

. . . .2 बी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मला भाषण करण्यासाठी जो वेळ दिला आहे, तो सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांना देण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, याठिकाणी अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे, त्यांना मदत मिळावी यासाठी नियम 97 अन्वये जो प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे, त्यावर बोलत असताना कोकणातील शेतीचे जे नुकसान झालेले आहे, त्याबाबत त्या भागातील सन्माननीय सदस्यांनी प्रश्न मांडलेले आहेत. खऱ्या अर्थाने कोकणामध्ये मोठया प्रमाणात भात शेती केली जाते. परंतु अवकाळी पावसामुळे भात शेती पूर्णपणे नष्ट झालेली आहे हे त्या भागातील वक्त्यांनी केलेल्या भाषणामधून आपल्याला समजलेले आहे. 2005-2006 या वर्षी देखील अशाच प्रकारे अतिवृष्टी झाली होती आणि त्यावेळी सरकारने येथील शेतकऱ्यांची पूर्णपणे चेष्टा केली होती. त्यावेळी हेक्टरी एक हजार आणि गुंठ्याला दहा हजार रुपयांची मदत देण्यात आली होती. परंतु तेथील शेतकऱ्यांना गुंठ्याला दहा हजार रुपयांची मदत पुरेशी होणार नाही, इतकी कमी मदत दिली होती. कोकणामध्ये सर्वांच्या जमिनी एकरी नसून गुंठ्यावर घेतलेल्या असतात. 5 गुंठे जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांला जर 50 हजार रुपये मिळत असतील तर ती मदत मिळविण्यासाठी शेतकऱ्याला आपल्या गावातून तालुक्याच्या ठिकाणी यावे लागते व 7:12 वर बऱ्याच जणांची नावे असल्यामुळे त्याबाबतीत संमती पत्र तयार करावी लागतात व यासाठी 200 रुपये खर्च येतो. म्हणजे मदत म्हणून 50 रुपये मिळणार आणि त्यासाठी 200 रुपये खर्च करावे लागतात अशी स्थिती आहे. पूर्वी शासनाने 8 कोटी रुपयांची मदत दिली होती. परंतु आजही त्यातील चार कोटी रुपये शासनाच्या तिजोरीमध्ये पडून आहेत. त्यामुळे जर अशा प्रकारची मदत देणार असाल तर कोकणाला मदत दिली नाही तरी चालेल. जर कोकणातील शेतकऱ्यांना मदत द्यावयाची असेल तर ती भरघोस देण्यात यावी अशी मी मागणी करतो. आज कोकणातील शेती आणि गवत हे पूर्णपणे नष्ट झालेले आहे.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

श्री. परशुराम उपरकर....

सभापती महोदय, आज शेती आणि शेतीमध्ये उगवणारे गवत पूर्णपणे नष्ट झालेले आहे. अनेक ठिकाणी पशुधन आहे पण या पशुधनाला खाद्य कुठून द्यावे अशा प्रकारचा प्रश्न शेतकऱ्यासमोर निर्माण झालेला आहे. या मदतीमध्ये शेतीला हेक्टरी, गुंठेवार मदत देण्यात येणार आहे पण या ठिकाणी ज्या पशुधनाची नोंद झालेली आहे त्या पशुधनाच्या चाऱ्यासाठी काही अनुदान देता येईल काय याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, मागच्या वेळी 2005-2006 मध्ये फळझाडांच्या नुकसान भरपाईसाठी केंद्र शासनाकडून 27 कोटी रुपये मदत देण्यात आली पण हे 27 कोटी रुपये रोखीन द्यावेत की, निविष्ठा म्हणून द्यावेत हे ठरिवण्यासाठी एक वर्षे घालविले. त्यानंतर खताच्या रुपाने मदत देण्याचा निर्णय झाला. नियम 93 अन्वयेच्या सूचनेला माननीय कृषी मंत्र्यांनी दोन वेळा उत्तर दिले की, 15 माचे ते 15 मे, पर्यत या मदतीचे वाटप करण्यात येईल.पण कोणत्याही प्रकारचे वाटप करण्यात आलेले नाही. अद्यापही ते वाटप झालेले नाही. तेव्हा शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी मदत मिळाली पाहिजे अशा प्रकारची मी शासनाला विनंती करतो. तसेच ती मदत तातडीने आणि लवकरात लवकर कशी मिळेल यासाठी शासनाने योजना तयार करावी एवढीच मी या ठिकाणी सूचना करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी नियम 97 अन्वये मांडलेल्या अल्पकालीन चर्चेच्या निमित्ताने माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मागच्या वेळी फयानचे वादळ झाले. त्यावेळी महाराष्ट्र शासनाकडून गोंदिया जिल्हयाचे सर्व्हेक्षण केले गेले. माननीय प्रफुल्ल पटेल, केंद्रीय उड्डान मंत्री यांनी केंद्र शासनाकडे याबाबत तक्रार केली. त्यानंतर केंद्र शासनाच्या टीमने गोंदिया जिल्हयात येऊन पाहणी केली. त्यावेळी गोंदिया जिल्हयाची अंतिम आणेवारी 45 टक्के आली पण गोंदिया जिल्हयात दुष्काळ घोषित करण्यात आला नाही त्यामुळे गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांना पाहिजे ती मदत मिळाली नाही. गोंदिया आणि भंडारा जिल्हयात दुष्काळ असल्यामुळे त्या वर्षी फार मोठया प्रमाणात मजुरांनी रोजगार हमी योजनेवर काम केलेले आहे. म्हणून मागच्या वर्षी गोंदिया जिल्हयातील शेतकऱ्यांना किती मदत देण्यात आली, विम्याचे पैसे किती दिले हे माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणातून सांगावे. खरे म्हणजे मागच्या वर्षी पडलेल्या अवकाळी पावसामुळे
झालेल्या नुकसानीच्या संदर्भात गोंदिया जिल्हयाला न्याय मिळाला नाही तर या वर्षी तो कसा मिळेल असा माझ्यासमोर प्रश्न आहे.

सभापती महोदय, आम्ही अशी मागणी केली होती की, बागायतीसाठी 50 हजार रुपये आणि अन्य पिकांसाठी 25 हजार रुपये हेक्टरी मदत देण्यात यावी. परंतु या ठिकाणी दु:खाने सांगावे लागते की, शेतकऱ्यावर सातत्याने अन्याय होत आहे. या वर्षी अवकाळी पाऊस पडला त्यासंदर्भात वर्तमानपत्रांचे जाहीर अभिनंदन करणे आवश्यक आहे. लोकमत, सकाळ, तरुण भारत या सर्व विदर्भ क्षेत्रातील वर्तमानपत्रांतील यासंबंधीच्या बातम्यांची कात्रणे मागविण्यात यावीत. म्हणजे खऱ्या अर्थाने अवकाळी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे चित्र दृष्य स्वरुपात समोर येईल. बांधात एक फुट पाणी साचल्यामुळे, शेतकऱ्यांनी कापलेले धान या पाण्यात 24 तास भिजत राहिले.त्यामुळे तर त्याला अंकूर फुटले. हया धानाची मळणी केली तरी तो लाल तांदूळ तयार होतो आणि तो खाण्याला अयोग्य असतो अशा प्रकारची स्थिती शेतकऱ्यांची झालेली आहे. तुरीचे पीक गेले. अन्य पीक सुध्दा गेले. आता खरिपाची पिके घेऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण
झालेली आहे. सभापती महोदय, मी 8 एकर शेती गहू आणि चणे लावण्यासाठी ठेवली होती. पण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

या शेतीमध्ये अजूनही इतका ओलावा आहे की, त्या शेतीमध्ये गहू आणि चणे पेरता येत नाहीत. म्हणजे या वर्षी रब्बीचेही पीक घेता येत नाही इतकी वाईट परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून शेतकरी अत्यंत हवालदिल झालेला आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आपण या सभागृहात मांडतो. सुरुवातीला पाऊस उशिरा आला म्हणून शेतकऱ्यांनी विहिरीतून पाणी काढले. पण विषारी वायूमुळे गोंदिया जिल्हयातील, आमगाव आणि गोरेगाव तालुक्यातील शेतकरी मरण पावले. त्या वेळी या सभागृहात माननीय मंत्री महोदय श्री. आर.आर.पाटील यांनी मदतीची घोषणा केली होती पण त्या शेतकऱ्यांना अद्याप मदत प्राप्त झालेली नाही ही शोकांतिका आहे. शासन मदत करेल असे फक्त आश्वासन देण्यात येते पण मदत देण्यात येत नाही. अवकाळी पावसामुळे गोंदिया जिल्हयातील शेतकत्याचा मृत्यू झाला. मोरगाव अर्जुनीतील मृत्यमुखी पडलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांनी काय करावे, या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना मदत देणार काय हा खरा प्रश्न आहे. शेतामध्ये काम करीत असताना शेतकरी मृत्यू पावलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर .....

या मृत झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने न्याय देण्याचे ठरविले पाहिजे आणि त्यांच्या परिवाराला मदत केली पाहिजे अशी मी विनंती करतो. या शेतकऱ्यांना कोणता न्याय द्यावयाचा हे शासनाने आज ठरविले पाहिजे. मी एकच सांगू इच्छितो की, खरिपाचे पीक गेले, रब्बीचे पीक गेले. माननीय उपमुख्यमंत्री यांच्याकडे ऊर्जा विभाग आहे. तिरोडा तालुक्यामध्ये 2007 ते 2010 या कालावधीमध्ये 400 वीज कनेक्शन शेतकऱ्यांना दिलेले नाहीत. ते कनेक्शन तातडीने द्यावे अशी मी विनंती करतो. वीज बिल माफ करु नका असे जरी आमच्या नेत्यांनी म्हटले असले तरी मी असे सांगेन की, त्यांना जर आपण 50 टक्के सुट दिली तर शेतकऱ्यांचे कनेक्शन जोडले जातील आणि दुबार पीक घेण्यासाठी त्यांना पाणी उपलब्ध होईल. या अवकाळी पावसाच्या संदर्भात शासनाने निश्चित धोरण ठरविले पाहिजे आणि शेतकऱ्यांना मोठी मदत दिली पाहिजे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या ठिकाणी राज्यात झालेल्या अवकाळी पावसासंबंधीचा अतिशय महत्वाचा विषय चर्चेला आला आहे. ही चर्चा होत असताना या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी अगदी पोटतिडिकीने आपापल्या भागातील जे विषय आहेत, शेतकऱ्यांचे झालेले जे नुकसान आहे त्याबाबत चर्चा केलेली आहे. मला या ठिकाणी आदरणीय मुख्यमंत्री असतील, उपमुख्यमंत्री असतील, कृषी मंत्री असतील या सगळ्यांचे मनापासून अभिनंदन करावयाचे आहे. त्यांनी झालेल्या नुकसानीबद्दल तातडीने आढावा बैठक घेतली. याबाबतीत ते लवकर निर्णय जाहीर करतील याबाबतीत माझ्या मनात कोणतीही शंका नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी अवकाळी पावसाबाबत चर्चा करीत असताना ग्लोबल वॉर्मिंगला किती महत्व आहे याचा आपल्याला निश्चितपणे विचार करावा लागेल. हा विषय अतिशय महत्वाचा आहे असे मला आवर्जून सांगावेसे वाटते. जूनमध्ये जो पाऊस सुरु झाला तो डिसेंबरपर्यंत चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे अतीव प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी त्याबाबतीत काही उपाययोजना सुचविल्या. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हेक्टरी 50 हजार रुपये द्यावेत. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वीज जोडण्या ताबडतोब करुन द्याव्यात. खरोखर सर्वांच्या भावना लक्षात घेण्यासारख्या आहेत. परंतु मला एका वेगळ्या विषयाकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. आपण पाहतो की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे हवामानामध्ये फार मोठे बदल होत आहेत. त्यामुळे हवामानाचा अचूक अंदाज वर्तविण्यासाठी आपल्याला काही निर्णय घ्यावे लागतील. ज्यावेळी आपण दुसऱ्या देशामध्ये जातो तेव्हा आपल्याला माहीत आहे की, त्या ठिकाणी घराबाहेर जावयाचे असले तरी तेथील लोक आजचा हवामानाचा अंदाज काय आहे हे बघतात. आज स्नो फॉल होणार आहे काय, आज विंडी हवामान राहणार आहे काय हे बघतात. आपण तेवढे जरी पाहात नसलो तरी या ठिकाणी ऑटोमॅटीक वेदर फोरकास्टींग स्टेशन्स शासनाच्या वतीने बसविण्याची गरज आहे. त्यायोगे पुढच्या आठ दिवसाचा हवामानाचा अंदाज काय आहे, एक महिन्याचा हवामानाचा अंदाज काय आहे हे कळेल. त्या त्या ठिकाणी जी शासकीय कार्यालये असतील, मग तहसीलदार कार्यालय असेल किंवा इतर छोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी .....

कार्यालये असतील त्या ठिकाणी हा हवामानाचा अंदाज शेतकऱ्यांना उपलब्ध करुन द्यावा. त्यामुळे त्या ठिकाणी कोणते पीक घेतले तर नुकसान होणार नाही हे ठरविता येईल. या पध्दतीने काळजी घेतली तर निश्चितपणे शेतकऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर फरक पडू शकतो.

सभापती महोदय, आपला देश शेतीप्रधान आहे असे आपण म्हणतो. या देशातील 70 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. असे असताना आपल्याला काही धोरणे निश्चितपणे बदलण्याची आवश्यकता आहे. आपण उद्योगधंद्यांना सबसिडी देत असतो. त्याचप्रमाणे बियाणे असतील, औषधे असतील किंवा खते असतील या गोष्टी शेतकऱ्यांना अत्यल्प दरामध्ये उपलब्ध करुन द्याव्यात अशी माझी शासनाला आग्रहाची विनंती आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, अवकाळी पावसासंबंधी नियम 97 अन्वये सभागृहामध्ये अल्पकालीन चर्चा सुरु आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यात अवकाळी पाऊस झाल्यामुळे प्रशासनामार्फत सर्वत्र पंचनामे सुरु असताना पाऊस पडलेला आहे. त्याचप्रमाणे अवकाळी पाऊस पडत असताना राज्यात नवे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले. राज्याच्या नवीन मुख्यमंत्र्यांची काँग्रेस पक्षाच्या हायकमांडने घोषणा केली, त्या घोषणेनंतर लगेच उपमुख्यमंत्र्यांची घोषणा झालेली नव्हती. परंतु नवनियुक्त मुख्यमंत्र्यांनी प्रत्येक विभागातील मग कोकण असो, विदर्भ असो, मराठवाडा असो, पश्चिम महाराष्ट्र असो, खानदेश असो या सर्व भागातील लोकप्रतिनिधींबरोबर 8-8 तास सहयाद्री अतिथीगृहामध्ये चर्चा केली होती. रात्री अडीच अडीच वाजेपर्यंत पक्षाच्या आमदारांची भूमिका समजून घेतली आहे. विधानसभेचे अधिवेशन सुरु होण्याच्या पार्श्वभूमीवर त्यांची निवड झालेली असल्यामुळे प्रत्येकाच्या विभागातील प्रश्न त्यांनी समजून घेतले होते. त्यानंतर त्यांनी एक आराखडा तयार केला. प्रशासनाकडून माहिती घेतली. त्याचप्रमाणे पालकमंत्र्यांना 24 तारखेपर्यंत आपापल्या विभागात जाऊन अवकाळी पावसासंबंधीची माहिती घेऊन अहवाल सादर करावा असे सांगितले होते. तो अहवाल आल्यानंतर...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कोणत्या विषयावर चर्चा सुरु झाली आहे ?

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, आपण फक्त ओल्या दुष्काळासंबंधी आपले विचार मांडावेत.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मागील 3 दिवस वाया घालविले. राज्यात नवीन मुख्यमंत्री आलेले आहेत. त्यांना स्व.यशवंतराव चव्हाण यांचा वारसा लाभलेला आहे. माननीय मुख्यमंत्री नवीन असल्यामुळे त्यांची भूमिका समजावून घेतली पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सभागृहात अवकाळी पावसाची चर्चा सुरु आहे. नवीन मुख्यमंत्र्यांनी काय काय केले हे त्यांच्याकडून आम्हाला समजले. हे फार चांगले झाले. त्यांनी सर्व आमदारांबरोबर रात्री अडीच अडीच वाजेपर्यंत बैठका घेतल्या, पालक मंत्र्यांना अहवाल सादर करण्यास सांगितले हे समजले. ही सर्व वस्तुस्थिती असेल तर मग आमच्या मागणीप्रमाणे सरकारने चर्चेपूर्वी घोषणा का केली नाही ? सन्माननीय सदस्यांनी सभागृहाला माहिती दिली ते बरे झाले.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी फक्त ओल्या दुष्काळासंबंधी 2 मिनिटात आपले विचार मांडावेत.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ओला दुष्काळ घालविण्यासाठी पॉवरफूल मिनिस्ट्री पाहिजे आणि या राज्याला ती लाभली आहे. कारण नवीन मंत्रिमंडळाने दोन महत्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत. जैतापूर येथे अणूऊर्जा प्रकल्प सुरु करण्याचा महत्वाचा निर्णय घेतलेला आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी कृपया खाली बसावे.

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहात अवकाळी पावसावर चर्चा सुरु असून या विषयावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मागील दोन वर्षांपासून विदर्भातील कास्तकारांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. मग तो ओला दुष्काळ असो, कोरडा दुष्काळ असो, अतिवृष्टी असो, या नैसर्गिक आपत्तीमुळे सोयाबीनचे पीक, धानाचे पीक, कापसाचे पीक असो ही सर्व पिके वाया गेली आहेत. (अडथळा) सभापती महोदय, मला आपण संरक्षण द्यावे. मला मराठी भाषेतून नीट भाषण करता येत नाही तरी देखील मी मराठीतून बोलतो. परंतु समोरचे सन्माननीय सदस्य हे मराठीचे दुश्मन आहेत की काय ते मला समजत नाही. त्यांनी दुटप्पी धोरण सोडून द्यावे. ज्यावेळी मी मराठीतून बोलत असतो त्यावेळी ते काही तरी विसंगत बोलत असतात.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी माझ्याकडे बघून भाषण करावे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : विदर्भात चांगले पीक आलेले असताना कापसावर, धानावर, सोयाबीनवर मागील दोन वर्षांपासून वेगवेगळे रोग पडत आहेत. त्यासाठी शासनाने मदत जाहीर केली आहे, परंतु ती कास्तकारांपर्यंत पोहोचत नाही, याची शासनाने दखल घेतली आहे काय ? केंद्रात व राज्यात लोकशाही आघाडीचे सरकार आहे. या सरकारने शेतक-यांचे करोडो रुपयांचे कर्ज माफ केले आहे, मागील दोन वर्षात विजेची बिले माफ केली आहेत. तरी सुध्दा विदर्भातील शेतक-यांची परिस्थिती सुधारलेली नाही.

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी...

विदर्भातील कास्तकारांना जोडधंदे नाहीत, शेतीसोबत करावयाचे मत्स्यव्यवसाय, दुग्धव्यवसाय असे जोडधंदे नाहीत. विदर्भातील शेतक-यांनी उद्योगधंद्यासाठी मोठ्या प्रमाणावर आपल्या जमिनी दिलेल्या असताना त्या उद्योगामध्ये शेतक-यांना नोक-या मिळत नाहीत आणि मग अवकाळी पावसाचे, अतिवृष्टीसारखे संकट त्याच्यावर ओढवल्यानंतर त्याला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नाही. म्हणून विदर्भातील शेतक-यांना जोडधंदे उपलब्ध करुन द्यावेत आणि आता अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतक-यांना भरीव मदत करावी अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, पूर्वीच्या प्रथेप्रमाणे जेव्हा 1 डिसेंबरला हिवाळी अधिवेशन सुरु झाले त्यावेळीच राज्यातील तमाम जनतेचे लक्ष विशेषत शेतक-याचे, बळीराज्याचे लक्ष या सभागृहाकडे लागले, की या सभागृहामार्फत अवकाळी पावसामुळे, अतिवृष्टीमुळे अडचणीत सापडलेल्या शेतक-याला शासन कोणती मदत करणार, शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे या करिता राज्य शासन कोणते धोरण राबविणार यासंबंधीच्या अपेक्षा सहाजिकच राज्यातील शेतक-यांच्या मनामध्ये आहेत. या विषयाच्या संदर्भात या सभागृहामध्ये आपण कालपासून चर्चा सुरु केली. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, जयप्रकाश छाजेड, दिवाकर रावते, हेमंत टकले, भाई जगताप, डॉ. दीपक सावंत, श्रीमती उषा दराडे, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री सुभाष चव्हाण, जैनुद्दीन जव्हेरी, केशवराव मानकर अशा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपापली मते या ठिकाणी मांडली. अजूनही काही सन्माननीय सदस्यांना बोलायचे होते. परंतु वेळेअभावी त्यांना त्यांची मते मांडता आली नाहीत. आपणा सर्वांना माहीत आहे की, या राज्यावर ज्या ज्या वेळी संकटे आली मग लातूर-उस्मानाबादमध्ये झालेला भूकंप असेल, कोकणामध्ये झालेली प्रचंड अतिवृष्टी असेल, या राज्याला सातत्याने दुष्काळाला सामोरे जावे लागण्याची वेळ असेल, गारपीट किंवा अतिवृष्टी असेल अशा वेळी आपदग्रस्तांना मदत दिलेली आहे. या सर्व संकटांना आपण सामोरे गेलेलो असलो तरी राज्यातील जनतेने डिसेंबर महिन्यापर्यन्त सातत्याने पडत असलेला पाऊस, अतिवृष्टी ही पहिल्यांदाच पाहिलेली आहे. राज्यामध्ये सातत्याने पाऊस पडत आहे. राज्यातील बहुतेक धरणे चांगल्या प्रकारे भरली गेली. माझ्याकडे सुरुवातीला जलसंपदा विभाग होता त्यामुळे मी देखील समाधानी होतो. मला वाटत होते की यंदाचा उन्हाळा बळीराजाला चांगल्या प्रकारे जाईल. त्यादृष्टीने नियोजन केले होते. हे सर्व करीत असताना भूगर्भातील पाण्याची पातळी वाढलेली असताना राज्यात पडणा-या अवकाळी पावसामुळे, सातत्याने पडणा-या पावसामुळे शेतक-यांना वाफाचा मिळत नव्हता. शेतक-यांनी उत्तम प्रकारचे बियाणे पेरले होते. मधल्या काळात खताच्या टंचाईची परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु केन्द्र सरकारने मदत केल्यानंतर शेतक-यांना चांगल्या प्रकारचे खत, युरिया उपलब्ध करुन देण्यात आला. माथाडी कामगारांनी टोकाची भूमिका घेतली होती, त्यातून देखील मार्ग काढण्यात आला. असे वाटत होते

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

की शिवारामध्ये चांगल्या प्रकारचे आलेले पीक पाहून शेतकरी समाधानी होईल. परंतु काळाच्या पुढे आपले काही चालत नाही.

एक गोष्ट सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आणि राज्यातील जनतेने लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा संपूर्ण जगामध्ये सुरु आहे. जगातील काही देशातील जनतेने मागील 50-60 वर्षामध्ये बघितली नाही एवढी वृष्टी होतेय, एवढा बर्फ पडतोय.

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

आणि तशाच पध्दतीची परिस्थिती काही प्रमाणात पावसाच्या बाबतीत आमच्या देशामध्ये आणि राज्यामध्ये निर्माण झाली. ही परिस्थिती बघितल्यानंतर राज्यकर्ते कोणीही असतील, कोणतेही राज्यकर्ते असले तरी त्यांना केंद्रातून आणि राज्यातून मदत करावीच लागते. परंतु ही मदत करीत असताना ग्लोबल वॉर्मिंगचे संकट आणि या संपूर्ण हवामानामध्ये जे बदल झाले त्याचाही विचार झाला पाहिजे. पावसाळा सुरु होण्याच्या वेळी पूर्वी मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर 7 जूनला पाऊस सुरु व्हायचा. ही वेळ आता पुढे गेली आहे. आज आपण सर्वजण नागपूरच्या हिवाळी अधिवेशनासाठी याठिकाणी आलो असताना कोणाच्याही अंगावर स्वेटर दिसून येत नाही. आपण नागपूरला आल्यानंतर स्वेटर घालायचो. थंडीपासून बचाव करणारे गरम कपडे घालायचो. आता थंडीचा हंगाम पुढे गेला आहे. उन्हाळा देखील पुढे गेलेला आहे. संपूर्ण ऋतुचक्र बदलले की काय अशा प्रकारची शंका आपल्याला वाटू लागली आहे. खरे आता आपण इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी आणि बायो-टेक्नॉलॉजीच्या युगात प्रवेश केलेला आहे. एकेकाळी नक्षत्र बघूनच तुमच्या माझ्या भागातील शेतकरी कधी पाळी करायची, कधी पेरणी करायची, कधी नांगरट करायची, रान उन्हामध्ये किती तापवायचे याचा निर्णय घेत असत. हे संपूर्ण चित्र आता बदलले आहे.

सभापती महोदय, धरणासाठी निधी देण्याचा शासनाने प्रयत्न केला. सिंचनाचे क्षेत्र वाढविण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात आपले विचार मांडताना सिंचनाच्या बाबतीत काही भागामध्ये काम केले पाहिजे असे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.कमलकिशोर कदम आणि सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी आज हा मुद्दा मांडला. त्यांच्या या मताशी राज्य सरकार सहमत आहे. जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे याठिकाणी उपस्थित आहेत, अर्थ खाते माझ्याकडे आहे. पुढील अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळया भागात अधिक चांगल्या प्रकारे सिंचनाचे काम होण्याच्या दृष्टीकोनातून निधी देण्याची राज्य सरकारची तयारी राहील, माझ्यासारख्या कार्यकर्त्याची तयारी राहील ही गोष्ट मी आवर्जून सांगू इच्छितो. या सर्व गोष्टी करीत असताना अनेक जणांनी केंद्र स्तरावर आणि राज्य स्तरावर राज्यकर्ते म्हणून काम केले आहे. अनेकांनी फक्त घोषणा केल्या. आपल्या शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज पुरवठा केला पाहिजे असे सांगितले. परंतु घोषणा झाल्या तरी कृती मात्र कोणाकडून झाली नाही. पहिल्यांदा युपीए सरकारने डॉ.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली, माननीय श्रीमती सोनीया गांधी असतील,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

माननीय श्री.शरद पवार असतील, माननीय श्री.पी.चिदंबरम असतील अशा अनेक मान्यवरांनी देश पातळीवर चर्चा केली आणि आमच्या शेतकऱ्यांना सावकारांच्या पाशातून बाहेर काढण्यासाठी कमी व्याज दराने पीक कर्ज देता आले पाहिजे ही भूमिका स्वीकारली. फक्त भूमिका स्वीकारली नाही, तर 71 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला. इतकेच नव्हे तर ज्यावेळी आमच्या लक्षात आले की, राज्य सरकारमध्ये काम करीत असताना आपल्या राज्यातील जे शेतकरी आहेत त्यांच्या बाबतीत देखील आपण काहीतरी ठोस भूमिका घेतली पाहिजे. त्यावेळेस राज्य सरकारने देखील 5 ते 6 हजार कोटी रुपयांच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला.

सभापती : विशेष बैठकीची वेळ दुपारी 12.45 वाजेपर्यंत होती. सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत मी सभागृहाची वेळ वाढवित आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होणार होती, त्याऐवजी दुपारी 1.30 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरु होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, आपण मला उत्तराचे भाषण करण्यासाठी वेळ उपलब्ध करुन दिला त्याबद्दल मी आपला आणि सभागृहाचा देखील अत्यंत आभारी आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना मोठया प्रमाणावर कर्ज पुरवठा देण्याचा देखील निर्णय केंद्र सरकारने घेतला. काही भागातील बँका चुकीच्या पध्दतीने कारभार करीत आहेत. मी देखील आज राज्य सहकारी बँक आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये प्रतिनिधीत्व करतो. आमच्यासारख्या कार्यकर्त्यांना वाटते की, काही भागातील बँका चांगल्या पध्दतीने का चालत नाहीत? मराठवाड्यातील एक-दोन बँका वगळता इतर सर्व बँका अगदी डबघाईला आलेल्या आहेत. नीट चालविल्या जात नाहीत. त्या भागातील बँका बाहेरच्या लोकांनी जाऊन चालवावयाच्या का? स्थानिक लोकांचे ते काम नाही का? वेगवेगळया भागातील लोक पोटतिडकीने आपली भूमिका सभागृहात मांडतात. त्यांनी आपापल्या भागातील बँकांची अवस्था काय आहे हे पाहिले पाहिजे. खऱ्याअर्थाने शेतकऱ्यांची आर्थिक नाडी म्हणून ज्या बँकांकडे पाहिले जाते त्यापैकी विदर्भातील बँकामध्ये घोटाळ्याचे प्रकार आम्ही बघितले.

नंतर 2एच.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अजित पवार .....

कोकणातील सहकारी बँकांची परिस्थिती चांगली आहे. विशेषकरुन सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांची अलिबाग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तर एकदम उत्कृष्ट आहे. परंतु पश्चिम महाराष्ट्रातील बँकांची स्थिती देखील चांगली आहे. माझा मुद्दा असा आहे की, शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने बँका चांगल्या असतील तर त्या मदत करु शकतात. सहकारी बँकेमध्ये आपण त्रिस्तरीय सिस्टम सुरु केली असून त्यात राज्य सहकारी बँक, जिल्हा सहकारी बँक आणि गाव पातळीवर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था अशी ही व्यवस्था आहे. त्यासाठी आपल्याला नाबार्डने मदत केली व केंद्रशासन सुध्दा मदत करीत आहे. त्याचबरोबर डॉ. पंजाबराव देशमुख पीक प्रोत्साहन व्याज अनुदान ही योजनाही आपण सुरु केली आहे. याचे कारण असे की, शेतकऱ्यांना दोन ते चार टक्क्यांनी कर्ज पुरवठा करता यावा हाच त्यामागचा हेतू आहे. मागील काळात शेतकरी सावकाराचे व्याज देऊन देऊन मेटाकुटीला येत होता असा आपणा सर्वांचाच अनुभव आहे. केवळ एवढ्यावरच केंद्र व राज्यशासन थांबले नाही तर त्याच्या पुढे जाऊन पिकाच्या आधारभूत किंमती ठरविण्याचाही प्रयत्न झालेला आहे. आज आपल्याकडे कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु असून त्यावर अनेक सन्माननीय सदस्य बोलतात. दरवर्षी नागपूरला होणाऱ्या हिवाळी अधिवेशनात कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासन मदत करीत नाही, कापसाला भाव मिळत नाही अशा प्रकारे कापसावर खूप चर्चा होत होती, हे सर्वांनाच माहीत आहे. यावर्षी मात्र केंद्रशासनाने कापसाची आधारभूत किंमत 3000 रुपये प्रति क्विंटल एवढी ठरविली असल्याने सुदैवाने जगाच्या बाजारपेठेत कापसाचा भाव सुध्दा वाढलेला आहे व त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. मराठवाडा, विदर्भ तसेच खानदेशातील शेतकऱ्याच्या कापसाला 4500 रुपये प्रति क्विंटल इतका भाव मिळू लागला ही आनंदाची बाब आहे. कापूस खरेदीला शासनाने सुरुवात केली परंतु शासनाच्या कापूस खरेदी केंद्रांवर कापूस विक्रीसाठी येतच नाही. त्यात शासनाला कमीपणा वाटण्याचे काही कारणही नाही. आमची सुध्दा हीच भूमिका आहे की, शेतकऱ्याला 3 हजाराच्या पुढे भाव मिळावा परंतु त्या किंमतीच्या खाली कापसाचा भाव आला की राज्यशासन खरेदी करण्यास तयार आहे. कापसाचे सुधारित बी.टी. हे बियाणे आल्यापासून उत्पादनात सुध्दा वाढ झालेली आहे. अलिकडल्या काळात अनेक चांगली बियाणे निघाली असून त्यांचा फायदा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

शेतकऱ्यांना व्हावा, माझ्या राज्यातील बळीराजाला उत्तम प्रकारची खते मिळाली पाहिजेत, पाणी व्यवस्थित मिळाले पाहिजे, ठिबक व तुषार सिंचनासारख्या विविध योजना सुध्दा केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून सवलती देऊन राबविल्या जात आहेत. अशा सर्व योजनांचा फायदा शेतकऱ्यांना खास बाब म्हणून मिळावा याची जाण राज्यकर्ता म्हणून आम्हाला असल्यामुळेच ही भूमिका शासनाने स्वीकारली आहे. ऊसाच्या पिकाला तर अलिकडे 2000 रुपये टन एवढा चांगला भाव मिळायला लागला आहे. त्याचबरोबर तांदूळ व गहू यांनाही चांगला दर दिला जात आहे. शेतकऱ्याच्या पिकाला चांगला दर मिळत असला तरी गरीब वर्गाला सुध्दा त्या वस्तू खरेदी करता याव्यात म्हणून शासनाने दोन व तीन रुपये किलोने या वस्तू सबसिडीच्या माध्यमातून गरिबांसाठी उपलब्ध करुन दिल्या व त्यासाठी केंद्रशासनाने जवळपास 65000 कोटीची सबसिडी देण्याची भूमिका घेतली आहे. यामध्ये जो हेतू आहे तो असा की जो उत्पादक आहे त्यालाही पैसा मिळाला पाहिजे आणि तेवढ्या जास्त दराने गरीब विकत घेऊ शकत नाहीत म्हणून त्यांना सबसिडी देऊन ते धान्य उपलब्ध करता आले पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे. राज्यात कोणाचाही भूकबळी होता कामा नये, पोटभर अन्न सर्वांनाच मिळाले पाहिजे म्हणून प्रत्येक कुटुंबाला 35 किलो धान्य देण्याची योजना शासन राबवित आहे.

महोदय, कापूस निर्यातीबद्दल या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, कापूस निर्यातीला मुदतवाढ देण्यात यावी. ही मुदत 15 डिसेंबरपर्यंत देण्यात आलेली आहे. नंतर जर ती बंद झाली तर कापसाचे दर खाली कोसळतील अशी भीती असते. सूत गिरण्या चालविणाऱ्या ज्या संस्था अथवा खाजगी लोक आहेत त्यांची मागणी आहे की, कापसाची निर्यात बंद करावी. त्याचबरोबर जे वेगवेगळ्या प्रकारचे कापड तयार करणारे लोक आहेत त्यांचीही तीच मागणी आहे. कारण त्यांना जास्त भावाने कापसाच्या गाठी विकत घ्याव्या लागतात. अशा परिस्थितीत दोन्ही गोष्टींचा समन्वय साधण्याचे काम शासनाला करावे लागत आहे. म्हणून राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी केंद्रीय वाणिज्य मंत्री माननीय श्री. आनंद शर्मा यांना दि. 6.11.2010 रोजी एक पत्र पाठविलेले आहे. त्यानुसार ओपन जनरल लायसेन्स अंतर्गत कापसाची निर्यात खुली करण्यात आली असून केंद्रशासनाने 55 लाख गाठीपर्यंतच ही निर्यात सिमीत केलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

सभापती महोदय, आम्ही आज जे आकडे घेतले त्यावरुन साधारणत: 10 ते 15 लक्ष गाठींचीच निर्यात डिसेंबरच्या 3-4 तारखेपर्यंत झाल्याचे दिसून आलेले आहे. 15 डिसेंबर पर्यंत कापूस निर्यातीची जी मुदत होती ती वाढवली पाहिजे यासाठी राज्यशासन आग्रही राहील व त्यासंदर्भात राज्यकर्त्यांना जाणीव देखील आहे. या विषयाची माहिती आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. पवार साहेबांच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. केंद्रसरकारमध्ये मा. विलासराव देशमुख, मा. सुशीलकुमार शिंदे, मा. प्रफुल्ल पटेल आणि इतर सर्वांची मदत घेऊन कापूस निर्यातीला मुदवाढ देण्यासाठी मा. मुख्यमंत्री तसेच आम्ही सर्व मंडळी प्रयत्नशील आहेत, हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. कापूस निर्यातीला मुदतवाढ दिली पाहिजे या मताचेच दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आहेत व ही मुदतवाढ मिळवून देण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील राहील अशी मी आपल्याला ग्वाही देतो.

सभापती महोदय, आज शेतकरी निश्चितपणे हवालदिल झालेला आहे अशी भूमिका अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेली आहे. ज्या ज्या वेळी ऊस उत्पादक शेतक-यावर संकट आले त्या त्या वेळेस राज्यसरकारने त्यांना भरीव अशी मदत केलेली आहे. आंबा, संत्रा, द्राक्ष बागा पिकविणा-या शेतक-यालाही शासनाने वेळोवेळी मदत केलेली आहे. परंतु या अवकाळी विदर्भ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया या ठिकाणी मोठया प्रमाणात धानाचे पीक घेतले जात असते तर सिंधुदुर्ग, रत्नागिरी,रायगड व ठाणे जिल्हयातील काही भागात भाताचे पीक घेतले जात असते. या ठिकाणच्या लोकांना या पिकाशिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नाही याची शासनाला कल्पना आहे. मी स्वत: कोकणच्या महसूल खात्याच्या आयुक्तांना तसेच नागपूरच्या महसूल खात्याच्या आयुक्तांना सूचना दिलेल्या आहेत. ब-याचदा धानाचे किंवा भाताचे पीक शेतातून कापून खळयावर आणले तर त्यांचे पंचनामे केले जात नाही. शेतक-याने ते धान कापून एका ठिकाणी ठेवले आणि पाऊस आल्यानंतर त्या धानाला कोंब फुटले तर त्यामध्ये त्या शेतक-याचा काही एक दोष नसतो. त्यामुळे अशा प्रकारे सुध्दा खळयात कापून ठेवलेल्या धानाचे नुकसान झाले असले तरी त्या धानाचे किंवा भाताचे पंचनामे झालेच पाहिजे अशा प्रकारच्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

क्लिअर सूचना मी आयुक्तांना दिलेल्या आहेत. शेतक-याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्य सरकार शेतक-यांच्या पाठीशी मजबुतीने उभे आहे हाच मॅसेज आम्हाला राज्यातील जनतेपर्यंत द्यावयाचा आहे.

सभापती महोदय, स्थायी आदेशा प्रमाणे कृषी विभागाची, महसूल विभागाची यंत्रणा किंवा इतर यंत्रणा फिल्डवर काम करीत असते. परंतु मघल्या काळात राजकीय घटना घडल्यामुळे सत्तेवर कोण येणार, काय येणार याबाबत ते विचार करीत बसतात त्यामुळे या संकटाच्या बाबतीत राज्य शासनाने तातडीने जून ते सप्टेंबर, 2010 या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे आणि नोव्हेंबर, 2010 मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती आणि फळ पिकांच्या नुकसानीबाबतचे पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश तातडीने काढलेले आहेत.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

आणखी काही गडबड घोटाळा होऊ नये म्हणून आम्ही काही खबरदारी घेतलेली आहे. शासनाकडून आदेश देण्यात आले आहेत की, शेतीचे पंचनामे विभागीय आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने जलद गतीने पूर्ण करण्यात यावेत. हे पंचनामे गावनिहाय असावेत, त्या पंचनाम्यावर तलाठी,ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या सह्या असाव्यात, झालेले पंचनामे तत्सम अधिकारी यांनी रॅन्डम पध्दतीने 10 टक्के तपासावेत, एस.डी.ओ. आणि तत्सम अधिकाऱ्यानी 5 टक्के तपासावेत, जिल्हाधिकारी आणि तत्सम अधिकाऱ्यांनी 2 टक्के तपासावेत. दिनांक 12.12.2010 पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांनी पंचनाम्याच्या आधारावर एकत्रित अहवाल कृषी आयुक्त यांना सादर करुन त्याची एक प्रत विभागीय आयुक्त यांना सादर करावयाची आहे. तसेच आमच्याकडे दिनांक 12.12.2010 पर्यंत पाठवावयाची आहे. जेणेकरुन सर्व चित्र आपल्या सर्वांसमोर येईल. हा अहवाल येईपर्यंत आम्ही थांबणार नाही. या सर्व गोष्टी करणे आवश्यक आहेत कारण त्या शिवाय वस्तुस्थिती आपल्यासमोर येणार नाही. लोकप्रतिनिधींचे त्यांच्या भागात दौरे देखील सुरु आहेत. उद्या सभागृहाला सुट्टी असल्यामुळे दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या मतदारसंघात जाऊन प्रत्यक्ष पाहणी करतील.

सभापती महोदय, आपल्या राज्यावर संकट आलेले आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरकार आहे असा मर्यादित विचार करुन चालणार नाही किंवा भाजप आणि शिवसेना पक्ष विरोधी पक्षात आहे असा देखील विचार करुन चालणार नाही. महाराष्ट्रामध्ये दिग्गज मुख्यमंत्री झालेले आहेत. राज्यावर कोणत्याही प्रकारचे संकट ओढवल्यास त्यास महाराष्ट्रातील जनतेने धैर्याने तोंड दिलेले आहे. मग 26.11 चा अतिरेक्यांचा हमला असो, बॉम्ब स्फोट असो, भूकंप असो, नक्षलवाद्यांचा हल्ला असो की नैसर्गिक आपत्ती असो या सर्व संकटांच्या वेळी आपण राजकारण बाजूला ठेवून संकटांमध्ये सापडलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी जनतेने तसेच राजकीय मंडळीनी मदतीचा हात दिलेला आहे. तशाच पध्दतीची मदत आता देखील मिळेल अशी मला अपेक्षा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

हे सर्व करीत असताना मी सभागृहाला सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत स्थायी आदेशापेक्षा शेतकऱ्यांना अधिकचे देण्याची आवश्यकता आहे. तोच शब्द मी या चर्चेच्या निमित्ताने सभागृहाला देतो. आम्ही स्थायी आदेश बाजूला ठेवलेले आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे स्थायी आदेश इतके तुटपुंजे आहेत की, शेतकरी तेवढ्या रकमेचा चेक घेण्यासाठी देखील जात नाही. यापुढे शेतकऱ्यांच्या मनात अशाप्रकारची भावना येऊ नये म्हणून स्थायी आदेश बाजूला ठेवण्याचा निर्णय आम्ही घेत आहोत.

राज्यावर जे संकट आलेले आहे ते केंद्र सरकारच्या मदतीच्या कोणत्याही नॉर्म्समध्ये बसत नाही. म्हणून आम्ही केंद्र सरकारच्या मदतीवर अवलंबून राहणार नाही. राज्यातील केंद्र सरकारात असलेल्या वरिष्ठ मंत्र्यांकडून मदत मिळविण्यासाठी आम्ही जरुर प्रयत्न करु. परंतु त्यांच्याकडून मदत मिळो अथवा न मिळो, आम्ही शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवणार नाही. या विषयावरील चर्चा सुरु व्हावी म्हणून शेतकऱ्यांची जी मागील देणी होती ती देण्याची भूमिका आम्ही सभागृहासमोर मांडली. दिनांक 31 मार्च 2011 ही मदतीची शेवटची तारीख आहे. परंतु आम्ही त्या तारखेपर्यंत थांबणार नाही. त्या अगोदरच शेतकऱ्यांना मदत देण्याची भूमिका वित्त व नियोजन मंत्री या नात्याने माझी राहील. मागील मदत देऊन आम्ही शेतकऱ्यांवर मेहेरबानी करीत नाही. ही त्यांच्या हक्काची मदत आहे. कारण आम्ही तशी घोषणा केली होती. परंतु त्यांना ती मदत मिळाली नाही ही सल आमच्या मनात होती. ही खंत आमच्या मनात होती. जे खरे आहे ते मी नम्रपणे मान्य करतो. परंतु आता ते तातडीने कसे दुरुस्त करता येईल आणि त्यांना मदत देऊन कशाप्रकारे बाहेर काढता येईल याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आता जो अवकाळी पाऊस झालेला आहे त्याबाबत देखील निश्चितपणे मदत करता येईल.

सभापती महोदय, आपण मागील 40-50 वर्षे राजकारणात आहात. आपण जिल्हापरिषदेवर काम केलेले आहे. संघटनेचे अध्यक्ष म्हणून आपण काम केलेले आहे. अनेक संघटनांवर काम केलेले आहे. शेतकरी अडचणीत आल्यानंतर तो आत्महत्या करतानाचे चित्र आपणास कधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

पहावयास मिळाले नाही. परंतु मधल्या कालावधीत विदर्भातील सहा जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र सुरु झाले. त्या भागातील शेतकऱ्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी पंतप्रधान तसेच मुख्यमंत्र्यांचे पॅकेज देण्यात आले. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी असा मुद्दा उपस्थि केला होता की, अशाप्रकारचे पॅकेज जाहीर केल्यानंतर त्याचा फायदा नक्की कोणाला होतो याचा विचार सरकार करते काय ? त्यांनी सर्वश्री देशमुख, मोघे, ठाकरे, कासावार, पाटील, इत्यादीची नावे घेतली. सहा जिल्ह्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत केल्याशिवाय त्यांना आत्महत्येपासून परावृत्त करता येणार नाही. त्यांना आर्थिक ताकद द्यावी लागेल. त्यांना सक्षम करावे लागेल म्हणून आम्ही पंतप्रधान पॅकेज निवडीचे जे निकष केले होते त्यामध्ये कर्जाचा बोजा असणाऱ्या कुटुंबांना लाभ दिला. मुख्यमंत्री पॅकेज होते त्यामध्ये स्वयंसहाय्यता गटामध्ये कमीत कमी 10 लाभार्थ्यांपर्यंत शक्य तो त्यांच्या नावाचा समावेश असावा अशी अट घातली. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी काल ज्यांची ज्यांची नावे घेतली वा मला जी कागदपत्रे दिली ती सर्व कागदपत्रे व नावे रात्री तपासून घेण्यात आली. लाभार्थ्यांसाठी जे नॉर्म्स ठरविण्यात आलेले आहेत त्या नॉर्म्स मध्ये ते सर्व लोक बसतात ही वस्तुस्थिती मी आपल्याला सांगतो. लाभार्थी कोणत्या पक्षाशी संबंधित असावेत हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्या खोलात मी जात नाही. परंतु यामध्ये कोणी जाणीवपूर्वक चुकीने लाभ घेण्याचा प्रयत्न केला..

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

आणि खरोखर जो लाभार्थी आहे व त्याचा हक्क डावलण्याचा प्रयत्न झाला तर त्या प्रकरणात संबंधितावर ॲक्शन घेतली पाहिजे परंतु सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, आतापर्यंत माझ्याकडे जी काही कागदपत्रे आली आहेत ती पाहिल्यानंतर तसे करण्याचे काही गरज नाही. या पेक्षा आपल्याकडे काही वेगळी कागदपत्रे असतील आणि माननीय पंतप्रधान आणि माननीय मुख्यमंत्र्याच्या पॅकेजमध्ये जे निकष ठरविण्यात आलेले आहेत त्या निकषामध्ये जर त्या व्यक्ती बसत नसतील तर त्या व्यक्ती राष्ट्रवादी वा कॉंग्रेस ,भारतीय जनता पार्टी , शिवसेना वा मनसे अशा कोणत्याही पक्षाची असल्या तरी त्यामध्ये आम्हाला कोणताही पक्ष पाहण्याचे कारण नाही आम्ही राज्यकर्ते म्हणून कारभार करीत असतांना ती व्यक्ती ख-या अर्थाने लाभार्थी आहे काय हीच गोष्ट पाहू व त्या व्यक्तीला मदत करु ही खात्री मी सभागृहाला या चर्चेच्या निमित्ताने देऊ इच्छितो.

सभापती महोदय, द्राक्ष उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणावर अडचणीत आला आहे .द्राक्ष उत्पादन करणारा शेतकरी आत्महत्या करीत आहे हे आपल्याला प्रथमच पहावयास मिळत आहे.राज्यामध्ये अशा चार केसेस घडल्या आहेत.या चर्चेच्या मार्फत मला बळीराजाला असे सांगावयाचे आहे की, नैसर्गिक संकट आले म्हणून आत्महत्या केल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय आपल्यासमोर नाही अशा प्रकारची भूमिका अजिबात घेऊ नका . त्याला आत्महत्येपासून आपल्याला परावृत्त करावेच लागेल तसेच त्याला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी राज्य सरकार मजबुतीने त्याच्या मागे उभे राहील. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले,श्री संजय पाटील ज्या भागाचे प्रतिनिधित्व करतात त्या भागामध्ये द्राक्ष बागा मोठया प्रमाणावर आहेत. सभापती महोदय, आपल्याही सांगली जिल्हयामध्ये द्राक्षाच्या बागा मोठया प्रमाणावर आहेत. नाशिक,सांगली, पुणे उस्मानाबाद या जिल्हयामध्ये द्राक्षाच्या बागा अधिक प्रमाणावर आहेत.या शेतक-यांनी कर्ज काढले आहे आणि त्यांच्या द्राक्षाच्या बागांचे नुकसान झालेले आहे तेव्हा त्या शेतक-यानी जे कर्ज काढलेले आहे त्या कर्जावरील व्याजाची रक्कम कितीही असली तरी दोन वर्षाचे व्याज भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे . हा निर्णय कशा करता घेतला आहे ? एक वर्षाचे व्याज जर राज्य सरकारने भरले आणि पुढच्या वर्षी पीक आले तरी पुन्हा व्याज भरण्याचा त्याच्यावर बोजा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार..

येईल म्हणून राज्य सरकारने असे ठरविले आहे की, दोन वर्षे राज्य सरकारने कर्जावरील व्याज भरावयाचे व बॅकांना सांगावयाचे की, या शेतक-यांच्या कर्जावरील व्याज राज्य सरकार भरणार असून त्याला पुन्हा नवीन कर्ज देण्यास तयार रहावे. हे कर्ज जर शेतक-याला मिळाले तर तो शेतकरी जोमाने आपल्या काळया आईची सेवा करील व द्राक्षाच्या बागा उत्तम प्रकारे फुलविण्याकरता चांगल्या प्रकारे पुढाकार घेईल.

नंतर श्री.सरफरे`

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

हा पहिला निर्णय याठिकाणी घेत आहोत.

या गोष्टी करीत असतांना काल माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर व अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यामध्ये माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचे नाव घेतले, अन्य माननीय सदस्यांचे नाव घेतले. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपण धीर धरावयास तयार नाहीत. तुम्ही आमच्याबरोबर होता, परंतु तुम्ही जरासुध्दा थांबला नाहीत व तिकडे गेलात. त्यामुळे तिकडून माननीय श्री. प्रकाश सोळंके यांना आम्हाला घ्यावे लागले. माननीय श्री. प्रकाश सोळंके यांना जे दिले ते तुम्हाला द्यावयाचे माझ्या मनामध्ये होते. परंतु तुम्ही धीर धरायला तयार नाही तर काय करणार? तुम्ही पेशन्स दाखविणे आवश्यक होते. परंतु तुम्ही भावनेच्या आहारी गेला. तुम्हाला माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी काहीतरी सांगितले की कुणी सांगितले हे मला माहीत नाही, ठीक आहे. तुम्ही मला काल इशारा करीत होता. कदाचित याठिकाणी राज्यमंत्री पद नसेल म्हणून राहिले असेल. यामधील गंमतीचा भाग आपण बाजूला ठेवू या.

माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर आपल्या व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी सहमत आहे. आज शेतकऱ्यांच्या शेतामध्ये असलेल्या विहिरीला पाणी आहे. आज नद्यांना, ओढे नाल्यांना पाणी आहे, धरणामध्ये, कॅनॉलमध्ये पाणी आहे. हे पाणी शेतीला देत असतांना त्यामध्ये आमचा शेतकरी अडकला आहे. या अवकाळी पावसामुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांच्या पंपाचे कनेक्शन डिसेंबर 2010 ते एप्रिल 2011 पर्यंतच्या कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारे तोडण्यात येणार नाही. हे तुम्हाला पाहिजे होते. डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे चार महिने तुम्ही आम्हाला सांगितले होते, आम्ही एप्रिल महिन्यापर्यंत म्हणजे पाच महिने केले आहे. आम्हाला माहीत आहे की, शेतकऱ्याला थोडासा एक महिना अधिक दिला तर असणाऱ्या पाण्याचा वापर करुन काही ना काहीतरी पीक घेण्याचा तो प्रयत्न करील ही वस्तुस्थिती आहे. त्यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यापूर्वी ज्यांचे वीजेचे कनेक्शन तोडण्यात आले असतील त्यांचे कनेक्शन पुन्हा जोडून देण्यात येतील त्यामध्ये अडचण निर्माण होणार नाही. यापूर्वी सांगण्यात आले होते की,ट्रान्सफॉर्मरसाठी ज्यांनी पैसे भरले आहेत केवळ त्यांची नाही तर सर्वांची कनेक्शन जोडून देण्यात येतील आणि उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर करुन व तेथील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. अजित पवार...

भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन त्या पाण्यामध्ये कोणते पीक घ्यावयाचे हे ठरवून त्या पध्दतीने पिके घ्यावीत त्यासाठी हे राज्य शासन आणि ऊर्जा विभाग त्यांना मदत करील. या चर्चेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाने हा निर्णय घेतला आहे. निश्चितपणे राज्यातील शेतकऱ्यांना मदत करणारा हा निर्णय आहे हे कुणीही नाकारु शकत नाही.

सभापती महोदय, ही मदत करीत असतांना कुणीतरी म्हणाले की, कोंबडीचे नुकसान झाले तर 2 रुपयांची मदत दिली जाते. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, कदाचित तुम्ही चुकून कोंबडीला 2 रुपये दिले जातात असे सांगितले असेल. आम्ही अंडयाला 2 रुपये देतो. त्याचप्रमाणे गाय, बैल, म्हैस यांचे नुकसान झाले असेल तर 10 हजार रुपये मदत देतो. बऱ्याचशा पुढाऱ्यांचे घोडे बाजारात येतात हे आपणास माहीत आहे. त्यामुळे त्यांच्या घोडयाचे काही नुकसान झाले तर आम्ही त्या घोडयासाठी मदत करावयास तयार आहोत. त्यांच्या एकेका घोडयाची किंमत 2 लाख आहे. त्या घोडयाच्या मालकाच्या नावामुळे घोडयाची किंमत वाढते की, खरेच तो घोडा 2 लाखाचा आहे की 10 लाखाचा आहे, हे मला माहीत नाही. मी याबाबतीत एक गोष्ट मान्य करीन की, मागच्या काळात अशाप्रकारची तुटपुंजी मदत मिळत होती. माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे साहेबांनी पत्र दिले होते की, यामध्ये शेळी, मेंढीचा व्यवसाय करणाऱ्यांचे सुध्दा नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाई शेळी व मेंढीला 1 हजार रुपये दिली जाते. व ती फार कमी रक्कम आहे, असे त्यांचे म्हणणे होते.परंतु 100 टक्के नुकसान भरपाई कुणीही राज्यकर्ते असले तरी ते देऊ शकत नाहीत. माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांचे सरकार साडे चार वर्षे सत्तेवर होते ते सुध्दा देऊ शकले नाही ही वस्तुस्थिती आहे. याठिकाणी आपण त्या बळीराजाला पुन्हा उभे रहाण्यासाठी मदत करतो. आम्ही त्याला वाऱ्यावर सोडलेले नाही. हे सरकार त्याच्या पाठीमागे उभे आहे हा वेगळा मेसेज आपण त्याच्यापर्यंत पोहोचविला पाहिजे. त्याला खऱ्या अर्थाने मजबूतीने उभे करण्याची राज्यकर्ते म्हणून आमची भूमिका आहे. याठिकाणी माझ्याकडे असलेल्या आकडेवारीनुसार 33 जिल्हयांमध्ये 5 लाख 44 हजार 459 हेक्टरपर्यंत वेगवेगळया पिकांच्या क्षेत्राचे नुकसान झाले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासंबंधीचे आकडे प्राप्त झालेले आहे. तसेच अजूनही काही बाबतीत सूचना देण्यात आलेल्या आहेत आणि त्यासंदर्भातील आकडे दिनांक 10 ते 12 तारखेपर्यंत निश्चितपणे येतील अशा प्रकारची खात्री मी या चर्चेच्या निमित्ताने आपल्या सर्वांना देऊ इच्छितो.

सभापती महोदय, मी मागच्या वेळची आकडेवारी पाहिली. ज्यावेळी फयानचे चक्रीवादळ इ ाले होते, तेव्हा आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना 276 कोटी रुपयांची मदत करण्यात आली होती. त्यावेळी शेतकऱ्यांना स्थायी मदतीपेक्षा अधिक मदत देऊन त्या संकटातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला होता हे देखील मला आवर्जून सांगावयाचे आहे. तसेच या वेळेसही यादृष्टीने सर्व कामे करीत असताना शेतकऱ्यांना जी काही मदत करावयाची आहे, ती करीत असताना कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनामार्फत सुरु असणाऱ्या इतर विकास कामांमध्ये कुठेही खंड पडू नये, त्यामध्ये अडचणी येऊ नयेत, कारण एस.सी., एस.टी., एन.टी. आणि ओ.बी.सी. असा गरीब वर्ग आहे, जो शेतकरी नाही, ज्याच्याकडे शेती नाही अशा वर्गासाठी ज्या योजना आहेत, त्यांना कुठे धक्का लागता कामा नये. तसेच शासन गरीब वर्गातील मुला-मुलींसाठी शिष्यवृत्ती देते, त्यावर देखील काही परिणाम होता कामा नये. आज राज्यावर एवढया मोठया प्रमाणात संकट आल्यानंतर त्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढत असताना आपल्याला निधीची कमतरता भासू नये यासाठी उरलेल्या चार महिन्यामध्ये वेगवेगळा असा अधिक कर देणारा जो विभाग आहे, त्याबाबतीत त्या विभागांना अधिक अलर्ट करण्याचा आमचा प्रयत्न राहील. यासाठी आम्ही पोलीस विभागाची मदत घेत आहोत.जेणेकरुन राहिलेल्या वर्षामध्ये कराच्या रुपाने जे काही ठराविक उत्पन्न येणार असेल तर त्यामध्ये कोणत्याही परिस्थितीत गळती निर्माण होता कामा नये. त्याबाबतीत माझ्याकडून किंवा माननीय मुख्यमंत्र्यांकडून स्टे देता कामा नये अशा प्रकारची आम्ही खबरदारी घेत आहोत.

सभापती महोदय, या सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे.राज्य शासन यावेळेस जी मदत जाहीर करणार आहे, अशा वेळी पुढील कोणत्या तरी अधिवेशनामध्ये पुन्हा असा मुद्दा उपस्थित होता कामा नये की, शासनाने मागील अधिवेशनामध्ये मदत जाहीर केली परंतु अजूनही शेतकऱ्यांना मदत दिली जात नाही. म्हणून मी आपल्या सर्वांना, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब आपल्याला सांगू इच्छितो की,याबाबतीत जी मदत द्यावयाची आहे,ती ठराविक काळामध्येच देणार आहोत.सन्माननीय सदस्यां-

. . . .2 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . ..

पैकी कोणालाही पुन्हा अशा प्रकारचा मुद्दा उपस्थित करण्याची संधी आमच्या सरकारकडून दिली जाणार नाही अशा प्रकारचे आमचे याबाबतीत नियोजन रहाणार आहे.आपल्या राज्यातील शेतकऱ्यांना एवढया मोठया संकटातून बाहेर काढण्यासाठी आणि विशेषत: धानाला आणि भात उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी किंवा कांद्यासारखी पिके आहेत, इतर अनेक पिके आहेत. मी याठिकाणी वेगवेगळया पिकांची नावे घेऊन सन्माननीय सदस्यांचा वेळ घेऊ इच्छित नाही. पण या सर्व पिकांच्या बाबतीतील सर्व आकडेवारी आता आमच्याकडे आलेली नसली तरी देखील मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांना सांगू इच्छितो की, कृपा करुन आपण याबाबत काही गैरसमज करुन घेऊ नका. मी सदनाला शब्द देतो की, अवेळी, अवकाळी झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यातील 5 रिजनमधील शेतकरी अडचणीमध्ये आलेला आहे. या शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी राज्य शासन 1 हजार कोटी रुपयांची मदत 100 टक्के करील. अशा प्रकारची खात्री मी या चर्चेच्या निमित्ताने देतो. कोणत्याही परिस्थितीत माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री म्हणून आणि मी स्वत: या राज्याचा उप मुख्यमंत्री म्हणून काम करीत असताना येथील शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही. या सर्व योजना राबवित असताना किंवा त्यासाठी निधी देत असताना किंवा ही सर्व मदत करीत असताना, याबाबतीत ज्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी आहे, त्यांनी देखील यामध्ये चुकीच्या गोष्टी करता कामा नये. मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे की, जे-जे अधिकारी फिल्डवर काम करतात, मग ते रेव्हेन्यू विभागाचे असतील किंवा कृषी विभागाचे असतील किंवा इतर वेगवेगळया विभागाचे असतील, त्यांनी ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांनाच लाभ मिळाला पाहिजे याची काळजी घेतली पाहिजे. परंतु ज्यांचे नुकसान झालेले नाही, ज्यांचा यामध्ये अंतर्भाव होऊ नाही, त्याठिकाणी कारण नसताना त्यांची नावे समाविष्ट करण्याचे कारण नाही.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात. . . .

श्री. अजित पवार....

तेथे खाली कोणी गडबड घोटाळा करण्याचा प्रयत्न केला तर संबंधित कर्मचाऱ्याला आणि संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरले जाईल आणि त्यांना देखील शासन केले जाईल. त्यांना तेथल्यातेथे सस्पेंड केले जाईल, ही गोष्ट मला या निमित्ताने सभागृहाला सांगावयाची आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात मी काही पिकांची आणि फळांची नावे घेतलेली आहेत, काही फळांची आणि पिकांची नावे घेण्याचे राहिले आहे याचा अर्थ त्या पिकांना आणि फळांना वगळण्यात आलेले आहे असा अजिबात नाही. द्राक्षाचे नुकसान जास्त झालेले असल्यामुळे त्याचा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. परंतु यामध्ये संत्र्याचे पीक असेल, आंब्याचे पीक असेल, जी काही पिके असतील ती, जी काही फळे असतील ती, मग त्यामध्ये केळीचे पीक असेल, सगळी पिके आणि सगळी फळे, प्रत्येक पिकाचे आणि फळाचे नाव घेण्याचे कारण नाही असे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. फळबागा, कांदा आणि इतर वेगवेगळया प्रकारच्या धान्याचा अंतर्भाव मदत देण्यामध्ये असेल. फयान चक्रीवादळाच्या वेळी 276 कोटी रुपयांची मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. आता एक हजार कोटी रुपयांची मदत देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे कुठल्याही भागातील शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवण्याचे अजिबात कोणतेही कारण नाही, अशी राज्य सरकारची भूमिका आहे ती मी या चर्चेच्या निमित्ताने राज्यातील 11 कोटी जनतेला सांगू इच्छितो आणि माझे दोन शब्द संपवितो.

(माननीय विरोधी पक्ष नेते तसेच काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

आता सभागृहाची विशेष बैठक तहकूब होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(दुपारी 1.16 ते 1.30 बैठक तहकूब झाली)

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

हरकतीच्या मुद्यासंबंधी

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण या सभागृहामध्ये महाराष्ट्राच्या अत्यंत महत्वाच्या विषयावर नियम 97अन्वये चर्चा घडवून आणली. या चर्चेला राईट ऑफ रिप्लायचा अधिकार विरोधी पक्षाला असतो. राज्य शासनाने या ठिकाणी आमच्या चर्चेला जे उत्तर दिले ते पाहता गेले दोन दिवस आम्ही सभागृहामध्ये चर्चेविना घोषणा करावी ही जी मागणी करीत होतो ती यासाठीच करीत होतो. सभापती महोदय, आम्हाला आपल्याकडून न्यायाची अपेक्षा आहे. या सभागृहाच्या नेत्यांनी या ठिकाणी उत्तर दिल्यानंतर ते उत्तर जर जनतेला फसविणारे असेल तर त्याचा जाब राईट ऑफ रिप्लायमध्ये विचारण्याचा आम्हाला अधिकार आहे. यासाठीच आम्ही घोषणा आधी करा अशी मागणी करीत होतो.

सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्याकडे ऊर्जा खाते आहे. त्यासंदर्भात त्यांनी स्वत:ला क्लिअर करुन घेतले परंतु आम्ही एकरी आणि हेक्टरी जी मागणी केली होती त्यासंदर्भात त्यांनी 1 हजार कोटी रुपयांची घोषणा केली. आज या राज्यामध्ये 5 लाख नाही तर 10 लाख हेक्टर शेती उद्ध्वस्त झालेली आहे. त्या 10 लाख हेक्टरचे गणित मांडले तर हेक्टरी 1 हजार रुपये सुध्दा शेतकऱ्यांना मिळणार नाहीत. यामध्ये इतर फळबागाही आहेत. त्यांनी द्राक्षाचा भाग वेगळा केला. त्यांनी या ठिकाणी फयानचे उदाहरण दिले. फयान वादळ हे कोकण किनारपट्टीमध्ये दहा टक्के भागामध्ये आले होते. त्यासाठी शासनाने 275 कोटी रुपयांची मदत जाहीर केली होती. आज संपूर्ण राज्यातील शेतकरी उद्ध्वस्त झालेला आहे. या ठिकाणी शासनाने फक्त 1 हजार कोटी रुपयांची मदत जाहीर केली आणि आम्हालाच नव्हे तर या राज्यातील शेतकऱ्यांना फसविले आहे. त्यामुळे काही गोष्टींचा खुलासा आम्हाला या ठिकाणी पाहिजे होता. तो अधिकार आम्हाला असल्यानंतर आपल्याकडून तो अधिकार आम्हाला मिळावयास पाहिजे होता. आम्ही उभे राहिलो होतो. महत्वाची चर्चा असताना सुध्दा विरोधी पक्षाला आपल्या अधिकारापासून वंचित केले गेले. आम्ही या सभागृहाचे दोन दिवस वाया घालविले असे भाष्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सत्ताधारी पक्षाकडून झाले. परंतु आमची जी शंका होती ती खरी ठरली. या चर्चेतून काहीही निष्पन्न होणार नाही अशी आमची शंका होती आणि नेमके तेच घडले. या राज्यातील जे शेतकरी आहेत त्यांच्या तोंडावर शेवटी हेक्टरी 1 हजार रुपयांचा तुकडा फेकण्याची घोषणा केली गेली. आम्ही हेक्टरी 25 हजार रुपयांची मागणी केली होती. अनेक विषय या ठिकाणी उपस्थित केले होते. विदर्भामध्ये 40 शेतकऱ्यांच्या अंगावर वीज कोसळली. त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. आपल्या नैसर्गिक आपत्तीमध्ये ते कोठेही बसत नाही. त्याचा वेगळा विचार करण्याची आवश्यकता आहे पण त्याबाबतीत उत्तर दिलेले नाही. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी नेमका त्यांच्या खात्याच्या बाबतीत निर्णय जाहीर केला.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

या 1000 कोटी रुपयांमध्ये मागील 250 कोटी रुपये आहेत काय याचाही खुलासा झालेला नाही. तसे असेल तर मग केवळ 750 कोटी रुपयेच शेतक-यांच्या हातामध्ये पडणार आहेत. या उत्तरामुळे आमचे समाधान झालेले नाही हे आम्हाला माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणावयाचे होते परंतु ते तुम्ही आणू दिले नाही. आम्हाला तुमच्याकडून अपेक्षा आहेत. विरोधी पक्षाला सुध्दा तेवढाच न्याय मिळाला पाहिजे, परंतु दुर्दैवाने तसे घडले नाही. म्हणून आता मी हरकतीच्या मुद्यावर उभा राहिलो आहे. जे झाले ते योग्य झाले नाही. आम्ही उपस्थित केलेल्या चर्चेला उत्तर देताना विरोधी पक्षाचे काय म्हणणे होते हे लक्षात न घेता या चर्चेला वेगळे वळण दिले गेले ते आम्हाला मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणावयाचे होते, परंतु यावेळी ते घडले नाही, आम्हाला आमचा अधिकार बजावता आला नाही. या चर्चेला देण्यात आलेल्या उत्तरामुळे आमचे समाधान झालेले नाही, हा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेल्या हरकतीच्या मुद्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. शेतक-यांच्या वतीने बाजू मांडताना आम्ही असे म्हटले होते की, शेतक-यांचा माल आधारभूत किंमतीने खरेदी करणारी केंद्रे आजपर्यंत सुरु झालेली नाहीत. भिजलेले धान्य विकत घेतले जात नाही. त्यासंबंधीचा उल्लेख माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या उत्तरातून आलेला नाही. त्यांचे उत्तर संपल्यानंतर मी हात वर केला होता, परंतु आपण सभागृहाची बैठक थांबविली. वास्तविक विशेष बैठकीची वेळ संपल्यामुळे आपण वेळ वाढवून दिली होती. शेतक-यांच्या दृष्टीने ही महत्वपूर्ण चर्चा होती. सरकार या चर्चेला काय उत्तर देत आहे याकडे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी आशेने पहात होता. परंतु हे उत्तर अपूर्ण राहिले आहे असे मला वाटते, मंत्री महोदयांकडून आम्हाला पुन्हा उत्तर मिळावे अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आज सकाळ पासून सभागृहात अवकाळी पावसासंबंधी चर्चा झाल्यानंतर या सभागृहाच्या नेत्यांनी त्याला उत्तर दिले आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी काही निर्णय जाहीर करुन राज्यातील शेतक-यांना दिलासा देण्याचे फार मोठे काम केलेले आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्यांनी माझ्या बोलण्यामध्ये व्यत्यय आणू नये, मी आपल्या भाषणाच्या वेळी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.विनायक मेटे.....

अडथळा आणला नव्हता. मला माननीय सभापतींनी बोलण्याची परवानगी दिलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर आपण निर्णय दिला, त्यानंतर ब्रेक झाला होता. आता पुन्हा सभागृहाची बैठक सुरु झाल्यानंतर प्रश्नोत्तराचा तास सुरु झालेला आहे. (अडथळा) आजचा चौथा दिवस आहे. आज प्रथमच प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होत आहे. विधिमंडळाची यंत्रणा एकेका प्रश्नासाठी दीड महिन्यापासून राबत असते. त्यासाठी लाखो रुपये खर्च होत असतात. मंत्री महोदयांनी उत्तरातून शेतक-यांना दिलासा दिल्यानंतरही केवळ आम्हाला बोलू दिले नाही म्हणून प्रश्नोत्तराच्या तासात व्यत्यय आणण्याची विरोधी पक्षाची भूमिका योग्य नाही. सभापती महोदय, आपण प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात केलेली आहे, त्यामध्ये व्यत्यय आणला जात असल्यामुळे आपलाही ते अवमान करीत आहेत. त्यामुळे आपण त्यांना समज द्यावी.

सभापती : मी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना वेळोवेळी सूचना करीत असतो त्याचा ते सन्मान करीत असतात त्यामुळे विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य माझे ऐकत नाहीत, असे आपण म्हणणे बरोबर होणार नाही. उलट आपल्या म्हणण्यामुळे माझ्यावर अन्याय होतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीच्या मुद्यावर बोलण्यासाठी उभा आहे. प्रथम मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी आपल्यावर जो हेत्वारोप केला आहे त्याचा निषेध करुन मी पुढे बोलतो. सभापती महोदय, सकाळच्या सत्राची वेळ संपलेली होती.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे एकाच वेळी आपापल्या जागेवर उभे राहून एकमेकांना उद्देशून बोलत असतात.

श्री. दिवाकर रावते : चापलुशी करायला देखील अक्कल लागते.

सभापती : "अक्कल" या शब्दाला माझी हरकत आहे. तो असंसदीय शब्द आहे.

श्री. दिवाकर रावते : मी तो शब्द मागे घेतो. चापलुशी करायला बुद्धी लागते असे मला म्हणायचे होते. या चर्चेमध्ये जेवढा वेळ वाया गेला तेवढा तो प्रश्नोत्तराच्या तासासाठी वाढवून द्यावा अशी माझी आपणास विनंती आहे....

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे हे एकाच वेळी आपापल्या जागेवर उभे राहून एकमेकांना उद्देशून बोलत असतात.)

सभापती महोदय, या महत्वाच्या चर्चेला वेळेची मर्यादा असताना देखील आपण वेळ वाढवून दिली. या चर्चेला माननीय उपमुख्यमंत्र्यांनी उत्तर दिल्यानंतर त्यासंदर्भात राईट ऑफ रिप्लाय म्हणून माननीय विरोधी पक्षनेत्यांना एक-दोन मिनिटामध्ये आपले मत मांडण्याची संधी द्यायला पाहिजे होती. शासनाने चांगले निर्णय घेतले तर त्याबाबतीत शासनाला धन्यवाद देण्यासाठी किंवा निर्णय योग्य वाटले नाहीत तर त्याबाबतीत शासनाचा निषेध करण्याची संधी विरोधी पक्षाला मिळायला पाहिजे, एवढया पुरता हा विषय होता. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी जी मदत जाहीर केली त्याप्रमाणे गुंठ्याला 85 रुपये मिळणार आहेत. विजेच्या बाबतीत माननीय उपमुख्यमंत्र्यांनी चांगला निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे जरुर अभिनंदन करतो. परंतु त्यांनी शेतक-यांना योग्य प्रकारे आर्थिक मदत दिली नाही. त्याबाबतीत खेद व्यक्त करण्याची संधी आम्हाला द्यायला पाहिजे होती ती दिली गेली नाही. आता ती संधी दिल्याबद्दल मी माननीय सभापती महोदयांना धन्यवाद देतो. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या चर्चेमुळे सभागृहाचा जो वेळ वाया गेला तेवढा तो प्रश्नोत्तराच्या तासासाठी वाढवून द्यावा अशी मी विनंती करतो.

श्री. उल्हास पवार : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी हरकतीच्या मुद्यावर आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या भावना व्यक्त करताना, त्यांचा तसा हेतू नसला तरी ते तीन वेळा असे बोलून गेले की, सन्माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे त्यांच्या अर्थखात्यापुरते बोलले. "ते अर्थखात्यापुरते बोलले" हे शब्द कार्यवृत्तातून काढण्याची आवश्यकता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

आहे. कारण सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी संपूर्ण शासनाच्या वतीने उत्तर दिलेले आहे. म्हणून "ते अर्थखात्यापुरते बालेले" हे शब्द त्यांच्या भाषणातून वगळण्यात यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण रेकॉर्ड तपासून पहावे. मी असे बोललो की, माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी आपले खाते क्लिअर करुन घेतले. त्यांच्या खात्याचा त्यांनी योग्य निर्णय घेतला. "त्यांनी अर्थखात्याच्या संदर्भात उत्तर दिले" असे विधान मी केलेले नाही.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भात माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी चांगला निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु शेतक-यांच्या तोंडाला जो पाने पुसण्याचा निर्णय त्यांनी घेतला त्याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

सभापती : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी हरकतीचा मुद्दा मांडला. या सदनामध्ये नियम 97 अन्वये मी चर्चेला परवानगी दिली. त्या नियमामध्ये चर्चा केल्यानंतर आणि चर्चेला मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर ज्यांनी ही चर्चा उपस्थित केली त्यांना राईट ऑफ रिप्लायचा हक्क आहे अशी कोणतीही तरतूद नाही.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती.....

अजूनही त्यांनी ती तरतूद माझ्या निदर्शनास आणून द्यावी. मला वाटते की, अशी तरतूद नसल्यामुळे त्यांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे ती हरकत होऊ शकत नाही असा माझा निर्णय आहे. त्यामुळे मी त्यांच्यावर अन्याय केला किंवा जी तरतूद होती ती बाजूला सारुन मी पुढे गेलो असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही. हा निर्णय ते सभागृहात उपस्थित असते तर त्यांच्यासमोर मी जाहीर करणार होतो, परंतु ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या अपरोक्ष मी हा निर्णय जाहीर करीत आहे. अजूनही माझी त्यांना विनंती आहे की, जर अशी एखादी तरतूद त्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिली तर त्यासंबंधी काय निर्णय घ्यायचा यादृष्टीने मी जरुर विचार करेन. या अनुषंगाने या सभागृहाचे जे नियम आहेत ते नियम मी स्वत: पडताळले आहेत, पाहिले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केला किंवा सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्या मुद्यावर जे भाष्य केले त्यादृष्टीने मी दिलेला हा अधिकृत निर्णय आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील शेवटचा तारांकित प्रश्न क्रमांक 11903 ला जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नाही. किमान उत्तर देत असताना ते काळजीपूर्वक दिले गेले पाहिजे. प्रश्न दुष्मी खारपाडा, ता.पेण, जि.रायगड येथील पाणीपुरवठा योजनेसंबंधी असताना उत्तरामध्ये जिल्हा परिषद, रायगड ऐवजी जिल्हा परिषद, उस्मानाबादचा उल्लेख केलेला आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी मला टिपण द्यावे.

श्री.जयंत प्र.पाटील : उत्तरामध्ये रायगड जिल्हा परिषद ऐवजी उस्मानाबाद जिल्हा परिषद असे म्हटले आहे. अधिकाऱ्याकडून माहिती तपासली जाते की नाही?

सभापती : त्या प्रश्नाचा क्रमांक मला द्यावा. म्हणजे प्रश्नोत्तराच्या तासातील शेवटच्या दोन मिनिटामध्ये मी संबंधित मंत्रीमहोदयांच्या ही बाब निदर्शनास आणून देईन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ता.प्र.क्र.11903 ला उत्तर देताना ही चूक घडलेली आहे. उत्तर देत असताना मंत्री किंवा अधिकारी लक्ष देत नाहीत.

सभापती : ठीक आहे. शेवटच्या दोन मिनिटामध्ये माननीय सदस्यांनी जी दुरुस्ती सुचविली आहे त्या अनुषंगाने ही चूक रेकॉर्डवर राहणार नाही अशी व्यवस्था केली जाईल. आता प्रश्नोत्तराला सुरुवात होत आहे. यादीतील पहिला प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे यांचा आहे. त्यांनी प्रश्न पुकारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुध्दीस्ट स्टुडंट फेडरेशनने शिष्यवृत्तीत वाढ करण्यासोबत अन्य सात मागण्यांबाबत दिलेले निवेदन

(१) * ९६६८ श्री.विनायकराव मेटे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.सतीश चव्हाण : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यासोबत अन्य सात मागण्यांबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना बुध्दीस्ट स्टुंडंट फेडरेशनने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनातील मागण्या काय आहेत व मागणीनिहाय तसेच शिष्यवृत्तीत वाढ करण्याप्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१), (२) व (३) अशा प्रकारचे कोणतेही निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.शालेय शिक्षण मंत्री यांना प्राप्त झालेले नाही. तथापि, शासन निर्णय दिनांक २२ जुलै, २०१० मध्ये इ. ४ थी मध्ये शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इ. ५ वी ते ७ वी पर्यंत दरमहा १० महिन्यांसाठी रु.७५/- वरुन रु.१००/- इतकी शिष्यवृत्ती वाढ करण्यात आली आहे. तसेच इ.७ वीच्या शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना इ.८ वी ते १० वी या वर्गांसाठी दरमहा १० महिन्यांसाठी रु.१००/- वरुन रु.१५०/- इतकी शिष्यवृत्ती वाढ करण्यात आली आहे. सदर शिष्यवृत्तीचे दर १० हजार लोकसंख्येस तीन शिष्यवृत्ती संच इतकी वाढ करण्यात आली आहे.

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, मी लोकशाही आघाडी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो. इयत्ता ५ वी ते ७ वी व ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परंतु हा निर्णय अंमलात आणताना शिष्यवृत्तीची जी रक्कम निश्चित केली आहे ती अतिशय तुटपुंजी आहे. ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये व ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा १५० रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. ही रक्कम फारच कमी आहे. त्यामुळे शासन या रकमेत वाढ करणार आहे का? सदर शिष्यवृत्ती १० हजार लोकसंख्येमागे फक्त तीन विद्यार्थी किंवा विद्यार्थीनींना दिली जाते. ही १० हजार लोकसंख्येची मर्यादा ५ हजार लोकसंख्येवर आणण्यात येईल काय? मी माहिती घेतली असता असे कळले की, आतापर्यंत ज्या विद्यार्थी किंवा विद्यार्थीनींना शिष्यवृत्ती मंजूर झाली त्यापैकी ५ ते ५.५ हजार लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम अद्याप प्राप्त झालेली नाही. ही रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना त्वरित दिली जाईल काय?

नंतर २ एस.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9668.....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही योजना विद्यार्थ्यांसाठी राबवित असल्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केले. या निमित्ताने मला सभागृहाला अशी माहिती द्यावयाची आहे की, सन 2006-07 मध्ये आपण पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना प्रति माह 25 रुपये एवढी शिष्यवृत्ती देत होतो आणि आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना प्रति माह 40 रुपये एवढी शिष्यवृत्ती देत होतो. त्यात वाढ करुन अनुक्रमे ही वाढ पहिली ते सातवीसाठी 75 रुपये आणि आठवी ते दहावीसाठी 100 रुपये करण्यात आली आहे. यानंतर दि. 22.7.2010 रोजी शासनाने पुन्हा निर्णय घेतला व पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना 100 रुपये आणि आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना 150 रुपये शिष्यवृत्ती आपण देत आहोत. तसेच 15 हजार संचापासून ही संख्या आता 29 हजार संचापर्यंत गेली आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी शिष्यवृत्तीत वाढ करण्यासाठी किमान दोन तीन वर्षे तरी थांबावे, नंतर यामध्ये वाढ करण्याबाबत विचार करता येईल, असेही मी त्यांना सांगू इच्छिते.

श्री. रामदास मोते : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या रकमेत वाढ करण्यासंबंधी तसेच संचांची संख्या वाढविण्याबाबत मी एक अर्धा-तास चर्चा सभागृहात उपस्थित केली होती. तत्काली शिक्षण राज्यमंत्री माननीय श्री. हसन मुश्रीफ यांनी उत्तर दिले होते. त्या उत्तरात त्यांनी सांगितले होते की, यासंबंधी शासनाने अत्यंत चांगला निर्णय घेतला असून एक समिती देखील गठित केली आहे. त्या समितीचा अहवाल आला व तातडीने तशी कार्यवाही करण्यात आली त्याबद्दल मी त्यांचे व शासनाचे अभिनंदन करतो. त्यामुळे शिष्यवृत्ती व संचांमध्ये सुध्दा वाढ झाली. त्याचबरोबर उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी एक आश्वासन दिले होते की, ही शिष्यवृत्तीची रक्कम वर्षाच्या अखेरीस व 10 महिन्यासाठी दिली जाते. त्यासंदर्भात मागणी केली असता विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या शैक्षणिक साहित्याच्या खरेदीसाठी व इतर कामासाठी उपयोगात यावी म्हणून वर्षाच्या सुरुवातीलाच ही रक्कम देण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेत आहे. त्या पध्दतीने ही रक्कम शाळा सुरु होताच देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय ? त्या निर्णयाची अमलबजावणी होत आहे काय ? नसल्यास त्यात दुरुस्ती करणार काय ? आणि वर्षाच्या सुरुवातीलाच ही रक्कम देण्यात येईल काय ?

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 9668.....

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, सुरुवातीलाच सन्माननीय सदस्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करतो की, त्यांनी शासनाने शिष्यवृत्ती व संचांमध्ये वाढ करण्यासंबंधीच्या निर्णयाचे स्वागत केले. तसेच त्यांनी शिष्यवृत्तीची रक्कम वर्षाच्या सुरुवातीलाच देण्यात यावी व दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी मागील वर्षाची जवळपास 5000 विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची रक्कम अद्यापही देणे आहे ती दिली जाणार आहे काय ? असे दोन प्रश्न सभागृहात उपस्थित केले आहेत. ही गोष्ट खरी आहे की, मागील वर्षाची शिष्यवृत्तीची रक्कम जवळपास 44,35,000/- एवढी देणे प्रलंबित आहे व ती रक्कम येत्या 31 मार्चपूर्वी देण्यात येईल असेही मी सभागृहाला सांगू इच्छितो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ...

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शिष्यवृत्तीची रक्कम वर्षाच्या शेवटी विद्यार्थ्यांना दिली जाते ती शाळा सुरु होतेवेळी दिली जाईल काय असा मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थी चवथी नंतर पाचवीच्या वर्गात प्रवेश घेत असतात. प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात शासनाकडे माहिती येते व संपूर्ण माहिती तपासून त्याचे पे बील काढावे लागते व यासाठी निश्चितपणे काही वेळ लागत असतो. परंतु ही रक्कम वर्षाच्या शेवटी दिली जात असेल तर संपूर्ण माहिती तपासून पुढील वर्षापासून म्हणजे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर लवकरात लवकर ही रक्कम विद्यार्थ्यांना देण्यात येईल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी मा. शिक्षणमंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे ते बरोबर आहे. परंतु माझा असा प्रश्न आहे की, चवथी पास झाल्यानंतर मुले पाचवीमध्ये दुस-या शाळेत प्रवेश घेत असतात. दहावी पास झाल्यानंतर विद्यार्थी कॉलेजमध्ये प्रवेश घेत असतात. व दुस-या शाळेत विद्यार्थी प्रवेश घेत असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळत नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, शिष्यवृत्तीची रक्कम चेक द्वारे विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाईल काय ? विद्यार्थी दुस-या शाळेत प्रवेश घेतात त्यामुळे ही शिष्यवृत्ती अगोदरच्याच शाळेत तशीच पडून राहत असते. आता उपस्थिती भत्ता देखील चेक द्वारेच दिला जातो. सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, विद्यार्थ्यांना जी काही शिष्यवृत्ती दिली जाते ती फार तुटपुंजी आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीमध्ये कमितकमी 50 रुपयांची वाढकरण्याचा निर्णय एक महिन्यात घेतला जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, शिष्वृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगली सूचना केलेली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या माध्यमातून इ-स्कॉलरशिप दिली जाते त्यामुळे आपल्या विभागाच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा स्वीकार करतो व विद्यार्थ्यांच्या खात्यात डायरेक्ट पैसे जमा करण्याची कार्यवाही विभागाकडून केली जाईल.

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, शिष्यवृत्तीची रक्कम तुटपुंजी आहे त्यामुळे त्यात वाढ करावी असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असून त्याबाबत मी सांगू इच्छितो की, सन 2007 साली 25 रुपयांची शिष्वृत्ती 75 रुपये करण्यात आली होती व 40 रुपयांची शिष्यवृत्तीची रक्कम 100 रुपये करण्यात आली होती. सन 2010 मध्ये 75 रुपयांची शिष्यवृत्ती 100 रुपये व 100 रुपयांची शिष्यवृत्ती 150 रुपये करण्यात आलेली आहे. यामध्ये रक्कमच वाढवलेली आहे असे नाही तर महाराष्ट्र शासन विद्यार्थ्यांच्या बद्दल किती संवेदनशील आहे हे दाखवून दिलेले आहे. पूर्वी 15000 शिष्यवृत्तीचे संच होते त्याची संख्या आता 29 हजाराच्यावर गेलेलेली आहे. संचाची संख्या वाढल्यामुळे महाराष्ट्र शासनावर भार पडलेला आहे. त्यामुळे सद्यातरी या रक्कमेमध्ये वाढ करणे शक्य होणार नाही मात्र ज्यावेळेला शक्य होईल त्यावेळेस आपल्या सूचनेचा निश्चित आदर केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाबाबतचा प्रस्ताव

(२) * ९११३ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.दिपकराव साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक ६७६३ ला दिनांक २३ जुलै, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, आकृतीबंधाची सद्य:स्थिती काय आहे, तसेच आकृतीबंध रद्द करणेबाबतचा निर्णय झाला आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयामुळे हजारो सेवक अतिरिक्त ठरले असून त्याबाबत समायोजनाची कोणतीही हालचाल झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये ५० हजार शिपाई, लिपिकांची आवश्यकता असून सदरहू रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता

(१)होय.

(२) हा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीपुढे प्रलंबित आहे.

(३) नाही.

(४) दिनांक १० जून, २०१० च्या शासन निर्णयाव्दारे राज्यातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भर्तीसाठी एक वर्षाची बंदी घालण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सुधारित छापिल उत्तर देण्यात आलेले आहे.

श्री. दिलीपराव सोनवणे : छापलेले उत्तर रद्द करुन सुधारीत उत्तर दिल्याबद्दल आभार. सुधारित उत्तरात आकृतीबंधाचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीकडे प्रलंबित तसेच दिनांक १० जून २०१० च्या शासन निर्णया द्वारे राज्यातील शिक्षकेतर कर्मचा-यांच्या भरतीसाठी एक वर्षाची बंदी घालण्यात आलेली आहे अशी माहिती दिलेली आहे. त्यामुळे शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंधाचा प्रश्न सातत्याने सभागृहात उपस्थित केला जात आहे. डॉ. देवीसींग शेखावत, अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांच्याबरोबर मुख्यमंत्र्यांची बैठक होऊन दि. ८.८.२००७ रोजी निर्णय झाला होता. त्यावेळी मा. मुख्यमंत्र्यांनी निर्देष दिले होते की, नवीन आकृतीबंध रद्द करुन शाळा संहितेप्रमाणे पदे भरण्यात येतील.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9113....

श्री.दिलीपराव सोनवणे....

हा निर्णय होऊन दोन वर्षे झाली. याबाबत सतत पाठपुरावा करुनही काही झाले नाही. त्यानंतर दिनांक 10 जून 2010 रोजीच्या निर्णयाद्वारे राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीवर एक वर्षाची बंदी घालण्यात आली. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिले असताना, माननीय शिक्षण मंत्र्यांनी आश्वासन दिले असताना त्या निर्णयाची अंमलबजावणी का करण्यात आली नाही ? माझा दुसरा प्रश्न असा की,शिक्षकेतर पदांचा नवीन आकृतीबंध रद्द करुन जुन्या एस.एस.कोड प्रमाणे ताबडतोब भरती करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी या विषया संदर्भात थोडी पार्श्वभूमी सांगते. सप्टेंबर 2001 मध्ये संपूर्ण राज्यातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील आढावा घेण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले. त्या आढाव्यानुसार दिनांक 25.11.2005 रोजी आकृतिबंध लागू करण्यात आला. हा आकृतिबंध एस.एस.कोड आणि चिपळूणकर समितीच्या शिफारशी विचारात घेऊन करण्यात आला. परंतु या आकृतिबंधास संघटनेकडून विरोध झाला. त्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक 8.8.2007 रोजी एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये एस.एस.कोड प्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश दिले. त्यानंतर दिनांक 25.6.2008 रोजी शिक्षण विभागाने वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविला. दिनांक 26.7.2008 रोजी वित्त विभागाने सदरहू प्रस्ताव सचिव समितीकडे पाठविला. दिनांक 28.10.2008 रोजी तो प्रस्ताव संयुक्त समितीच्या बैठकीत घेण्यात आला असता त्याबाबत अधिक माहिती घेण्याचा निर्णय झाला. तद्नंतर दिनांक 24.3.2009 रोजी वित्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली. दिनांक 27.5.2009 रोजी त्या बैठकीचे कार्यवृत्त विभागाकडे प्राप्त झाले. दिनांक 20 जुलै रोजी सदरहू प्रस्ताव उच्च स्तरीय समितीकडे पाठविण्याचा निर्णय झाला. त्यानुसार हा प्रस्ताव आता उच्च स्तरीय समितीपुढे प्रलंबित आहे आणि उच्च स्तरीय समिती त्याबाबत निर्णय घेईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9113....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सभागृहातील कामकाजाचा आदर होणार आहे की नाही ? सभागृहात आश्वासन दिलेले आहे. एस.एस.कोड प्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती केली जाईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. जो निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी होत नाही. एस.एस.कोड प्रमाणे् अंमलबजावणी न करता आता दिनांक 10 जून 2010 रोजीच्या निर्णयाद्वारे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या भरतीवर एक वर्ष बंदी घातली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती न झाल्यामुळे अनेक शाळा बंद आहेत. ज्या शाळेत कर्मचारी आहेत जे सर्व जनगणनेच्या कामात व्यस्त असल्यामुळे शाळा बंद पडल्या आहेत. त्याशिवाय रोस्टरमध्ये बदल केला. रोस्टरमध्ये बदल करण्याचा अधिकार आपल्याला नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9113.. श्री.कपिल पाटील..

त्यामुळे शासनाच्या गैरकारभारामुळे तीन संकटे निर्माण झालेली आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले आदेश आणि सभागृहात दिलेले आश्वासन या दोघांचाही आदर करुन 10 जून 2010 चा शासन निर्णय मागे घेण्यात येणार आहे काय ? आणि सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : माननीय मुख्यमंत्र्याच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे परंतु वित्त विभागाने ...

श्री.कपिल पाटील : या ठिकाणी वित्त विभागाचा काही संबंध येत नाही त्याबाबतीत शासनाला जेव्हा निर्णय घ्यावयाचा असेल तेव्हा घ्यावा परंतु सभागृहात दिलेल्या आश्वासनाचा शासन आदर करणार आहे किंवा नाही असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार शासनाला आहे. शासनाने एकही कर्मचारी भरला नाही तरी हरकत नाही परंतु सभागृहात आश्वासन दिल्यानंतर व माननीय मुख्यमंत्र्यांनी निदेश दिल्यानंतर त्याचा आदर करण्यात येणार आहे किंवा नाही ?

श्रीमती फौजिया खान : वित्त विभागाच्या अभिप्रायाच्या अनुसार तसे करणे शक्य होणार नाही आणि कोणतीही शाळा बंद होण्यासारखी परिस्थिती नाही.याचे कारण असे की, नवीन आकृतीबंधानुसार चतुर्थ श्रेणीची पदे सरप्लस ठरत आहेत मात्र शिक्षकांची पदे वाढलेली आहे. त्यामुळे शाळा बंद होण्यासारखी स्थिती नाही. आपण जो प्रस्ताव दिला आहे तो आणि वित्त विभागाने जो काही आक्षेप घेतला आहे तो उच्च स्तरीय समितीकडे पाठविण्यात आला आहे त्याचा निर्णय आल्याशिवाय शासनाला कोणतीही घोषणा करता येणार नाही.

सभापती : सन्माननीय राज्य मंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य सर्वश्री. कपिल पाटील, वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे या शिक्षक प्रतिनिधींची अशी अपेक्षा आहे की या सदनामध्ये या विषयाच्या संदर्भात चर्चा झाली होती इतकेच नव्हे तर दोन वेळा माझ्या दालनात देखील माजी शिक्षण मंत्र्यांबरोबर चर्चा झाली होती त्या चर्चेला प्राधान्य देण्याचा आपला विचार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : नियोजन विभागाकडून एक वर्षे पदे भरण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे.

(एकाच वेळी अनेक सन्माननीय बोलतात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9113..

सभापती : माननीय राज्य मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सभागृहामध्ये जे आश्वासन देण्यात आले होते ते आश्वासन पाळण्यात येणार आहे किंवा नाही ?

श्रीमती फैजिया खान : त्या आश्वासनाच्या अनुषंगाने हा प्रस्ताव तयार झालेला आहे आज वर्ग तीन आणि वर्ग चारची पदे भरण्यासाठी बंदी घालण्यात आलेली असल्यामुळे नवीन अडचणी निर्माण झाल्या आहेत त्यामुळे सध्या नोकर भरती करता येणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील जे सांगत आहेत ती गोष्ट खरी आहे. माजी शिक्षण मंत्री आता सभागृहामध्ये उपस्थित आहेत. त्यावेळी त्याच्या उत्तरावर मी हरकत घेतली होती. मी शाळेत असतांना चिपळूणकर समिती राज्य शासनाने स्थापन केली होती. या बाबतीत माझे असे म्हणणे होते की, त्यावेळी संगणक नव्हते त्यामुळे आताचा शिक्षणाचा पॅटर्न पूर्णपणे बदलण्यात आला पाहिजे आणि याबाबतीत विचार करण्यात येईल असे शासनाने आश्वासन दिले होते.चार हजार शाळा विना अनुदान तत्वावर सुरु असून तेथील शिक्षकांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. ज्या ठिकाणी अनुदानावर शाळा चालतात त्या ठिकाणी 50 शिपाई आणि क्लार्क नेमावयाचे हे धोरण बरोबर नसल्यामुळे याबाबतीत शासन पुन्हा विचार करणार आहे काय आणि चिपळूणकर समितीच्या धर्तीवर पुन्हा समिती नेमण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र. पाटील यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या विषयाच्या संदर्भात सभागृहामध्ये चर्चा झाली होती असा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील व श्री.वसंतराव खोटरे यांनी मांडला होता हे मला मान्य आहे. त्या चर्चेच्या अनुषंगाने प्रस्ताव देखील तयार करण्यात आला होता परंतु आर्थिक परिस्थितीसुध्दा विचारात घेतली पाहिजे याची आपल्याला देखील कल्पना आहे सभागृहात आश्वासन दिले जाते परंतु आश्वासन दिल्यानंतर सुध्दा आधुनिक काळाचा विचार करुन आपण काम केले पाहिजे.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र पाटील यांनी चिपळूणकर समितीबद्दल उल्लेख केला होता एस.एस. कोड नंतर त्या समितीचा रिपोर्ट दिनांक 28 जून 1994 साली सादर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आला होता त्यानंतर संगणकीकरण झालेले आहे. जगामध्ये सगळीकडे शिक्षणाला जास्त महत्व दिले जाते आणि शिक्षणाशिवाय इतर बाबीना कमी महत्व दिले जाते . जुन्या चिपळूणकर समितीच्या आकृतीबंधाप्रमाणे त्यावेळी लॅबोटरीसाठी किंवा लायब्ररीसाठी ती व्यवस्था नव्हती...

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा....

ती सन 2005 च्या नवीन आकृतीबंधामुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे मी आपणास एकच सांगतो की, आपल्या भावनांशी मी निश्चितपणे सहमत आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी याठिकाणी मुद्दा मांडला आहे. त्या संदर्भात यापूर्वी या सभागृहामध्ये चर्चा झाली आहे. मागील दहा दिवसापूर्वी माझ्यावर या विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यामुळे या संदर्भात मी आपणा सर्वांकडून मार्गदर्शन घेत आहे, हा विषय समजून घेत आहे. मी या निमित्ताने एवढेच सांगतो की, हे अधिवेशन संपल्यानंतर सर्व मान्यवरांची एक बैठक घेण्यात येईल. महाराष्ट्रातील तज्ज्ञ मंडळींकडून, पालकांकडून ही बाब समजून घेण्यात येईल हा नवीन अभ्यासक्रम समजून घेण्यात येईल. व त्यानंतर या लागू करण्यात आलेल्या नवीन आकृतीबंधाबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

महाबीज, अकोल्यामध्ये झालेल्या कोट्यवधीच्या बियाणे घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करणेबाबत

(३) * ९२०० श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाबीज अकोल्यामध्ये गेल्या ३ वर्षांपासून बियाणा पुरवठ्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घोटाळ्यात समाविष्ट असलेल्या वरीष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द उच्चस्तरीय चौकशी करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्याबाबत शासनाकडे दिनांक १६ ऑक्टोबर, २००८, दिनांक ६ एप्रिल, २००९ व दिनांक ४ फेब्रुवारी, २०१० रोजी तेथील मा.लोकप्रतिनिधींनी लेखी कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव देवकर, श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधींच्या पत्रासोबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अहवालानुसार तक्रारीत तथ्य नसल्याचे दिसून आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, लोकप्रतिनिधींनी तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीबाबत चौकशी करीत असतांना त्या लोकप्रतिनिधींना चौकशी अधिकाऱ्यांनी विश्वासात घेतले होते काय? दुसरा प्रश्न असा की, याठिकाणी जी तक्रार करण्यात आली होती त्याबाबत कोणत्या पातळीवरील अधिकाऱ्यांनी चौकशी केली आहे?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, विधानसभेचे सन्माननीय सदस्य श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी माननीय तत्कालीन मुख्यमंत्र्यांना अशाप्रकारचे निवेदन दिले होते. ते निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडून बियाणे महामंडळाकडे आणि कृषी आयुक्तालयाकडे जाऊन त्या बाबतच्या चौकशीचा सविस्तर अहवाल कृषी आयुक्तालयामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात आला. त्यानंतर सन्माननीय सदस्यांकडून याबाबत विचारणा झालेली नाही. ज्या निवेदनाच्या अनुषंगाने तक्रार करण्यात आली होती त्या संदर्भात वेगवेगळया पातळीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

ता.प्र.क्र.९२००...

श्री. राधाकृष्ण विखे पाटील....

खुलासा झाला आहे. विशेष करुन न्यायालयात दाखल करण्यात आलेले दावे सुध्दा खारिच करण्यात आले आहेत ते निकाली निघाले आहेत. त्यामुळे या तक्रारीमध्ये कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही हे स्पष्ट झाले.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनामध्ये महामंडळामार्फत जे बियाणे दिले जात होते त्याबाबत भरपूर तक्रारी आल्या व त्यावर चर्चा देखील झाली होती आणि त्यानंतर राज्य सरकारने सुध्दा त्याबाबत निदेश दिले होते. याठिकाणी देण्यात येत असलेले बियाणे निकृष्ट असल्यामुळे ते उगवत नाहीत. त्यामुळे यामध्ये एजंट नावाचा एक प्रकार आहे ते तक्रारी करतात आणि नंतर ते मॅनेज करतात असे मंत्रिमहोदयांनी त्यावेळी सभागृहामध्ये सांगितले होते. त्यामुळे हा विषय गंभीरपणे घेऊन यापुढे अशाप्रकारच्या तक्रारी येणार नाहीत याबाबत बियाणे महामंडळाला आदेश दिले जातील काय?

श्री. राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी मी देखील सहमत आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या निकृष्ट प्रतीच्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक होईल आणि त्याचा शेती उत्पन्नावर परिणाम होईल असे कुणालाही वाटणार नाही. यापूर्वी आपण सांगितले आहे की, बियाणे महामंडळाच्या कामकाजामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील व त्याबाबत कुणाची तक्रार असेल तर त्याबाबत निश्चितपणे गंभीरपणे दखल घेतली जाईल. त्याचप्रमाणे बियाणे महामंडळाकडून किंवा खाजगी बियाणे उत्पादन करणाऱ्यांकडून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची शासन निश्चितपणे दक्षता घेईल.

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात मुलींकरीता "गृहअर्थशास्त्र" विषय असून स्वतंत्र महिला प्रयोगशाळा परिचरचे पद नसल्याबाबत

(४) * ९५७७ श्री.केशवराव मानकर , श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.संजय केळकर , श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमात मुलींकरीता "गृहअर्थशास्त्र" हा विषय समाविष्ट केला असून या विषयाकरीता स्वतंत्र प्रयोगशाळा तसेच विज्ञान विषयाच्या अभ्यासक्रमाकरीता पटसंख्येच्या आधारावर सदर पदास मान्यता देतांना "गृहअर्थशास्त्र" हा विषय महिलांकरीता असून देखील त्यांच्या प्रयोगशाळेकरीता स्वतंत्र महिला प्रयोगशाळा परिचरचे पद मंजूर नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थीनींचे हित लक्षात घेता "गृहअर्थशास्त्र" हा विषय असलेल्या महाविद्यालयात स्वतंत्र महिला प्रयोगशाळा परिचरचे पद मंजूर करण्याबाबत शासनस्तरावर कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. डी.पी. सावंत, श्री.राजेश टोपे यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) शासन निर्णय क्र.एनजीसी-२२९९/४७९५/विशि-४, दि.२६.८.१९९९ मधील तरतूदीनुसार विद्यार्थी संख्येच्या निकषानुसार व केवळ विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर ही पदे मंजूर आहेत. इतर कोणत्याही विषयाच्या प्रयोगशाळेसाठी ही पदे मंजूर नाहीत.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, विद्यापीठाच्या पदवी अभ्यासक्रमामध्ये "गृहअर्थशास्त्र" या विषयासंदर्भात दुसऱ्या व तिसऱ्या उत्तरामध्ये म्हटल्याप्रमाणे विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर ही पदे मंजूर आहेत. सभापती महोदय, त्याठिकाणी असलेल्या प्रयोगशाळेचे रुपांतर पूर्णपणे मेसमध्ये झालेले असते. याचे कारण त्याठिकाणी एक ओटा असतो, गॅस असतो, भांडी असतात. आणि "गृहअर्थशास्त्र" या विषयाला धरुन त्याठिकाणी शिकविले जाते. त्याठिकाणी असलेली लॅब स्वच्छ करावयाची, भांडी घासावयाची कुणी हा प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

ता.प्र.क्र.९५७७....

श्री. केशवराव मानकर....

आहे, हे काम प्राध्यापकांनी करावयाचे की मुलांनी करावयाचे? याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता प्रयोगशाळा परिचर या पदास शासन मान्यता देईल काय?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9577 . . . .

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकरजी यांनी जी वस्तुस्थिती मांडली. त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, गृह अर्थशास्त्र हा विषय आहे, त्याबाबतीत आपण सांगितल्याप्रमाणे केवळ महिलांसाठी राखीव असा हा विषय नाही. यामध्ये पुरुष सुध्दा भाग घेऊ शकतात. दुसरा विषय असा आहे की, शासन निर्णय दिनांक 26-08-1999 च्या तरतूदीनुसार विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर ही पदे मंजूर केलेली आहेत. परंतु गृहअर्थशास्त्र या प्रयोगशाळेसाठी महिला परिचर असे वेगळे पद मंजूर नाही ही आजची शासनाची परिस्थिती आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, माझा एक उप प्रश्न आहे. जर विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा सहायक व प्रयोगशाळा परिचर ही पदे दिली जातात, तर मग गृहअर्थशास्त्रासाठी का देत नाही किंवा महिलांच्या धोरणाप्रमाणे किंवा आरक्षणाप्रमाणे तेथे महिला परिचर हे पद भरण्यासाठी शासनाने संबंधितांना बाध्य केले पाहिजे. जेणेकरुन या लॅब मध्ये देखील महिला काम करु शकेल. अशा प्रकारचा आपण धोरणात्मक निर्णय घेणार आहात काय ?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, गृह अर्थशास्त्र हा विषय कला फॅकल्टीमध्ये येतो. विज्ञान शाखेसाठी लॅब असिस्टंट आणि लॅब ऑपरेटरची पदे आहेत, ती पदे कला शाखेसाठी नाहीत. परंतु यासाठी मागणी आल्यास शासन याबाबत नक्की विचार करील.

. . . .2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विनाअनुदानित उच्चमाध्यमिक शाळांच्या मान्यतेमधील "कायम" शब्द काढण्याबाबत

(5) * 9073 श्री.भगवान साळुंखे, श्री.संजय केळकर,श्री.विनोद तावडे,श्री.वसंतराव खोटरे, प्रा बी.टी. देशमुख, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कायम विनाअनुदानित प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळांचा "कायम" हा शब्द दिनांक 20 जुलै, 2009 च्या शासन निर्णयानुसार काढून टाकण्यात आला परंतु विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांतील कायम हा शब्द काढण्यात आला नाही त्यामुळे महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शाळा कृती समितीने दिनांक 19 जुलै, 2010 रोजी आझाद मैदान, मुंबई येथे धरणे आंदोलन व दिनांक 27 सप्टेंबर, 2010 रोजी राज्यभर रास्ता रोको आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने केलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे,

(3) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) होय.

(2) व (3) कायम विना अनुदानित तत्त्वावरील उच्च माध्यमिक शाळांना विना अनुदान तत्त्वावर आणण्याचा निर्णय अद्याप झालेला नाही.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, राज्य शासनाने इयत्ता दहावी पर्यंतचा कायम विना अनुदानित तत्वाच्या शाळांमधील "कायम" हा शब्द दिनांक 20 जुलै 2009 च्या शासन निर्णयानुसार काढला. परंतु अजून अकरावी व बारावी कायम विना अनुदानित तत्वाच्या शाळांमधील "कायम" हा शब्द काढलेला नाही. राज्याभरामध्ये एकंदर साडेआठ हजार पेक्षा जास्त तुकड्या असून, तेथे काम करणारा प्राध्यापक हा विना वेतन काम करीत आहे,राबत आहे.तसेच दहावीच्या निकालाचे प्रमाण दरवर्षी वाढत आहे. आता तर हा निकाल 100 टक्के लागत आहे. अशा परिस्थितीत प्रत्येक माध्यमिक शाळेला जोडून अकरावी व बारावीचे वर्ग काढणे आता अनिवार्य झालेले आहे. अशा परिस्थितीत जवळजवळ सर्वच शाळा विना अनुदानाच्या करण्याचा शासनाचा अप्रत्यक्ष हेतू दिसून येत आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, पावसाळी अधिवेशनामध्ये याबाबतीत विचार करु असे आश्वासन देऊन सुध्दा याठिकाणी तांत्रिक स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे की, "निर्णय अद्याप झालेला नाही." हा निर्णय केव्हा होणार आहे असा माझा उपप्रश्न आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे शासनाने दि.24-11-2001 रोजी मंत्रिमंडळामध्ये असा निर्णय घेतला होता की, आपण राज्यामध्ये कायम विना अनुदान तत्वावर शाळा द्यावयाची. आम्ही सुध्दा त्यामध्ये होतो आणि

. . . .2 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदनामध्ये सर्वांनी मागणी केली की, आता यामधील "कायम" हा शब्द काढून टाकावा आणि राज्यामध्ये अनुदान तत्वावर शाळा द्यावयाची. शासनाने सर्वांच्या आग्रहामुळे ती मागणी मान्य केली आणि दिनांक 16 नोव्हेंबर 2009 रोजी असा निर्णय झाला की, यापुढे महाराष्ट्रामध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना अनुदान देण्याचे धोरण शासन स्वीकारणार आहे. त्यासाठी जर शासनावर 500 कोटी रुपयांच्यावर बोजा पडला तरीही शासनाला चालेल. पण आपण हा निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे आज शासनाने त्याची अंमलबजावणी करण्याचे काम सुरु केलेले आहे. त्याचे मुल्यांकन करुन त्या शाळांना अनुदान देण्याच्या बाबतीतील धोरणाचा शासनाने स्वीकार केलेला आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : माननीय मंत्री महोदयांनी थेट उत्तर द्यावे. आता 11 वी आणि 12 वी बाबत काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वस्तुस्थिती समजून घ्यावी. याची पार्श्वभूमी समजून घ्यावी. मी उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीतच बोलत आहे. पण शासनाचे कसे धोरण आहे ते सांगत आहे. आता केंद्र शासनाने "राईट टू एज्युकेशन" असा कायदा पास केला आहे. त्यामुळे 6 ते 14 या वयोगटातील जी मुले आहेत, त्यांच्यासाठी मॅन्डेटरली शासनाला आता प्रत्येक एक कि.मी.च्या आत शाळा उपलब्ध करुन देणे व .....

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.9073....

प्रा. फौजिया खान...

इयत्ता आठवी ते इयत्ता 10 वी च्या शाळा 3 कि.मी.च्या आत उपलब्ध करुन देणे हे शासनावर बंधनकारक आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आपण आयसोलेशनमध्ये कुठल्याही प्रश्नावर बोलू शकत नाही. आपण उच्च सभागृहात वक्तव्य करीत आहोत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी जो प्रश्न विचारलेला आहे तो स्पेसिफिक इयत्ता 11 वी, 12 वी आणि उच्च माध्यमिक शाळांच्या संदर्भात विचारलेला आहे. सभापती महोदय, आपल्या सहकार्याने चार ते साडे चार वर्षे लढा दिल्यानंतर आणि या सभागृहात अनेक वेळा चर्चा झाल्यानंतर शासनाने एक चांगला धोरणात्मक निर्णय घेतला आणि 'कायम' विनाअनुदानित शाळांचा 'कायम' हा शब्द काढला. त्यामुळे 'कायम' या विनाअनुदानितमधून 1834 माध्यमिक शाळा आणि 1674 प्राथमिक शाळा बाहेर निघाल्या त्याबद्दल आम्ही शासनाला धन्यवाद देऊ इच्छितो. राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान योजनेंतर्गत आता इयत्ता 11 वी आणि इयत्ता 12 वी चे वर्ग अत्यावश्यक शिक्षणामध्ये आणलेले आहेत. 'कायम' हा शब्द वगळताना शासनाने फक्त प्राथमिक आणि माध्यमिकचा विचार केला. शासनाने इयत्ता 12 वी पर्यंत मूलभूत शिक्षण गृहीत धरलेले आहे.तशी केंद्र शासनाची योजना लागू केलेली आहे. त्यामुळे इयत्ता 11 वी व 12 वी चे जे कायम विनाअनुदानित वर्ग सुरु आहेत त्या शाळा सुरु आहेत त्यांच्या संदर्भात 'कायम' हा शब्द काढून टाकण्याचा हा विषय आहे. शासनाने आम्ही त्याचा विचार करीत आहोत असे मान्य केलेले आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. यासंदर्भात शासनाने स्पेसिफिक उत्तर द्यावे. कायम विनाअनुदानित इयत्ता 11 वी व 12 वीचा म्हणजे ज्युनिअर कॉलेजेसचा उच्च माध्यमिक शाळांचा 'कायम' हा शब्द काढून टाकण्याच्या संदर्भात शासन तातडीने एक महिन्याच्या आत, दोन महिन्याच्या आत निर्णय घेणार आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी यासंदर्भातच सांगत होते. याला प्राधान्य द्यावे लागेल. आज राईट टू एज्युकेशनमुळे शासनावर जबाबदारी येऊन पडलेली आहे तिला फोकस

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावे लागेल. शिक्षणाच्या क्वालिटीसह त्याची उभारणी करुन दुसऱ्या टप्प्यामध्ये शासनाला उच्च माध्यमिकचा विचार करता येईल. शासनाचा याबाबतचा विचार सकारात्मक असला तरी आपल्याला त्यासाठी थोडेसे थांबावे लागेल.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, इयत्ता दहावी पर्यंतच्या शाळांचा 'कायम' हा शब्द काढण्यात आलेला आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. पण इयत्ता 11 वी आणि 12 वी च्या बाबतीत शासन अन्याय करीत आहे. भेदभाव करीत आहेत. एकाच शाळेत एकाच बेंचवर बसणारे आणि एकाच परिसरात असणारे काही शिक्षक आता विनाअनुदानित होतील आणि काही शिक्षक कायम विनाअनुदानित होतील. त्यांना कोणताही पगार मिळणार नाही. या संदर्भात कोर्टाने निकाल दिलेला आहे. यासंदर्भात कोर्टामध्ये गेलेल्या शिक्षकांचे म्हणणे असे आहे की, "कायम विनाअनुदान तत्वाचे धोरण बदलले पाहिजे" यासाठी माननीय मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला याचिका क्रमांक 138/2003 /दि.8 एप्रिल, 2005 रोजी कायम विनाअनुदानावर मान्यता असा शब्द परवानगीपत्रात वापरल्यामुळे कधीच अनुदान देता येणार नाही असा त्यातून अर्थ काढणे बरोबर नाही. दुसरी याचिका क्रमांक 8738/2005 च्या निकाल पत्रात दिनांक 23 जुलै, 2006 रोजी माननीय उच्च न्यायालयाने सर्व प्रयोजनासाठी "कायम विनाअनुदान तत्वावर" या शब्दाचा अर्थ "विनाअनुदान तत्वावर" असाच वाचला पाहिजे असा निकाल दिला आहे. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, शासनाला कोर्टाचा अवमान करावयाचा असेल तर तो शासनाने करावा. परंतु कोर्टाने निकाल दिलेला आहे आणि त्याच धर्तीवर शासनाने बाकीच्या शाळांचा विनाअनुदान तत्वावरील 'कायम' हा शब्द काढलेला आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, एका महिन्याच्या आत उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांचा 'कायम' हा शब्द शासन काढणार आहे काय? याचे उत्तर शासनाने द्यावे.

प्रा. फोजिया खान : सभापती महोदय, मी या अगोदरच सांगितले की, या गोष्टीला प्राधान्यक्रम द्यावा लागेल. पण उच्च माध्यमिकचा विचार शासनाला ताबडतोब करता येणार नाही. त्यासाठी शासनाला थोडा वेळ द्यावा लागेल. शासन याच्याबद्दल सकारात्मक असून सुध्दा शासनाला सध्या याबाबतचा निर्णय घेता येणार नाही. तो निर्णय पुढे घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9073....

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, दिनांक 22 जुलै,2009 ला हा निर्णय झाला. त्यावेळी असे ठरले होते की, पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबतचा निर्णय घोषित करण्यात येईल. सरकारने हेतुपुर:स्सरपणे पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी, शेवटच्या क्षणाला अध्यादेश काढला आणि एकाच दिवशी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक असा सगळयांच्या बाबतीतील 'कायम' हा शब्द काढण्या ऐवजी फक्त प्राथमिक आणि माध्यमिकच्या बाबतीत 'कायम' हा शब्द काढला.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हा एका अर्थाने अन्यायच आहे. त्यामुळे शासनाने त्याच्या नंतरच्या कोणत्याही शाळेला परवानगी देऊ नये पण त्या निर्णयाच्या आधीच्या सर्व उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत कायम शब्द काढला पाहिजे. दुसरा प्रश्न असा की, माध्यमिक आणि प्राथमिकमध्ये तो शब्द काढला आहे त्याला दोन वर्षे झालेली आहेत. उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत कार्यवाही किती दिवसात पूर्ण करणार ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जी अपेक्षा आहे तसे उत्तर देता येणार नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, जशी अपेक्षा आहे तसे उत्तर देता येणार नाही. परंतु या सभागृहामध्ये नागपूरच्या अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले आहे ते पूर्ण करण्याची जबाबदारी माननीय मंत्री महोदयांवर आहे की नाही याचा खुलासा करावा. दुसरा प्रश्न आम्हाला विचारता येत नाही म्हणून आम्ही जेव्हा स्पेसिफिक प्रश्न विचारतो तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे. आपण पूर्ण पार्श्वभूमी सांगितली म्हणून मी आपल्याला पूर्ण पार्श्वभूमी सांगतो. आता राईट टू एज्युकेशनमुळे 65 टक्के खर्च केंद्र शासन उचलणार आहे. त्यामुळे आपले पैसे वाचणार आहेत. ते पैसे शासन बारावीपर्यंतच्या शिक्षणासाठी देणार काय ? या सभागृहामध्ये आम्ही कायम शब्द वगळण्याच्या संदर्भात मागणी केली होती तेव्हा ती उच्च माध्यमिक पर्यंतची मागणी होती. आपण रेकॉर्ड काढून बघावे. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पेसिफिक उत्तर दिले होते. त्यावेळी उच्च शिक्षण विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर दिले नव्हते. कारण उच्च शिक्षणामधून हे आपण बाहेर काढलेले आहे. ते उत्तर शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भात होते आणि आपल्या विभागाकडे उच्च माध्यमिक पर्यंतची व्यवस्था येते. त्यामुळे मी शासनाला अजिबात धन्यवाद देणार नाही. आपण काही उपकार करीत नाही. शिक्षण मिळण्याचा जनतेचा अधिकार आहे. आपण ते दिले म्हणून आम्ही अजिबात आपले आभार मानणार नाही. आपण काम करता परंतु या सभागृहाला जो शब्द दिला होता तो पूर्ण करावा. माननीय मुख्यमंत्र्यांनी या सभागृहाला काय उत्तर दिले होते हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे आणि नंतर आपण कॅबिनेटमध्ये निर्णय घेत असताना ते बदलले. ते का बदलले हेही माननीय मंत्री महोदयांनी सांगावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9073 ....

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तरामध्ये काय आहे ते तपासून पाहू. याला नकार देण्यात आलेला नाही. आम्ही फक्त प्राधान्य देण्याची बाब सांगितलेली आहे. जेव्हा वेळ येईल तेव्हा ते प्राधान्याने करु.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विरोधी बाकावर बसल्यानंतर एखादी भूमिका मांडली आणि नंतर सत्ताधारी झाल्यानंतर थोडी भूमिका बदलली तर समजू शकतो. पण माननीय मंत्री महोदया सदस्य असताना सत्ताधारी बाकावर बसल्या होत्या. माननीय मुख्यमंत्री मान्यता देत नव्हते. ते फक्त माध्यमिकपुरतेच बोलत होते. त्यावेळी सदस्य असलेल्या आणि आता माननीय राज्यमंत्री असलेल्या प्रा. फौजिया खान यांचे तेव्हाचे वक्तव्य मी वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले होते की, एकाच ठिकाणी काम करणाऱ्या माध्यमिक शिक्षक आणि उच्च माध्यमिक शिक्षक यांच्यामध्ये मुख्यमंत्री महोदय फरक करता येणार नाही. त्यामुळे आताच्या आता हे मान्य केले पाहिजे. त्यांचे हे वक्तव्य मी आपल्याकडे पाठवितो. सत्ताधारी बाकावर बसून नंतर त्या मंत्री झाल्या. त्यांचे मत इतके कसे बदलू शकते ? कोर्टाने सुध्दा सांगितले. केंद्र काही खर्च उचलणार आहे त्यामुळे आपले पैसे वाचतात. सत्ताधारी बाकावर बसून नंतर मंत्री झाल्यानंतर आपण जे बोललो आहोत ते खरे करण्याचे काम आपले आहे. माननीय मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा ते करणार नसतील तर आपण प्राचार्य आहात, आपल्याला उच्च माध्यमिकबाबत जास्त कळते. माननीय मंत्रिमहोदय श्री. राजेंद्र दर्डा हे आणखी एडीशन काढत बसतील पण आपण हे नक्की करावे आणि ते आता घोषित करावे अशी माझी विनंती आहे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, माझे वक्तव्य जरुर आहे पण आमदार म्हणून आहे.

श्री. राजेंद्र दर्डा :सभापती महोदय, शासन चालविताना ज्या अडचणी येत असतात, आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते त्यामुळे सन्माननीय सदस्या म्हणून त्या त्यावेळी बोलल्या असतील. मी एवढेच सांगू इच्छितो की, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत एक निर्णय मागच्या वेळी शासनाने घेतलेला आहे. शासन याही वेळेला निश्चितपणे सकारात्मक आहे. त्याबद्दल कधीच नकार देण्यात आलेला नाही हे माननीय राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी वारंवार सांगितलेले आहे. परंतु एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

ता.प्र.क्र.9073 .... श्री. राजेंद्र दर्डा...

गोष्ट निश्चित आहे की, यावेळेला आपण आपला फोकस निश्चितपणे माध्यमिक पर्यंत घेतलेला आहे आणि ज्यावेळेला ही परिस्थिती शक्य होतील त्यावेळेला निश्चितपणे उच्च माध्यमिकबद्दल सकारात्मक विचार करण्यात येईल. त्यासाठी सगळ्या आर्थिक बाबी निश्यितपणे तपासून पहाव्या लागतील.

सभापती : यानंतर पुढचा प्रश्न घेण्यात येईल. आता अडीच वाजलेले आहेत. प्रश्नोत्तराच्या तासामध्ये सुरुवातील अन्य चर्चेमध्ये 10 मिनिटे गेल्यामुळे प्रश्नोत्तराची वेळ मी दहा मिनिटे वाढवून देत आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकामांमधील गैरव्यवहार

(६) * ९२३४ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकामांमधील गैरव्यवहारांची दखल सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी घेऊन कारवाईचे आदेश माहे ऑगस्ट, २०१० मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने संबंधित सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्यास जबाबदार कोण आहे ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) होय.

(२) बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षा अभियान अंतर्गत बांधकामातील गैरव्यवहाराबाबत सर्व तालुक्यांच्या गट विकास अधिकारी यांना तालुकास्तरीय चौकशी समिती स्थापन करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, उत्तरामध्ये नमूद केलेल्या गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे आणि तालुका स्तरावर चौकशी समिती नियुक्त केली जाणार आहे ती चौकशी ग्रामसेवकांमार्फत करणार आहे काय, असल्यास ते चुकीचे होईल. कारण त्या स्तरावरच हा भ्रष्टाचार व गैरव्यवहार झालेला आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्हयासंबंधी हा प्रश्न विचारलेला आहे. सकाळ या वर्तमानपत्रामध्ये सर्व शिक्षा अभियानांच्या संदर्भात एक मालिका छापून येत होती. त्या मालिकेत या योजनेखाली केलेल्या बांधकामाबाबत व इतर योजनांबाबत सर्वसाधारणपणे आक्षेप घेण्यात आले होते. त्यामुळे या विभागाच्या सचिवांनी स्वत:हून राज्यातील प्रत्येक जिल्हयात या योजनेंतर्गत केलेल्या बांधकामांची प्राथमिक चौकशी करण्याचे आदेश दिले होते, त्यामध्ये बीड जिल्हयाचाही उल्लेख होता. परंतु बीड जिल्हयाचा अहवाल शासनाला प्राप्त झालेला नाही.

प्रा.सुरेश नवले : या विभागाचे सचिव चौकशी समिती नियुक्त करणार आहेत ती कोणाच्या अध्यक्षतेखाली नेमली जाणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ता.प्र.क्र.9234.....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, बीड जिल्हयात सर्व शिक्षा अभियान अंतर्गत कोणताही गैरव्यवहार झाल्याचे त्यावेळच्या बातमीत छापून आलेले नव्हते. त्या मालिकेत 7-8 जिल्हयांचा उल्लेख होता. परंतु एका वर्तमानपत्रात बातमी आल्यानंतर सरकारने त्याची दखल घेण्याच्या उद्देशाने त्यावेळच्या सचिवांनी एक आदेश काढून राज्यातील सर्व जिल्हयातील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना व महानगरपालिकेच्या आयुक्तांना या वर्तमानपत्रातून आलेल्या बातमीबाबत चौकशी करुन या योजनेंतर्गत गैरव्यवहार झाला आहे काय याचा तपास करण्यास सांगितले होते. त्यानुसार बीड जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील गट विकास अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी करण्यास सांगितले होते. माझ्याकडे बीड जिल्हयाचा अहवाल आताच आलेला आहे. बीड जिल्हयात तालुकानिहाय चौकशी समित्या स्थापन झालेल्या आहेत. या चौकशी समित्यांचे काम सुरु झालेले आहे. परंतु सकृतदर्शनी यामध्ये कोणताही गैरव्यवहार वा अनियमितता आढळून आलेली नाही. तसेच याबाबत सखोल चौकशी करण्यात येत आहे. बीड जिल्हयाबाबत कोणताही आरोप करण्यात आलेला नाही.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

चंद्रपूर व यवतमाळ या दोन जिल्ह्यांना फ्लोराईड युक्त जिल्हे म्हणून केलेली शिफारस

(७) * ९०४० श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाकडून जलमणी प्रकल्पाच्या माध्यमातून ४ कोटी रुपये सन २००९-१० या वर्षाकरिता राज्यशासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे, फ्लोराईड युक्त पाण्याने त्रस्त असलेल्या जिल्ह्यासाठी देण्यात आले तथापि, भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत फ्लोराईड युक्त जिल्हे म्हणून चंद्रपूर व यतवमाळ ह्या दोन जिल्ह्याची शिफारस करुनही केंद्र शासनाने अद्याप उपरोक्त रकमेतून त्यांना मदत देण्याबाबत राज्य शासनास आहेश दिलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदेश न देण्याची कारणे काय आहेत तसेच आदेश केव्हा मिळणार आहेत ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : (१) हे खरे नाही. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता कार्यक्रमासाठी प्राप्त होणाऱ्या २०% निधीतून राज्यातील फ्लोराईड बाधीत गावांमध्ये डी-फ्लोरीडेशन संयंत्रे बसविली जातात. या निधीतून आतापर्यंत चंद्रपूर जिल्ह्यामधील ४३ गावांमध्ये व यवतमाळ जिल्ह्यातील २३ गावांमध्ये डी-फ्लोरीडेशन संयंत्रे बसविण्यात आलेली आहेत. तसेच दि. ८.११.२०१० च्या शासन पत्रान्वये यवतमाळ जिल्ह्यातील आणखी ३४ गावांमध्ये डी-फ्लोरीडेशन संयंत्र बसविण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विदर्भातील 5 जिल्हयात मोठया प्रमाणात फ्लोराईड आहे. पावसाळयामध्ये पाणी जास्त असल्यामुळे त्याचे प्रमाण कमी असते. परंतु नदीतील, नाल्यातील, विहिरीतील पाणी कमी झाले की, फ्लोराईडचे प्रमाण वाढत असते. विदर्भातील पाण्यामध्ये किती फ्लोराईड आहे याचा डाटा शासनाकडे नाही. हा प्रश्न विदर्भातील नागरिकांच्या आरोग्याशी निगडीत आहे. चंद्रपूर जिल्हयात मोठया प्रमाणात फ्लोराईडयुक्त पाणी आहे. चंद्रपूर जिल्हयात नद्यांचे प्रमाण जास्त आहे त्यामुळे तेथे पाणी जास्त आहे. परंतु या पाण्यात फ्लोराईडचे प्रमाण किती हे त्याचे उत्तर मिळालेले नाही. मी चंद्रपूर व यवतमाळ या दोन जिल्हयासंबंधी प्रश्न विचारलेला असताना शासनाने केवळ यवतमाळ जिल्हयाबाबत उत्तर दिलेले आहे, चंद्रपूर जिल्हयाबाबत उत्तर दिलेले नाही. चंद्रपूर जिल्हयात सुध्दा डी-फ्लोराईड संयंत्रे बसविण्याबाबत तातडीने विचार करु, त्यासाठी तरतूद केली जाईल असे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

यानंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. लक्ष्मण ढोबळे : चंद्रपूर जिल्ह्यामध्ये एकूण 240 फ्लोराईडयुक्त गावे आहेत. 2010 पर्यन्त 142 गावांना फ्लोराईडमुक्त अशा प्रकारचा स्त्रोत शोधून त्या गावांना पाणी पुरवठ्याची योजना करण्यात येईल. सन 2010-11मध्ये मार्चअखेर पर्यन्त 38 गावांचा प्रश्न सोडविण्याचे नियोजन केलेले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एकूण 180 फ्लोराईडयुक्त पाणी असलेल्या गावामध्ये फ्लोराईडमुक्त अशा प्रकारचा स्त्रोत शोधून त्या गावांना पाणी पुरवठा करण्याच्या बाबतीत प्रयत्न केलेला आहे. संयंत्र बसविण्याचे आदेश दिलेले आहेत. 2005 सालात फ्लोराईडयुक्त असलेली गावे शोधण्याचा सर्व्हे करण्यात आला. त्यामध्ये आता आणखी 500 ते 600 गावे वाढण्याची शक्यता आहे.या सर्व गावांचा सर्व्हे करुन त्या गावामध्ये फ्लोराईडमुक्त स्त्रोत शोधून त्या गावामध्ये संयंत्रे बसविण्याचा हा जो विषय आहे तो माझ्या विभागामार्फत करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : प्रश्न फ्लोराईडयुक्त पाण्याचा शोध घेण्याचा आहे. त्यासाठी रासायनिक प्रयोगशाळा पाहिजेत. चंद्रपूर जिल्ह्यामध्ये फक्त एकच प्रयोगशाळ आहे. त्या शाळेमध्ये फक्त 15-20 गावातील पाण्याच्या नमुन्यांची तपासणी होऊ शकते. अशा प्रकारे चंद्रपूर जिल्ह्यातील गावातील फ्लोराईडयुक्त पाण्याचा शोध घेतला तर त्यामध्ये आमच्या चार पिढया जातील आणि तरी आमच्या जिल्ह्याला न्याय मिळणार नाही. पाण्याचे ॲनालिसिस करण्यासाठी रासायनिक प्रयोगशाळा आणि त्यासाठी लागणारे तंत्रज्ञ उपलब्ध व्हावयास पाहिजेत. प्रयोगशाळेमध्ये संयंत्र दिले जाते पण ते हाताळण्यासाठी तंत्रज्ञ दिले जात नाहीत, पाण्याचे ॲनालिसिस करण्यासाठी ॲनालिस्ट मिळत नाही. तेव्हा चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यातील लोकांना न्याय देण्यासाठी,भविष्यातील नवीन पिढीचे आयुष्य वाढण्यासाठी शासन तातडीने प्रयोगशाळा उभी करील काय ?

श्री. लक्ष्मण ढोबळे : चंद्रपूर आणि नागपूर या दोन ठिकाणी पाण्याची तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल आमच्या विभागाकडे येतो. परंतु आता गावाची वाढत असलेली संख्या विचारात घेता चंद्रपूर येथे आमच्या विभागाची स्वतंत्र प्रयोगशाळा करण्याच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विचारलेल्या प्रश्नाचे मी स्वागत करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेणारे १ लाख १५ हजार विद्यार्थी विद्यावेतनापासून वंचित असल्याबाबत

(८) * ९५६९ श्रीमती उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले , श्रीमती वंदना चव्हाण , श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कित्येक औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेणारे १ लाख १५ हजार विद्यार्थी विद्यावेतनापासून वंचित असल्याचे माहे जुलै, २०१० च्या चौथ्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रशिक्षणार्थींना शासनाने विनाविलंब विद्यावेतन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (१) नाही.

फक्त औ.प्र.संस्था भडगांव, जि. जळगांव येथील ४३ प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन बीडीएस प्रणालीतील अडचणीमुळे प्रलंबित झाले होते तथापि सद्य:स्थितीत ते अदा झालेले आहे.

(२) होय.

(३) संबंधित संस्थेच्या प्राचार्य व लिपीक यांना सक्त ताकीद देण्यांत आली होती व विद्यावेतन प्रदानाचे निर्देश देण्यांत आले होते.

(४) लागू नाही.

ॲड. उषा दराडे : छापील उत्तराच्या भाग (1)मध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, फक्त औ.प्र.संस्था भडगांव, जि. जळगाव येथील 43 प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन बीडीएस प्रणालीतील अडचणीमुळे प्रलंबित राहिले होते. तथापि सद्य:स्थितीत ते अदा झालेले आहे. बीडीएस प्रणालीतील अडचणी कोणत्या आहेत ? या अडचणी पुन्हा निर्माण होऊ नयेत म्हणून शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. डी.पी.सावंत : या राज्यामध्ये जवळ जवळ 1 लाख 15 हजार विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. त्यांचे विद्यावेतन वेळेवर दिले गेले आहे. जळगाव जिल्ह्यातील फक्त 43 प्रशिक्षणार्थींचे विद्यावेतन बीडीएस प्रणालीतील अडचणीमुळे प्रलंबित राहिले होते. तथापि ते अदा झालेले आहे. त्या त्या वेळी केलेले नियोजन हे त्या त्या वेळी देण्यात येत नाही किंवा बीडीएस प्रणाली इफेक्टिव्हली वापरता येत नसल्यामुळे हे विद्यावेतन प्रलंबित राहिले होते. आता शासनाने संबंधित प्रशिक्षणार्थींना विद्यावेतन अदा केलेले आहे.

श्री. रामनाथ मोते : औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणा-या प्रशिक्षणार्थींना मिळणा-या विद्यावेतनाचा हा प्रश्न आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की...

...नंतर श्री.भोगले...

अशुद्धीरहित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..... ता.प्र.क्र.9569.....

सध्या 1.15 लाख विद्यार्थ्यांना जे विद्यावेतन दिले जाते त्याची रक्कम किती? सदर विद्यावेतनाचे दर केव्हापासून लागू केले आहेत? ज्याप्रमाणे शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्यात आली त्याच धर्तीवर आयटीआय संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या विद्यावेतनामध्ये वाढ करण्याचा शासनाचा विचार आहे काय?

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, एकूण 1.15 लाख विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. त्यापैकी 50 टक्के आर्थिकदृष्टया मागासवर्गीय प्रशिक्षणार्थी आहेत त्यांना दरमहा 40 रुपये या दराने विद्यावेतन दिले जाते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या सर्व प्रशिक्षणार्थींना दरमहा 60 रुपये या दराने समाजकल्याण विभागामार्फत विद्यावेतन दिले जाते. सदर योजना 1982 पासून सुरु झालेली आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्नोत्तराच्या यादीतील शेवटचा तारांकित प्रश्न क्रमांक-11903 संबंधी

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु होत असताना माझे लक्ष वेधले होते. तारांकित प्रश्न क्रमांक-11903 सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी विचारलेला आहे. सन्माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे यांच्या विभागाने उत्तर दिलेले आहे. सदर उत्तर मंत्रीमहोदयांनी जरुर तपासावे. प्रश्नाच्या उत्तरामध्ये रायगड ऐवजी उस्मानाबाद जिल्हयाचा उल्लेख केलेला आहे. त्या संदर्भात योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी. सन्माननीय मंत्री श्री.लक्ष्मणराव ढोबळे सभागृहात उपस्थित नाहीत. शासनाने याची जरुर नोंद घ्यावी आणि योग्य ती दुरुस्ती होईल असे पहावे.

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, होय.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दैनिक देशोन्नती आणि दैनिक सामना या वृत्तपत्रामध्ये अशी बातमी प्रसिध्द झाली आहे की, या राज्याचे एक माजी मंत्री यांनी बॅकबे, मुंबई येथील आदर्श इमारतीसंबंधीच्या फाईलमधील काही कागदपत्रे शिपायामार्फत गहाळ केली आहेत आणि त्या शिपायाला या कामासाठी 5 लाख रुपये दिले गेले. राज्य शासनाच्या अखत्यारितील महत्वाची कागदपत्रे जर शिपाई गहाळ करीत असतील आणि ते गहाळ करण्यासाठी राज्याचे माजी मंत्री त्यांना प्रवृत्त करीत असतील तर ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकरणाचा तपास सीबीआय मार्फत केला जात आहे. देशाच्या संरक्षण विभागामार्फत चौकशी सुरु आहे. राज्याच्या गृह विभागामार्फत चौकशी केली जात आहे. असे असताना या इमारतीच्या मंजुरीपासून बांधकामापर्यंतच्या काळात तीन ते चार नगरविकास मंत्री होऊन गेले, त्या सर्वांकडे संशयाने बघितले जात आहे. हा संशय दूर झाला पाहिजे यादृष्टीने शासनाने या घटनेची नोंद घ्यावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करीत आहे.

सभापती : माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या मी निदर्शनास आणू इच्छितो की, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जे निवेदन केले ही बाब अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणाची आपण नोंद घ्यावी. शासनामार्फत माहिती घ्यावी व चौकशी कशी होईल हे पहावे. या अनुषंगाने जी माहिती असेल ती सदनाला देण्याचा प्रयत्न करावा.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

सभापती : आज माझ्याकडे औचित्याच्या मुद्यासंबंधी तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यापैकी दोन सूचना माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी दिलेल्या आहेत. एक सूचना माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची असून मी या सूचनेस अनुमती दिलेली नाही. माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी माझ्या दालनात येऊन मला जरुर भेटावे, त्यानंतर अनुमती देता येईल की नाही हे मी सांगेन.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी जो मुद्दा मांडला तोच विषय मला मांडावयाचा आहे.

सभापती : माझ्या दालनात येऊन मला जरुर भेटावे.

...नंतर 3डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला वेगळा न्याय हे योग्य नाही. आपण निर्णय दिला तेव्हा माननीय गृह मंत्री सभागृहात उपस्थित नव्हते. ते आता सभागृहात हजर आहेत. माझी विनंती आहे की, त्यांनी यासंदर्भात खुलासा केला तर बरे होईल.

सभापती : मी माननीय मंत्री महोदय श्री. अनिल देशमुख यांना स्पेसिफिकपणे सांगितलेले आहे की, आपण या बाबीची माहिती माननीय गृह मंत्र्यांना द्यावी.

श्री. रामदास कदम : माननीय गृह मंत्री सभागृहात उपस्थित आहेत, आपण त्यांना खुलासा करण्याची परवानगी द्यावी, अशी मी विनंती करतो.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, आदर्श घोटाळ्याच्या संदर्भातील नगरविकास विभागाच्या काही फाईल्समधील कागदपत्रे गहाळ झाल्याची फिर्याद त्या विभागाचे प्रधान सचिव श्री. बेंजामीन यांनी मरीन लाईन्स पोलीस स्टेशनमध्ये दिलेली आहे. पोलिसांनी त्यासंबंधीचा एफआयआर नोंदवून घेतला आहे. तसेच हा विषय संवेदनशील आणि महत्वपूर्ण असल्यामुळे त्याचा तपास कसून करण्यात येत आहे व ही महत्वाची कागदपत्रे गहाळ करण्याच्या पाठीमागे कोण आहे, कोणाचा सहभाग आहे या चौकशीपर्यंत अथवा त्या व्यक्तिपर्यंत सुध्दा क्राईम ब्रँच जाईल व तपास करण्यात येईल. त्यानंतर संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्री. रामदास कदम : महोदय, आजच्या वर्तमानपत्रात छापून आलेले आहे की, कागदपत्रे गहाळ होण्यामागे एका माजी मंत्र्याचा हात आहे. तसेच हे काम एका शिपायाच्या हातून केलेले आहे. यामागे कोणाचे डोके आणि कोणाचे हात आहेत याचा पत्ता शासनाला लागला आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, याप्रकरणी तपास करीत असताना वर्तमानपत्रातून जी माहिती छापून आलेली आहे त्या दृष्टीनेही तपास केला जाईल. शिवाय सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम हे जी माहिती मिळवून देतील त्या माध्यमातूनही तपास करण्यात येईल.

सभापती : माझी गृह मंत्र्यांना विनंती आहे की, माझ्याकडे सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी याच मुद्याच्या संदर्भात एक पत्र दिलेले आहे. मी त्यांना सांगितले की, माझ्या दालनात येऊन भेटा, तेथे चर्चा करुन आपण परवानगी देता येईल की नाही याचा विचार करु. परंतु आपण त्या अनुषंगाने सभागृहात उत्तर दिलेले आहे. तसेच आपल्याकडे हे पत्र सुध्दा देतो आणि योग्य वाटले तर आपण त्यासंबंधी स्पष्टीकरण देऊ शकता.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या पत्रातून असे सूचित केले आहे की, आणखी काही फाईल्स गहाळ होण्याची शक्यता आहे. याप्रकरणात मुख्य सचिवांना अशी महत्वाची कागदपत्रे सेफ कस्टडीमध्ये ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये सभागृहाची दिशाभूल होत असल्याचे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे. या प्रकरणाशी संबंधित महत्वाच्या फाईल्स अगोदरच सीबीआयच्या ताब्यात आहेत असे वर्तमानपत्रातूनच आम्हाला कळले. तरी देखील माननीय गृह मंत्री सांगत आहेत की, मुख्य सचिवांना या फाईल्स सेफ कस्टडीमध्ये ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील. यावरुन खरोखरच या फाईल्स सीबीआयकडे आहेत की विभागाकडे आहेत याचा बोध होत नाही.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांची दिशाभूल ते स्वत:च करुन घेतात. मी सांगितले की, ज्या महत्वाच्या फाईल्स आहेत त्या सीबीआयकडेच आहेत पण ज्या फाईल्स राज्यशासनाकडे आहेत त्यातील महत्वाची कागदपत्रे गहाळ होऊ नयेत म्हणून सेफ कस्टडीत ठेवण्याच्या सूचना देण्यात येतील, असे मी सांगितले. त्याचबरोबर ही कागदपत्रे कोणी गहाळ केली याचाही तपास करण्याच्या सूचना दिल्या जातील.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती :सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण मला औचित्याचे दोन मुद्दे मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल आपले धन्यवाद.

सभापती महोदय, कालच केंद्रीय उड्डयन मंत्री श्री. प्रफल्ल पटेल यांनी विमानाचे भाडे किती असावे याबद्दल आपले मत मांडलेले आहे. आतापर्यंत नागपूर ते मुंबई विमानाचे भाडे साडेतीन ते चार हजार रुपये होते परंतु आज नागपूर ते मुंबई विमानाचे भाडे 12,500 ते 16,000 रुपये करण्यात आलेले आहे. विधानसभा किंवा विधान परिषदेच्या सदस्यांना विमानाने मुंबईला जावयाचे आहे त्यांना 12,5000 ते 16,000 रुपयांचे तिकीट घेऊन मुंबईला जावे लागत आहे. या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून माझी आपल्याला विनंती आहे की, विमानाचे तिकीट कोणत्याही विमान कंपनीचे असू दे त्यांचे नागपूर ते मुंबईचे दर जास्तीत जास्त व कमीतकमी किती असावे याबाबतची शिफारस राज्य शासन केंद्रशासनाला करु शकते. आज जे काही सदस्य मुंबईला जात आहेत त्यासाठी जे वाढीव दर आपल्याला द्यावा लागत आहे ते पैसे शेवटी शासनाचेच जाणार आहेत. शासनाचे प्रत्येक तिकिटामागे 12000 रुपयांपेक्षा जास्त पैसे जाणार आहे. विमान कंपन्या जो काही गैरफायदा उठवत आहे त्यांना जरब बसवून आळा घालण्यासाठी आपण केंद्रसरकारला तशा प्रकारचा प्रस्ताव पाठविणार आहात काय ?

सभापती : सन्माननीय गृहमंत्र्यांनी केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांचे या विषयाबाबत लक्ष वेधण्यासाठी प्रयत्न करावेत.

श्री. आर.आर.पाटील :होय, सभापती महोदय.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा दुसरा मुद्दा असा आहे की, गेल्या अधिवेशनात अमरावती-मेळघाटसाठी देण्यात येणारे दाई कीटच्या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदय, श्री. सुरेश शेट्टी उत्तर देत असतांना मा. गृहमंत्र्यांनी मध्येच उभे राहून सांगितले होते की, "दाई कीटची" चौकशी सीआयडी मार्फत करण्यात येईल व त्याचा अहवाल पुढील अधिवेशनात दिला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, या घोषणेला जवळ जवळ एक वर्ष उलटून गेले आहे तरी सुध्दा दाई कीटचा अहवाल सभागृहापुढे आलेला नाही. दाई कीटच्या संदर्भात मी काल तारांकित प्रश्न उपस्थित केला होता परंतु हा प्रश्न चर्चेला आला नाही. मी जो तारांकित प्रश्न विचारला होता त्यामध्ये असे उत्तर देण्यात आले होते की, "दाई कीटचा तपास अजूनही सुरु आहे." त्यामुळे अजून दाई कीटच्या संदर्भातील तपास किती दिवस चालणार आहे ? दाई कीटची आवश्यकता ही गर्भवती महिलांसाठी लागते त्यामुळे हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, दाई कीटच्या तपासाची सद्य स्थिती सदनासमोर ठेवण्यात येईल.

सभापती :सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, आपण मला औचित्याचे दोन मुद्दे मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद.

सभापती महोदय, बीडवरुन नागपूरला येण्यासाठी अगोदर रोडने 600 कि.मी. प्रवास करावा लागत होता. परंतु आता औरंगाबाद ते नागपूर अशी विमानाची सोय करण्यात आलेली असून या विमानाची वेळ सायंकाळी 6.40 वाजता आहे. मागच्या वेळेस ही सोय नव्हती परंतु मा. फौजीया खान यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित केल्यामुळे नागपूर ते मुंबई विमान सेवा सुरु करण्यात आली. परंतु आता आम्हाला बीडला जावयाचे असेल तर आम्हाला नागपूरवरुन मुंबईला आणि मुंबई वरुन औरंगाबादला जावे लागते. त्यामुळे येण्याची जशी सोय आहे तशीच सोय जाण्याची सुध्दा व्हावी यासाठी शासनाने नामदार श्री. प्रफुल्ल पटेल यांच्याशी पाठपुरावा करावा असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती :सन्माननीय गृहमंत्र्यांनी या विषयामध्ये लक्ष घालावे.

श्री. आर.आर.पाटील :सभापती महोदय, नागपूरहून औरंगाबादला किमान अधिवेशन काळात तरी सोय व्हावी ही बाब तपासून घेण्यात येईल व त्यासाठी राज्यशासनामार्फत तशा प्रकारची विनंती केंद्र सरकारला करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, यावर्षी सतत पाऊस सुरु असल्यामुळे साखर कारखाने थोडे उशिरा सुरु होत आहेत. बीड जिल्हयातील 3-4 लाख कुटुंब ऊस तोडण्यासाठी इतर जिल्हयात जातील व त्यांची मुले उघडयावर पडतील त्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी या मुलांसाठी निवासी वसतीगृहे सुरु करण्याच्या दृष्टीने काही उपाययोजना केली जाईल काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही बाब तपासून घेण्यात येईल.

सभापती :सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिल्याबद्दल आपले धन्यवाद.

सभापती महोदय, अमेरिकेने जपानवर अणूबॉम्ब टाकल्यानंतर तेथील जखमीवर उपचार करण्यासाठी भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांनी केलेल्या आवाहनानुसार डॉ. द्वारकानाथ कोटणीस यांनी रुग्णांची सेवा केली होती.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

"डॉ.कोटणीस की अमर कहाणी" या नावाचा एक हिंदी चित्रपट आला होता. चीन देशामध्ये डॉ.द्वारकानाथ कोटणीस यांचे स्मारक आहे तसेच त्यांच्या नावाचे हॉस्पीटल आहे. महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील वेंगुर्ले तालुक्यात त्यांचे घर आहे. या घराचे जतन करुन त्यास डॉ.कोटणीस यांचे नावे द्यावे अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

सभापती :सन्माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. त्यांच्या सूचने संदर्भात सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी लक्ष घालावे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 वरील सूचना तसेच लक्षवेधी सूचना क्रमांक 1 व 4 बाबत

सभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवरील नियम 93 वरील सूचना लक्षवेधी सूचना झाल्यानंतर घेण्यात येतील.

आजच्या कामकाजपत्रिकेत पहिल्या क्रमांकाच्या लक्षवेधी सूचनेबाबत सन्माननीय राज्य मंत्री श्री.भास्कर जाधव यांनी माझ्याकडे अशी लेखी विनंती केली आहे की, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या संदर्भातील काही माहिती केंद्र सरकारकडून मागविली आहे. परंतु त्यांना ती माहिती अजून प्राप्त झालेली नाही.त्याशिवाय गृह विभागाशी त्यांनी संपर्क साधलेला आहे. त्यांना माहिती गोळा करण्यासाठी थोडा वेळ लागणार आहे असे त्यांचे म्हणणे बरोबर आहे. ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना केव्हा घेण्यात येईल एवढेच आम्हाला सांगावे.

सभापती : ही लक्षवेधी सूचना पुढच्या आठवड्यात घेण्यात येईल.

दुसरे असे की, सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांनी माझ्याकडे अशी विनंती केली आहे की, त्यांना माननीय उपमुख्यमंत्री यांचे बरोबर चंद्रपूर येथे दौऱ्यावर जावयाचे असल्यामुळे आजच्या कामकाजपत्रिकेतील चौथ्या क्रमांकावरील लक्षवेधी सूचना प्रथम घ्यावी. चौथ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यास मी परवानगी दिलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

पृ. शी. : गोंदिया जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे धानात आर्द्रता असल्याचे कारण देऊन शासकीय धान खरेदी केंद्रावर धान खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या भावाने धान विकावा लागणे

मु. शी. : गोंदिया जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे धानात आर्द्रता असल्याचे कारण देऊन शासकीय धान खरेदी केंद्रावर धान खरेदी न केल्यामुळे शेतकऱ्यांना मिळेल त्या भावाने धान विकावा लागणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्हयातील काही भागातील हलक्या आणि भारी धानाची कापणी पूर्ण झाली असणे, त्या अनुषंगाने शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्र सुरु करण्याचे आदेश जिल्हयातील मार्केटींग अधिकाऱ्यांना शासनाकडून ऑक्टोबर,2010 च्या दरम्यान देण्यात येणे, त्यानुसार मार्केटिंग अधिकाऱ्यांनी सेवा सहकारी संस्थांना धान खरेदी करण्याचे आदेश देणे, पंरतु एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी लोटला असूनही जिल्हयात फक्त 17 केंद्रे सुरु करण्यात येणे, सध्या जिल्हयात पावसाची रिमझीम सुरु असल्यामुळे धानामध्ये 17 ते 21 टक्क्यापर्यंत आर्द्रता असणे, परंतु शासकीय नियमानुसार धानात 17 टक्क्याच्या खाली आर्द्रतेचे प्रमाण असणे आवश्यक असणे,त्यामुळे शेतकरी शासकीय धान खरेदी केंद्रावर गेला असता त्याला आर्द्रतचे कारण पुढे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

करुन माघारी पाठविल्या जात असणे, त्यामुळे शेतकऱ्याला आपले धान व्यापाऱ्याकडे पडक्या दरात विक्री करावे लागत असणे, शासकीय गोदमांमध्ये मागच्याच वर्षीचा धान असल्याने सेवा सहकारी संस्थांच्या गोदामातील गेल्या वर्षीच्या धानात मोठया प्रमाणात तुट होत असून शासन त्यांना तेवढी तूट देण्यात तयार नसणे, परिणामी शेतकऱ्यांसमोर इकडे आड तिकडे विहीर अशी परिस्थिती ओढवणे, धान खरेदी केंद्र सुरु करण्याचे आदेश शासनाने जरी दिले असले तरी धान खरेदी केंद्रे धान खरेदी करण्यासाठी उत्सुक नसणे, कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून आधारभूर किंमतीपेक्षा कमी किंमतीत माल विकणाऱ्या शेतकऱ्यांना आधारभूत किंमत आणि विक्री किंमतीतील फरका एवढा आर्थिक मोबदला देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, यावर शासनाची कार्यवाही व शासनाने करावयाचे निवेदन. "

श्री.अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. "राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान" या विषयावर काल आणि आज अल्पकालीन चर्चा झाली. या अवकाळी पावसामुळे पूर्व विदर्भातील आणि कोकणातील शेतकरी हवालदिल झालेले आहेत. शेतातील उभी पिके नष्ट झालेली आहेत. अवकाळी पावसामुळे धानामध्ये आर्द्रता आली आहे. त्यामुळे धान केंद्रावर शेतकऱ्यांचे धान घेतले जात नाही. त्यांना परत पाठविण्यात येत आहे. धान केंद्रावर धान घेत नसल्यामुळे शेतकरी खाजगी व्यापाऱ्यांकडे आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडे धान घेऊन जात आहे. परंतु त्याच्या धानास आधारभूत किंमत मिळत नाही. "अ" प्रतीच्या धानास 1030 रुपये भाव आहे तर "ब" प्रतीच्या धानास 1000 रुपये भ्राव आहे. परंतु शेतकऱ्यांना 750 ते 850 या दराने भाव मिळत आहे. तेव्हा माझा प्रश्न आहे की, शेतकऱ्यांनी जो कमी भावात धान विकला आहे त्यास आधारभूत किंमतीनुसार फरक मिळेल काय, तसेच अन्य राज्यांप्रमाणे शेतकऱ्यांना 150 ते 200 रुपये बोनस देण्यात येईल काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, धान सेंटरमध्ये तूट येत आहे सरकारने वर्ष-वर्षभर धानाची उचल केली नाही. दुसरे म्हणजे प्रति क्विंटल घट पाच कि.ग्रॅम पेक्षा कमी येत नाही. आपण दोन कि.ग्रॅम घट मान्य करतो. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी एका बैठकीमध्ये एक टक्का वाढवून देण्याचे मान्य केलेले आहे. त्याबाबत मी त्यांचे आभार मानतो. परंतु त्यामुळे प्रश्न सुटणार नाही.

यानंतर श्री.गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर..

म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, 2 अधिक 1 अधिक 1 याप्रमाणे तुटीचे प्रमाण वाढवून देण्यात येणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे नागपूर, गोदिया ,भंडारा चंद्रपूर या जिल्हयातील तसेच राज्यातील इतरही काही भागातील धानाचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे की, मधल्या काळात अवकाळी पाऊस पडल्यामुळे धान ओला झाला होता त्यामुळे तुटीचे प्रमाण वाढवून देण्यात येणार आहे काय त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, एफसीआय फक्त 17 टक्क्यापर्यंत आद्रतेचे प्रमाण असलेले धान खरेदी करीत असते. मधल्या काळात पाऊस पडल्यामुळे व धान ओले झाल्यामुळे धानाच्या संदर्भात अडचण निर्माण झाली होती.परंतु आता धान सुकले असून भंडारा,गोदिंया आणि बाकीच्या जिल्हयात खरेदी केन्द्रे सुरु करण्यात आली असून जवळजवळ 265 केन्द्राच्या माध्यमातून जवळजवळ 1 लाख 84 हजार क्विंटल धानाची खरेदी संपूर्ण राज्यात करण्यात आली आहे. तुटीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे ती वस्तुस्थिती खरी आहे.जेव्हा धान गोडावूनमध्ये ठेवतो तेव्हा सध्याच्या नियमाप्रमाणे केन्द्र सरकार एक टक्का आणि राज्य सरकार एक टक्का अशा प्रकारे दोन टक्के तूट शासन मान्य करते.मधल्या काळात गोडावूनमधून धानाची मोठया प्रमाणावर साठवणूक केली होती आणि गोडावून मध्ये धान साठवले असल्यामुळे त्यात तूट आलेली आहे. त्यामध्ये राज्य सरकारच्या माध्यमातून दोन अधिक एक याप्रमाणे एक टक्का जास्तीच्या तुटीसबंधीचा प्रस्ताव मंत्री मंडळासमोर लवकरात लवकर आणून तो मान्य करावा अशी मंत्री मंडळाला विनंती करण्यात येणार आहे ही विनंती मान्य झाल्यानंतर 2 अधिक 1 अशी तीन टक्के तूट मान्य केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय,ज्यावेळेला धान विकण्याकरता जेव्हा खरेदी केन्द्रावर आणले जाते त्यावेळी ओला धान म्हणून मोठया प्रमाणावर कटौती केली जाते काळा धान आणल्यानंतर तो परत केला जातो,जाड धान खरेदी केला जात नाही.पोते व सुतळी नाही या सारख्या किरकोळ कारणासाठी धान खरेदी न करता शेतक-याला परत पाठविण्यात येते.असे प्रकारे भविष्य काळात घडता कामा नये अशा प्रकारचे आदेश देण्यात येणार आहे काय ? मागच्या वर्षी धानाचा बोनस जाहीर करण्यात आला होता.परंतु शेतक-याकडील धान संपल्यानंतर तो घोषित

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आला होता त्यामुळे शेतक-या ऐवजी व्यापा-यांना त्याचा फायदा मिळाला होता.म्हणून या वर्षी धानाची एकूण परिस्थिती पाहता शेतक-यांनाच बोनस मिळेल यासाठी आताच बोनस जाहीर करण्यात येणार आहे काय ?

श्री.अनिल देशमुख :सभापती महोदय, मधल्या काळात अवकाळी पावसामुळे धान खरेदी केन्द्रात गर्दी झाली होती ही गोष्ट खरी आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी मार्केटीग फेडरेशनने ट्रायबल डेव्हलपमेंट डिपार्टमेन्टला सूचना दिल्या असतील परंतु शेतक-यांना त्रास होणार नाही या दृष्टीने खबरदारी घेण्यात यावी अशा प्रकारच्या सूचना दोघांनाही देण्यात येतील . त्याचबरोबर बोनसच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, केन्द्र सरकारकडून बोनस जाहीर केला जातो आणि या वर्षी केन्द्र सरकारने अजून बोनस जाहीर केला नाही. जेव्हा केन्द्र सरकार हा निर्णय जाहीर करील तेव्हा सूचना देऊन शेतक-यांना धानाचा बोनस देण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस :सभापती महोदय, शेतक-यापर्यत बोनसची रक्कम पोहोचेल याकरता शासनाने कोणती व्यवस्था केली आहे? कोणत्या शेतक-यांनी किती धान विकले आहे यासाठी वेगळी नोंद घेण्यात येणार आहे काय ? मागच्या वर्षी बोनसचा सगळा पैसा व्यापा-यांना मिळाला होता . शेतक-यांना न्याय देण्यासाठी बोनस जाहीर केला जातो परंतु शेतक-यांना फायदा न होता व्यापा-यांना त्याचा फायदा होत असतो तेव्हा या वर्षी जाहीर होणा-या बोनसची रक्कम शेतक-याच्या हातात जाईल अशा प्रकारची व्यवस्था करण्यात आली आहे काय ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय,जो काही बोनस जाहीर केला जाईल त्याबाबतीत स्वतंत्र व्यवस्था करुन बोनसची रक्कम शेतक-यांनाच मिळेल व्यापा-यांना मिळणार नाही याबाबतीत खबरदारी घेण्यात येईल आणि बोनसचे 100 टक्के पैसे शेतक-यांनाच देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ

मु. शी. :राज्यात महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस होत असलेली वाढ यासंबंधी सर्वश्री हुसेन दलवाई,चरणसिंग संप्रा,श्रीमती अलका देसाई.श्री.भाई जगताप,श्रीमती दीप्ती चवधरी,श्रीमती शोभा फडणवीस, डॉ.नीलम गो-हे सर्वश्री मोहन जोशी, सुभाष चव्हाण.वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हुसेन दलवाई (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात महिलांवरील अत्याचारात दिवसागणिक वाढ होणे, मुंबईतील पवई परिसरात राहणाऱ्या एका अल्पवयीन मुलींवर गेल्या ९ वर्षापासून बलात्कार होत असल्याची घटना दि. ११.११.२०१० रोजीच्या सुमारास उघडकीस येणे, त्यात अंधेरी पूर्व, येथील एम्रॉल्ड कोर्ट इमारमतीमधील सन २००१ पासून कोर्ट रिसिव्हरच्या ताब्यात असलेल्या फ्लॅटचा वापर करण्यात येणे, तसेच या सेक्स स्कॅण्डलमध्ये लोकमान्य टिळक मार्ग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण बोरुडे यांचा सहभाग असणे, त्याचप्रमाणे सांगली जिल्हयातील बुधगांव, ता.मिरज येथील आश्रमशाळेतील १० मुलींवर अत्याचार केल्याप्रकरणी पोलिसांच्या ताब्यात असलेला हबीब इसुफ मुलानी याने एका तरुणीस आपल्या प्रेमाचे आमिष दाखवून तिची अश्लील चित्रफीत तयार केल्याचा लोकांनी संशय व्यक्त करणे, मुंबई खालोखाल पुणे शहर, ठाणे शहर, नाशिक ग्रामीण, यवतमाळ, जळगांव, अहमदनगर, अमरावती, वर्धा व बुलढाणा येथे अशा प्रकारच्या गुन्हयांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, दिनांक २/७/२०१० रोजी जि.अमरावती, ता.परतवाडा, बडगाव फतेपूर येथील एका शिक्षणार्थी युवतीला जबरस्तीने पळवून नेऊन लग्नाचे अमिष दाखवून तिच्यावर अत्याचार करणे, त्यातच दिनांक २७/१०/२०१० रोजी गिट्टीखदान येथील एका महिला डॉक्टराची फसवणूक करुन तिला गुंगीचे औषध देऊन तिला गणेशपेठ बस स्थानकाजवळील हॉटेलात नेऊन बलात्कार करणे, अश्लील छायाचित्रे काढून त्याआधारे ब्लॅकमेल करुन तिच्याकडून साडे सहा लाख रुपयांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लुट करणे, त्याचप्रमाणे दिनांक २६/१०/२०१० रोजी जि.वर्धा,टेंभा येथील १८ वर्षीय युवतीवर जिल्हा परिषद शाळेत नेऊन बलात्कार करणे, अशा प्रकारच्या अत्यंत गंभीर प्रकरणांमुळे जनमानसात विशेषत: महिला वर्गात पसरलेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हुसेन दलवाई : सभापती महोदय, या राज्यामध्ये अनेक महिलांवर अशाप्रकारचे बलात्कार झाले आहेत याची यादी याठिकाणी देण्यात आली आहे. आणि या बलात्काराच्या प्रकरणांमध्ये पोलीस देखील सहभागी आहेत. सन 2005 मध्ये श्री. सुनील मोरे या पोलीस शिपायाने मुंबईच्या मरीन लाईन या विभागामध्ये एका टिनेजर मुलीवर बलात्कार केला. त्यानंतर श्री. पवार नावाच्या पोलीस शिपायाने एअर पोर्टवर कचरा वेचणाऱ्या मुलीवर बलात्कार केला. त्यानंतर गुन्हेगारांचे मुडदे पाडण्यामध्ये ज्यांची खासियत आहे अशा एका सिनियर इन्सपेक्टरचा देखील यामध्ये सहभाग आहे. हे पोलीस अधिकारी लोकमान्य टिळक मार्ग पोलीस स्टेशनमध्ये कसे आले? त्यापूर्वी त्यांची बदली झाली होती, त्यानंतर ते रजेवर गेले होते आणि पुन्हा त्याच पोलीस स्टेशनमध्ये आणण्याचे काम कुणी केले हा प्रश्न आहे? सभापती महोदय, ज्या 14 वर्षाच्या मुलीवर हा बलात्कार करण्यात आला तो करण्यासाठी कोर्ट रिसिव्हरने ताब्यात घेतलेल्या व सील केलेल्या फ्लॅटचा वापर करण्यात आला. यामध्ये जे चार लोक सहभागी आहेत त्याबाबत माननीय गृहमंत्र्यांचे काय म्हणणे आहे?

श्री. सतेज पाटील : सभापती महोदय, दिनांक 17.10.2010 रोजी पिडीत मुलगी कुमारी माता म्हणून प्रसूत झाली. त्यापूर्वी तिची तब्येत बिघडल्यामुळे तिच्या आईने तिला राजावाडी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. राजावाडी हॉस्पिटलमध्ये पिडीत कुमारी माता ॲडमिट झाल्यानंतर मेडिकली लिगल केसच्या दृष्टीने या सर्व त्रुटी लक्षात आल्यानंतर त्या संदर्भात दिनांक 1.11.2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या मुलीचा उपयोग श्रीमती गायकवाड नावाच्या महिलेने केल्याबद्द तिला अटक करण्यात आली आणि तिच्यामार्फत या मुलीला ज्या ज्याठिकाणी नेण्यात आले त्या सर्व ठिकाणांची माहिती घेऊन प्रथमदर्शनी दोन आरोपींना अटक करण्यात आली. या प्रकरणी तपासांतर्गत पोलीस अधिकाऱ्यांचा उल्लेख करण्यात आला. त्या अधिकाऱ्याचा मोबाईल नंबर त्या महिलेच्या मोबाईलवर वारंवार आल्यामुळे त्यादृष्टीने तपास करण्यात आला. तपासामध्ये असे निष्पन्न झाले की, तो मोबाईल नंबर हा माननीय श्री. सुरेश बोरुडे यांचा असून त्यांनी या प्रकरणामध्ये मोबाईलचा वारंवार वापर केला आहे. म्हणून या प्रकरणाची चौकशी करुन श्री. सुरेश बोरुडे यांना बडतर्फ करण्यात आले आहे. त्याचबरोबर या प्रकरणी पुढील तपास सुरु असून योग्य ती कारवाई करण्याचे काम सुरु आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, त्या पिडीत मुलीचे नाव काय आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज पाटील : पिडीत मुलगी कुमारी माता असल्यामुळे तिचे नाव सहसा जाहीर केले जात नाही.

उपसभापती : मंत्री महोदय, आपण याठिकाणी उत्तरामध्ये आरोपीच्या नावाचा उल्लेख करीत असतांना "माननीय" असा उल्लेख केला आहे. तेव्हा आरोपींना "माननीय" असे म्हणण्यात येऊ नये. तशाप्रकारचा उल्लेख कामकाजामधून काढून टाकण्यात यावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये श्री. बोरुडे यांना अद्यापि अटक कां करण्यात आली नाही? त्याचप्रमाणे निवेदनातील क्रमांक चार वरील आरोपींना अद्यापि अटक कां केली नाही ? सभापती महोदय, श्री. सुनिल सिताराम काजरोळकर यांच्यामुळे हे बलात्कारीत मुलीचे प्रकरण उघडकीस आले. त्यांनी माझ्या जीवाला धोका आहे, व मला संरक्षण देण्यात यावे. अशाप्रकारे माननीय मुख्यमंत्री व सर्व माननीय मंत्र्यांना पत्र लिहिले आहे, याबाबत आपण कोणती उपाय योजना करणार आहात तसेच, बलात्कारीत मुलीला गरोदर ठेवून हा प्रश्न मिटणार नाही,तिचे आर्थिक पुनर्वसन केले पाहिजे यासाठी आपण काय करणार आहात?

श्री. आर. आर.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी दोन-तीन प्रश्न उपस्थित केले आहेत, त्या संदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी याठिकाणी उत्तर दिले आहे. आपण याठिकाणी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एक बलात्कारीत मुलगी कुमारी माता असल्यामुळे यामध्ये सहभागी असलेल्या आरोपींचा शोध पोलिसांनी स्वत:हून घेतला आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या मुलीचा वापर वेश्या व्यवसायासाठी ज्या महिलेने केला आहे, तिला देखील पोलिसांनी ताब्यामध्ये घेतलेले आहे. तसेच ज्यांनी या मुलीचा गैरवापर केला, त्या दोघांनाही ताब्यात घेतलेले आहे आणि पोलीस तपासामध्येच दाखविण्यात आलेल्या जागेवरुन हे स्पष्ट झाले की यामध्ये एक इन्स्पेक्टर सुध्दा समाविष्ट आहे आणि त्याच्याही बाबतीत पोलिसांनी कठोर भूमिका घेतलेली आहे. या प्रकरणाच्या बाबतीत प्राथमिक माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ते उघड केले आहे. त्यामुळे यामध्ये कोणालाही पाठिशी घालण्याची पोलिसांनी भूमिका घेतलेली नाही. या घटनेमध्ये नोकरीतून काढून टाकण्याच्या दृष्टीने घटनेतील कलम 311 व्या कलमाचा देखील कठोर वापर केलेला आहे. पण संबंधितांनी काही वर्षे पोलीस विभागामध्ये काम केलेले असल्यामुळे, पोलिसांना कसे सापडावयाचे नाही याबाबतची संबंधित अधिकाऱ्याला थोडीशी माहिती आहे असे दिसते. पण तरी सुध्दा त्याला पकडण्याच्या दृष्टीने, फरारी म्हणून घोषित करण्याच्या दृष्टीने आणि त्याची सर्व मालमत्ता जप्त करण्याच्या दृष्टीने सगळी प्रक्रिया सुरु केली आहे. यातील जी पिडित मुलगी आहे तिला शासना-मार्फत आर्थिक मदत करण्यात येईल. तसेच ज्यांनी ही घटना उघडकीस आणली आहे, त्यांना धोका असल्याचे जर तपासामध्ये आढळून आले तर आवश्यक असणारे संरक्षण सुध्दा देण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,संभाजीनगर येथे अशाच प्रकारची घटना घडली होती आणि याबाबतीत जी दिरंगाई होते, त्याचा परिणाम असा होतो की, शेवटी कोर्टामध्ये या मुली टिकूच शकत नाहीत. म्हणून या संबंधित मुलीला मदत करण्याच्या बाबतीत माननीय गृहमंत्री यांनी उल्लेख केला. परंतु तिच्यासाठी निवासाची सुरक्षित अशी व्यवस्था करावयास पाहिजे ही पहिली गोष्ट आहे आणि दुसरी गोष्ट म्हणजे या कामामध्ये श्री.बोरुडेचे बाकीचे जे सहकारी आहेत. त्यांच्या बाबतीत देखील आपण मोक्कासारखी कारवाई करणे गरजेचे आहे.याचे कारण असे की, हे लोक अनेक गिऱ्हाईकांचा उपयोग करीत होते.तिसरा आणि शेवटचा प्रश्न असा की, शेवटी सरकार कोणत्या पध्दतीने पावले उचलत आहे याची माननीय गृह मंत्री महोदयांनी माहिती दिली आहे त्याबद्दल मी आपली आभारी आहे. परंतु पोलीस महानिरीक्षक हे पद आपण महिलांवरील अत्याचाराचे निराकरण करण्याच्या संदर्भात लक्ष घालण्यासाठी नेमलेले आहे आणि आपण नुकतीच पुण्यामध्ये संबंधितांवर जबाबदारी टाकलेली आहे. पण ते स्वत: आणि त्यांचा ड्रायव्हर याखेरीज ...

. . . .3 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्याकडे कोणताही स्टाफ नाही.फॅक्स मशीन नाही.त्यांच्या मदतीला डी.वाय.एस.पी.सुध्दा नाहीत. अशा वेळी जोपर्यंत त्यांच्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत पुढची जी लिस्ट आहे, त्याबाबतीत न्याय मिळणे अशक्य आहे. म्हणून पोलीस महानिरीक्षकांना सक्षमपणे काम करता येईल असे इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करुन देण्यासाठी आपण कोणती पावले उचलणार आहात?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, पोलीस महानिरीक्षकांना जो संबंधित स्टाफ लागणार आहे, साधने लागतील ती देण्याच्या सूचना शासनामार्फत निश्चितपणे दिलेल्या आहेत. पण मी आपल्या निदर्शनास एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, काही अधिकारी हे काम करण्यापेक्षा काय उणीवा आहेत हे सांगण्याचे जास्त काम करतात. काही दिवसापूर्वीच संबंधित अधिकाऱ्यांचे पोस्टींग केलेले आहे आणि त्यांना आवश्यक असणारा स्टाफ देण्याच्या बाबतीत त्याच वेळी सूचना देण्यात आल्या आहेत. पण काही वेळा बदल्या करीत असताना, आपल्याला बदलीचा कायदा आड येत आहे. तेथे दिल्या जाणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोकरीच्या कालावधीस तीन वर्षे पूर्ण झालेली नसतील तर त्यांच्या बदल्या करुन चालत नाही. अशा प्रशासकीय बाबीमुळे काही वेळेस विलंब लागत आहे. पण हा विभाग सक्षम करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येतील आणि एकंदरीत राज्यामध्ये पोलिसांनी वेळीच दखल न घेणे, त्याचबरोबर गुन्हे दाखल केल्यानंतर कन्व्हेक्शनचा रेट वाढविणे आणि आज जे कायदे अस्तित्वात आहेत, त्याची जरब न बसणे असे प्रकार होत आहेत. तसेच राज्यामध्ये श्री.धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधींची एक समिती सुध्दा गठीत करण्यात आलेली आहे. तसेच मला जी माहिती मिळालेली आहे, त्यानुसार या समितीचा इंटेरिअम अहवाल देखील तयार झालेला आहे आणि तो पुढच्या आठवड्यामध्ये शासनाला सादर होण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, महिलांना सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने आज अस्तित्वात असलेले सगळे कायदे अधिक स्ट्रेन्थदन करणे महत्वाचे आहे. मग ते गुन्हे कोणत्याही स्वरुपाचे असतील. एकदा गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर कोर्टामध्ये अशा पध्दतीची प्रकरणे प्रलंबित न रहाणे आणि कन्व्हीक्शनचा रेट वाढविणे याबाबतीत सुध्दा शासनाने ठोस पावले उचललेली आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने महिलांवर झालेल्या अत्याचारा बाबत कारवाई होणार ही गोष्ट नक्की आहे. परंतु दरवर्षी अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे त्यावर उपाय शोधण्यासाठी कमिटी तयार केल्यानंतर कायदे तयार होतील, त्यानंतर त्याचे कायद्यात .....

. . . .3 आय-3

श्रीमती शोभा फडणवीस . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपांतर होईल आणि मग त्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होईल. मात्र त्यासाठी दोन-तीन वर्षे लागणार आहेत. सर्वप्रथम आमच्या असे लक्षात येते की, जेव्हा एखादी मुलगी किंवा एखादी स्त्री गुन्हा दाखल करण्यासाठी जाते, तेव्हा ताबडतोब गुन्हा नोंदवून घेतला जात नाही ही वस्तुस्थिती आहे आणि आम्ही माननीय गृहमंत्री महोदयांकडे देखील मर्दानी महिला मंचच्या वतीने दोन-तीन केसेसमध्ये अर्ज सादर केलेले आहेत. पण सगळयात दुर्दैवाची गोष्ट अशी की, 3 ते 10 या वयोगटातील मुलींवरील अत्याचाराचे प्रमाण जानेवारी 2008 ते डिसेंबर 2008 या कालावधीमध्ये 19.19 टक्के वाढलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

माननीय मंत्री महोदयांनी दिलेली यादी पाहिली तर लक्षात येते की, सहा महिन्यात आणि आठ महिन्यात मोठया प्रमाणात महिलांवर अत्याचार झालेले आहेत. 3 ते 10, 10 ते 14, 14 ते 18 आणि 18 ते 30 या वयोगटामधील महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. केवळ कायद्याने हे प्रमाण कमी होईल या मताशी मी सहमत होणार नाही. त्यासाठी कायदे कडक असण्याची आवश्यकता आहे. एखाद्या पोलिसाने तक्रार नोंदविली नाही अशा प्रकारची जेव्हा तक्रार करण्यात येते तेव्हा त्याबाबतचे स्पष्टीकरण त्याच्याकडून घेतले पाहिजे अशा प्रकारची सूचना मी याठिकाणी करते. पण हा घडलेला प्रकार अतिशय घृणास्पद आहे. पोलिसांकडूनच महिलांवर अत्याचार होणार असतील तर आम्ही सुरक्षितता कोणाकडे मागायची. जर कुंपणच शेत खात असेल तर आम्ही कोणाकडे न्याय मागायचा हा महत्वाचा प्रश्न आहे ज्यांनी आमचे रक्षण करायचे असते तेच जर भक्षण करणार असतील तर याबाबतीत अतिशय गंभीरतेने विचार झाला पाहिजे. तक्रार ताबडतोब नोंदविली गेली पाहिजे. अटक ताबडतोब केली पाहिजे. चौकशी ताबडतोब केली पाहिजे आणि न्यायालयात ती केस ताबडतोब दाखल केली पाहिजे. हे करण्याची आवश्यकता असताना हे घडत नाही. भविष्यामध्ये अशा पध्दतीने जे पोलीस ऑफिसर दिरंगाई करणार असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय? भृण हत्येच्या बाबतीत मागच्या जुलै महिन्यात शासनाने सांगितले होते की, कोल्हापुरी पॅटर्न राबवू आणि भृण हत्या कमी करु पण कोल्हापुरी पॅटर्नचा वापर अद्यापपर्यंत करण्यात आलेला नाही. भविष्यात तो कधी करण्यात येणार आहे याचे उत्तर देण्यात यावे.

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, महिलांवरील अत्याचार वाढत आहेत अशा पध्दतीची बाब सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केलेली आहे ती गोष्ट काही प्रमाणात खरी आहे. गेल्या पाच वर्षात अत्याचाराच्या प्रमाणात 7.8 वरुन 8.9 पर्यंत इतकी वाढ झालेली आहे. देशभरातील एकंदर घटना बघितल्या तर देशस्तरावरील सगळे आकडे डोळयासमोर ठेवून मी खात्रीने सांगू इच्छितो की, ...

श्रीमती शोभा फडणवीस : देशामध्ये महाराष्ट्र हा चौथ्या क्रमांकावर आहे. आम्ही महाराष्ट्राचे विचारतो. आम्हाला संपूर्ण भारताच्या माहितीची आवश्यकता नाही. महाराष्ट्राची माहिती देण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. आर.आर. पाटील : सभापती महोदय, देशामधील इतर राज्यांचे गुन्हेगारीतील क्रमांक सन्माननीय सदस्यांना गैरसोईचे वाटत असतील आणि ती माहिती सदनासमोर येऊ नये अशी त्यांची इच्छा असेल तर माझीही त्याबाबतची माहिती सांगण्याची इच्छा नाही. कुठल्याही राज्यामध्ये महिलांवर अत्याचार होणे ही गोष्ट योग्य नाही. सन 2008 मध्ये केंद्र शासनाने जे आकडे घोषित केलेले आहेत त्यानुसार महाराष्ट्रामध्ये महिलांच्या संदर्भामध्ये 1523 वेगवेगळया प्रकारचे गुन्हे घडलेले आहेत. यामध्ये कॉग्नीजिबल/महत्वाचे जे गुन्हे आहेत त्यामध्ये आपल्या राज्याचा देशामध्ये 17 वा क्रमांक आहे. छेड काढणे वगैरे याबाबतीतील गुन्हे बघितले आणि एकंदरीत सगळया राज्यातील गुन्हयांची संख्या बघितली तर आपल्या राज्याचा देशामध्ये क्रमांक चौथा आहे ही गोष्ट खरी आहे. संख्येच्या बाबतीत आपल्या राज्याचा देशामध्ये क्रमांक चौथा आहे पण कॉग्नीजिबल ऑफेन्सच्या प्रमाणात आपल्या राज्याचा 17 वा क्रमांक आहे. 10 ते 14 या वयोगटामधील स्त्रियांवर अन्याय आणि अत्याचार जास्त होतात अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. सभापती महोदय, माझ्याकडे असलेल्या आकडेवारीवरुन असे दिसते की, वर्षभरात एकंदर 1523 घटनांची नोंद झालेली आहे त्यामध्ये वयोगट 10 ते 14 मधील बाधीत आणि पीडित मुलींची संख्या 130 आहे. वयोगट 14 ते 18 मध्ये 433 आहे. वयोगट 18 ते 30 मध्ये 696 आणि वयोगट 30 ते 50 मध्ये 155 आणि 50 च्या पुढे 4 घटना घडलेल्या आहेत. सभापती महोदय, यातील धक्कादायक माहिती अशी आहे की, ज्या 1523 घटना नोंद झालेल्या आहेत. त्यातील 1485 घटनामधील जे आरोपी आहेत ते त्या मुलींच्या आणि त्यांच्या कुटुंबियाचे ओळखीचे आरोपी आहेत. मुलींवर अत्याचार होण्याचे प्रमाण ओळखीच्या माणसांकडून अधिकचे आहे आणि त्यातील काही नाती तर न सांगण्या इतपत आणि सदनामध्ये त्याचा उल्लेखही करु नये अशा स्वरुपाचे काही नातेसंबंध असलेले आहेत. राज्यामध्ये महिला सुरक्षित असल्या पाहिजेत. जनतेच्या जीविताचे, मालमत्तेचे आणि शिलाचे रक्षण करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे हे गृहीत धरुन अनेक उपाययोजना राज्य शासनामार्फत केलेल्या आहेत.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड.....

श्री. आर. आर. पाटील ....

आपल्यालाही या गोष्टीची माहिती आहे की, राज्य सरकार याबाबतीत निश्चितपणे संवेदनशील आहे म्हणूनच आपण कमिटी नेमलेली आहे. माझी निश्यितपणे खात्री आहे की, ज्या कमिटीमध्ये आपण काम करीत आहात त्या कमिटीचे निष्कर्ष आज ना उद्या देशाच्या स्तरावर सुध्दा स्वीकारले जातील. महिलांच्या तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाहीत अशी तक्रार आहे. 103 नंबरवर डायल केले आणि फक्त फोनवरुन जरी माहिती दिली तरी सुध्दा तक्रारी नोंदवून घेण्यास आपण सुरुवात केलेली आहे. अलीकडच्या काळात तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाही अशा तक्रारी दिवसेंदिवस कमी व्हावयास लागल्या आहेत. महिलांसाठी डायल 103 सुरु केल्यापासून 3775 महिलांनी फोनवरुन तक्रारी केल्या. त्यातील 99 गुन्हे दखलपात्र आढळून आले. त्या गुन्ह्यांची नोंद केली. जे अदखलपात्र गुन्हे नोंदविले त्यांची संख्या 1542 होती. त्यासंदर्भात एकूण 1788 लोकांवर कारवाई केलेली आहे. साधी फोनवरुन तक्रार केली तरी सुध्दा त्याची अतिशय गांभीर्याने दखल घेतली जाते पण बऱ्याचवेळा लोक पोलीस स्टेशनला येण्यासाठी टाळाटाळ करतात किंवा प्राधान्य देत नाहीत. म्हणून आमची सगळी तयारी झालेली आहे आणि लवकरच अधिवेशन संपल्यानंतर काही दिवसात मुंबई सारख्या शहरामध्ये प्रायोगिक तत्वावर 'इ-कम्प्लेंट' करण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येईल. लोकांना तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये सुध्दा यावे लागणार नाही. ही सुविधा महिलांबरोबर सगळ्यांनाच उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, यामधील जी पीडित महिला आहे ती अल्पसंख्यांक समाजातील आहे. त्यामुळे ही बाब अतिशय गंभीर आहे. अत्याचार करणारा पोलीस अधिकारी आहे. तो पोलीस अधिकारी आहे म्हणून ही घटना घडून पंधरा वीस दिवस होऊन सुध्दा तो अजून पकडला जात नाही. तो पकडला जात नाही की त्याला पकडले गेले नाही असा थोडा संभ्रम निर्माण झालेला आहे. म्हणून मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, आपण त्याला किती दिवसात पकडणार याबाबत सदनाला सांगणार काय, खरोखर त्याला पकडणार आहात काय, पकडणार असाल तर किती दिवसात पकडणार ? दुसरी आणखी एक गंभीर बाब आहे. सांगलीतील मिरज येथील प्रकरण आहे. त्या ठिकाणी 10 मुलींवर अत्याचार झालेला आहे. अशा तऱ्हेच्या ज्या घटना घडत आहेत त्या अतिशय दुर्दैवी आहेत. यावर निश्चितपणे कडक कारवाई

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. राम पंडागळे .....

करण्याचे धोरण सरकारने आखले पाहिजे. जे हात अत्याचार करण्यासाठी पुढे जात आहेत ते हात आधीच आवरले गेले पाहिजेत असे मला वाटते. बलात्कार करणारे जे लोक आहेत, मग तो सरकारी अधिकारी असो किंवा कोणीही असो, आमच्या माननीय मंत्री महोदया असे म्हणत आहेत की त्याला फाशी झाली पाहिजे आणि माझीही त्याला संमती आहे की, अशा प्रवृत्तीचे जे गुन्हेगार आहेत त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. विशेषत: ते जर पोलीस दलातील असतील तर त्यांच्या बाबतीत शासनाने गंभीर विचार केला पाहिजे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, हा जो कोणी अधिकारी आहे तो किती दिवसात पकडला जाणार आहे, त्याला पकडल्यानंतर त्याच्यावर ताबडतोबीने कठोर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, प्रश्न विचारताना हेत्वारोप करण्याची आवश्यकता नव्हती. शासनाची भूमिका मी माझ्या उत्तरातून स्पष्ट केलेली आहे. कोणत्याही आरोपीवर कारवाई करताना आणि पीडित व्यक्ती कोण आहे त्याची जात, धर्म बघून कोणतीही कारवाई होत नाही. देशात आणि राज्यात सगळ्यांसाठी सारखेच कायदे आहेत. या पीडित महिलेला संबंधित अधिकाऱ्याचे नाव सुध्दा माहीत नव्हते. पोलिसांनी हा तपास पुढे नेला आहे आणि नाव निष्पन्न केले आहे. याचा अतिशय खोलामध्ये जाऊन तपास केला आहे. मग त्याचे फोन नंबर तपासणे, डीएनए टेस्ट करणे अशा शास्त्रोक्त पध्दतीने पोलिसांचा तपास सुरु आहे. ही गोष्ट खरी आहे की, पोलिसांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यानंतर सुध्दा, हाय क्राईम ब्रँच सारख्या एका शाखेमध्ये काम केल्यानंतर कसे सापडावयाचे नाही हे त्याला पोलीस सेवेमध्ये राहून कळले असेल त्यामुळे तो चुकवत आहे. तरी सुध्दा तो पोलिसांच्या हातापासून लांब राहू शकणार नाही. पोलीस त्याला निश्चितपणाने पकडतील. अशा घटनांमध्ये जर मला वेळ सांगता आली असती की, अमुक वाजून अमुक मिनिटांनी पकडतो तर तसे सांगितले असते. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे हे अशा पध्दतीने प्रश्न विचारत आहेत की, जणूकाही त्याला कोणी धरुन ठेवले आहे आणि पोलीस पकडत नाही. अशी स्थिती नाही. या आरोपीचा ठावठिकाणा लागल्याबरोबर पोलीस त्याला पकडतील.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

आरोपीला पकडल्याबरोबर हे अधिवेशन सुरु असेल तर अधिवेशनामध्ये आणि चालू नसेल तर सन्माननीय सदस्यांना मी फोन करुन सांगेन.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी पोलीस यंत्रणेबद्दल आपल्या भावना का व्यक्त केल्या ? पवईतील मिलिंद नगरमधील ही घटना आहे. आपल्या म्हणण्याप्रमाणे या केसचा तपास पोलीस दल अतिशय कार्यक्षमपणे करीत आहे. एफ.आय.आर.मध्ये श्री.अरुण बोरुडे यांचे नाव आले आहे काय, आले असल्यास कधी आले ते सांगावे. जुवेनाईल ॲक्टप्रमाणे पोलिसांनी कारवाई केली आहे काय, कधी केली ते सांगावे. ज्यावेळी सामाजिक संस्थांनी हा विषय उचलून धरला त्यानंतर पोलिसांनी कारवाई केली आहे. श्री.बोरुडे अटकपूर्व जामीन मिळविण्यासाठी कोर्टात गेले त्यावेळी न्यायमूर्ती तहिलरामानी यांनी एक दिवस सुनावणी पुढे ढकलली. आपल्या पोलिसांनी जी घटना एम्रॉल्ड कोर्ट इमारतीमध्ये घडली तेथे त्या मुलीला नेले नाही. त्यांचे असे म्हणणे होते की, ती मुलगी नुकतीच बाळंत झाली आहे. त्यामुळे ते शक्य नव्हते. मग तेथे सिक्युरिटी गार्डला नेऊन दाखविले पाहिजे होते, जेणे करुन श्री.बोरुडे अडकले पाहिजे होते. याबाबतची कारवाई पोलिसांनी केली नाही असे न्या.तहिलरामानी यांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांनी एक दिवस सुनावणी पुढे ढकलली. पोलीस दल कार्यक्षम आहे असे माननीय गृह मंत्री म्हणत आहेत ते खरेच आहे काय असा प्रश्न उपस्थित होतो. सतत 15 दिवस सर्व वर्तमानपत्रातून याबाबतची बातमी येत होती म्हणून शासनाने ही धावपळ केली. अन्यथा इतकी कार्य तत्परता दिसली नसती. शांताबाई हया चौथे नाव सांगतच नाही, हे पोलिसांना पटू शकते ? पोलीस दल कार्यक्षम आहे, परंतु मरीन लाईन्सचा कोण तरी एक पोलीस शिपाई संपूर्ण पोलीस दलाला बदनाम करीत असतो. त्यावर ज्या तत्परतेने काम झाले पाहिजे तसे झालेले नाही. त्या आरोपीने पोलीस दलात काम केल्यामुळे त्याला लपण्याची ठिकाणं माहीत आहेत त्याप्रमाणे ती ठिकाणे माहीत असलेले संपूर्ण पोलीस दल शासनाकडे आहे. सन्माननीय गृहराज्यमंत्री श्री.सतेज पाटील हे नवीन आहेत, परंतु माननीय गृह मंत्र्यांनी हे खाते किती तरी वेळा सांभाळलेले आहे. त्यामुळे गृह मंत्री म्हणून आपल्याकडून आम्हाला हे उत्तर अपेक्षित नाही. त्याला लपण्याची पध्दत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.विनोद तावडे....

माहीत आहे असे आपण म्हणालात, परंतु त्याला शोधून काढण्याची पध्दत अनेकांना माहीत आहे. हा कोणत्या पक्षाचा विषय नाही. महाराष्ट्रातील पोलीस खात्याच्या इभ्रतीचा प्रश्न आहे. एकही गोष्ट यापुढे शिल्लक राहणार नाही असा जबाबदार अधिकारी नेमून महाराष्ट्राची शान आपण सर्वजण वाढवू यासाठी मंत्री महोदय, आपण असा विशेष अधिकारी नेमणार आहात काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही सूचना आल्यानंतर कारवाई केली जाईल अशी वाट मी बघत बसलो नाही आणि पोलीस दलही बसलेले नाही. या आरोपीला शोधून काढण्यासाठी 6 अधिका-यांची तपास पथके तयार केलेली आहेत. हा आरोपी जेथे जेथे जाण्याची शक्यता असेल त्या सर्व ठिकाणी तपास करण्याचे काम पोलिसांमार्फत अहोरात्र सुरु आहे. त्याला पोलिसांकडून पाठिशी घालण्याचा प्रयत्न सुरु असल्याची शंका व्यक्त करण्यात आली. परंतु तसा प्रयत्न असता तर त्याला पोलीस दलातून बडतर्फ करण्याची कारवाई केली नसती. त्याचे नाव घेण्याची भूमिका शासनाने घेतली नसती. एवढेच नव्हे तर त्याला फरार घोषित करणे, त्याला देशाच्या बाहेर जाण्यास मज्जाव करणे, त्याची सर्व मालमत्ता जप्त करणे म्हणजे गँगस्टर्ससाठी कडक पावले उचलली जातात तेवढी कडक पावले याच्यासाठी उचललेली आहेत. यासाठी 6 पथके तयार केलेली आहेत, पोलीस त्याला निश्चित पकडतील. सहआयुक्त, क्राईम यांच्यावर ही विशेष जबाबदारी टाकलेली आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, ज्या गायकवाड बाईंना पकडलेले आहे त्या चौथ्या माणसाचे नाव का सांगत नाहीत आणि त्या ते नाव कधी सांगणार आहेत असा माझा पहिला प्रश्न आहे. त्या पीडित महिलेविषयी बोलत असलो तरी मिरजमध्ये आणखी 10 मुलींवर बलात्कार झालेला असल्यामुळे त्या हबीब मुलानीवर पोलीस विभागाने काय कारवाई केली आहे ?

यानंतर श्री.शिगम

अशुधीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

माझा तिसरा प्रश्न असा आहे की, अभिरुची स्वातंत्र्य आणि व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली दूरदर्शन वाहिन्यांवरुन दाखविण्यात येणा-या कार्यक्रमांचे चांगल्या प्रकारे सेन्सॉरशिप केले जाईल काय ? समाज बघू शेकल अशा प्रकारचे कार्यक्रम विविध वाहिन्यांद्वारे दाखविले जातील अशी व्यवस्था शासन करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : पहिल्या घटनेमध्ये बोरुडेच काय पण जेवढे आरोपी असतील आणि ते कुठेही लपलेले असले तरी त्यांना शोधून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. दूरदर्शनवरील विविध वाहिन्यांद्वारे दाखविल्या जाणा-या मालिकांसंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपली भूमिका या ठिकाणी व्यक्त केली. तो विषय केन्द्र शासनाच्या अखत्यारितील असल्यामुळे राज्यस्तरावरुन त्याबाबतीत प्रतिक्रिया देण्याची आवश्यकता नाही. सन्माननीय सदस्यांचे मत वेगळया पध्दतीने केन्द्र सरकारला कळविण्याचा प्रयत्न केला जाईल. सांगली जिल्ह्यातील बुधगाव येथील घटनेचा उल्लेख करण्यात आला. हबीब मुलानी याने 10 मुलींवर बलात्कार केला अशी वृत्तपत्रामध्ये बातमी आली होती. अशी घटना कुठे घडलेली आहे किंवा विनयभंग झालेला आहे अशी तक्रार आली आणि त्यात तथ्य आढळले तर त्याबाबतीत कारवाई करण्यात येईल. अन्य घटनेमध्ये विनयभंगाचा गुन्हा दाखल केलेला आहे. लक्षवेधीमध्ये 5 घटना सांगितल्या. पहिली घटना वगळता प्रत्येक घटनेतील सर्व आरोपी पकडलेले आहेत आणि त्यांच्यावर कायद्यानुसार कारवाई केलेली आहे.

श्री. हेमंत टकले : या लक्षवेधीच्या निमित्ताने राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सगळयांच्या माना खाली जाव्यात अशा प्रकारची विकृत स्वरुपाची गुन्हेगारी आणि महिलावरील अत्याचार वाढत आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी सांगितल्या प्रमाणे सध्या "झीटीव्ही"वर लज्जा नावाची मालिका सुरु आहे. त्या मालिकेमध्ये समाजातील कोणत्या ना कोणत्या स्त्रीवर अत्याचार करण्याच्या प्रवृत्तीचे जे चित्रण दाखविले जाते ते अतिशय विदारक आहे. जो कोणी ती मालिका पाहतो त्याचे संवेदनशील मन अस्वस्थ होईल. अशा मालिकामधून समाजाचे चित्र उभे रहाते. पोलीस अधिकारी फरार होतो, गुन्हा करतो, महिलेवर अत्याचार करतो आणि तो सापडू शकत नाही,यामुळे गृहखात्याच्या एकूणच यंत्रणेबद्दल लोकांमध्ये असलेला अविश्वास दूर होण्याची सूतराम शक्यता दिसत नाही. अरुण बोरुडे काय किंवा त्याच्या सारखी प्रवृत्ती असलेले अधिकारी काय, अशा अधिका-यांना वेळीच वेचून गुन्हा करण्यापूर्वीच त्यांचा बंदोबस्त करावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

महिलांवरील अत्याचार हे अन्य राज्यामध्ये जास्त आणि आपल्या राज्यामध्ये कमी अशा प्रकारची तुलना न करता महिलांना सुरक्षित वाटेल अशा प्रकारचे महाराष्ट्र राज्य आपण निर्माण करणार आहात काय ?

श्री. आर.आर.पाटील : चॅनल्स आणि मालिकांच्या संदर्भात या सदनामध्ये उल्लेख करण्यात आला. हा विषय केन्द्र शासनाच्या अखत्यारितील आहे. तेव्हा केन्द्र सरकारकडे कोणकोणत्या शिफारशी केल्या पाहिजेत हे तपासून त्या शिफारशी अमलात आणण्याची केन्द्र सरकारला विनंती करण्यात येईल. महिलांच्या सुरक्षिततेला पहिले प्राधान्य देण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. राज्य सरकारला आणि पोलीस दलाला बदनाम करणारे जे अस्तनीतील निखारे असतील त्यांना शोधून त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका सरकारची असेल. अशा घटनांच्या बाबतीत अतिशय कडकपणे आणि लवकरात लवकर शिक्षा झाली पाहिजे यासाठी ज्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे त्या केल्या जातील.

श्री. अरुण गुजराथी : कोणत्याही पोलीस स्टेशनवर आपण गेलो तर त्या ठिकाणी तक्रार लिहिणारा कर्मचारी किंवा पोलीस हा पुरुष असल्याचे पहावयास मिळते. तेव्हा पुढच्या काळामध्ये पोलीस स्टेशनमध्ये तक्रार लिहिण्यासाठी रायटर म्हणून महिला पोलीस किंवा महिला कर्मचारी असेल अशी व्यवस्था राज्य शासन करणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2....

श्री.आर.आर.पाटील : पोलीस कॉन्स्टेबल, पीएसआय, डीवायएसपी या पदांकरिता महिलांसाठी 30 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. पोलीस दलामध्ये प्रत्येक वर्षी महिलांचे प्रमाण गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पट होत चालले आहे. मध्यंतरी मीच एक भूमिका घोषित केली होती की, प्रत्येक शहरामध्ये एक तरी पोलीस स्टेशन हे महिला इन्स्पेक्टर नेमून तिच्या अखत्यारित दिले जाईल. काही शहरे निघाली, काही जिल्हयांची ठिकाणे आहेत, तेथे एकही महिला इन्स्पेक्टर नसल्यामुळे शासनाने भूमिका व्यक्त करुनही महिला अधिकारी उपलब्ध झालेली नाही. हे उपलब्धतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. ज्या जिल्हयामध्ये अशा महिला कॉन्स्टेबल व महिला अधिकारी उपलब्ध आहेत त्याठिकाणी माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे रायटर पदावर एक तरी महिला असेल अशी भूमिका सरकारमार्फत स्वीकारली जाईल. ज्या जिल्हयामध्ये पोलीस दलात महिला उपलब्ध होत नाहीत त्या जिल्हयांमध्ये महिलांचे प्रमाण वाढेल अशी भूमिका सरकारमार्फत स्वीकारली जाईल.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, पोलीस दल कार्यक्षम आहे. मी त्याच्याशी सहमत आहे. एखाद्या घटनेमुळे सगळे पोलीस दल वाईट आहे असे मी म्हणणार नाही. श्री.संजीव दयाळ, श्री.सदानंद दाते यांच्यासारखे अतिशय चांगले पालीस अधिकारी आहेत. परंतु मंत्रीमहोदयांनी दिलेल्या उत्तरामध्ये सुध्दा काही खोच आहे. ठरवून दिलेली खोच नाही. त्यांना विभागाकडून जी माहिती दिली गेली त्या माहितीमध्ये खोच आहे. एक पोलीस अधिकारी गंभीर अपराध करुनही इतके दिवस सापडत नाही याचे आकलन होत नाही. या अधिकाऱ्याला फरार म्हणून जाहीर केलेले आहे. त्याऐवजी त्यांना प्रोक्लेम ऑफेंडर घोषित करुन त्यांच्याविरुध्द सीआरपीसी अंतर्गत प्रोसेस सुरु करणार आहात का? त्यांची प्रॉपर्टी सील करण्यात आली असा अहवाल आलेला आहे. ती प्रॉपर्टी अटॅच करणार आहात का? चौथ्या आरोपीचे नाव उघड झालेले नाही असे सांगितले जाते ते असत्य आहे. चौथा आरोपी या घटनेतील महत्वाचा दुवा आहे. त्याचे नाव मुद्दाम दडविले जात आहे अशी शंका घेण्यास वाव आहे असे माझे मत आहे. श्री.काजरोळकर यांनी संरक्षण मागितले नसले तरी त्यांना संरक्षण द्यावे. डीएनए टेस्ट पॉझिटिव्ह आली नाही असे म्हटले जाते. बलात्कार करणारे बरेच लोक असले तरी शास्त्रीय विज्ञानाप्रमाणे गर्भधारणा एकाकडूनच होते. त्या मुलीला सुध्दा संरक्षण दिले पाहिजे. ती मुलगी 19

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वर्षाची असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न झाला. डॉक्टरांनी सांगितले की, ते शक्य नाही. आताच ती प्युबर्टी आलेली मुलगी आहे. दहा महिन्यांपासून तिच्यावर बलात्कार होत होता अशी माहिती आहे. मी तीन प्रश्न विचारले आहेत त्याबाबत मंत्रीमहोदयांनी समाधानकारक उत्तर द्यावे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, खरे तर जे प्रश्न उपस्थित केले त्याची तीन वेळा मी उत्तरे दिली आहेत. चौथ्या वेळा जरुर उत्तर देतो. मी अगोदरच सांगितले आहे की, श्री.बोरुडे यांना फरार म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यांची सर्व मालमत्ता अटॅच करण्यात येईल. त्यांना पाठीशी घालण्याची भूमिका घेतलेली नाही. ज्यांनी सगळी माहिती दिली त्यांना पोलीस प्रोटेक्शन देण्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. आवश्यकता तपासून बघू व पोलिसांना योग्य वाटले तर निश्चितपणाने आवश्यक आहे तेथे सगळे प्रोटेक्शन त्यांना देऊ. पिडित मुलगी 18 वर्षाच्या आतील आहे. सुरुवातीला त्या मुलीने स्वत:चे वय 19 वर्षे असल्याचे सांगितले होते. पोलिसांना शंका आली, डॉक्टरांना शंका आली म्हणून ही केस उद्‌भवली. मुलीचे वय 19 वर्षाचे आहे यावर डॉक्टर आणि पोलिसांचा विश्वास नव्हता, म्हणून पुढील गुन्हा नोंद झाला. नेमका कोणी बलात्कार केल्यामुळे ती मुलगी गरोदर राहिली हे डीएनए टेस्टमध्ये निश्चितपणाने स्पष्ट होईल. मुलगी अल्पवयीन आहे म्हणून तिला आर्थिक मदत करणे आणि बाल सुधारगृहामध्ये तिची व्यवस्था करणे या गोष्टी शासनामार्फत करण्यात येतील.

नंतर 3ओ.1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. हुसैन दलवाई : महोदय, यातील चौथा आरोपी कोण आहे याचा तपास लागलेला नाही. तसेच श्री. काजरोळकर यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना दिलेल्या अर्जात म्हटले आहे की, ही एक मोठी गँग आहे त्यांच्यापासून माझ्या जिवाला धोका आहे. म्हणून त्यांना संरक्षण देण्याचा आपण प्रयत्न करावा अशी माझी विनंती आहे. आपल्या विभागाचे अधिकारी गॅलरीतून आपल्याला सांगतात, त्यांच्यावर विश्वास ठेवू नका. तसेच चौथा आरोपी कोण आहे हे देखील समजून घेण्याचा हक्क आम्हाला आहे, त्याचे नाव काय आहे ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हुसैन दलवाई यांच्याकडे जी माहिती असेल ती माझ्याकडे त्यांनी द्यावी, त्याच्या आधारे तपास करण्यात येईल. चौथ्या आरोपीसंबंधी पोलिसांचा अंदाज असून तसा तपासही सुरु आहे व त्या आरोपीचा शोध घेण्याचे काम पोलीस करीत आहे, पण अजून तरी त्याचे नाव निष्पन्न झालेले नाही. संरक्षणाच्या बाबतीत मी वारंवार सांगितले की, खरोखरीच आवश्यकता आहे की नाही याची तपासणी करुन गरज असेल तर आवश्यकतेपेक्षा जास्तीचे संरक्षण देण्यात येईल, असेही मी सांगू इच्छितो.

उपसभापती : माननीय गृह मंत्र्यांकडे मी सन्माननीय सदस्यांनी दिलेली कागदपत्रे पाठवित आहे. त्यातूनही चौथा आरोपी असल्याचे निष्पन्न होते. त्या अनुषंगाने आपण चौथा आरोपी कोण आहे याचा तपास करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विजेचे बिल न भरल्याने धारुर (जि. बीड) येथील पाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा बंद होणे

मु. शी. : विजेचे बिल न भरल्याने धारुर (जि. बीड) येथील पाणीपुरवठा योजनेचा पाणीपुरवठा बंद होणे यासंबंधी ॲड. उषा दराडे, सर्वश्री रमेश शेंडगे, अरुण गुजराथी, हेमंत टकले, सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"बीड जिल्ह्यातील धारुर शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या धनेगाव पाणी पुरवठा योजनेचे बील न भरल्याने दिनांक 18 ऑक्टोबर, 2010 पासून महावितरणाने योजनेचा पाणी पुरवठा तोडल्याने शहरवासियांना तीव्र पाणी टंचाई निर्माण होणे, तसेच सदर टंचाईमुळे शहरवासियांना भटकंती करावी लागणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन धारुर शहरवासियांना भासत असलेली पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : महोदय, बीड जिल्ह्यातील केज व धारुर तसेच इतर 12 गावांसाठी सन 1997 साली पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत जिल्हा परिषदेला दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी हस्तांतरित करण्यात आली. या योजनेअंतर्गत केज आणि धारुर ही दोन मोठी गांवे आहेत. सध्याच्या परिस्थितीत पाण्याची बिले भरली जात नाहीत म्हणून मागील दोन वर्षात या योजनेचे कनेक्शन वेळोवेळी कपात करण्यात येत असून जेमतेम पाचच वेळा सुरळीत पाणी पुरवठा झाला आहे. यासंबंधी मंत्री महोदय काय कार्यवाही करणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, केज आणि धारुरसोबत 12 गावांसाठी ही पाणीपुरवठा योजना असून सन 1997 च्या जून महिन्यामध्ये ती योजना पूर्ण झाली आणि ऑक्टोबर महिन्यात हस्तांतिरत करण्यात आली. या योजनेचा वीज पुरवठा वारंवार बंद होण्याचे एकच कारण आहे ते म्हणजे बिले भरली जात नाहीत. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, या योजनेपोटी एकूण 9.67 कोटीची बिलाची थकबाकी असून यावर्षातील वसुली फक्त 6.18 लाख एवढीच आहे त्यामुळे स्वाभाविकच कनेक्शन कपात होणार. मधल्या काळात एकदा जिल्हा परिषदेने तात्पुरती 5 लाख एवढी रक्कम भरली होती म्हणून पुन्हा पाणीपुरवठा सुरु करण्यात आला होता परंतु पुन्हा बिले थकित होत असल्याने पुन्हा पुन्हा कपात करण्यात येत आहे. याचा अर्थ या योजनेपोटी येणारे विजेचे बिल भरण्याची तयारीच नाही.

श्री. विनोद तावडे : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अवकाळी पावसामुळे राज्यात जी परिस्थिती निर्माण झाली त्या अनुषंगाने खालच्या सभागृहात घोषणा केली तसा निर्णय आपला विभाग घेणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : या योजनेपोटी असलेले पाण्याचे दर अत्यंत कमी आहेत. दरवर्षी 360 रुपये नगरपालिका आणि नगर पंचायतीसाठी वर्षाकाठी फक्त 720 रुपयेच आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

एका नळाच्या कनेक्शनला केवळ 30 रुपये महिन्याकाठी लागतात म्हणजे या योजनेतील पाण्यासाठी दरदिवशी केवळ एक रुपया लागत असतो असे असतांनाही यथील जनता पैसे भरत नाही. पाण्याचा दर एवढा कमी असतांना सुध्दा लोकांनी त्याचे पैसे भरले नाही तर ही योजना चालू शकणार नाही. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, पाण्याचे पैसे भरल्याशिवाय योजना सुरु राहणार नाही यासाठी जलतेला त्यांनी पैसे भरण्यासाठी प्रोत्साहीत केले पाहिजे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी "तळोजा (ता. पनवेल, जि.रायगड) एम.आय.डी.सी. मधील नाईक ओशिय एक्सपोर्ट कंपनीमध्ये दिनांक 23 नोव्हेंबर,2010 रोजी झालेल्या अमोनिया वायू गळतीमुळे सुमारे 70 जणांना बाधा होऊन पाच-सहा जणांची प्रकृती चिंताजनक असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यातील चार आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येत असलेली उपयोजना आदिवासी क्षेत्राबाहेरील प्रयोजनासाठी वळविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "चंद्रपूर जिल्हयात सन 2009-2010 मध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या केलेल्या आरोग्य तपासणीत 114 विद्यार्थी हृदय रुग्ण असल्याचे आढळून येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "मुंबई शहरातील दादर-नायगाव विभाग सि.स.नं. 103, नायगाव क्रॉस रोड या भूखंडाचा विकास करण्याची परवानगी घेतांना या भूखंडातील 786 चौ.मी. जमीन म्हाडाला, 828.20 चौ.मी जागा प्रकल्पग्रस्तांसाठी शासनास तसेच मुंबई महानगरपालिकेला बाजारासाठी हस्तांतरीत करण्यासाठी घातलेल्या अटींची पूर्तता विकासकाने न करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, पाशा पटेल यांनी "गेवराई (जि.बीड) येथील गोदावरी नदीतून यांत्रिक बोटी व शेकडो सक्षम पंपाच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळूचे उत्खनन होत असल्याने तेथील ऐतिहासिक व पौराणिक तीर्थक्षेत्राच्या पावित्र्यास वाळू उपसामुळे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

धोका निर्माण होणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, संजय केळकर, विनोद तावडे चंद्रकांत पाटील यांनी "राज्यातील महानगरपालिकेच्या व नगरपरिषदांच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग शासनाने अद्याप लागू न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, भगवान साळुंखे यांनी "मागासवर्गीयांसाठी असलेल्या आरक्षण अधिनियम 2001 मधील खंड 4(2) नुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, अ,ब,क, व ड प्रवर्गासाठी आरक्षण विहित केले असतांनाही या प्रवर्गातील उमेदवारांना भरती, बढती आरक्षण इत्यादी पासून वंचित ठेवले जात असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "अकोला येथील विमानतळाचे नूतनीकरण व वास्तूसाठी शासनाकडून 14 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असूनही धावपट्टीसाठी लागणारी जमीन हस्तांतर करण्यास डॉ.पंजाबराव कृषी विद्यापीठाने नकार दिल्याने विमानतळ व धावपट्टीचे काम करण्यास विलंब होत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर यांनी "पातोंडा, ता. नांदूरा (जि.बुलढाणा) येथील आलमपूर शिवारातील सर्वश्री. शिवाजी ढोले, जगदेव फलके, बापू देशमुख व अन्य 25 शेतक-यांच्या बागायत जमिनी जिगाव प्रकल्पासाठी संपादित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. ..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी " मुंबईतील आदर्श सोसायटी घोटाळा प्रकरणी संबंधित सनदी अधिका-यांना शासनाने दि. 3.12.2010 रोजी वा त्या सुमारास नोटीस पाठविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "धुळे जिल्हयात महादेव कोळी समाजाच्या विविध मागण्यांसाठी दिनांक 10 ऑगस्ट, 2009 रोजी निधालेल्या मोर्चाबर पोलिसांनी अचानक केलेल्या गोळीबारात कोळी समाजाचा श्री. बंटू कुंवर हया इसमाच्या तोंडात गोळी लागून झालेला मृत्यू" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "मुंबईतील परळ, वरळी, भायखळा या भागात पर्यावरण विभागाची परवानगी न घेता निवासी व्यावसायिकांनी पार्किंगचे बांधकाम करणा-या 13 बांधकाम व्यावसायिकांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारणे दाखवा नोटीसा देणे "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसला तरी शासनाने या प्रकरणी निवेदन करावे असे निदेश देवून मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

अन्य सूचनांना मी दालनातच अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी.: ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील टेंभोडे गावातील जमिनीवर उपनगराध्यक्ष श्री.विष्णू पाटील व श्री.गजानन किणी यांनी केलेले अतिक्रमण

मु.शी. :ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील टेंभोडे गावातील जमिनीवर उपनगराध्यक्ष श्री.विष्णू पाटील व श्री.गजानन किणी यांनी केलेले अतिक्रमण याबाबत श्री. रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.रामदास कदम यां□ विशेष उल्ले□ संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

ठाणे जिल्ह्यातील पालघर तालुक्यातील टेंभोडे गावातील गट क्र.67 हिस्सा नं. 0 क्षेत्र 24 हेक्टर 47.71आर ही जमीन शासनाची असून तशी नगर परिषदेत नोंद आहे. ही जमीन पालघर नगरपरिषदेची स्थापना होण्यापूर्वी टेंभोडे गावच्या महसुली हद्दीत असल्याने गुरचरण व सकस आहार योजनेसाठी टेंभाडे ग्रामपंचायतीच्या ताब्यात शासनाने दिली होती. नगरपरिषदेच्या स्थापनेनंतर पुन्हा ही जमीन राज्य शासनाच्या ताब्यात आली. परंतु त्या जमिनीवर श्री.सुभाष विष्णू पाटील, उपनगराध्यक्ष व श्री. गजानन किणी यांनी अतिक्रमण केले असून ही जमीन आपल्याच ताब्यात व वहिवाटात असल्याचा त्यांनी दावा केला. या दाव्याचा निर्णय देताना न्यायालयाने सदरहू जमीन नगरपालिकेच्याच मालकीची असल्याचे सांगितले. तेव्हा नगरपालिकेच्या जमिनीवर अतिक्रमण करुन निवडणूक लढविल्याने नगरपालिका अधिनियमानुसार नगरसेवक अपात्रतेच्या कलम 44/ई प्रमाणे श्री.सुभाष पाटील हे नगरसेवक व उपनगराध्यक्ष पदी राहण्यास अयोग्य असल्याने त्यांच्यावर जिल्हाधिकारी यांचेकडून कारवाई होणे क्रमप्राप्त असूनही आजपर्यंत कोणतीच कारवाई करण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

आली नाही. तेव्हा शासनाने याप्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन श्री.पाटील यांचे उपनगराध्यक्ष पद रद्द करुन त्याबाबतचे निवेदन तात्काळ करावे अशी मी विनंती या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी : कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात कृषी पर्यटन करणे

मु. शी.: कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात कृषी पर्यटन करणे

याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

देशामध्ये महाराष्ट्रातील एकमेव सिंधुदुर्ग जिल्हा हा "पर्यटन जिल्हा" म्हणून घोषित झालेला आहे. कोकण निसर्गरित्या अत्यंत सुंदर असून सुमारे त्यास 750 कि.मी.चा समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकणात भात, आंबा, नारळ, काजू,अननस, रतांबे, करवंदे, जांभूळ इत्यादी प्रमुख फळांचे उत्पादन होते.

हा निसर्गरम्य जिल्हा कृषी प्रधान आहे. तेव्हा शेताजवळ किंवा प्रत्यक्ष शेतात शेतघरे बांधून पर्यटकांना राहण्याची सोय उपलब्ध करुन दिल्यास पर्यटकांना शेतीची देखील माहिती मिळेल आणि त्यांना पर्यटनाचा आनंद देखील मिळेल. यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी "कृषी पर्यटन" (इको टुरिझम) करण्यासंबंधीचा एक सविस्तर आराखडा तयार करुन "कृषी पर्यटन" प्रस्तापित करावे अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी.: मौजे हासगाव, जिल्हा लातूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शवविच्छेदन केंद्रातील शवांचे मोकाट कुत्रे लचके तोडत असणे

मु. शी.: मौजे हासगाव, जिल्हा लातूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या शवविच्छेदन केंद्रातील शवांचे मोकाट कुत्रे लचके तोडत असणे याबाबत श्री.राम पंडागळे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.राम पंडागळे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

मौजे हासेगाव, जिल्हा लातूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात एच.आय.व्ही. बाधित 13 वर्षीय मुलीस दिनांक 3.11.2010 रोजी उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारा दरम्यान त्या मुलीचा दिनांक 4.11.2010 रोजी मृत्यू झाला. दिनांक 5.11.2010 रोजी मुलीची उत्तरीय तपासणी करण्यात येईल असे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. मध्यंतरीच्या काळात त्या मुलीचे शव शवविच्छेदन केंद्रात ठेवण्यात आले. परंतु सदर केंद्रात कोणीही कर्मचारी नसल्याने मोकाट कुत्र्यांनी त्या शवाचे लचके तोडल्याचे निदर्शनास आले. तेव्हा सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी तेथील लोकांनी मागणी केलेली आहे. तेव्हा याबाबत शासनाने लक्ष घालावे अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. गोंदिया जिल्हयातील आरोग्य विभागात रिक्त असलेली विविध पदे त्वरित भरणे

मु.शी.: गोंदिया जिल्हयातील आरोग्य विभागात रिक्त असलेली विविध पदे त्वरित भरण्याबाबत श्री.केशवराव मानकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखा संबंधीची सूचना मांडतो.

" गोदिंया जिल्हयात नक्षलग्रस्त अति जलद विकास कार्यक्रम आणि आदिवासी उपाययोजने अंतर्गत एकूण 18 प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 69 उपकेंद्रे अशा एकूण 146 आरोग्य संस्थांचे प्रस्ताव गेल्या 2002 आर्थिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने शासनाकडे सादर करण्यात येणे, परंतु अद्याप एकाही प्रस्तावाला शासनाकडून मंजूरी प्राप्त न होणे, जिल्हयातील कुपोषणाची स्थिती अत्यंत भयावह असून कमी वजनगटात 2639 मुलांचा समावेश असणे,12 लाख लोकसंख्या असलेल्या गोंदियासारख्या जिल्हयाला अद्याप पूर्णवेळ जिल्हा शल्य चिकित्सक नसणे, शिवाय 366 मंजूर पदांपैकी 155 पदे आरोग्य विभागात रिक्त असून श्रेणी 1 ची 14 पदे रिक्त असणे, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 26 डिसेंबर 1998 च्या शासन निर्णयानुसार 1991 च्या लोकसंख्येच्या निकषानुसार नवीन ग्रामीण आरोग्य संस्था तयार करण्याचा निर्णय घेण्यात येणे, त्यानुसार गोंदिया जिल्हा अस्तित्वात येण्यापूर्वीच 22 उपकेंद्राचे स्थान निश्चित केलेल्या गावांचा अहवालसुध्दा शासनाकडे पाठविण्यात येणे, परंतु लोकसंख्येच्या निकषात बसत असूनसुध्दा उपकेंद्रांना अद्याप मंजूरी देण्यात आली नसणे, त्यापैकी सर्वाधिक 10 उपकेंद्रे सालेकसा तालुक्यात प्रस्तावित असणे , तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी 17 डिसेंबर, 2009 रोजी शासन निर्णय काढून जिल्हयातील रिक्त पदे मार्च 2010 पर्यंत भरण्याचे निर्देश देणे, परंतु आरोग्य संस्थांच्या प्रस्तावांना अद्यापही मंजूरी न मिळणे, त्यामुळे जिल्हयातील अदिवासी भागातील रुग्णांना होणारा कमालीचा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर ...

त्रास, यासंदर्भात जिल्हयातील नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, तसेच सदर आरोग्य संस्थांच्या प्रस्तावाकडे शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष लक्षात घेता शासनाने यावर तातडीने करावयाची उपाययोजना, शासनाची प्रतिक्रिया आणि शासनाने करावयाचे निवेदन "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गावदरा ,तालुका धारुर, जिल्हा बीड येथील ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या राजीव गांधी निवासी आश्रमशाळेस मान्यता देणे

मु.शी.: गावदरा ,तालुका, धारुर जिल्हा बीड येथील ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या राजीव गांधी निवासी आश्रमशाळेस मान्यता देण्याबाबत श्री.धनजय मुंडे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उप सभापती : माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.त्यांनी ती मांडावी.

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो :-

"ऊस तोड कामगारांच्या स्थलांतरित मुला मुलीची शैक्षणिक आरोग्य विषयक व जेवणाची सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत ऊसतोड कामगार वाहतूक मजूर व मुकादम संघटना किल्ले तालुका धारुर, जिल्हा बीड यांनी त्यासाठी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केला एवढेच नव्हे तर सन 2010-2011 या वर्षी 154 ऊस तोड कामगारांच्या मुलांचे स्थलांतर रोखून मौजे गावदरा तालुका धारुर येथे पहिली ते बारावी पर्यत राजीव गांधी निवासी आश्रमशाळा सुरु केली आहे व संस्थेच्या क्षमतेप्रमाणे मुलांचे पालनपोषण करीत आहे. या शाळेमुळे 154 ऊसतोड कामगारांच्या मुलीना शिक्षणाची संधी मिळाली आहे. तथापि या शाळेस मंजुरी किंवा कसलेही अनुदान नाही. त्यामुळे या आश्रमशाळेतील विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

त्यामुळे या विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी या शाळेस मान्यता देऊन अपेक्षित कार्यवाही व्हावी अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : नियम स्थगित ठेवणे

मु.शी.: नियम स्थगित करण्याबाबत उपमुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव

श्री.राजेंद्र मुळक (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीच्या सभागृहाने मान्य केलेल्या शिफारशीस अनुलक्षून महाराष्ट्र विधान परिषद नियम 230 (2)मधील पूरक मागण्या सादर केल्यानंतर तीन दिवसाच्या आत त्यावरील चर्चा घेऊ नये अशा आशयाची तरतूद पूरक मागण्यावरील चर्चेच्या संदर्भात स्थगित करण्यात यावी असा प्रस्ताव नियम 289 अन्वये मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहापुढील कामकाजासंबंधी

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय,आता चार वाजले आहेत. आज या आठवडयातील कामकाजाचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना त्यांच्या मतदारसंघात जावयाचे आहे. पूरक मागण्या वरील चर्चा झाल्यानंतर शासकीय विधेयके देखील आजच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आली आहेत. पूरक मागण्यांवर सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यावर माननीय मंत्री महोदयांचे उत्तरे पूर्ण करण्यामध्ये बराच वेळ जाईल त्यामुळे विधेयके चर्चेसाठी घेता येणार नाहीत म्हणूनच विधेयके आता घेण्यात येणार नाहीत असे आपण जाहीर करावे.

उप सभापती : आता चार वाजले आहेत तेव्हा पूरक मागण्यावरील चर्चा आपण पूर्ण करु या.

श्री.दिवाकर रावते : परंतु आठवडयाचा आजचा शेवटचा दिवस असल्यामुळे व सर्वच सन्माननीय सदस्यांना जावयाचे असल्यामुळे पूरक मागण्यावरील चर्चे नंतरचे पुढचे कामकाज घेता येणार नाही.,

उप सभापती : आता चार वाजलेले आहेत तेव्हा पूरक मागण्यांवरील चर्चा आपण पूर्ण करु या.

श्री.दिवाकर रावते : आज आठवडयातील शेवटचा दिवस असल्यामुळे पूरक मागण्यां शिवाय इतर कोणतेही कामकाज होणार नाही असे जर आपण सांगितले तर ज्या सन्माननीय सदस्यांना जावयाचे असेल ते जाऊ शकतील.

उप सभापती : याबाबतीत शासनाच्या वतीने काय सांगावयाचे आहे ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय पूरक मागण्या घेण्यात याव्यात

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, विधेयकावरील चर्चा घेता येणार नाही.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : याबाबत शासनाचे काय म्हणणे आहे?

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे आज आठवडयाचा शेवटचा दिवस आहे. याठिकाणी वेळेचा प्रश्न आहे,पुरवणी मागण्यांवरील चर्चेला भरपूर वेळ लागणार आहे आणि ही चर्चा आज होणे आवश्यक असल्यामुळे कामकाज पत्रिकेमधील इतर कामकाज नंतर घेण्यात यावे.

उपसभापती : ठीक आहे. आता पुरवणी मागण्यांवरील चर्चेला सुरुवात करीत आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उपसभापती : पुरवणी मागणंवरील चर्चा आज आणि मंगळवार, दिनांक 7 डिसेंबर, 2010 रोजी घेण्यात येणार आहे. आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पुरवणी मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन व्दारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्यांने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रीनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्री महोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाचे आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. अन्यथा आज राहिलेल्या पुरवणी मागण्या व मंगळवार, दिनांक 7.12.2010 करिता असलेल्या सर्व मागण्यांवरील चर्चा मंगळवार, दिनांक 7.12.2010 रोजी पूर्ण करावी लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 55 आणि बाब क्रमांक 75 मध्ये प्राथमिक शाळांमधील 1478 तुकडयांना अनुदान देण्यासाठी जवळ जवळ 15 कोटी 50 लाख 64 हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. उशिरा कां होईना शासनाने या तुकडयांना अनुदान देण्यासाठी याठिकाणी तरतूद केली आहे. प्राथमिक शाळांप्रमाणे माध्यमिक शाळांच्या 5 वर्षे झालेल्या तुकडया अनुदान पात्र आहेत त्यांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे. या पुरवणी मागण्यांमध्ये माध्यमिक शाळांमधील तुकडयांचा समावेश केला नाही किंवा माध्यमिक शाळांमधील तुकडयांसाठी कोणत्याही प्रकारची मागणी केलेली दिसून येत नाही. त्यादृष्टीने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 55, बाब क्रमांक 76 मध्ये दुर्बल घटकातील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या मुलांना उपस्थिती भत्ता देण्यासाठी 1 कोटी 37 हजार रुपयांची मागणी करण्यात आली आहे. यानिमित्ताने मला आपल्याला विचारावयाचे आहे की, इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आपण शिष्यवृत्ती देणार आहात. परंतु त्यांचे वर्ष संपत आले असल्यामुळे आपण त्यांना नक्की केव्हा शिष्यवृत्ती देणार आहात. त्या संदर्भात शासनाने धोरण किंवा नियोजन केले असेल तर त्याची माहिती सभागृहाला अवगत करावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 56 व बाब क्रमांक 79 मध्ये विभागीय कोकण शिक्षण मंडळाच्या आस्थापना खर्चासाठी जवळ जवळ 3 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्हयांकरिता कोकण माध्यमिक शिक्षण मंडळाची स्थापना करावी याकरिता या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी सातत्याने तीन ते चार वर्षे हा विषय लावून धरला आहे. त्या संदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे. विशेषत: रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्हयांसाठी कोकण माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करण्यात येत आहे. त्याकरिता आपण इमारत बांधकाम, इन्फ्रास्ट्रक्चर तयार करणे, फर्निचर व इतर यंत्रसामग्री उभी करणे यासाठी 3 कोटींची तरतूद केली आहे. परंतु हे कोकण माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करण्याकरिता शासनाने जी.आर. काढला आहे काय? याबाबत मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडे वारंवार मागणी करुन सुध्दा अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय घेतल्याचे आदेश त्यांच्याकडून मला प्राप्त होत नाहीत आणि म्हणून कोकण माध्यमिक शिक्षण मंडळ स्थापन करीत असतांना त्यामध्ये रत्नागिरी व सिंधुदुर्ग या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ D/ KTG/ MMP/

श्री. रामनाथ मोते....

दोन जिल्हयांचा समावेश करुन त्याची रचना कशी तयार केली जाणार आहे, या संदर्भात शासनाने आदेश काढल्याचे मला पहावयास मिळत नाहीत. तेव्हा अशाप्रकारचे आदेश शासन काढणार आहे काय असल्यास, ते केव्हा काढण्यात येणार आहेत आणि त्यामध्ये नक्की कोणती तरतूद करण्यात आली आहे? याचे मंत्री महोदयांकडून उत्तर अपेक्षित आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 56 व बाब क्रमांक 80 मध्ये सैनिकी शाळा, सातारा यांचेकरिता उत्तेजनार्थ सहायक अनुदानावरील खर्च भागविण्यासाठी 1 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये राष्ट्रीय संरक्षण अकादमीमध्ये नाव नोंदविलेल्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी 5 लाख रुपयांचे सहायक अनुदान देण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. याचा अर्थ ही तरतूद फक्त 20 विद्यार्थ्यांकरिता करण्यात आली आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.गोपीकिसन बाजोरिया)

त्यामुळे साताऱ्याच्या या सैनिकी शाळेप्रमाणे अन्य सैनिकी शाळेमधील विद्यार्थ्यांनी एनडीएकरिता नोंदणी केली असेल तर...

(अपूर्ण यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर त्या विद्यार्थ्यांसाठी सुध्दा आपण अशा प्रकारे काही आर्थिक मदत करणार आहोत काय ? याबाबत देखील माहिती मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय,पान क्र.57, बाब क्र.81 मध्ये उच्च माध्यमिक विभागातील पायाभूत सुविधा पेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याच्या संदर्भात जवळजवळ 6 कोटी 82 लाख 62 हजार रुपयांची तरतूद केलेली आहे.पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याच्या संदर्भात शासनाने काही धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे आणि त्या पदांची निर्मिती होऊन 3-3, 4-4, 5-5 वर्षे झाली तरी देखील आमच्या शिक्षकांच्या पदांना शासन स्तरावर मान्यता मिळत नाही. परिणामत: या पदांवर काम करणारे जे शिक्षक आहेत, त्यांना सुध्दा पाच वर्षाच्या वेतनावर पाणी सोडावे लागते. कारण ज्या वेळेस शासनाकडून या पदांना मान्यता मिळते, तेव्हापासूनच शासन त्या पदांवर काम करणाऱ्या शिक्षकांना वेतन देते.परंतु हे विना अनुदानित शाळांचे शिक्षक नाहीत,कायम विना-अनुदानित शाळांचे शिक्षक नाहीत तर हे शिक्षक अनुदानित संस्थांमध्ये काम करणारे आहेत, अनुदानित शाळांमध्ये निर्माण झालेली ही पदे आहेत. मग आपण याबाबतीत शासन स्तरावरुन मान्यता घेण्याच्या बाबतीत जी प्रोसीजर निर्माण केलेली आहे, त्या सर्व प्रोसीजरमुळे 4-4, 5-5 वर्षे आमच्या या शिक्षकांना मान्यता मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. आम्ही सभागृहामध्ये अनेक वेळा हा विषय उपस्थित केला आहे.यासाठी शासनाबरोबर संघर्ष केला, भांडलो आणि सातत्याने याबाबत पाठपुरावा केल्यामुळे आता कुठे शासनाने ही पदे मंजूर केलेली आहेत. 2004-2005 मधील फक्त 2 पदे आहेत. 2005-2006 मध्ये 137 पदे, 2006-2007 मध्ये 143 पदे, 2007-2008 मध्ये 466 पदे आहेत आणि या पदांना आता मान्यता देत आहेत. याचाच अर्थ 2005-2006 या वर्षातील पदांना 2010-2011 मध्ये मान्यता दिली जात आहे. अशा वेळी 2005-2006 पासून 2010-2011 पर्यंत या पदांवर काम करणाऱ्या शिक्षकांच्या वेतनाच्या संबंधात शासन काय निर्णय घेणार आहे? शासनाने आता जी तरतूद केलेली आहे, ती जुलै 2010 पासून पुढच्या कालावधीसाठी केलेली आहे याचा अर्थ 2005 ते 2010 पर्यंत या शिक्षकांनी जे काम केले आहे, त्याबद्दल त्यांना वेतन मिळणार नाही आणि हा त्या शिक्षकांचा दोष नाही, त्या शाळेचा दोष नाही. आपल्या एकूणच प्रक्रियेतील दोष आहे, त्रुटी आहे. आमची अशी अपेक्षा आहे की, 2005-2006 मधील पदे सुरुवातीला त्या वर्षामध्ये तुम्हाला मंजूर करता आली नाहीत, पण शेवटी तरी मंजूर करावी. किमान त्या वर्षातील पदे जर

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याच वर्षामध्ये मान्य केली तर त्या शिक्षकांना चार-चार, पाच-पाच वर्षाचे वेतन मिळू शकेल. म्हणून याबाबतीत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे की, जेव्हापासून ही पदे निर्माण झालेली आहेत, त्या पदाला आपण तेव्हापासून मान्यता दिलेली आहे, भले आता दि.17 सप्टेंबर 2010 ला आदेश निघाला आहे. मग त्या शिक्षकांना आतापासून वेतन देणार आहात काय ? कारण मागच्या पगाराच्या बाबतीत देखील प्रश्न आहे. म्हणून माझी मागणी अशी आहे की, या मागण्यांच्या माध्यमा-तून केलेली तरतूद ही जुलै 2010 पासूनची आहे. मात्र या शिक्षकांची ज्या दिवसापासून नेमणूक झालेली आहे, त्या दिवसापासून त्यांना वेतन मिळणे हा त्यांचा हक्क आहे. तसे झाले नाही तर अनेक न्यायालयीन प्रकरणे निर्माण होतील. म्हणून या शिक्षकांना त्यांचे पद निर्माण झाले आणि जेव्हापासून त्याला मान्यता दिली, तेव्हापासून त्यांना पगार देण्याची जबाबदारी शासनाची आहे. त्यानुसार शासनाने या शिक्षकांना पगार देण्याच्या बाबतीत विचार करावा आणि माननीय मंत्री महोदयांच्या भाषणामध्ये आम्हाला याबाबतीत ठोस उत्तर मिळावे अशी अपेक्षा आहे. मी शासनाला विनंती करु इच्छितो की, शिक्षकांना कारण नसताना न्यायालयीन प्रकरणे निर्माण करावयास लावू नयेत. याबाबत शासनाने दखल घ्यावी आणि शिक्षकांचे शोषण करु नये तर शिक्षकांना न्याय देण्याच्या भूमिकेतून ठोस निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, पान क्र.57, बाब क्र.83 बाबत सांगावयाचे तर याठिकाणी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना शैक्षणिक मदत करण्याकरता विद्यार्थ्यांच्या दहावी व बारावीची परीक्षा फी भरण्यासाठी, त्यांना पुस्तके किंवा अन्य साहित्य देण्यासाठी, वह्या देण्यासाठी 14 कोटी 18 लाख रुपयांची मदत देण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाने दि.13 ऑगस्ट 2010 रोजी पैसे काढलेले असून त्याबाबत पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. सदरहू प्रश्न अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, वर्धा आणि अमरावती अशा सहा जिल्ह्यांमधील आहे. शासनाकडून या विद्यार्थ्यां- साठी 14 कोटी रुपयांची रक्कम खर्च करण्यात येणार आहे म्हणजेच ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी शासनाने घेतली आणि त्यांना काही पैसे वाटण्यात आले.परंतु जे खऱ्या अर्थाने लाभार्थी आहेत, त्यांना खरोखरच हे पैसे वाटण्यात आले आहेत काय, असेल तर आतापर्यंत किती विद्यार्थ्यांना पैसे वाटण्यात आले आहेत, तसेच कोणकोणत्या जिल्ह्या मध्ये किती रक्कम देण्यात आली आणि आतापर्यंत या रकमेचे संबंधितांना वाटप झालेले आहेकाय?

.. ..3 टी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

आम्हाला यासंबंधातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये द्यावी अशी अपेक्षा आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, पान क्रमांक 61. बाब क्रमांक 94 यासंदर्भात मी बोलू इच्छितो.

सभापती महोदय,राज्याच्या क्रीडा धोरणानुसार जिल्हा क्रीडा स्पर्धांमध्ये उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या प्रत्येक जिल्हयातील पाच शाळांना पंधरा हजार रुपये अनुदान देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे त्यासाठी 12,63,000/- रुपयांची पुरवणी मागणी या ठिकाणी सभागृहासमोर आलेली आहे. प्रत्येक जिल्हयातून ज्या पाच शाळा निवडण्यात येणार आहेत त्या शाळा निवडण्याचे निकष काय आहेत? जिल्हा क्रीडास्पर्धामध्ये सहभागी होणाऱ्या आणि उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या शाळांसाठी हे अनुदान देण्यात येणार आहे हे ठीक आहे. पण या शाळा निवडताना गुणदानाची काही योजना तयार केलेली आहे काय किती गुण मिळल्यानंतर या शाळांना अनुदान देण्यात येणार आहे या संदर्भातील नक्की निकष काय आहेत? अन्यथा ज्याचा वशिला असेल, ज्याची काही ओळख असेल, ज्याचा काही परिचय असेल अशा वेगळया माध्यमातून या शाळांना हे अनुदान मिळेल. म्हणून खऱ्या अर्थाने ज्या शाळांतील विद्यार्थी क्रीडा स्पर्धांमध्ये चमकलेले आहेत, ज्यांनी आपले नैपुन्य सिध्द केलेले आहे त्या शाळांना हे अनुदान मिळणे आवश्यक आहे. यामध्ये पाच शाळांना 15000 रुपये विशेष अनुदान देण्यात येत आहे. पण तालुका स्तरावर ज्या क्रीडा स्पर्धा होतात या तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून काही अनुदान मिळते काय?. या क्रीडा स्पर्धांसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून एक नवा पैसा सुध्दा अनुदान मिळत नाही. मी याबाबतीत ठाणे जिल्हयाचे उदा. देऊ इच्छितो. ठाणे जिल्हयामध्ये मागच्या दोन वर्षामध्ये तालुका स्तरावर ज्या क्रीडा स्पर्धा झाल्या त्यासंदर्भात संबंधित क्रीडा अधिकाऱ्यांनी शिक्षकांना किंवा संबंधित प्रमुखांना सांगितले की, या क्रीडा स्पर्धांचे तुम्ही आयोजन करा. त्याप्रमाणे त्यांनी त्या क्रीडा स्पर्धा घेतल्या. शाळांनी खर्च केला. संबंधित शिक्षकांनी वर्गणी काढून स्पर्धा घेतल्या आणि त्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वीरीत्या आयोजन केले. पण 2007-2008, 2008-2009 या दोन वर्षात क्रीडा स्पर्धांवर झोलेला खर्च क्रीडाधिकाऱ्यांनी जल्हाधिकाऱ्यांच्या मार्फत अद्यापही दिलेला नाही. एका बाजूला उत्कृष्ठ कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळांसाठी अनुदान देण्यात येणार आहे आणि दुसऱ्या बाजूला त्या विद्यार्थ्यांना या क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी जो खर्च तालुकास्तरावर करावयास पाहिजे तो खर्च क्रीडाधिकारी करत नाहीत. त्यामुळे शासनाने याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सर्व जिल्हयांमध्ये अशीच परिस्थिती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

तालुकास्तरावर ज्या आंतरशालेय स्पर्धा होतात त्यासाठी होणारा खर्च हा सुध्दा शासनाने करणे आवश्यक आहे. जिल्याचे जिल्हाधिकारी क्रीडा परिषदेचे अध्यक्ष आहेत. क्रीडा परिषदेच्या अकाऊंटला लाखो रुपये जमा असताना सुध्दा तालुका स्तरावरील स्पर्धांसाठी झालेला खर्च जिल्हाधिकारी का देऊ शकत नाहीत? याची शासनाने दखल घेण्याची आवश्यकता आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: मंत्र्यांचा परिचय

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माझ्या मंत्रिमंडळातील सहकारी सन्माननीय श्री. शिवाजीराव मोघे यांचा दि. 1 डिसेंबर, 2010 रोजी मला या सभागृहाला परिचय करुन देता आला नाही कारण त्या दिवशी ते माननीय राज्यपाल महोदयांना घेण्याकरिता गेले होते.

सभापती महोदय, मी आज सन्माननीय श्री. शिवाजीराव मोघे यांचा मंत्री म्हणून आपणाला व आपल्यामार्फत या सभागृहाला परिचय करुन देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन् 2010-2011 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य शासनाने शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. तीन हजार रुपयां ऐवजी सात हजार रुपये,चार हजार रुपयां ऐवजी साडे आठ हजार रुपये, पाच हजार रुपयां ऐवजी साडे अकरा हजार रुपये अशा पध्दतीने मानधनात वाढ करण्याची घोषणा सन्माननीय मंत्रिमहोदयांनी केली आहे. आम्हाला अशी अपेक्षा होती की, या पुरवणी मागण्यांमध्ये या मानधनवाढीच्या संदर्भातील पुरवणी मागणी येईल आणि शिक्षण सेवकांना या मानधनवाढीचा लाभ मिळू शकेल पण या संदर्भातील कोणत्याही प्रकारची पुरवणी मागणी या पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आलेली नाही. याचा अर्थ शासनाने फक्त घोषणा केली आणि शिक्षण सेवकांची दिशाभूल केली, त्यांची फसवणूक केली. पुरवणी मागण्यांमध्ये त्या संदर्भात कुठल्याही प्रकारची मागणी करण्यात आलेली नाही. म्हणून शासनाने शिक्षण सेवकांच्या मानधनवाढीमध्ये वाढ करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याची अंमलबजावणी होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, वेतनेत्तर अनुदान देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे.12 टक्के, 9 टक्के, 6 टक्के ही सगळी टक्केवारी बाजूला ठेवली आणि सर्व शाळांना समान न्याय म्हणून 5 टक्के वेतनेत्तर अनुदान देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने जाहीर केला. शाळा बंद पडत आहेत पण वेतनेत्तर अनुदान मिळत नाही. या पुरवणी मागण्यांमध्ये वेतनेत्तर अनुदानासाठी काही तरी तरतूद होईल असे आम्हाला वाटले होते पण या वेतनेत्तर अनुदानासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. या संदर्भात देखील गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयांना अनुदान देताना शासनाने अनेक महाविद्यालयांना ते अनुदानास पात्र ठरलेले आहेत, तुकड्या अनुदानास पात्र ठरलेल्या आहेत असे पत्र पाच वर्षापूर्वी दिलेले आहे. आपल्या तुकड्या किंवा वर्ग 100 टक्के अनुदानावर आलेले आहेत असे पाच वर्षापूर्वीचे पत्र आहे पण प्रत्यक्षात शासनाकडून त्या तुकड्यांना, वर्गांना आणि त्या महाविद्यालयांना अनुदान मिळालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. मी कोकण मंडळाच्या कार्यालयात संपर्क साधून विचारले असता त्यांनी सांगितले की, आम्हाला शासनाने अद्याप मंजुरी दिलेली नाही, शासनाने आम्हाला अद्याप अनुदान दिलेले नाही. म्हणून ज्यांना चार पाच वर्षापूर्वी तुकड्या आणि वर्गांना अनुदान मंजूर केलेले आहे, आदेश पोहोचलेले आहेत पण प्रत्यक्षात अनुदान मिळालेले नाही ते अनुदान देण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला पृष्ठ क्रमांक 429 वरील बाब क्रमांक 394 बाबत बोलावयाचे आहे. यामध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या संदर्भातील विषय आहे. यामध्ये 16 कोटी 86 लाख रुपयांची तरतूद सार्वजनिक ग्रंथालयांसाठी केलेली आहे. 6326 ग्रंथालयांना त्यांचा 90 टक्के खर्च भागविण्यासाठी हे अनुदान दिलेले आहे. परंतु या सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील विषय अनेक वेळा या सभागृहात चर्चेला आला. सन्माननीय मंत्रिमहोदयांशी चर्चा झाली आणि त्यांनी हे मान्य केले होते की, या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये काम करणारे जे आमचे कर्मचारी आहेत त्यांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात आणि त्यांच्या सेवाशर्तीच्या संदर्भात आम्ही तातडीने निर्णय घेऊ परंतु अद्याप त्याबाबत निर्णय आलेला नाही. या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. व्यंकाप्पा पत्की साहेब यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल आलेला आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय श्रीमती प्रभा राव यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली. त्या समितीचाही अहवाल आलेला आहे. हे दोन्ही अहवाल शासनाकडे प्राप्त आहेत. आम्ही हे दोन्ही अहवाल स्वीकारत आहोत, आम्ही या दोन्ही अहवालांची अंमलबजावणी करीत आहोत असे आश्वासन देऊन सुध्दा अद्यापही या अहवालांची अंमलबजावणी झालेली नाही. म्हणून माझी या निमित्ताने अशी विनंती आहे की, या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. रामनाथ मोते .....

सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीच्या संदर्भात, सेवाशर्तीच्या संदर्भात व्यंकाप्पा पत्की समिती आणि प्रभा राव समितीचे हे जे दोन अहवाल आलेले आहेत ते अहवाल शासनाने स्वीकारावेत. त्याचप्रमाणे सार्वजनिक ग्रंथालयाचा 1970 चा जो कायदा आहे त्याचा एक नवीन मसुदा सन्माननीय श्री. व्यंकाप्पा पत्की साहेबांनी दिलेला आहे. तो मसुदा सुध्दा आम्ही तातडीने सभागृहासमोर मांडू असे आश्वासन देण्यात आले होते. ते सुध्दा सभागृहासमोर आणण्याचे काम करावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सुरुवातीला मी आदिवासी विकास विभागाच्या पृष्ठ क्रमांक 405 वरील बाब क्रमांक 354 बाबत माझे विचार मांडणार आहे. आदिवासींची मुले संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आदिवासी पाड्यांमध्ये किड्यामुंग्यांसारखी मरत आहेत. आता त्यांना कुपोषित म्हणावयाचे नाही तर वजन कमी आहे असे सांगावयाचे अशी पध्दत सुरु झाली आहे. कमी वजनाची मुले अशा पध्दतीचा वेगळा मार्ग शासनाने काढलेला आहे. कारण कुपोषित म्हणावयाला शासनाला लाज वाटते. मेळघाटमध्ये मागच्या एका वर्षामध्ये जवळजवळ 480 मुलांचा कुपोषणामुळे बालमृत्यू झाला. न्यायालयाने असे आदेश दिले होते की, कुपोषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्या कार्याचा दरमहा आढावा घ्यावा आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमावी. अशा समित्या शासनाने नेमल्या का ? त्या समितीच्या सभा झाल्या का ? प्रत्येक आदिवासी भागातील समितीचा आपल्याकडे काय अहवाल आला आणि त्याची काय अंमलबजावणी झाली याबाबत माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे अशी माझी पहिली विनंती आहे. दुसरी बाब अशी की, सचिव स्तराच्या अधिकाऱ्यांनी मेळघाटात बालमृत्यूच्या ठिकाणी जाऊन भेट द्यावी असे न्यायालयाने आदेश दिले होते आणि त्याचा अहवाल न्यायालयाला द्यावयाचा होता. सचिव स्तराच्या अधिकाऱ्यांनी मेळघाटमधील आदिवासी भागामध्ये भेटी दिल्या का आणि त्याचा अहवाल दिला का याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

माननीय मंत्री महोदय, आपण आदिवासींच्या संदर्भात पैसे मंजूर करण्याकरिता सभागृहासमोर आलेला आहात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

त्याचवेळी आदिवासींचाच पैसा मंत्री कसा खातात त्याच्या भ्रष्टाचाराचा नमुना मी सादर करीत आहे. म्हणजे कुंपणच शेत कसे खात आहे ते सांगतो. मी यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना जाऊन भेटलो आहे, त्यांना निवेदन दिलेले आहे. हे जे माजी मंत्री आहेत त्यांनी आदिवासींचे पैसे कसे खाल्ले त्याची माहितीच्या अधिकाराखाली माहिती घेतली आहे. ही शासकीय माहिती आहे, ही माहिती माझी नाही. शासनाने या माजी मंत्र्यांना नोटीस दिलेली आहे. या नोटीस मध्ये असे म्हटले आहे की, "आपण 37 लाखाचा भ्रष्टाचार केला आहे, अपहार केला असल्यामुळे आपल्याविरुध्द कायदेशीर कारवाई का करण्यात येऊ नये" अशाप्रकारची ही नोटीस आहे, हे मी म्हणत नाही. शासनाच्या उपजिल्हाधिकाऱ्यांनी माजी शिक्षण मंत्र्यांना ही नोटीस दिलेली आहे. ते स्वत: आदिवासी आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांना मी याबाबत पत्र दिलेले आहे, परंतु त्यामध्ये त्या मंत्र्यांचे नाव आहे. परंतु मी नोटीस दिलेली नाही, ते या सभागृहाचे सभासद नाहीत असे बोलले जाईल, म्हणून मी त्यांचे नाव घेत नाही. बाकी हे प्रकरण मी समजावून सांगतो. आदिवासींच्या मुलांना रोजगारासाठी प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी 3 संस्था काढल्या. एका संस्थेचे महावैष्णवी असे नाव आहे, दुसऱ्या संस्थेचे जगदंबा असे नाव आहे, तिस-या संस्थेचे महारेणुका असे नाव आहे. या तीन बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्थांची स्थापना करण्यात आली. त्या संस्था रजिस्टर्ड नाहीत, शासकीय संस्था तर मुळीच नाहीत. हे मी म्हणत नाही, तर शासकीय अधिकारी म्हणत आहेत. हे सर्व कागद मी आपल्याकडे देतो. महावैष्णवी नावाच्या संस्थेला 11 लाख, जगदंबा नावाच्या संस्थेला 12 लाख 60 हजार आणि महारेणुका नावाच्या संस्थेला 14 लाख 32 हजार रुपये अशी उचल केली. आदिवासी युवकांना मार्गदर्शन करण्यासाठी हा पैसा पोहोचला नाही. पण संस्थेमध्येच 37 लाख रुपये संपले. या राज्याचे माजी मंत्री या संस्थेचे संचालक आहेत. त्यांनी कसकसे पैसे उचलले त्याची यादी माझ्याजवळ आहे. त्या नोटीसमधील काही मुद्दे वाचून दाखवितो. त्यात असे नमूद केले आहे की, "सबब, उपरोक्त कार्यालयाने आपणास प्रदान केलेल्या रकमेचा विनियोग आपण योग्य प्रकारे केला नसल्याचे स्पष्ट होते. फक्त प्रशिक्षणाची एकूण रक्कम रुपये 37 लाख तुमच्याकडून वसूल का करु नये याचा खुलासा हे पत्र प्राप्त झाल्यापासून 10 दिवसाच्या आत

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.रामदास कदम....

द्यावा, त्याचप्रमाणे आपण शासकीय रकमेचा गैरवापर व अपहार केल्यामुळे आपल्याविरुध्द कायदेशीर कारवाई का करु नये याचा खुलासा देखील करावा." म्हणजे या राज्याचे माजी मंत्री पैसे खात आहेत, कोणी पॅकेजमधील गायी घेत आहेत. कोणी मंत्री 'आदर्श' घोटाळयात अडकले आहेत. या अधिवेशनामध्ये मी किमान 50 घोटाळे दाखविणार आहे. मी जबाबदारीने बोलत आहे. या राज्यात काय चालले आहे, फक्त घोटाळे करणारे हे सरकार आहे का ? या राज्याचे माजी मंत्री आदिवासींचाही पैसा लाटत आहेत. मेलेल्या शेतक-यांच्या टाळूवरील लोणी खात आहे. हे शासन आहे की, दु:शासन आहे, काय आहे? म्हणून एका बाजूला पुरवणी मागण्या मांडून या मागण्या मंजूर कराव्यात असे सांगितले जाते. शासनाकडे बहुमत आहे, त्या मंजूर होणारच आहेत. परंतु अशाप्रकारे शासनाकडे असलेल्या पैशाचा अपहार केला जात आहे. या घोटाळयाची चौकशी सुध्दा या शासनामार्फत होईल. त्यातून काही निष्पन्न होणार नाही, मी त्या गावचा नाही असे बोलण्यासाठी ते मोकळे राहतील आणि तो मी नव्हेच असे म्हणतील. हे थांबणे आवश्यक आहे. यह तो सिर्फ इ ांकी है, अभी तो बहुत कुछ बाकी है. या अधिवेशनात माननीय आदिवासी मंत्र्यांना कळेल. (अडथळा) मी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांना सांगतो की, तुमचे लोक आत्महत्याग्रस्त शेतक-यांसाठी आलेल्या पॅकेजमधील वस्तू सोडत नाहीत, कारगिलमध्ये शहीद झालेल्या जवानांच्या पत्नीला सुध्दा सोडत नाहीत. तुम्ही माणसे आहात की जनावरे, राक्षस आहात की कोण आहात ? (अडथळा) मी जबाबदारीने बोलत आहे. या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, एकाही दागी मंत्र्यांना माझ्या मंत्रिमंडळात स्थान असणार नाही. मग हे काय आहे ? दाल मे कुछ काला है असे म्हटले जाते, परंतु येथे तर संपूर्ण डाळच काळी आहे.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य असे म्हणाले की, ही माणसे आहेत की जनावरे आहेत ? जनावरे असा जो उल्लेख करण्यात आला आहे तो कामकाजातून काढून टाकावा.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम

श्री. रामदास कदम : मी केवळ "जनावरे" असाच नाही तर "राक्षस" असा देखील शब्दप्रयोग केलेला आहे.

ॲड. उषा दराडे : तो देखील शब्द कार्यवृत्तातून काढून टाकला पाहिजे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ज्यांनी भ्रष्टाचार केलेला आहे त्यांना सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी देखील "राक्षस" म्हटले पाहिले. ज्या मंत्र्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचे सन्माननीय सदस्य समर्थन करीत आहेत हे योग्य नाही. जे माजी शिक्षण मंत्री होते, जे स्वत: आदिवासी होते त्यांनी आदिवासींचे पैसे लाटलेले आहेत. आदिवासी विकास खात्याचे मंत्री महोदय, श्री. बबनराव पाचपुते हे आदिवासी खात्यातील भ्रष्टाचाराबाबत योग्य ती कारवाई करतील अशी मी अपेक्षा बाळगतो.

महिला व बालविकास विभागाच्या पान क्रमांक 460 वरील बाब क्रमांक 436च्या संदर्भात मी काही मुद्दे येथे मांडणार आहे. आता महिला व बालविकास खाते हे माननीय प्रा. वर्षाताई गायकवाड यांच्याकडे आलेले आहे. माननीय मंत्री महोदयांना कल्पना नसेल, परंतु मी विरोधी पक्षनेता असताना महिला व बालविकास खात्यातील 500 कोटीचा भ्रष्टाचार उघडकीस आणला होता. मी आता नोटीस दिली नसल्यामुळे संबंधित मंत्र्यांचे नाव घेऊ इच्छित नाही. मागील मंत्रीमहोदयांनी जेथे जेथे बालकाश्रम मंजूर केले त्याची यादी मी सादर केली होती. खरे म्हणजे नियमाप्रमाणे एका तालुक्यामध्ये एक बालकाश्रम दिला पाहिजे. मागील मुंबईच्या अधिवेशनामध्ये मी मागणी केली होती आणि त्याबाबतीत अगोदरच्या मंत्रीमहोदयांनी आश्वासन दिले होते की, प्रत्येक तालुक्यामध्ये एक बालकाश्रम दिला जाईल. परंतु नियम डावलून तुमच्या पक्षाच्या विशिष्ट नेत्याच्या मतदारसंघामध्ये 10-10 बालकाश्रम दिले गेले. प्रत्यक्षात जागेवर हे बालकाश्रम नव्हते. परंतु पैसे मात्र उचललेले गेले होते. मग अशा लोकांना "जनावर" आणि "राक्षस" म्हणायचे नाही तर काय म्हणायचे ? या लोकांनी कागदावर बालकाश्रम दाखविले आणि पैसे खाल्ले. हे प्रकरण बाहेर काढल्यानंतर पैसे वसूल केल्याचे सांगण्यात आले. तेव्हा मला आता माननीय मंत्री महोदयांकडून असे आश्वासन हवे आहे की, त्यांनी नियमाप्रमाणे प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक बालकाश्रम द्यावा. सभापती महोदय, मंत्री पैसे किती खाणार, त्यांची पोटे किती भरणार ? जाताना शेवटी खाली हातानेच जावे लागते. एका विशिष्ट मतदारसंघामध्ये 10-10 बालकाश्रम मंजूर करण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

आले आणि त्याचे पैसे देखील उचललेले आहेत. त्या पैशाची वसुली झाली नसेल तर ती वसुली करावी आणि प्रत्येक मतदारसंघामध्ये एक बालकाश्रम विद्यमान मंत्री महोदया देतील अशी अपेक्षा करतो.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पान क्रमांक 378, बाब क्रमांक 323वर बोलत असताना मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांच्याविरुध्द हक्कभंग देण्याची वेळ माझ्यावर त्यांनी येऊ देऊ नये अशी मी अपेक्षा करतो. "खेड तालुक्यातील कळभणी येथे हॉस्पिटल आणि निवासी डॉक्टरांसाठी इमारत बांधण्यासाठी 4 कोटी 70 लाख रुपये मंजूर करीत आहोत" अशा प्रकारचे छापील उत्तर मी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात दिलेले आहे. एक वेळ तोंडी आश्वासन दिले असते तर मी समजू शकलो असतो. परंतु शासनाने छापील उत्तर दिलेले आहे. आता माननीय राज्यमंत्री महोदयांच्या जागी दुसरा कोणी तरी असता तर मी लगेच त्यांच्या विरुध्द हक्कभंगाचा प्रस्ताव दिला असता. परंतु सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यमंत्री प्रा.फौजिया खान असल्यामुळे मी तो देऊ इच्छित नाही. सभापती महोदय, खेड तालुक्यातील कळभणी येथे 100 खाटांच्या हॉस्पिटलचे उद्घाटन विधानसभेचे माजी अध्यक्ष श्री. बाबासाहेब कुपेकर यांनी केले. आता त्या ठिकाणी डॉक्टर्स उपलब्ध नसल्याच्या बातम्या वर्तमानपत्रातून रोज येत आहेत. या हॉस्पिटलमधील 63 रिक्त पदे भरली जावीत असे मी माननीय मुख्यमंत्र्यांसमोर सांगितले होते. ही पदे त्वरित भरली जातील अशी अपेक्षा बाळगून मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 56, बाब क्रमांक 79 द्वारे शालेय शिक्षण विभागाने पुरवणी मागणी सादर केली आहे. शेवटी शासनाने कोणते धोरण निश्चित केले आहे? आता महाराष्ट्राला चौथे शिक्षण मंत्री लाभले आहेत. श्री.पुर्के शिक्षणमंत्री असताना पर्सेंटाईल सूत्र लागू केले होते. श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या कारकिर्दीत बेस्ट ऑफ फाईव्हचे सूत्र लागू केले होते तर श्री.बाळासाहेब थोरात हे शिक्षण मंत्री असताना 90:10 चे सूत्र अंमलात आणण्याचे ठरविले होते. यावेळी किमान काय नवीन आहे हे वेळेत जाहीर केले तर मागाहून कोर्टाकडून सरकारला जी सणसणीत चपराक बसते आणि एका नवीन पिढीचे नुकसान होते ते टाळता येईल. म्हणून वेळेत निर्णय जाहीर केला तर खूप उपयोग होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक-96 अन्वये क्रीडा विभागाची पुरवणी मागणी सादर केली आहे. क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्याचा विचार शासन करीत आहे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या खेळांची असोसिएशन्स असतात. महाराष्ट्राची रायफल असोसिएशन आहे. नियम असा आहे की, 20 जिल्हा असोसिएशनची फॉर्मेशन झाली की, राज्याची असोसिएशन होते. परंतु महाराष्ट्रामध्ये फक्त पाच जिल्हयांची रायफल असोसिएशन असताना राज्याची रायफल असोसिएशन म्हणून मान्यता देण्यात आली आहे. रायफल शूटींगच्या क्षेत्रात आपण चांगल्याप्रकारे पदकांची कमाई केली आहे. तेजस्वीनी सावंत, सरनोबत यांनी आपापल्या ताकदीवर ही कमाई केली आहे. या असोसिएशनचा कारभार कसा चालला आहे? श्री.गफूर हे या संस्थेचे अध्यक्ष असून श्री.पंडित हे सचिव आहेत. तेथील लोकांशी चर्चा केली तर नेमकी काय वस्तुस्थिती आहे, कशा पध्दतीने काम चालले आहे, तेथील खेळाडूंचे काय म्हणणे आहे हे आपल्या लक्षात येईल. या संदर्भातील माहिती सभागृहाला दिली तर ते अधिक उपयोगी होईल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागांतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या कारभारासंबंधी मी मंत्री महोदयांना सविस्तर पत्र लिहिलेले आहे. कर्ज वाटप करीत असताना जो गैरव्यवहार केला गेला त्यासंबंधी महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. ज्या लाभार्थ्यांला कर्ज मंजूर झाले, ते कर्ज वितरित करण्यासाठी पैसे मागितले म्हणून त्या लाभार्थ्याने आत्महत्या केली. शाहू, फुले, आंबेडकरांचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

समतावादी अर्थसंकल्प म्हणून घोषणा केली गेली. परंतु महामंडळामार्फत कर्ज वाटप करताना पैसे द्यावे लागणार म्हणून श्री.सतीश गायकवाड यांनी आत्महत्या केली. त्यांची पत्नी श्रीमती सुरेखा गायकवाड यांनी एफ.आय.आर.दाखल केला आहे. या विषयाबाबत पुढे काय करणार आहात? आतापर्यंत काय कारवाई केली? याची माहिती सभागृहाला मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलत असताना मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांनी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना घोषित केली होती.

नंतर 3झेड.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

या जीवनदायी योजनेसाठी एक हजार कोटीची तरतूद केली जाईल. जेणेकरुन लोकांना या योजनेचा जास्तीत जास्त फायदा मिळेल अशी घोषणा सभागृहात झाली होती परंतु माननीय अर्थ मंत्र्यांकडून ती योजना अडविली गेली आहे. जी योजना माजी मुख्यमंत्री सभागृहात घोषित करतात ती कोणाच्या दादागिरीमुळे थांबता कामा नये. कदाचित त्यांना राजीव गांधींचे नाव आवडत नसेल तर नावात बदल करावा परंतु गरिबांसाठी फायदेशीर असलेली योजना अमलात आणावी अशी माझी विनंती आहे. अशा प्रकारे एपीएल किंवा बीपीएलचे कारण सांगून योजनेमध्ये खीळ घालून चालणार नाही तर शासनाने यासंबंधीची भूमिका स्पष्ट करावी.

महोदय, राज्यात आज जवळपास 10535 अंशकालीन परिचारिका काम करीत आहेत. वास्तविक त्यांच्या कामाचे फक्त चारच तास आहेत परंतु आठ ते दहा तास त्यांना प्रत्यक्षात काम करावे लागत आहे. पगार मात्र महिन्याला फक्त 900 रुपये एवढाच मिळतो. रोजगार हमी योजनेवर जाणाऱ्या मजुराला सुध्दा त्यापेक्षा जास्त रोजंदारी मिळते. तसेच या परिचारिकांचे वय आता जवळपास 45 ते 50 पर्यंत गेलेले आहे तरी देखील त्यांना कायम करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला नाही. महिला व बालविकास विभागाला आता महिलाच मंत्री मिळालेल्या आहेत त्या तरी आता महिलांच्या संदर्भात विचार करतील अशी मी अपेक्षा करतो.

महोदय, आदिवासी विभागाचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, आदिवासी भागात अनुदानित आश्रमशाळातील कर्मचाऱ्यांच्या मागण्यासाठी त्यांनी उपोषण सुरु केलेले आहे. त्यांच्या काही मागण्याही आपण मान्य केल्या आहेत. त्यांचे म्हणणे आहे की, ज्या मागण्या मान्य केल्या त्या तरी मंत्री महोदयांनी देण्याबाबतच्या सूचना कराव्यात. कारण मान्य करुनही इतकी वर्षे त्यांना न्याय मिळत नाही ही लाजिरवाणी गोष्ट आहे. अन्यायग्रस्त कर्मचारी संघर्ष समितीने आपल्यासमोर देखील त्यांची व्यथा मांडली आहे. स्वाभाविकपणे त्यांची अपेक्षा आहे की, आपण मान्य केलेले तरी त्यांना लवकरात लवकर द्यावे. या अनुषंगाने वस्तुस्थिती मंत्री महोदयांनी स्पष्ट करावी अशी माझी सूचना आहे. त्याचप्रमाणे खोब्रागडे साहेब तिकडे काय करतात काय नाही याची माहिती नाही परंतु बायफ नावाच्या संस्थेचा सभागृहात उल्लेख झाला, त्या संस्थेबद्दल मला अत्यंत आदर आहे त्यासंदर्भातील वास्तविकता मंत्री महोदयांनी स्पष्ट करावी, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागासंबंधी बोलत असताना मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, राज्यातील प्रत्येक तालुक्याला अनुदानित महाविद्यालय देण्यात येईल अशी घोषणा सदनातच करण्यात आली होती. अशा परिस्थितीत आमच्या कोकणातील वैभववाडी तालुका जो डिलिमिटेशनमध्ये अगोदर घाटावर होता नंतर खाली गेला. त्यावेळेस कोकणचे सुपूत्र व माजी मुख्यमंत्री यांनी सुध्दा लक्ष दिले नाही. यासंदर्भात मी सभागृहात वारंवार मागणी केली तरी देखील बृहत आराखड्यात हा तालुका आला नाही. मी 370 पत्रं, 45 भेटी आणि 15 वेळा सभगृहात विषय उपस्थित केल्यानंतर कुठेतरी हा तालुका बृहत आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यानंतर त्यासंबंधीची जाहिरात निघणे अशा प्रकारची प्रोसिजर सुरु होईल. अशा प्रकारे आपल्याच राज्यातील एक तालुका अनुदानित महाविद्यालयापासून वंचित राहतो ही गोष्ट भूषणावह नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री. डी.पी.सावंत हे नांदेडमधून निवडून आलेले असले तरी ते मुळचे आमच्या कोकणाचेच आहेत. त्यामुळे ही जाहीरात लवकर निघेल यासाठी आपण लक्ष घालावे अशी माझी त्यांना विनंती आहे. त्यामुळे सिंधुदुर्ग जिल्हयाला अनुदानित महाविद्यालय मिळेल आणि डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळू शकेल एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, महिला व बालकल्याण विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, चिल्ड्रेन एड्स् सोसायटीतील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही. पाचवा वेतन आयोग लागू करण्यासाठी सुध्दा त्यांना संघर्ष करावा लागला होता. पाचव्या वेतन आयोगासाठी संघर्ष केल्यानंतर त्यांना 3 वर्षानी तो मिळाला होता. त्यामुळे सचिव असे म्हणतात की, तुम्हाला अजून तीन वर्षानंतर सहावा वेतन आयोग लागू केला जाईल. मंत्री महोदय सुध्दा या विषयाबाबत लक्ष घालीत नाहीत. प्रा. वर्षा गायकवाड या धारावीतून निवडून आलेल्या असल्यामुळे त्या धारदार आहेत. निदान त्यांनी तरी या विषयाबाबत लक्ष घालावे व हा प्रश्न सोडवावा अशी विनंती आहे. चिल्ड्रेन एड्स् सोसायटीचे काम चांगल्या प्रकारे चालले आहे. केवळ तुम्ही फाईल मराठीतून पाठविल्यामुळे या सोसायटीवर असलेल्या या सभागृहातील सदस्याने त्या फाईलवर सही केली नाही अशी दुर्दैवाची परिस्थिती आहे. असे असतांना सुध्दा या ठिकाणचे कर्मचारी चांगल्या प्रकारे काम करीत आहेत. सभापती महोदय, चिल्ड्रेन एडस् सोसायटीच्या कर्मचा-यांना सहावा वेतन आयोग लागू केला तर राज्य शासनावर केवळ दीड पावणेदान कोटीचाच बोजा पडणार आहे. जर वित्त विभाग त्यांची मागणी मान्य करणार नसेल तर सर्व खाते वित्त विभागाकडे पाठवून द्या. त्यामुळे ही बाब माननीय मंत्री महोदया श्रीमती वर्षाताई गायकवाड या नक्की मान्य करुन घेतील असा मला विश्वास आहे. तसेच या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांचा आपल्या खात्यावर कंट्रोल आहे हे दाखवून देण्याची हीच खरी वेळ आहे.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भात माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांना चांगली कल्पना आहे. मराठी नाटकांचे 25 शो झाले तरच मराठी नाटय निर्मात्याला एका शो मागे 15 हजार रुपये अनुदान दिले जाते. हे अनुदान मिळावे यासाठी मराठी नाटय निर्माते फाईलवर जवळ जवळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

4-5 हजार रुपये खर्च करतात आणि रोज मंत्रालयामध्ये चकरा मारत असतात. बरेच मराठी नाटक निर्माते हे कलाकारही आहेत. अक्षरश: डेस्क ऑफिसरकडे भीक मागावी त्याप्रमाणे ते फिरत असतात. मराठी नाटकाला अनुदान मिळण्यासाठी ब-याच अटी सुध्दा आहेत. मराठी नाटक राज्यभर गेले पाहिजे ही जी अट आहे ती अट आम्ही समजू शकतो. हे नाटककार ज्या ज्या ठिकाणी आपले प्रयोग करतात त्या ठिकाणचे लॉजचे भाडे सुध्दा खूप मोठया प्रमाणात असते. साधे नॉन ए.सी.च्या लॉजवर गेले तरी 800-900 रुपये लॉजसाठी लागत असतात. निम्मे नाटय प्रयोग गामीण भागात आणि निम्मे नाटय प्रयोग शहरी भागात ही यासाठी अट आहे. परंतु ब-याच ग्रामीण भागात नाटकाला चांगला प्रतिसाद मिळत नाही तसेच काही शहरामध्ये सुध्दा नाटकांना पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे यासाठी शहरांची सुध्दा नावे फिक्स होण्याची आवश्यकता आहे. मा. सभापती महोदय, श्री. संजय देवतळे हे सांस्कृतिक मंत्री असून ते सांस्कृतिक जिल्हयातून आलेले आहेत. त्यामुळे मराठी नाटय निर्मात्यांवर जे प्रदूषण आलेले आहे ते आपण काढून टाकावे अशी विनंती आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले हे मराठी नाटय परिषदेचे अध्यक्ष म्हणून काम करीत आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

मराठी नाटकांना अनुदानापोटी 15 हजार रुपये देण्यात येतात त्यामध्ये वाढ करुन ते 25 हजार रुपये करण्यात यावेत. मराठी साहित्य संस्कृती ही चित्रपट, कला व साहित्य या मधून जाते असे स्व.यशवंतराव चव्हाण यांनी म्हटले होते. त्यांच्या नावाचा आदर ठेवून मराठी नाटकांना अनुदान वाढवून देण्यात यावे. नाटकाचे 25 प्रयोग झाल्यानंतर नाट्य निर्माते अनुदानासाठी अर्ज करतात. त्या संदर्भातील कागदपत्रे सादर केल्यानंतर त्यांना किती दिवसात अनुदान मिळाले पाहिजे एक वेळ निश्चित केली पाहिजे. कारण अनेक नाट्य निर्मात्यांना पासेससाठी मंत्रालयाच्या रांगेत उभे राहिलेले पाहिले आहे. काही वेळा मी त्यांना रांगेतून बाहेर काढून माझ्या सोबत मंत्रालयात घेऊन गेलो आहे. दुसरे म्हणजे त्यांनी रांगेत एक-दीड तास घालविल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यास भेटण्यास गेल्यावर त्या अधिकाऱ्याकडून "अजून आपली केस आली नाही, आपण नंतर या" असे उत्तर मिळते. म्हणजे त्याची वेळ फुकट गेली आणि कामही झाले नाही. काही नाट्य निर्माते चांगले नट आहेत. त्यांना अशाप्रकारची वागणूक मिळणे बरोबर नाही. तेव्हा अनुदान मिळण्यासंदर्भातील कागदपत्रे सादर केल्यानंतर किती दिवसात अनुदान मिळेल याबाबतची एक वेळ निश्चित केली पाहिजे. सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर अमुक इतक्या कालावधीत अनुदान मिळाले पाहिजे अन्यथा संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येईल अशाप्रकारचे आदेश काढले पाहिजेत. तरच यामध्ये बदल होऊ शकेल. तेव्हा माननीय मंत्रिमहोदयांनी माझ्या या सूचनेचा जरुर विचार करावा अशी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, अल्पसंख्यांकासाठी असलेल्या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळात अनेक गैरप्रकार, भ्रष्टाचार सुरु आहेत. त्याबाबत पोलीस स्टेशनमध्ये देखील तक्रार झालेली आहे. या महामंडळाने कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांपैकी 50 टक्के अल्पसंख्याक लाभार्थी हे वांद्रे आणि खार परिसरातील आहेत. तसेच यापैकी 80 टक्के लाभार्थ्यांची प्रकरणे एका दिवसांत म्हणजे दिनांक 22 ऑगस्ट 2009 रोजी मंजूर झाली. यातील अनेक लाभार्थ्यांनी "जमाते जमुरीया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

कॉलनी, वांद्रे, मुंबई" असा पत्ता दिलेला आहे. परंतु हा पत्ता अस्तित्वात नाही. हे लाभार्थी बोगस आहेत. अनेक लाभार्थ्यांनी जो पत्ता दिलेला आहे तो वांद्रे वा खार परिसरात शोधून ही सापडणार नाही. मी पोस्ट ऑफीसमध्ये देखील त्या पत्त्यांची चौकशी केली, परंतु त्यांनी देखील असमर्थता दर्शविली. मी विद्यार्थी चळवळीत काम केलेला कार्यकर्ता आहे. त्यामुळे मला मुंबईतील अनेक भागांची चांगली माहिती आहे. लाभार्थ्यांनी जो जमतो जमुरीया कॉलनीचा उल्लेख केलेला आहे त्या नावाची कॉलनी वांद्रे वा खार परिसरात कोठेही नाही. कर्ज वाटपातील 2625 प्रकरणांपैकी 1192 प्रकरणे ही वांद्रे-खार परिसरातील आहेत. जमा भाई देखो, आपके नागपूर मे कोई नही है क्या ? या संदर्भात सी.आय.डी.चौकशी करण्याचे पत्र आयुक्तांना दिलेले आहे. मी याठिकाणी जी माहिती दिली त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी कार्यवाही केली तर अन्य अल्पसंख्यांकांना देखील न्याय मिळेल. आम्ही ही माहिती वरच्या नेत्यांना पाठविल्यामुळे संबंधितांची पुन्हा मंत्रिमंडळात वर्णी लागली नाही.

सभापती महोदय, आपण बेल वाजविली. मला इतर विषयांवर देखील बोलावयाचे होते, परंतु आपण बेल वाजवून भाषण आटोपते घेण्यास सांगितल्यामुळे मी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. या चर्चेत भाग घेण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार मानतो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागाची बाब क्रमांक 247, पान नंबर 199 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. गटई कामगारासाठी चर्मोद्योग विकास महामंडळ स्थापन करण्यात आले आहे.दिवंगत मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांनी या महामंडळाची ज्यावेळी स्थापना केली होती त्यावेळी या महामंडळाला 5 कोटी रुपयांचे अधिकृत भाग भांडवल दिले होते.आता त्या भाग भांडवलामध्ये या पूरक मागणीव्दारे आणखी 5 कोटी रुपयांची वाढ केलेली आहे.शासनाने काही महामंडळाची कर्जे माफ केली आहे. त्यासाठी शासनाच्या बजेटमधून पैसे देण्यात आलेले नाहीत. तर त्यासाठी प्रत्येक महामंडळाच्या तिजोरीतून पैसे देण्यात आले होते चर्मोद्योग विकास महामंडळासाठी 100 कोटी रुपयांचे भाग भांडवल देण्यात यावे अशी मी या पूरक मागण्यावरील चर्चेच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो. गेल्यावेळी देखील मी ही मागणी केली होती परंतु ती मान्य करण्यात आली नाही. गटई कामगार हा दबलेला समाज असून राज्यातील मुंबई, पुणे या सारख्या ज्या मोठया महानगरपालिका आहेत त्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात स्टॉल बांधण्यासाठी 25 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे परंतु ते काम अजूनही प्रलंबित आहे तरी ते काम त्वरित पूर्ण करण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय,यानंतर कृषी विभागाची बाब क्रमांक 62, पान नंबर 46 संबंधी बोलावयाचे आहे.राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत वित्तीय सहाय्य देण्यासाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, सिंधुदुर्ग जिल्हा हा कृषी प्रधान आहे. संपूर्ण देशात सिंधुदूर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे असे आपण सर्वच सन्माननीय सदस्य नेहमीच सांगत असतो. यानिमित्ताने केन्द्र सरकारच्या कृषी विभागाचा पैसा मिळविण्यासाठी पाठपुरावा करुन कृषी पर्यटन आराखडा शासनाने तयार करावा त्याचबरोबर राज्य शासनानेसुध्दा आपल्या पूरक मागण्यामध्ये त्यासाठी पुरेशी तरतूद करुन कृषी प्रधान जिल्हयामध्ये कृषी पर्यटन विकास चांगल्या प्रकारे करावा.एवढे बोलून मी माझे भाषण सांपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) :सभापती महोदय, पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय क्रीडा विभागाची बाब क्रमांक 88, पान नंबर 59 सबंधी मला बोलावयाचे आहे.जिल्हा क्रीडा कार्यालय लातूरने अनेक संस्थाकडून जे प्रस्ताव मागितलेले आहेत त्यावर अजूनही निर्णय न घेता ते प्रलंबित ठेवण्यात आले आहेत ते प्रस्ताव ताबडतोब मंजूर करावेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 400, पान क्रमांक 435 संबंधी मला बोलावयाचे आहे राज्यामध्ये 58 हजार 779 अंगणवाडयांना इमारती नाहीत त्यामुळे उघडयावर औपचारिक पध्दतीने त्या विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. नक्षलग्रस्त भागातही 1631 अंगणवाडयांना इमारती नाहीत तेव्हा या इमारतीसाठी वेगळी तरतूद करुन या इमारती लवकर बांधण्यासाठी व्यवस्था करावी असे मला सांगावयाचे आहे. त्याचप्रमाणे मागच्या तीन वर्षापासून राज्यामध्ये महिला आयोगाचे गठन करण्यात आलेले नाही. महिला आयोगाला अध्यक्ष नाहीत महिला आयोगाचे गठन झालेले नसल्यामुळे 2010 चे महिला धोरण जाहीर करण्यासाठी माविमला काम द्यावे लागले तेव्हा माझी अशी विनंती आहे की महिला आयोग त्वरित गठीत करण्यात यावा तसेच त्यासाठी करण्यात आलेली आर्थिक तरतूद तुटपुंजी असल्यामुळे त्यांना काम करणे अवघड जाते त्यामुळे त्यांना एक कोटी रुपयापर्यतचा निधी वाढवून देण्यात यावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 75, पान नंबर 55 संबंधी मला बोलावयाचे आहे. सर्व शिक्षा अभियानांतर्गत आलेल्या पुस्तकामुळे किल्ले धारुर, जिल्हा बीड येथील गट शिक्षणाधिकारी कार्यालयातील कर्मचा-यांना बसण्यासाठी जागा नव्हती त्या ठिकाणी पुस्तकाचे ढीग लागले होते त्यामुळे त्या पुस्तकावर बसण्याची वेळ त्या कर्मचा-यावर आली होती त्यांना बसण्यासाठी जागा नसल्यामुळे हजारो रुपयाच्या पुस्तकाची होळी करण्याचा तेथे प्रयत्न करण्यात आला होता परतु वेळीच हे वृत्त प्रसिध्द झाल्यामुळे हा प्रसंग टळला. आता अशी घटना पुन्हा घडणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्याचबरोबर अशी घटना इतर ठिकाणी होते काय याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापुती महोदय,शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे शासन आदेशानुसार गट शिक्षण कार्यालयाने मुदतीत बॅकेत खाते न उधडल्यामुळे धारुर तालुक्यात 220 विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित झाले आहे.याकडे शासनाने लक्ष देणे गरजेचे आहे . नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत/शुद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

त्याचप्रमाणे त्याठिकाणी मुलांच्या असलेल्या शासकीय वसतिगृहामध्ये प्रभारी अधिकाऱ्याचे पद नेमण्यात आले असून त्याऐवजी नियमित पद भरण्यात यावे अशी मागणी करते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 411 व पृष्ठ क्रमांक 442 च्या संदर्भात सांगू इच्छिते की, गेवराई शहराची लोकसंख्या फक्त 50 हजार असतांना त्याठिकाणी फक्त चार सार्वजनिक शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यापैकी दोन शौचालये चालू आहेत तर दोन शौचालये बंद आहेत आणि एका शौचालयाला बाभूळ वनाने विळखा घातलेला आहे. जिल्हा परिषदेच्या आठ पी.एच.सी. च्या सर्कलमध्ये एकही शौचालय बांधण्यात आलेले नाही. गेवराई शहरामध्ये दहा शौचालयांची आवश्यकता आहे, 430 घरगुती शौचालयांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. या संदर्भात शासनाने त्वरेने लक्ष देणे गरजेचे आहे. तुडुंब भरलेल्या मांजरा धरणामधून लाखो क्युसेस पाणी सोडून द्यावे लागत असतांनाही केज व धारुर या गावांसह 12 गावांना पाच वेळा सुरळीत पाणीपुरवठा होत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 240 व पृष्ठ क्रमांक 197 मध्ये बीड जिल्हयातील अनुसूचित जाती व भटक्या जमातीमधील 8300 विद्यार्थी शासनाच्या राजर्षि शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. त्यांना शिष्यवृत्ती देण्याकरिता 2 कोटी 49 लक्ष रुपायांची आवश्यकता आहे. त्याकरिता शासनाने तरतूद करावी अशी मी मागणी करते. सभापती महोदय, गेवराई तालुक्यातील गडी या गावामधील अस्थिव्यंग निवासी महाविद्यालयाचे स्थलांतर झाले असतांना शाळा स्थलांतराला परवानगी दिलेली नाही असे अधिकारी सांगत आहेत आणि शाळा स्थलांतराला परवानगी दिली आहे असे संस्था चालक सांगत आहेत. यामध्ये अस्थिव्यंग असलेल्या विद्यार्थ्यांची मात्र ससेहोलपट होत आहे. त्याबाबत आपण त्वरीत निर्णय घेणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 306, पृष्ठ क्रमांक 371 मध्ये आंबेजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला संरक्षित भिंत बांधण्यात न आल्यामुळे केंद्राच्या आवारामध्ये गावातील माणसे प्रार्तविधीकरिता जातात. त्यामुळे त्या केंद्रामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना त्याचा त्रास होतो. या प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत 30 गावे आहेत. केंद्रावर 50 हजार लोकांचा भार असतांना त्याठिकाणी 5 आरोग्यसेविका, 2 आरोग्य कर्मचारी व 1 शिपायाचे पद रिक्त आहे आणि कर्मचाऱ्यांना रहाण्याकरिता असलेल्या निवासस्थानांची अवस्था अतिशय वाईट आहे. याकडे सुध्दा आपण लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 306 व पृष्ठ क्रमांक 371 मध्ये बीड जिल्हयातील शिरुर तालुक्यात असलेली पी.एच.सी. गावापासून दीड किलोमीटर अंतरावर आहे. त्याठिकाणी दोन डॉक्टर्सची व्यवस्था केली असली तरी त्यांना रहाण्याकरिता एकच निवासस्थान देण्यात आले आहे. रुग्णांकरिता 6 खाटांची व्यवस्था करण्यात आली असली तरी त्या आरोग्य केंद्रासाठी नळ पाणीपुरवठा करण्यात आलेला नाही. 30 हजार लोकसंख्येला एक प्राथमिक आरोग्य केंद्र असा शासनाचा नियम आहे. शिरुर गावची लोकसंख्या 59 हजार आहे. त्यामुळे त्या गावाकरिता अजून एक पी.एच.सी. मंजूर करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, त्याठिकाण औषध निर्माण अधिकाऱ्याचे रिक्त असलेले पद भरणे आवश्यक आहे. याच तालुक्यामध्ये जातनांदूर आणि गोमाळवाडा या गावामध्य पी.एच.सी. आहे, परंतु त्याठिकाणी आरोग्य सेविकेची रिक्त असलेली पदे भरणे आवश्यक आहेत. या शिरुर तालुक्यातील 9 उपकेंद्रामधील कारभार शिरुर येथूनच चालतो. त्यामुळे त्या उपकेंद्राचा असून नसून काहिही उपयोग होत नाही. या तालुक्याची लोकसंख्या 1 लाख 25 हजार असल्यामुळे या तालुक्याला अजून 2 पी.एच.सी. देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 306 च्या अनुषंगाने मी सांगू इच्छिते की, आष्टी तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय आहे. त्याठिकाणी 38 खाटांची क्षमता असतांना 42 खाटा देण्यात आल्या आहेत. तरीसुध्दा रुग्णांची वाढीव संख्या लक्षात घेता त्या खाटा कमी पडत आहेत. त्याकरिता त्याठिकाणी उप जिल्हा रुग्णालय सुरु करुन 100 खाटांची व्यवस्था करण्यात यावी याकरिता आष्टी तालुक्यामधून वारंवार मागणी करण्यात येत आहे. टाकळशिंगी येथील पी.एच.सी.करिता 96 लाख रुपये खर्च करुन इमारत बांधण्यात आली. परंतु अजूनही त्या इमारतीचे काम पूर्ण होत नाही. त्यामुळे आष्टी तालुक्यामधील रुग्णांची अत्यंत हेळसांड होत आहे. याकरिता आष्टीचे ग्रामीण रुग्णालय कडा येथे स्थलांतरीत केले व आष्टी येथे उप जिल्हा रुग्णालय सुरु केले तर आष्टी तालुक्यातील रुग्णांचे प्रश्न सुटतील. माजलगाव तालुक्यामध्ये सहा ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्यात आले आहेत. त्याठिकाणी डॉक्टर, लिपिक, बहुउद्देशीय अधिकारी, परिचारिका व सेवकांची रिक्त असलेली पदे भरणे गरजेचे आहे. त्या पी.एच.सी.मध्ये औषधांचा तुटवडा आहे. साधोवा पी.एच.सी. ला पावसाळयामध्ये पाण्याचा वेढा पडतो. त्यामुळे गावातील रुग्ण कमीत कमी चार महिने त्या पी.एच.सी.मध्ये औषधोपचाराकरिता जाऊ शकत नाहीत. याच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

तालुक्यामध्ये पालखेड या गावामध्ये एक पी.एच.सी. आहे. त्या पी.एच.सी. मध्ये वैद्यकीय अधिकाऱ्याचे पद रिक्त आहे, तसेच तीन परिचारिकांच्या जागा रिक्त आहेत. 1984 पासून एक्स-रे मशीन बंद पडलेली आहे. त्या मशीनवर एक्स-रे काढला तरी तो व्यवस्थित दिसत नाही अशी अवस्था आहे. सभापती महोदय, बाब क्रमांक 306 च्या संदर्भात मला आणखी सांगावयाचे आहे की, वडवली तालुक्यातील चिंचवड ग्रामीण रुग्णालयातील एक्स-रे मशीन बंद पडलेली आहे. तसेच, औषधांचा मोठया प्रमाणात तुटवडा आहे. बीड जिल्हयामध्ये चिकनगुन्या या रोगाची लागण फार मोठया प्रमाणात झाली आहे. गेवराई तालुक्यामध्ये 1 हजार रुग्ण या आजाराने ग्रस्त आहेत. त्याकरिता आपण उपाय योजना करणे गरजेचे आहे.आंबेजोगाई तालुक्यातील उजनी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ओसाड आहे. त्या केंद्रामध्ये वीज व पाण्याची सुविधा दिलेली नाही. तसेच, आरोग्य केंद्रामधील डॉक्टर लातूरमध्ये रहातात आणि त्याठिकाणाहून उजनीच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचा कारभार पहातात. याची चौकशी होणे आवश्यक आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे . . . .

गेवराईचे उप जिल्हा रुग्णालय हे समस्यांचे माहेरघर झाले असून, त्याठिकाणी गावगुंड धुमाकूळ घालतात आणि त्यांच्या या धुडगूसाला कंटाळून रात्रीच्या वेळी तेथे एकही कर्मचारी थांबत नाही आणि रात्रीच्या वेळी तेथील कर्मचाऱ्यांना अशा प्रकारे रामभरोसे आणि बेवारस सोडले जाते. केज तालुक्यातील राजेगाव येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत अस्तित्वात नाही. तेथे शवविच्छेदना साठी खोली नाही. केज तालुक्यामध्ये चिंचोली पीएचसी व ईसू-वडगाव पीएचसी येथे प्रत्येकी एक डॉक्टरची जागा रिक्त आहे. विडा येथे डॉक्टर आहेत आणि त्यांच्याकडे चिंचोली-माळीचा चार्ज आहे आणि ते अंतर 20 कि.मी. आहे.बनसाळीचे डॉक्टर ईसू-वडगावचा चार्ज घेऊन काम करतात. परंतु अशा प्रकारे काम करणे अत्यंत कठीण आहे. त्यामुळे सदरहू ठिकाणी जागा भरण्यात आल्या पाहिजेत. परळी येथे 100 खाटांचे रुग्णालय आहे. परंतु रात्री रुग्णालयामध्ये अंधार असतो, डॉक्टर नसतात. तेथील नवजात शिशू कक्ष गेल्या दीड वर्षापासून बंद आहे, तसेच त्याठिकाणी अनेक पदे रिक्त आहेत. त्यामुळे या सर्व अडचणींच्या बाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने लक्ष द्यावे अशी विनंती करते आणि मला वेळ दिल्याबद्दल धन्यवाद.

. . . .4 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सर्वात प्रथम आदिवासी विकास विभागाच्या मागण्यांसंदर्भात पान क्र.399, बाब क्र.346 बाबत सांगावयाचे आहे. यामध्ये जनजाती क्षेत्र उप योजनेअंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालयाप्रमाणे दर्जा वाढविण्याकरिता तरतूद करण्यात आली आहे. आदिवासी विभागामार्फत अनेक ठिकाणी निधी दिला जातो. मग तो वैद्यकीय शिक्षण विभाग असू दे, सार्वजनिक आरोग्य विभाग असू दे किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग असू दे, शिक्षण विभाग असू दे, मात्र या विभागांसाठी देण्यात येणारा निधी कशा प्रकारे खर्च केला जातो याचे जीवंत उदाहरण मी आपल्यासमोर ठेवणार आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे आदिवासी विकास विभागाचा जी.आर.असून तो आपणच दि.19 मार्च 2008 मध्ये पारित केला आहे. यामध्ये असे लिहिलेले आहे की, "आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आरोग्य संस्थांना औषधे व साहित्य सामुग्री पुरविण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत". या जी.आर.मध्ये अनेक गोष्टी आहेत. उदाहरण द्यावयाचे तर औषधे आहेत, साधनसामुग्री आहे. मी महाराष्ट्रामध्ये जवळजवळ सर्व जिल्ह्यांमध्ये फिरतो. मात्र त्यातल्या त्यात आदिवासी जिल्ह्यामध्ये सगळयात जास्त फिरतो. याठिकाणी काही कोटी रुपयांची खरेदी केलेली आहे. खादी ग्रामोद्योग या संस्थेतर्फे 38 कोटी 62 लाख रुपयांची खरेदी केलेली आहे आणि आपण ती डोळे झाकून पास केली आहे. कारण असे की, मूळ बाबींवर बोलावयाचे नाही, त्यावर चर्चा करु शकत नाही असे आम्हाला सांगण्यात येते. त्या बाबींमध्ये कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होता? यात पिलोकव्हर होते, रेगझिनकव्हर असलेली मॅट्रेसेस होती, व्हाईट बेडशीट होत्या, ग्रीन बेडशीटस् होत्या, दोन प्रकारच्या सोलापूरी चादरी होत्या, सतरंज्या होती, ब्लँकेटस् होती आणि सब-सेंटर इक्वीपमेंटस् होती. याबरोबरच इतर अनेक गोष्टी होत्या, ज्याला म्हणतात रेडिओ ओपेक ॲबझॉरबंन्ट गॉज आणि रेडिओ ओपेक ॲबझॉरबन्ट स्वॅब अशा या दोन गोष्टी सर्जरीसाठी लागतात, त्याची खरेदी केली होती. या दोन गोष्टी 4 कोटी रुपयांच्या होत्या. अशी एकंदर 38 कोटी रुपयांची साहित्य खरेदी आणि बाकीची औषध खरेदी होती. सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत माननीय मंत्री महोदयांना अशी विचारणा आहे की, ज्या प्रायमरी हेल्थ सेंटरमध्ये फॅमिली प्लॅनिंगशिवाय कोणतेही ऑपरेशन होत नाही, अशा ठिकाणी या रेडिओ ओपेक ॲबझॉरबन्ट गॉज आणि रेडिओ ओपेक ॲबझॉरबन्ट स्वॅब याचा काय उपयोग आहे? या दोन गोष्टी नेमक्या काय असतात हे मी आपल्याला सांगतो. पूर्वी ऑपरेशन करीत असताना जर आपण कोणाचे ॲबझॉबन्ड ओपन केल्यानंतर, पोट ...

..... 4 ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फाडल्यानंतर आतमधून स्वॅब घेतो आणि ते साफ करतो,ज्याला मॉप असे म्हणतात, तो डॉक्टरांच्या नजरचुकीने बऱ्याच वेळेला पोटामध्ये रहातो आणि असे झाले तर शरीरात इन्फेक्शन होऊ शकते. मग आपण अमुक व्यक्तीच्या पोटामध्ये कापसाचे बोळे राहिले असे वर्तमानपत्रामध्ये वाचतो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

त्यासाठी एक नवीन सिस्टिम काढली आहे. या गॉजच्या बाजूला मेटॅलिक फ्रेम दिली जाते त्याने तो पुसला जातो. या प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इतक्या हायफाय गोष्टी असतात काय? या प्राथमिक केंद्रामध्ये साधे ब्लडप्रेशरचे इन्स्ट्रुमेंट नसते, बऱ्याचदा जेथे साध्या डिस्पोजेबल सीरिंजेस् नसतात. पॅरासिटॅमल सारखे सिरप देखील नसते तेथे या गोष्टींची खरेदी कां झाली? ही खरेदी हिवाळी अधिवेशनात सन 2008-2009 मध्ये पास झालेली आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, काही हजारामध्ये पिलोकव्हर्स आणि बेड्स खरेदी केल्या आहे. कॉटन मॅट्रेसेस 4695, रेगझिनकव्हर क्वायर मेट्रेसेस 5916, एक किलोच्या कॉटन पिलो 9780, व्हाईट बेडशीटस् 39120, पिलोकव्हर 19560, ग्रीन बेडशीटस् 39120, सोलापुरी चादर 9780, सतरंजी 9780, हॉस्पिटलसाठी ब्लँकेट्स 9780, सब सेंटर्ससाठी सब सेंटर इक्वीपमेंट्स किट, जे मला कुठल्याही प्राथमिक आरोग्य केंद्रात पहावयास मिळाले नाहीत. पण या इक्वीपमेंट्स किटची जवळ जवळ 10 कोटी 90 लाख रुपयांची खरेदी करण्यात आलेली आहे. त्यासबंधीचा जी.आर. शासनाचा आहे तो माझा नाही. सभापती महोदय, गेल्याच 25 ऑक्टोबरला मी मेळघाटात फिरलो. गुलरघाट, बारुखेडा, धूळघाट रेल्वे स्टेशन, सावली खेडा, सुसर्दा, कळमखार, तलई, साद्रावाडी, बिजूधावडी या सर्व प्राथमिक आरोग्य केंद्राना मी भेटी दिल्या आहेत. माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधीचा दौरा ठरविला होता पण तो दौरा रद्द झाला. त्यानंतर मी तिकडे जाऊन आलो. मी आश्रमशाळेत देखील जाऊन आलो. ही सर्व खरेदी आदिवासी खात्यातर्फे झालेली आहे.

प्रा.फौजिया खान : बाब क्रमांक सांगण्यात यावी.

डॉ. दीपक सावंत :ही खरेदी आदिवासी खात्यामार्फत झालेली आहे पण ती सार्वजनिक आरोग्य खात्याकडे गेलेली आहे. आदिवासी खात्याने खादी ग्रामोद्योगमार्फत ही खरेदी केलेली आहे असे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. आदिवासी विभागात आरोग्य विभागासाठी, वैद्यकीय शिक्षण विभागासाठी, सार्वजनिक बांधकाम विभागासाठी खरेदी केली जात असेल तर आदिवासी खाते खरेदीसाठी पैसे देते, त्यानंतर ही खरेदी केली जाते. पण ही खरेदी केली जाते की नाही हे कोणीच पहात नाही. विद्यार्थ्यांना पैसे दिले जातात की नाही हे पाहिले जात नाही. मी उदा. म्हणून सांगितले आहे. सन 2008 साली जर खरेदी केली असेल तर ती 2009 सालामध्ये त्या त्या विभागाकडे आली असेल. पण 2010 सालामध्ये मला आरोग्य विभागात एक तरी नवीन चादर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

डॉ. दीपक सावंत....

दिसायला पाहिजे होती. एक तरी बिछाना दिसायला पाहिजे होता. एक तरी मॅट्रेस दिसायला पाहिजे होती. महाराष्ट्रासाठी खरेदी केली आहे. आदिवासी जिल्हयांमध्ये आपल्यापैकी अनेक जण जात असतात. आपल्याला कुठे नवीन मॅट्रेस दिसली काय, आपल्याला कुठे नवीन सोलापुरी चादर दिसली काय?

सभापती महोदय, रेडिओ ओपेक ऑबझॉर्बंट गॉज आणि रेडिओ ओपेक ऑबझॉर्बंट स्वॅब कुठे गेले. याची खरेदीच झाली नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठी ऑपरेशन्स होत नाहीत. त्या ठिकाणी सर्जनच नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रात अमुक इतकी ऑपरेशन्स केली जातात असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. नसेल तर मग या चार कोटी रुपयाची खरेदी गेली कुठे?

सभापती महोदय, गुलरघाटला पाचवी पर्यंतची आश्रमशाळा आहे. बारुखेडा आणि गुलरघाट या दोन्ही आश्रमशाळा एकत्रित घेतल्या जातात. त्या ठिकाणी इयत्ता दहावीच्या मुलांना 98 हा शब्द लिहिता येत नाही. माननीय मंत्री महोदय असे विचारतील की, हे मला कसे कळले, मी त्या विद्यार्थ्याकडून लिहून घेतले काय? पण मी ज्यावेळी तेथे गेलो होतो त्यावेळी तेथे परीक्षा चालू होती. परीक्षेचे पेपर विद्यार्थ्यांना वाटण्यात येत होते. इयत्ता 7 वी ते 10 मधील विद्यार्थ्यांची जमिनीवर बसून परीक्षा घेतली जात होती. त्या विद्यार्थ्यांना 98 हा शब्द लिहिता येत नव्हता. त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना काय शिक्षण दिले जात असेल?

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

काय शिक्षण दिले जाते. खरे म्हणजे त्या ठिकाणी महिन्यातून दोन वेळा मांसाहार देणे आवश्यक आहे पण तो दिला जात नाही. कित्येक दिवस अंडी दिलेली नाहीत. तेथील आपले श्री. खोजरे नावाचे प्रकल्प अधिकारी आहेत ते त्यावेळी नव्हते. त्यावेळी समितीचा दौरा असल्यामुळे ते धारणीला सापडले नाहीत. त्या ठिकाणी ज्या श्रीमती पंधरे मॅडम होत्या त्यांना श्री. खोजरे यांच्या बाबतीत विचारले. मी त्यांना विचारले की, आपल्याकडे फाटलेले बुट घालून मुले का येतात, फाटलेले कपडे घालून मुले का येतात ? माझ्याकडे फोटोग्राफ्स आहेत. पाहिजे तर ते मी आपल्याला दाखवतो. गणवेश दिलेले असताना फाटलेले कपडे घालून मुले येतात. प्रत्येक मुलाला वर्षाला दोन गणवेश कधीही मिळत नाहीत. 15 ऑगस्टला एक गणवेश मिळतो आणि दुसरा गणवेश 15 मार्चमध्ये शिवून येतो. नवीन कंपास बॉक्स नवीन नाही, काहीही नवीन नाही. त्यांनी मला असे सांगितले की, प्रकल्प अधिकारी श्री. खोजरे हे रेंजर आहेत. ते वन विभागातून आपल्याकडे प्रकल्प अधिकारी म्हणून कसे आले ? त्यांच्याकडे प्रकल्प अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार दिला गेला. ते प्रतिनियुतीवर आले असतील. मला असे सांगण्यात आले की, आपल्या अगोदर जे तत्कालीन मंत्री डॉ. गावित साहेब होते यांनी त्यांना बाहेर ठेवले होते. त्यांनी त्यांच्यावेळी सुध्दा प्रयत्न केला होता पण आपल्यावेळी ते कसे आले याचे उत्तर आपण द्यावयास पाहिजे.

सभापती महोदय, आपल्याकडे आदिवासी खात्यातर्फे दुधाळ जनावरे देण्याचा एक उपक्रम आहे. दुधाळ जनावरे किती रुपयांची घ्यावयाची याचे कोष्टक ठरलेले आहे. गाय किती रुपयाला घ्यावयाची, शेळी किती रुपयाला घ्यावयाची, मेंढी किती रुपयाला घ्यावयाची, किती जनावरे द्यावयाची याचे कोष्टक ठरलेले आहे. ही जनावरे आपण किती वाजता देतो ? कोंडेश्वर येथे या जनावरांचे वाटप रात्री 12.00 वाजता झाले. आपला नियम असा आहे की, ही जनावरे त्या आदिवासींना घरपोच देणे आवश्यक आहे. त्याची चित्रफीत माझ्याकडे आहे. ती मी आपल्याला दाखवतो. रात्री 12.00 वाजता दुधाळ जनावरांचे वाटप होत असेल तर हे शासन किती कार्यक्षम आहे ? रात्री 12.00 वाजता सुध्दा यांचे अधिकारी काम करतात असे यातून दिसते. मेळघाटमधील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

आदिवासी आश्रमशाळेमध्ये दहावीच्या पुढे अकरावी आणि बारावीसाठी एकही विषय शिक्षक नाही. तसे असतील तर सांगावे. पीव्हीसी पाईप, मंगलोरी कौले, मुलींना देण्यात येणाऱ्या सायकली अशा ज्या सगळ्या योजना आहेत त्यातील जवळजवळ 90 टक्के योजना बंद आहेत. जी वह्या-पुस्तके परत घेतात तीच पुन्हा देतात. नवीन पुस्तके देत नाहीत. वह्यांच्या बाबतीत दहावीसाठी समजा 10 वह्या असतील तर दोनच वह्या दिल्या जातात. ही मेळघाटमधील स्थिती आहे.

सभापती महोदय, यानंतर मी एका मिनिटामध्ये डहाणूची स्थिती सांगतो. त्या ठिकाणी ज्या आश्रमशाळा आहेत त्यामध्ये 10 आश्रमशाळा ख्रिश्चन मिशनरीतर्फे चालविल्या जातात. या ख्रिश्चन मिशनरीचा जो एक फॉर्म आहे तो मी आपल्याकडे देतो. त्या फॉर्ममध्ये असे लिहिले जाते की, आपल्याकडे ख्रिश्ती धर्माचा बाप्तीष्मा आहे काय ? अशा प्रकारे त्या विद्यार्थ्यांना विचारले जाते आणि तरच डहाणूला या मुलींच्या आश्रमशाळेमध्ये प्रवेश दिला जातो. अशा 10 संस्था आहेत. त्यांची यादी देखील मी आपल्याकडे देतो. माझी माननीय मंत्री महोदयांकडून अशी अपेक्षा आहे की, या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी जे पैसे येतात, आश्रमशाळांसाठी जे पैसे येतात त्याबाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, एकाही आश्रमशाळेमध्ये मुलींसाठी न्हाणीघर नाही. टॉयलेट नाहीत. जवळजवळ 70 टक्के आश्रमशाळांमध्ये सोय नाही. आज किती आश्रमशाळांच्या बाबतीत शासनाची स्वत:ची जागा आहे ? आपल्याकडे प्रस्ताव होता. आपण आश्रमशाळांसाठी जागा खरेदी करणार होता. आपण किती जागा घेऊ शकला ते सांगावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

गेल्या अधिवेशनामध्ये मी हा प्रश्न विचारला होता, तो प्रश्न मी आजही विचारत आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा भाग सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मागण्यांसंबंधी आहे. पान क्र.378, बाब क्र.323 वर मी माझे विचार मांडतो. ट्रॉमा केअर युनिटसंबंधीची ही मागणी आहे. कणकणली येथे ट्रॉमा केअर युनिट सुरु केले होते, त्याचे उद्घाटन करण्यात आले, परंतु ते आजही तसेच आहे. कणकवलीत लेप्टोची साथ जोरात आहे. अजूनही लोक मरत आहेत. तेथील पेशंटस्ना डॉक्टर बाहेरुन औषधे विकत घेण्यास सांगतात. मी स्वत: कणकवली येथील हॉस्पिटलमध्ये गेलो होतो त्यावेळी मी स्वत: ही परिस्थिती पाहिली आहे. त्याठिकाणी डॉ.सोडल हे इनचार्ज आहेत. त्यांनी 5 पेशंटस्ला बाहेरुन औषधे आणण्यासाठी चिठ्ठी लिहून दिली होती. नॉरफ्लॉक्स, ऑरफ्लॉक्स अशा ॲण्टीबायोटिक्सच्या चिठ्ठया होत्या. ते लोक माझ्याकडे त्या चिठ्ठया घेऊन आले. त्यांनी मला सांगितले की, आम्हाला बाहेरुन औषधे आणण्यास सांगितले आहे. कणकवली येथील हे उप जिल्हा रुग्णालय दर्जाचे रुग्णालय आहे. त्याठिकाणी व्हेंटिलेटर पुरविण्यात आलेले आहे, परंतु तेथील डॉक्टरने माझ्या समोर ती बॅग उघडून ते मशीन बाहेर काढले. अगदी बॅग पॅक होती. डॉ.सोडल यांनी ते मशीन तसेच बॅगेत ठेवले होते. मी त्यांना विचारले की, तुम्ही या मशीनचा वापर का केलेला नाही, यावर त्यांनी मला असे सांगितले की, आमच्याकडे ॲनेस्थेटिस्ट नाही. तेथे असलेल्या पेशंटपैकी एका तरी पेशंटला व्हेंटिलेटरची आवश्यकता असणार. त्याचे प्लेटलेट कसे काऊंट करणार असे मी त्यांना विचारले. त्याचे प्लेटलेट डाऊन झाल्यावर तो एआरडीएसमध्ये जाणार, त्याला श्वसनाचा दाह झाल्यावर तो काय घेणार असे विचारले असता त्यांनी मला असे सांगितले की, अशा पेशंटला आम्ही कोल्हापूर किंवा गोव्याला पाठवितो. या 26 पेशंटपैकी निम्मे पेशंट प्रवासाच्या दरम्यान दगावलेले आहेत. या मृत्यूंसाठी जर डॉक्टर जबाबदार असतील तर त्या डॉक्टरवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावयाचा की नाही ? त्यांना व्हेंन्टिलेटर ऑपरेट करता येत नाही. त्याठिकाणी मोठया प्रमाणात लेप्टोची साथ आहे असे त्यांनी मला स्वत: लिहून दिले आहे. कणकवलीत 14 गावांमध्ये व आजुबाजूच्या परिसरात गेल्या 12 वर्षांपासून लेप्टोची साथ आहे. यावर्षी त्याचे जास्त प्रमाण असल्यामुळे ते आपल्या नजरेला

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

आले आहे. ही साथ आता कुडाळपर्यंत पसरली आहे. या प्रकाराला तेथील सिव्हिल सर्जन डॉ.कुलकर्णी पाठिशी घालत आहेत. डॉ.कुलकर्णी गेल्या 20 वर्षांपासून सिव्हिल सर्जन म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयात आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील सर्व सदस्यांचा त्यांच्या बदलीसाठी पाठिंबा असेल. त्यामुळे त्यांची शासनाने ताबडतोब बदली करावी. डॉ.कुलकर्णी हे ऑर्थोपेडिक सर्जन आहेत, ते काही करीत नाही, ते सिंधुदुर्ग जिल्हयाचे आरोग्य खराब करीत आहेत, ते केवळ राजाश्रयावर काम करीत आहेत. त्यामुळे त्यांची तातडीने बदली करावी.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य मिशन अंतर्गत राज्याला खूप निधी मिळतो. पण तेथे सेल काऊंट करणारी मशीन नाही, ज्याची किंमत केवळ अडीच लाख रुपये इतकी आहे. लोक कसे बरे होणार ? तेथे ती मशीनच नाही. 200 पेशंट तपासण्यासाठी केवळ 4 टेक्निशीयन्स आहेत. त्यामुळे त्यांच्या डोळयावर ताण आल्यामुळे त्यांच्याकडून चूक होऊ शकते. त्यामुळे ते लोक काय करतात ते सांगतो. एका पेशंटच्या प्लेटलेटस् 1 लाख 60 हजार असल्याचे दाखविले जाते. त्यामुळे तो पेशंट नार्मल दाखविला जातो. एखाद्या पेशंटचे 78 हजार प्लेटलेट काऊंट केल्याचे दाखविले जाते. परंतु डॉ.कुलकर्णी असे सांगतात की, 65 हजारच्या खाली प्लेटलेटस् मिळाले नाही तर आम्ही त्या पेशंटला लेप्टो झाला आहे असे घोषित करु शकत नाही. अशाप्रकारचे वक्तव्य करुन ते आपल्या अकलेचे तारे तोडत आहेत. त्या गरीब पेशंटस्चे प्लेटलेटस्च व्यवस्थित काऊंट होत नसतील तर त्यांना लेप्टो झाल्याचे घोषित कसे करणार ? याबाबत मी डॉ.डाखुरे यांना सांगितले होते. त्यांनी डॉ.कुलकर्णी यांना असे सांगितले की, सिंधुदुर्ग जिल्हयात लेप्टो सदृश्य साथ असल्याचे जाहीर करावे, तरी डॉ.कुलकर्णी, जिल्हा आरोग्य अधिकारी साथ असल्याचे जाहीर करण्यास तयार नाहीत.

अशुद्धीत मत / शोधनेसाठी नाही

यानंतर श्री.शिगम

आपण जर लेप्टोची साथ जाहीर केली तर तुम्हाला पशुसंवर्धन खात्याची मदत मिळते,पाणी पुरवठा आणि स्वच्छता विभागाची मदत मिळते. अनेक विभाग या साथीचे निर्मूलन करण्याच्या कामी मदत करतात आणि साथ त्वरित आटोक्यात येते.

बाब क्रमांक 314, पान क्रमांक 374 च्या संदर्भात देखील हाच कुपोषणाचा प्रश्न आहे. आपण कुपोषण हे नाव बदलून सॅम आणि मॅम यामध्ये बालकांची वर्गवारी केली तरी हा प्रश्न सुटणार नाही. एप्रिल ते सप्टेंबर 2010 या कालावधीत 51 बालमृत्यू झाले. मी 25 ऑक्टोबरला मेळघाटामध्ये गेलो. 25 ऑक्टोबर पर्यन्त 6 मृत्यू झाले. अजूनही बालमृत्यू होत आहेत. आजही तेथील दवाखान्यामध्ये पॅरासिटामॉल सिरप नाही. आपण कोणाची आर.सी. वापरता ? आपण डीएमआरअेची, इएसआयएसची आर.सी.वापरता. आपणाकडे औषध पुरवठा करणा-या फक्त तीनच कंपन्या आहेत काय ? कनाडाइण्डो रायडिक्स, हिन्दुस्थान लॅबोरेटरीज, अजंठा फार्मा या तीन कंपन्याकडून करोडो रुपयांची औषधे घेतली जातात. आपले आर.सी.करणारे अधिकारी हे कंपन्याची जी स्पेसिफिकेशन्स असतात त्याच स्पेसिफिकेशनचा आर.सी.मध्ये समावेश करतात. चार प्रकारची कफएक्स्पेटोरण्ट आहेत. एकाची किंमत 10 रु आणि दुस-याची किंमत 40 रु. आहे. करोडो रुपयाची कफएक्पेटोरण्ट घेतली जातात. माझ्या बॅगेमध्ये न्यूट्रीसॉल नावाची पावडर आहे. ही पावडर बालकांचे कुपोषण कमी करण्यासाठी आहे असे त्यावर म्हटलेले आहे. परंतु त्या पावडरमध्ये बालकांचे कुपोषण कमी करणारे कोणतेही घटक नाहीत. मी ही पावडर माननीय मंत्री महोदयांकडे देतो. ती त्यांनी एफडीअेकडे किंवा कोणत्याही प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठवावी आणि अहवाल घ्यावा. अंजठा फार्मा कंपनीने स्प्रिंकलिंग पावडरचे उत्पादन केले. ही पावडर अन्नावर टाकली तर मुलांना प्रोटीन्स मिळतात असा दावा केला जातो. असे असेल तर मग कुपोषणामुळे मुले का मरतायत त्याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे. आपण सॅम आणि मॅम वर्गीकरण केलेले आहे. परंतु अशा वर्गीकरणामुळे फार मोठा फरक पडणार नाही तर उलट कुपोषित मुलांची संख्या जास्त वाढेल.

सभापती महोदय, मी मेळघाटातील सादरावाडीचे उदाहरण देतो. सादरावाडी परिसरातील 2256 मुले ही सर्वसाधारण आहेत, 2126 मुले मॅनमध्ये म्हणजे मॉडरेट आहेत आणि तीव्र कुपोषित

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ.दीपक सावंत...

गटामध्ये 869 मुले आहेत. म्हणजे एकूण 5484 मुलांपैकी निम्म्याहून अधिक मुले सॅम आणि मॅममध्ये आहेत. माननीय मंत्री महोदयांनी प्रत्यक्ष दौरा करुन पहाणी करावी म्हणजे प्रत्यक्ष काय परिस्थिती आहे हे त्यांना समजेल. आपण प्रत्येक ठिकाणी पिडियाट्रिक युनिटची स्थापना केलेली आहे. तेथे किती वॉर्मर आहेत, वॉर्मर कशाला म्हणतात ? मी पाहणी करुन फोटो घेतलेले आहेत.त्यामध्ये एका रुममध्ये खाट टाकलेली आहे, त्यावर रक्ताचे डाग पडलेले आहेत, त्यावर उंदारांच्या लेंडया आहेत, पालीची अंडी आहेत, असे चित्र आपल्याला दिसेल. याचाच अर्थ वॉर्मर वापरले जात नाहीत. अशी अवस्था असेल तर तुमच्या प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये रुग्ण कसे काय येतील ? ही मेळघाटाची परिस्थिती आहे, ही विदभार्ची परिस्थिती आहे, ही वाडा-मोखाड्याची, अक्कलकुव्याची आणि भडगावची परिस्थिती आहे. आज वैद्यकीय शिक्षणमंत्री जरी तेथील असले तरी देखील तेथील परिस्थिती भयानक आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 371 वरील बाब क्रमांक 307च्या संदर्भात मी एवढेच सांगतो की आजही श्वानदंश लसीचे टेंडर कोणाचे घ्यायचे, कोणाकडून लस खरेदी करायची याबाबतीत जी काही मारामारी चाललेली आहे ती बंद करा आणि लोकांना मृत्यूपासून वाचवा. मधल्या काळात ही श्वानदंश लस अजिबात उपलब्ध नव्हती. आता याबाबतीत टेंडर वगैरे पास झालेले आहे. पुढच्या वेळी वैद्यकीय शिक्षणाच्या संबंधातील आणखी घोटाळे मी सांगेन. तोपर्यन्त जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

. --

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 405 वरील बाब क्रमांक 354 मध्ये आश्रमशाळेच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले आणि मी, आम्ही दोघांनी नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील आणि गुजराथ राज्याच्या सीमेवर असलेल्या डांग नावाच्या एका आश्रमशाळेला भेट दिली. त्या भेटीच्या वेळी आमच्या बरोबर एक डॉक्टर होते. त्या डॉक्टरांची प्रकृती पाहिल्यानंतर आम्ही त्यांना त्यांच्या अंगामध्ये रक्त आहे की नाही हे तपासण्यास सांगितले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

दुर्दैवाची गोष्ट आहे. त्या आदिवासी मुलांचे रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण 5 टक्क्यापेक्षाही कमी आहे. गुजराथच्या बॉर्डरवर हे आदिवासी लोक राहतात, त्यांची जर ही परिस्थिती असेल तर याबाबत पुढे काय करता येईल याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 433, पृष्ठ क्रमांक 459 वर वक्फ बोर्डासाठी पुरवणी मागणी सादर केली आहे. वक्फ न्यायाधीकरणातील कर्मचाऱ्यांची पदे अद्याप भरलेली नाहीत. औरंगाबाद येथील वक्फ न्यायाधीकरणामध्ये कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे न्यायाधीकरणाचे कामकाम धिम्या गतीने सुरु आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनी जो तो हडप करण्याच्या शर्यतीत आहे. न्यायाधीकरणामध्ये पदे न भरल्यामुळे तेथे नंगा नाच सुरु आहे. पीठासीन अधिकाऱ्यांना मुंबईहून पाठविण्यात आले आहे. परंतु टाईप करण्यासाठी टंकलेखक नाही. त्यांना पाणी पाजायला चपराशी नाही. इतर गोष्टी सोडूनच द्या. कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे न्यायालयीन प्रक्रिया बंद पडली आहे. ही रिक्त पदे त्वरित भरणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी आम्ही चौकशी केली होती. उर्दू शाळांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी धनादेश देण्याचे काम सुरु आहे. परंतु आमच्या भागातील शाळांना धनादेश का मिळत नाही याची चौकशी केली असता धनादेश लिहिण्यास कर्मचारी नसल्याचे सांगितले गेले. अल्पसंख्याक मंत्रालयात उर्दू शाळांना धनादेश द्यायला कर्मचारी नाहीत, न्यायाधीकरणासाठी कर्मचारी नाहीत. अल्पसंख्याकांची सगळी व्यवस्था डंप करण्याचे काम सुरु आहे का अशी शंका मनामध्ये उत्पन्न होते. वक्त बोर्डाच्या संदर्भात महाराष्ट्रामध्ये वक्फ बोर्ड नियम, 1995 लागू झाल्यानंतर काही दिवसांसाठी मंडळ नियुक्त करण्यात आले. परंतु मंडळाची निवडणूक व्हावयास पाहिजे होती ती अद्यापही झालेली नाही. निवडणूक घेण्यासाठी निधी उपलब्ध आहे. परंतु घोडे कुठे अडले आहे हेच कळून येत नाही. वक्फ बोर्डाच्या जमिनींचे मोठया प्रमाणात घोटाळे सुरु आहेत. या संदर्भात केंद्रीय दक्षता आयोगाने दखल घेतली. परंतु राज्य शासन दखल घ्यायला तयार नाही. मागील अधिवेशनात शासनाने शब्द दिला होता. महाराष्ट्रामध्ये वक्फच्या किती जमिनी आहेत याचा शोध घेऊन सांगितले जाईल असे आश्वासन दिले होते. ती चौकशी कुठे अडली आहे? काम सुरु झाले असेल तर मी शासनाचे अभिनंदन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.....

करतो. परंतु काम सुरु झाले नसेल तर घोडे कुठे अडले आहे? किती प्रॉपर्टीज ट्रेस आऊट झाल्या आहेत हे सभागृहाला सांगितले तर बरे होईल.

सभापती महोदय, बाब क्रमांक 435, पृष्ठ क्रमांक 459 संबंधी मी बोलणार आहे. अल्पसंख्याक समाजाच्या मुलांसाठी शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यात आली आहे. परंतु बँकेत खाते काढल्याशिवाय शिष्यवृत्ती मिळत नाही. महाराष्ट्र बँकेतच खाते उघडण्याची सक्ती केली जाते. त्यामुळे उत्सुकता दिसून येत नाही. कित्येक गावांमध्ये महाराष्ट्र बँकेची शाखा नाही. ज्याठिकाणी महाराष्ट्र बँकेची शाखा नसेल त्या गावामध्ये इतर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यास अनुमती दिली पाहिजे. आज त्या मुलांची जी कुचंबणा सुरु आहे ती थांबली पाहिजे. त्याचबरोबर शिष्यवृत्तीची रक्कम द्यायचे शासनाने कबूल केले आहे. यावर्षी मी अनेक तरुण मुलांची भेट घेतली. उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण घेण्यासाठी शासन शिष्यवृत्ती देत असताना तुम्ही उच्च शिक्षणासाठी प्रवेश का घेत नाही? त्यांच्याकडून उत्तर असे मिळाले की, शिष्यवृत्ती मिळेलच याची खात्री नाही. शासनाकडे रक्कम कमी असल्यामुळे सर्वच मुलांना शिष्यवृत्ती मिळेल याची खात्री देता येत नाही. अल्पसंख्याक समाजाची जेवढी मुले उच्च शिक्षणासाठी अर्ज करतील तेवढया मुलांना शिष्यवृत्ती मंजूर होईल असा निर्णय घेतला पाहिजे. शासनाचा जो उद्देश आहे तो खरा आहे की नाही याची मला माहिती नाही. परंतु ज्या गोष्टीसाठी हा निर्णय घेतला त्या मुलांनी शिकावे असे शासनाला वाटत असेल तर जेवढया मुलांनी अर्ज केला त्या सर्व मुलांना शिष्यवृत्ती मिळाली पाहिजे.

नंतर 4 के.1..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

त्याचबरोबर 6 मे, 2008 रोजी मुस्लीम समाजाच्या आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी मेहमूद उल रहमान यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल दिला की नाही हे मात्र समजले नाही. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी मी विनंती करतो. राज्य आणि जिल्हास्तरीय मॉनिटरिंग कमिट्या नेमण्याचे आश्वासन 21 नोव्हेंबर, 2009 रोजी अल्पसंख्यांक विभागाकडून मिळाले होते परंतु त्याची अमलबजावणी झाल्याचे मात्र दिसत नाही. जर मॉनिटरिंगच होत नसेल तर अमलबजावणी कोण करणार आहे ? हा खरा प्रश्न आहे.

महोदय, अल्पसंख्यांकांसाठी दोन योजना राज्यात आलेल्या आहेत. त्यातील पहिली योजना म्हणजे मुस्लीम समाजाच्या मुलांना पोलीस खात्यात संख्या कमी असल्याने त्यांचे पर्सेंटेज वाढविण्यासंबंधी ही योजना आहे. त्यासाठी जिल्ह्या-जिल्ह्यात पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण वर्ग सुरु केलेले आहेत. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे 100 मुलांना दोन महिन्याच्या प्रशिक्षणाचा, राहण्याचा तसेच जेवणाच्या खर्चासाठी फक्त 5.50 लाख एवढीच रक्कम शासनाकडून या योजनेच्या माध्यमातून दिली जाते. वास्तविक एवढ्या रकमेत दोन महिन्यांचा संपूर्ण खर्च कसा होऊ शकेल हा प्रश्न आहे. म्हणूनच कुठलीही संस्था आनंदाने असे प्रशिक्षण वर्ग घेण्यास तयार नसतात. त्यातूनच प्रशिक्षण न देता जी रक्कम मिळते ती घेण्यावरच अशा संस्थांचा भर असतो. राज्यात ज्या ज्या ठिकाणी असे प्रशिक्षण वर्ग चालू आहेत ते बोगस आहेत. अर्थात सर्वच ठिकाणी बोगस आहेत असे मी म्हणत नाही परंतु हे प्रमाण जास्त आहे. या अनुदानात शासनाने वाढ करावी त्याशिवाय प्रशिक्षण योग्य प्रकारे मिळणार नाही.

त्याचप्रमाणे दै. लोकसत्तामध्ये अल्पसंख्यांकांच्या मुलांना ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण देण्याबाबतची जाहिरात आली होती. त्यानुसार राज्यातील बऱ्याच मुलांनी या प्रशिक्षणासाठी अर्ज केले, काही संस्थांनी टेंडर सुध्दा भरले परंतु त्या प्रशिक्षणाच्या खर्चासाठी फक्त 40 लाख रुपयाचीच आवश्यकता होती, ती रक्कमही दिली गेली नाही. औरंगाबादसारख्या एकट्या शहरात मर्सिडीज बेंझसारख्या 145 गाड्या येत आहेत. एवढे श्रीमंत लोक आपल्याकडे असताना 40 लाख रुपयाचे अनुदान आपण देत नसाल तर ते योग्य नाही. याबाबत शासनाने विचार करणे आवश्यक आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

महोदय, बाब क्र. 437, पृ.क्र. 460-मौलाना अब्दूल कलाम आझाद आर्थिक विकास महामंडळाची परिस्थिती तर चमत्कारिकच आहे. या महामंडळाला शासनाकडून जी रक्कम देण्यात आली ती फक्त निवडणुकीच्या तोंडावरच दिली जाते. गेल्या 10 वर्षांमध्ये या महामंडळाचे जिल्ह्या-जिल्ह्यात कार्यालय सुध्दा होऊ शकले नाही. फक्त निवडणूक आल्यानंतरच पैसे दिले जातात. अशा परिस्थितीत या पैशांचा उपयोग मुस्लीम समाजाच्या भल्यासाठी केला जातो की मते मिळण्यासाठी हा खरा प्रश्न आहे. माझ्या माहितीप्रमाणे या महामंडळाला आतापर्यंत 230 कोटी रुपये मंजूर झाले असून आतापर्यंत 106 कोटी रुपये दिलेले आहेत अशी माझी माहिती आहे. कदाचित ती अपुरी सुध्दा असेल. गेल्या दहा वर्षात एवढी तुटपुंजी रक्कम देऊन आपण अल्पसंख्यांकाचा विकास करायला निघाले हे कितपत योग्य आहे. एका बाजूला ही परिस्थिती तर दुसऱ्या बाजूला मात्र एकट्या मुंबईत, जेथे नांवे सुध्दा मिळत नाहीत त्यांच्या नावाने सुध्दा कर्जाचे वाटप करण्यात आले आहे. दुसरीकडे मात्र चार-चार हजार अर्ज प्राप्त झालेले असताना त्यांच्या अर्जाचा विचार केला जात नाही. विभागाकडून सांगण्यात येते की, धनादेश लिहून तयार आहे. असे धनादेश तयार असताना आठ-नऊ महिने ते मिळतही नाहीत, अशा सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक आहे. अन्यथा केवळ अल्पसंख्यांच्या नावाने पैसा देतो म्हणून सांगायचे आणि प्रत्यक्षात मात्र ज्यांना गरज आहे त्यांना तो दिला जात नाही, याचाही विचार व्हावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त): सभापती महोदय, बाब क्रमांक 71, पृष्ठ क्रमांक 49 वर मी माझे विचार मांडणार आहे. कोकणामध्ये पशुधन फार कमी प्रमाणात आहे. महाराष्ट्राच्या तुलनेत कोकणातील पशुधनाची बेरीज केली तर कोकणामध्ये पशुधन अतिशय कमी प्रमाणात आहे. कोकणातील पशुधन वाढविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने प्रोत्साहन द्यावे अशी आग्रहाची विनंती मी या चर्चेच्या निमित्ताने राज्य शासनाला करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 375, पृष्ठ क्रमांक 424 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. वरिष्ठ महाविद्यालये महाराष्ट्रात मोठया प्रमाणात दिली गेली आहेत. वरिष्ठ महाविद्यालयाचे जे प्रोफेसर्स आहेत त्यांना आपण प्राध्यापक म्हणतो. हे प्राध्यापक पी.एचडी. झालेले, नेट लावून नेट सेट झालेले झालेले आहेत. परंतु संस्था चालक तोकड्या प्रमाणात मानधन देऊन त्यांची सेवा घेतात. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, आपण जसे शालेय धोरणातून "कायमस्वरूपी" शब्द काढला आहे तसाच शब्द वरिष्ठ महाविद्यालयाच्या बाबतीत सुध्दा "कायमस्वरूपी" शब्द काढावा अशी आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, महिला व बालविकास विभागाच्या बाब क्रमांक 407, पृष्ठ क्रमांक 435 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी एक उत्तम अशी सूचना केलेली आहे. महाराष्ट्रात जे बालक आश्रम आहेत त्या आश्रमामध्ये काम करणा-या कामगारांना दर महिन्याला केवळ 1000 ते 1500 रुपये मानधन दिले जाते. आश्रमामध्ये जे कर्मचारी राहतात ते केवळ दीड हजार रुपयाच्या मानधनावर मुलांचे संगोपन करीत असतात. त्यामुळे आश्रमामध्ये काम करणा-या कामगारांना कायमस्वरूपी सेवेमध्ये घ्यावे अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 77, पृष्ठ क्रमांक 55 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. पूर्वी महाराष्ट्र शासनाने क्रीडा धोरण जाहीर केलेले आहे. आशियाई स्पर्धेत भारताने चांगल्या प्रकारची कामगिरी केली असून अनेक सुवर्णपदकांची कमाई देखील केलेली आहे. महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंना घडवायचे असेल तर राज्य शासनाने क्रीडा धोरणामध्ये 100 खेळाडू मागे 1 क्रीडा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले.....

शिक्षकाची नियुक्ती केली तर आज आपल्या ग्रामीण भागातील जे तरुण खेळाडू आहेत त्यांना उत्तम प्रकारचे प्रशिक्षण मिळू शकेल एवढी सूचना करतो व क्रीडा धोरणामध्ये क्रीडा शिक्षकांचा अंतर्भाव करावा एवढे सुचवतो व आपली रजा घेतो.

मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय,सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

बाब क्रमांक 237, पृष्ठ क्रमांक 195- सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग - ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी ज्या विविध संस्था काम करतात त्यांना अनुदान देण्यासाठी 53 लाख 47 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रात प्रामुख्याने बीड जिल्ह्यातून सहा लाख ऊसतोड कामगार स्थलांतरीत होत असतात. त्यांच्या सोबत त्यांची लहान मुले देखील स्थलांतरीत होत असल्यामुळे ती मुले शिक्षणापासून वंचित राहतात. सन 1999 पासून या ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी आश्रमशाळा काढाव्यात अशी मागणी होत आहे. सन 1999 मध्ये तत्कालीन पंतप्रधान माननीय अटलबिहारी वाजपेयी यांचेकडे विविध कामगार संघटनांनी निवेदने दिली होती. तसेच सन 1996 मध्ये तत्कालीन उप मुख्यमंत्री माननीय श्री.गोपीनाथजी मुंडे यांनी देखील निवेदन दिलेले आहे. श्री.बबनराव पाचपुते आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री असताना त्यांनी देखील निवासी आश्रमशाळेस मंजुरी देण्याबाबत निवेदन दिले होते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी देखील राज्य सरकारला आश्रमशाळेस मंजुरी देण्याबाबत सांगितले होते. परंतु त्याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आता जी मागणी करण्यात आलेली आहे ती देखील फार तुटपुंजी आहे. त्या रकमेमध्ये बीड जिल्ह्यातील जवळपास पावणे दोन लाख विद्यार्थ्यांना शिक्षण मिळू शकेल असे वाटत नाही. माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांना आमच्या जिल्ह्याची चांगली माहिती आहे. तेव्हा ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी निवासी आश्रमशाळा सुरु करावी अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 413, पृष्ठ क्रमांक 442- पाणी पुरवठा विभाग - परळी नगरपालिका क्षेत्रामध्ये वैजनाथ येथे 125 मेगावॅट वीज निर्मिती केंद्र आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग या शहरात आहे. जिल्ह्यात एकमेव रेल्वे स्टेशन परळी भागात आहे. परळी भागात एक इंडस्ट्री हब येत आहे. सन 1998 मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने परळी शहरासाठी 32 कोटी रुपयांची पाणी पुरवठ्याची योजना मंजूर केली होती. परंतु निधी अभावी ती योजना बंद आहे. ही योजना सुरु झाली तर परळी शहराला न्याय मिळेल.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची बाब क्रमांक 371, पान नंबर 422 संबंधी मला बोलावयाचे आहे. शासनाने गोंडवाना विद्यापीठास मान्यता दिली आहे व त्यासाठी एक कोटी रुपयांची तरतूद या पूरक मागणीमध्ये केलेली आहे. राज्यामध्ये जो तंत्रशिक्षणाचा अनुशेष आहे तो भरुन काढण्यासाठी तंत्र शिक्षण विद्यापीठ निर्माण करावे असाही राज्य शासनाचा विचार आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला शासानाला अशी विंनती करावयाची आहे की, मराठवाडयातील मागासलेल्या बीड जिल्हयात हे तंत्र शिक्षण विद्यापीठ स्थापन करण्यात यावे. मराठवाडयामध्ये विद्यापीठ वा विद्यापीठाचे उप केंद्र आहे परंतु बीड जिल्हयामध्ये असे एकही विद्यापीठ वा त्याचे उपकेंद्र नाही त्यामुळे तंत्र शिक्षण विद्यापीठ बीड जिल्हयामध्ये स्थापन करण्यात यावे. अशी मी पुन्हा एकदा शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, सहकार आणि पणन विभागाची बाब क्रमांक 366 पान नंबर 416 संबंधी मला बोलावयाचे आहे.केन्द्र पुरस्कृत एकात्मिकृत हातमाग विकास योजनेसाठी ही पूरक मागणी करण्यात आली होती. या चर्चेच्या निमित्ताने मला शासानाला एक विनंती करावयाची आहे की, मराठवाडा विभागातील यंत्रमाग सहकारी संस्थेचा आर्थिक प्रस्ताव राज्य सरकारने केन्द्र सरकारकडे पाठविला आहे परंतु या आर्थिक प्रस्तावाला राज्य शासनाच्या वित्त आणि नियोजन विभागाने मंजूरी न दिल्यामुळे केन्द्र सरकारने पुन्हा तो प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला आहे. सन्माननीय सहकार आणि पणन राज्यमंत्री श्री प्रकाशं सोळंके या ठिकाणी उपस्थित असून त्यांच्याच मतदारसंघातील वडवणी गावात हातमाग कामगार मोठया प्रमाणावर राहतात व त्यांची मोठी वसाहत तेथे आहे. वित्त आणि नियोजन विभागाची मान्यता घेऊन हा प्रस्ताव केन्द्र सरकारकडे पाठविल्यास त्या हातमाग कामगारांना त्याचा फायदा होऊ शकेल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त): सभापती महोदय ,पूरक मागण्यांवरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, ग्राम विकास आणि जलसंधारण विभागाची बाब क्रमांक 219 पान नंबर 179 संबंधी मला प्रथम बोलावयाचे आहे. या पूरक मागण्या अंतर्गत 101 ते 250 हेक्टर पर्यतच्या जुन्ये लहान तलावासाठी किंवा के.टी वेअर बंधा-याच्या दुरुस्तीसाठी ही पूरक मागणी करण्यात आली आहे. मला असे सांगावयाचे आहे की, सांगली जिल्हयातील आटपाटी,कवठेमहांकाळ तसेच सोलापूर जिल्हयातील सांगोला हे कायम दुष्काळी तालुके आहेत आणि या भागातील तालुक्यांमध्ये 15- 20 वर्षा पूर्वी पाटबंधारे खात्याच्या अंतर्गत काही तलाव बांधण्यात आले होते तसेच जलसंधारण खात्याच्या अंतर्गत जलसंधारणाची काही कामे पूर्ण करण्यात आली होती परंतु या तलावामध्ये मोठया प्रमाणावर गाळ साठलेला असल्यामुळे पाणी साठवण्याची क्षमता कमी झालेली आहे. म्हणून जुन्या तलावातील गाळ काढण्याचे काम मोठया प्रमाणावर हाती घेतल्यास पाऊस पडल्यानंतर त्या पाण्याचा साठा या तलावात होऊन दुष्काळी भागातील शेतक-यांना त्या पाण्याचा फायदा होऊ शकेल. असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, कृषी आणि पशुसंवर्धन विभागाची बाब क्रमांक 72, पान नंबर 49 संबंधी मला बोलावयाचे आहे. मध्यंतरी गोवारींचे आंदोलन झाले होते आणि त्यामध्ये काही गोवारी हुतात्मे झाले होते त्यामुळे आदिवासी गोवारी शहीद स्मृती पशुपालन संस्था , नागपूर या संस्थेला पशुपालन करण्यासाठी जागा दिली होती परंतु त्यांना पशुपालन करता आले नाही म्हणून ही जागा आणि संस्था महाराष्ट्र राज्य पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात आली होती. आदरणीय डॉ. नितीन राऊत त्यावेळी या विभागाचे मंत्री होते. या महामंडळाकडे ही संस्था व जागा वर्ग करण्यात आली होती परंतु या संस्थेवर काही कोटी रुपयांचे जे कर्ज होते त्यावरील व्याजाची रक्कम भरण्यासाठी 60 लाख रुपयांची पूरक मागणी करण्यात आली होती. या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला अशी विनंती करावयाची आहे की, ही संस्था महामंडळाच्या ताब्यात देण्यात आली आहे परंतु त्या जागेचा विकास करण्यासाठी व त्या जागेवर फार्म चालविण्यासाठी या महामंडळाला काही खर्च येणार आहे त्या करिता काहीही पैसे देण्यात आलेले नाहीत म्हणून शेळी मेंढी विकास महामंडळासाठी अधिकचा निधी देण्यात यावा त्याचबरोबर या महामंडळाकडे कर्मचारी वर्ग कमी आहे म्हणून. या महामंडळाला संस्थेच्या जागेचा विकास करण्यासाठी तसेच फार्म चालविण्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग देण्यात यावा .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे ....

सभापती महोदय,यानंतर मला पशुसंवर्धन विकास विभागाची बाब क्रमांक 65, पान नंबर 47 सबंधी मला बोलावयाचे आहे. उस्मानाबादी शेळी पैदास विकास केंन्द्राची स्थापना करण्यासाठी 3 कोटी 50 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. मेंढपाळीचा व्यवसाय करणा-या मेंढपाळानां मदत करण्यासाठी शेळी मेंढी विकास महामंडळाला आर्थिक निधी अथवा सहकार्य शासनाने द्यावे याकरता या सभागृहात येण्या पूर्वी रस्त्यावर आणि या सभागृहात आल्यानंतरही सभागृहात सतत संघर्ष केला होता पंरतु आर्थिक निधी वा सहकार्य शासनाने केलेले नाही या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की,1978 पासून 2010 पर्यत 32 वर्षात फक्त दहा कोटी रुपये या महामंडळाला देण्यात आले होते.शेतकरी बांधवांसाठी आणि मेंढपाळ बांधवासाठी या रकमेतून महामंडळाला कोणत्याही प्रकारचे काम करता आले नाही. अनेक वेळा विनंती करुनही या महामंडळाला वाढीव निधी शासनाकडून दिला जात नाही तेव्हा या महामंडळाला अधिक निधी देण्यात यावा अशी माझी शासनाला विनंती आहे. अधिकचा निधी जर या महामंडळाला देण्यात आला तर या महामंडळाच्या माध्यमातून शेतक-यांना वा मेंढपाळांना आर्थिक मदत करता येईल..

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

या सभागृहामध्ये एखाद-दुसरे माननीय सदस्य सोडल्यास मटणाचे भाव कसे वाढावयास लागले आहेत हे वारंवार सांगितले जाते. त्यामुळे त्या विषयामध्ये मी पुन्हा जाऊ इच्छित नाही. परंतु हा भाग अतिशय दुर्लक्षित राहिला आहे. म्हणून माझी आपणास विनंती आहे की, याकडे आपण लक्ष द्यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 248 व पृष्ठ क्रमांक 199 मध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती/भटक्या जमाती विकास महामंडळाला अतिरिक्त भाग भांडवली अंशदान देण्याकरिता 9 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो व शासनाचे आभार मानतो. सभापती महोदय, या भटक्या-विमुक्तांमध्ये अनेक जाती येतात. परंतु कर्ज वाटप करीत असतांना या महामंडळाच्या माध्यमातून भटक्या-विमुक्त जातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात कर्ज वाटप केले जाते काय, सर्व जाती-जमातींच्या लोकांचा त्यामध्ये समावेश केला जातो काय? हे पहाणे आवश्यक आहे. जर त्याप्रमाणे कर्ज वाटप होत नसेल तर त्याप्रमाणे कर्ज वाटप करण्यात यावे अशी विनंती करुन व आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपणास धन्यवाद देऊन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृष्ठ क्रमांक 422 वरील बाब क्रमांक 370 मध्ये अकृषी विद्यापीठाच्या शिक्षक कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम देण्यासाठी 28 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यानिमित्ताने मी एका गंभीर बाबीकडे या सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. जवळ जवळ 1997 सालापासून महाराष्ट्रातील सर्व अकृषी विद्यापीठामध्ये दरवर्षी सॅलरीकरिता ॲडहॉक अमाऊंट दिली जाते आणि वर्षाच्या अखेरीस असेसमेंट होऊन डिफरन्स अमाऊंट काढली जाते. याबाबत सन 1997 पासून आजपर्यंत कोणतेही असेसमेंट न झाल्यामुळे उत्तर महाराष्ट्र विभागामध्ये 10 कोटी रुपये, मराठवाडा विभागामध्ये 22 कोटी रुपये सरकारने देणे आवश्यक आहेत. ही रक्कम जर प्राप्त झाली नाहीतर येत्या नजिकच्या काळात ही विद्यापीठे आपल्या कर्मचाऱ्यांना पगार करु शकणार नाहीत. नुकत्याच लागू झालेल्या सहाव्या वेतन आयोगाच्या फरकासाठी 28 कोटींची तरतूद केली आहे, त्याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. त्याप्रमाणे जेवढी अमाऊंट कमी पडत असेल तेवढी आपण दिली पाहिजे. सर्व विद्यापीठांची ही अमाऊंट जवळ जवळ 100 कोटींच्या आसपास पोहोचली आहे. तेव्हा ती देण्याबाबत सरकारने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 56 व बाब क्रमांक 78 मध्ये प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पायाभूत सोयी निर्माण करण्यावरील खर्च भागविण्यासाठी केंद्र सरकारकडून 744 कोटी रुपये मिळणार आहेत. त्यापैकी 131 कोटी रुपयांचा वाटा राज्य सरकारचा आहे. त्यामधून मुलांना प्राथमिक शिक्षण अधिक चांगल्या दर्जाचे मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपणा समोर सर्व शिक्षा अभियानामध्ये झालेला भ्रष्टाचार आहे. त्यामुळे केंद्र शासनाचे 744 कोटी रुपये व राज्य शासनाचे 131 कोटी रुपये प्राथमिक शिक्षणाचे सबलीकरण करण्यासाठी खर्च करीत असतांना सर्व शिक्षा अभियानामधील भ्रष्टाचार देखील आपण विचारात घेतला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 57 व बाब क्रमांक 83 मध्ये विदर्भातील सहा जिल्हयातील आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शैक्षणिक सवलती देण्याकरिता 14 कोटी 18 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. एका बाजूला ग्रामीण भागातील मुलांना आपण गणवेश, वहया-पुस्तके, पाटया मोफत पुरवितो. इतकेच नव्हे तर मुलींनी शाळेमध्ये नियमित उपस्थित रहावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. चंद्रकांत पाटील....

याकरिता त्यांना अनुदान देतो. असे असतांना आपण हे 14 कोटी 18 लाख रुपये कशावर खर्च करणार आहात? याचा खुलासा झाला पाहिजे. ही रक्कम कमी नसल्यामुळे यामधून आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 92 व पृष्ठ क्रमांक 60 मध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंच्या विकासासाठी 1 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु आंतरराष्ट्रीय स्तरावरील निरनिराळया खेळाडूंना आपण 1 लाख रुपये देऊन काय करणार आहात? हे माझ्या लक्षात आले नाही. आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले खेळाडू चमकत आहेत याचा विचार करता ही रक्कम फार कमी असून त्यासाठी मोठी तरतूद केली पाहिजे. सभापती महोदय, बाब क्रमांक 96 व पृष्ठ क्रमांक 61 मध्ये शासनाने फक्त क्रीडा विद्यापीठाची घोषणा केली आहे. परंतु हे विद्यापीठ कुठे होणार आहे, याचा कोणताही उल्लेख करण्यात आलेला नाही. आज कोल्हापूर शहर हे ज्याप्रमाणे कलेचे माहेरघर आहे त्याप्रमाणे क्रीडेचे सुध्दा माहेरघर आहे. कोल्हापूर जिल्हयामधून खाशाबा जाधव, तेजस्विनी सावंत व राही सरनोबत यांच्यासारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडापटू तयार झाले. त्यामुळे हे क्रीडा विद्यापीठ कोल्हापूरला जाहीर करावे . कोल्हापूर जिल्हयासाठी क्रीडा संकूल मंजूर होऊन सात वर्षे झाली. त्याकरिता 21 कोटी रुपयांची तरतूद केली होती व 16 एकर जागा घेण्यात आली. परंतु त्या संकुलासाठी कंपाऊंड उभारण्यात आले नाही. तसेच या पुरवणी मागण्यांमध्ये क्रीडा संकुलाचा उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 234 व पृष्ठ क्रमांक 193 मध्ये इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी, परीक्षा फीचे प्रदान करण्यासाठी 240 कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

मोठया प्रमाणावर शाळा आणि जी प्रोफेशनल कॉलेजेस् आहेत म्हणजे इंजिनिअरींग, मेडिकल कॉलेज आहेत. त्यामधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी त्या-त्या कॉलेजनां माफ करावी लागते आणि मग शासन त्यांना ती रक्कम रिईम्बर्स्मेंट करते. परंतु गेल्या वर्षामध्ये शासनाकडून या कॉलेजेस्नां फी च्या संबंधात रिईम्बर्समेंट झालेली नाही आणि ती रक्कम एवढी मोठी आहे की, आता त्या कॉलेजेस्नी मागासवर्गीय मुलांना फी शिवाय ॲडमिशन देणे बंद केले आहे. परंतु आता जर आपण जवळजवळ 240 कोटी रुपयांची तरतूद करणार असलो तर संबंधित कॉलेजना रिईम्बर्समेंटची जी रक्कम द्यावयाची आहे, ती देण्याचा विचार केला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, बाब क्र.243 मध्ये पान क्र. 198 वर समाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजनेसाठी 50 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एक वर्ष झाले, परंतु या विषयाच्या अनुषंगाने समित्या स्थापन झालेल्या नाहीत.म्हणून मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की, पूर्वी संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे पदसिध्द अध्यक्ष हे त्या-त्या विधानसभा मतदार संघातील आमदार असावयाचे. त्यानंतर सरकारने नव्याने असा नियम केला की, संजय गांधी निराधार योजनेचे पदसिध्द अध्यक्ष आमदार असणार नाही. आता ही बाब त्या जिल्ह्याचे पालकमंत्री ठरवतील.परंतु नवीन सरकार येऊन एक वर्षे झाले तरी देखील अजून समित्या झालेल्या नाहीत. मात्र दुसरीकडे आपण 50 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत, याकडेही मी आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यामुळे येथे उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांकडे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

. . . .4 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पूरक मांगणी के ऊपर चर्चा करने से पहले मेरा एक पॉइंट ऑफ इन्फोरमेशन है.पछले 4 सालों में पूरक मांगणी पर हमने 4 बार भाषण किया है और उसमें कुछ सुझाव दिए हैं, लेकिन मुझे लगता है कि इसका कोई फायदा नहीं है.बहुत सारे माननीय सदस्यों का यही अनुभव है.2 दिन की बहस के बाद बजट पास हो जाएगा. यहां पर पूरक मांगणी के ऊपर चर्चा करते हुए बहुत से माननीय सदस्यों ने सुझाव दिए हैं.ये सुझाव सभागृह के रिकॉर्ड पर तो आ जाएंगे, लेकिन सरकार के पास इनका कोई रिकॉर्ड नहीं रहता है.एक पैसे का भी इधर-उधर रि-एलोकेट नहीं होगा.इसके बारे में आपको रुलिंग देनी चाहिए.माननीय सदस्य जो सुझाव देते हैं, उसकी दखल लेते हुए या तो इस पूरक मांगणी में चेंज होना चाहिए या फिर कम से कम आने वाले बजट में माननीय सदस्यों द्वारा दिए गए सुझावों के बारे में दखल ली जानी चाहिए, यह मैं आपके माध्यम से सरकार से अनुरोध करता हूँ. पूरक मांगणी पर हुई चर्चा का उत्तर देते समय सरकार की तरफ से माननीय मंत्री महोदय सदन में कहते हैं कि आपने बहुत सुन्दर भाषण किया, लेकिन सरकार कोई दखल नहीं लेती है और उसमें कोई मेटीरियल चेंज नहीं होता है.

सभापति महोदय, सभागृह का समय बचाने के लिए मैं केवल बाब क्रमांक का जिक्र करुँगा, उस बाब क्रमांक के अन्तर्गत दी गई राशि का जिक्र नहीं करुँगा. क्रीड़ा विभाग की बाब क्रमांक 86 से 97 तक पेज नं. 56 पर दी गई हैं.हमारे युवा क्रीड़ा मंत्री यहाँ पर मौजूद हैं. हमारे माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील ने स्पोर्टस यूनिवर्सिटी शुरु करने के बारे में कहा है, इस प्रस्ताव को आप आगे बढ़ाइए. मेरा सुझाव यह है कि स्पोर्टस यूनिवर्सिटी सब से अच्छी लोकेशन पर बनाएं. बहुत सारे खेलों में हमारे महाराष्ट्र के बच्चे अभी आगे आ रहे हैं.उन बच्चों की रुचि के हिसाब से उनके लिए खेल अकादमी बनानी चाहिए.विदर्भ में विशेष रुप से नागपुर और कामठी में राष्ट्रीय स्तर के फुटबाल के खिलाड़ी हुए हैं. यहां पर श्री. नरसय्या और श्री. मुश्ताक जैसे खिलाड़ी हुए हैं. यहां पर फुटबॉल बहुत प्रचलित है, इसलिए यहां के बच्चों को बढ़ावा देने के लिए फुटबाल अकादमी की स्थापना होनी चाहिए.

सभापति महोदय, माननीय सदस्य ने यहां पर कहा कि अन्तर्राष्ट्रीय स्तर पर जो खिलाड़ी भाग लेते हैं, उनको एक लाख रुपए देने का प्रोवीजन आपने अभी किया है.उनको वह पैसा मिलने में 1 साल का समय लग जाता है.आज हालात इस प्रकार के हैं कि अगर किसी खिलाडी को ....

.. . .4 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद जमा . . . .

अन्तर्राष्ट्रीय स्पर्धा में प्रवेश मिल जाता है तो उसके पास वहां जाने के लिए किराया नहीं रहता है.

. . . . भाषण जारी, नंतर देवदत्त.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा . . . .
मेरी यह मांग है कि जो बच्चे इंटरनेशनल लेवल पर खेलों में हिस्सा लेने के लिए बाहर जाना चाहते हैं और अपने खर्च से बाहर नहीं जा पाते, उनको बाहर जाने के लिए सरकार की ओर से पूरा खर्च दिया जाए. उनकी एयर टिकट, लॉजिंग,बोर्डिंग इत्यादि का पूरा खर्च सरकार की ओर से किया जाए. इसके लिए उन्हें कुछ पैसा बाहर जाते समय एडवांस दे दिया जाए और बाकी पैसा उन्हें वहां से वापस आने के बाद तुरंत दिया जाना चाहिए.

सभापति महोदय, मैंने पहले भी कहा था कि सन् 2006 में माननीय मुख्यमंत्री जी ने विशेष बॉब के रुप में खिलाड़ियों के लिए जिस प्रकार की व्यवस्था की थी, उसी प्रकार की व्यवस्था हमें खिलाड़ियों के लिए हमेशा के लिए कर देनी चाहिए.

हमारे 289 माननीय आमदार विधान सभा में और 78 माननीय आमदार विधान परिषद में हैं. इसके अलावा लोक सभा में 48 और राज्य सभा में 22 माननीय संसद सदस्य हैं. यदि विशेष बॉब के रुप में आप सभी आमदारों और खासदारों को अपने फंड से 10-10 लाख रुपए देने की अनुमति एक बार दे दें तो करीब 40-50 करोड़ रुपए जमा हो सकते हैं. इसके अलावा महाराष्ट्र की क्रिकेट एसोसिएशन तथा दूसरे बड़े संघटनों ने भी इस काम के लिए अपना फंड देने की अनुमति दर्शायी है. इसके साथ ही कुछ उद्योगपतियों ने भी पैसे देने के लिए कहा है. इस प्रकार करीब 100 करोड़ रुपए का फंड जमा किया जा सकता है.

मेरा कहना है कि माननीय मुख्यमंत्री जी के स्तर पर यदि एक स्पोर्टस प्रमोशन बोर्ड बना दिया जाए और जमा किए गए करीब 100 करोड़ रुपए के इस फंड को बैंक में रख दिया जाए तो करीब 10-12 करोड़ रुपए हमें हर वर्ष ब्याज के रुप में मिल सकते हैं. जो खिलाड़ी पैसे के अभाव में खेलने के लिए बाहर नहीं जा पाते हैं, हम उन इन्डीविज्वुअल खिलाड़ियों की सहायता ब्याज के इन पैसों से कर सकते हैं. कॉमनवेल्थ गेम्स और हाल के एसियाड गेम्स के बाद इन्डीविज्वुअल एथलीट्स को काफी प्रोत्साहन मिला है.

सभापति महोदय, मंत्री महोदय से एक बात मैं यह भी कहना चाहूंगा कि नागपुर का इन्डोर स्टेडियम बनने में काफी समय जरुर लग गया है. लेकिन अब वह स्टेडियम काफी अच्छा बनकर तैयार हो गया है. मेरा अनुरोध है कि यदि संभव हो सके तो नागपुर के इस अधिवेशन के समाप्त होने से पहले उस स्टेडियम का उद्घाटन कर दिया जाए. धन्यवाद.

(इसके बाद कु. थोरात)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पान क्रमांक 371 ते 377, बाब क्रमांक 306,310,311 या संदर्भात मी बोलू इच्छितो.

सभापती महोदय,सार्वजनिक आरोग्याच्या बाबतीत भरती प्रक्रिया, विविध यंत्रसामुग्री, उपकरणे, मनोरुग्णालयासाठी ट्रॉमा केअर युनिट, वाहन, पेट्रोल इत्यादीच्या तरतुदीसाठी पुरक मागण्या सादर केलेल्या आहेत.

सभापती महोदय, सिंधुदुग जिल्हयाच्या संदर्भात थोडयावेळापूर्वी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उल्लेख केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्यामध्ये लेप्टो स्पायरोसिसमुळे आतापर्यंत 45 रुग्ण दगावलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्यामध्ये हत्तीरोग, डेंग्यू याही साथी आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये असलेल्या एकमेव जिल्हा रुग्णालयात डॉक्टर ते चतुर्थश्रेणीपर्यंत 251 पैकी 87 पदे रिक्त आहेत. प्रत्येक अधिवेशनात आम्ही रिक्त पदे भरण्याची मागणी करतो. सिंधुदुर्ग जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले आहे. पर्यटनाच्या माध्यमातून लोकांनी त्या ठिकाणी यावे आणि तेथील महसूल वाढवा या उद्देशाने शासनाने पर्यटन जिल्हा घोषित केलेला आहे. ज्या जिल्हयाला पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आलेले आहे त्या जिल्हयातील लोक असे आजारपणामुळे मृत्यूमुखी पडत असतील तर तेथे पर्यटक कसे येतील.? सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील आरोग्य यंत्रणेच्या संदर्भातील या बाबी प्रत्येक आदिवेशनामध्ये मांडण्यात आलेल्या आहेत. मागच्यावेळी या सदनामध्ये माननीय आरोग्य मंत्री श्री. शेट्टी साहेबांनी स्वत: सांगितले की, रिक्त पदे भरण्याचा प्रयत्न केला पण सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जाण्यासाठी डॉक्टर तयार नसतात. सभापती महोदय, ही गंभीर बाब आहे. एखादा जिल्हा पर्यटनासाठी घोषित केल्यानंतर त्या ठिकाणी डॉक्टर जाणार नसतील तर मला वाटते या पेक्षा आणखी कोणता जिल्हा चांगला आहे की, त्या ठिकाणी अशा प्रकारच्या सुविधा दिल्यानंतरही डॉक्टर जात नाहीत. म्हणून त्या ठिकाणी डॉक्टर्स जात नाहीत असे म्हणणे कितपत योग्य आहे. पर्यटन जिल्हा घोषित केल्या नंतर तेथील रस्ते,क्रीडा, पर्यटनाच्या बाबतीत मी बोलणारच आहे. पण तेथे कुठलीच व्यवस्था नसल्यामुळे चांगले डॉक्टर्स जात नाहीत. सभापती महोदय, आम्ही ज्या ज्या शासकीय रुग्णालयाला भेटी दिलेल्या आहेत. त्या शासकीय रुग्णालयाची अवस्था अशी आहे की, एखाद्या चांगल्या माणसाला एक रात्र या रुग्णालयातील कॉटवर झोपवले तर तो नक्कीच आजारी पडेल. अशा पध्दतीची ही शासकीय रुग्णालये आहेत. त्या ठिकाणी गाद्या नाहीत. चादरींची व्यवस्था

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर....

नाही. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 20 वर्षे सी.एस. असलेल्या अधिकाऱ्याच्या बदलीच्या बाबतीत आम्ही सूचना केलेली आहे. या सी.एस.नी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये एकच काम केलेले आहे. सर्व लोक आजारी पडले, रोगराई वाढली तरी चालेल पण जे आरोपी असतील मग ते मर्डर केसमधील असतील किंवा इतर कोणतयाही केसमधील असतील त्या आरोपींना कस्टडीतून बाहेर काढायचे आणि जिल्हा रुग्णालयात आणून ठेवावयाचे.....

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

तेवढे फक्त एक काम ते सातत्याने पंधरा वर्षापासून करीत आहेत. मला असे वाटते की, शासनाने त्यांच्यावर जी जबाबदारी दिली आहे ती ते पार पाडत आहेत. अशा प्रकारे त्या जिल्ह्यातून 47 लोक गेल्यानंतर मी तर असे म्हणेन की, एखादा अपघात झाल्यानंतर आपण संबंधित ड्रायव्हरवर निष्काळजीपणाची केस टाकतो पण यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी वारंवार आवाज उठवून देखील शासन त्या ठिकाणी काही करणार नसेल तर याला जबाबदार असणारा प्रशासकीय अधिकारी असेल किंवा आपले मंत्री महोदय असतील त्यांच्यावर सुध्दा मनुष्यवधाच्या गुन्ह्याची नोंद व्हावी जेणेकरुन पुढची येणारी यंत्रणा तरी खडबडून जागी होईल.

सभापती महोदय, सरकारी अनावस्थेमुळे महाराष्ट्रातील ठाणे, पुणे, नागपूर, रत्नागिरी या चार ठिकाणी असलेल्या मनोरुग्णालयांची अवस्था कोंडवाड्यासारखी झालेली आहे. चांगल्या माणसांसाठी असलेल्या जागा तर काढून घेतलेल्याच आहेत पण मनोरुग्णालयांसाठी असलेल्या जागा सुध्दा सोडलेल्या नाहीत. मी एक उदाहरण देईन. येरवडा येथील मानसिक आरोग्य केंद्रासाठी राखीव जमीन वापरात नसल्याचे कारण पुढे करुन आपल्या मंत्रिमंडळातील एका ज्येष्ठ मंत्र्याने त्यांच्याशी संबंधित ज्ञानेश्वरी संस्थेला देण्याचा प्रकार केलेला आहे. यामध्ये भूखंडाचा श्रीखंड खाण्याचा प्रकार झालेला आहे. आपण मनोरुग्णालयासाठी पुरवणी मागणी दाखविली आहे आणि अशा पध्दतीने पुणे येथील मनोरुग्णालयासाठी असलेली जागा लाटली गेली आहे त्याबाबतीत आपण काय कारवाई करणार आहात ? सन्माननीय सदस्य श्री. सय्यद जमा साहेबांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक वेळी आम्ही बोलतो, प्रत्येक गोष्ट निदर्शनास आणून देतो आणि माननीय मंत्री महोदय आपल्या उत्तरामध्ये एवढेच सांगतात की, सन्माननीय सदस्यांकडून चांगल्या पध्दतीच्या सूचना आलेल्या आहेत त्यांचा आम्ही गांभीर्याने विचार करु. मी तर असे म्हणेन की सूचनांचा गांभीर्याने विचार करु नका पण आपल्या निष्काळजीपणामुळे ज्या लोकांना मरण पत्करावे लागते आणि ज्या पध्दतीने भूखंड लाटत आहेत त्यांच्यावर केसेस केल्या पाहिजेत. बाकीचा कारभार चांगल्या पध्दतीने चालू शकेल.

सभापती महोदय, ग्रामीण आरोग्य केंद्रात काम करणाऱ्या 10,535 स्त्री परिचारिकांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन सुध्दा मिळत नाही. उद्योगांमध्ये जर किमान वेतन कायद्यानुसार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/

श्री. किरण पावसकर ....

वेतन मिळत नसेल तर हेच सरकार, हेच कामगार मंत्री त्यांना नोटिसेस देऊन त्यांच्यावर गुन्हे दाखल करतात. मी पुष्कळ कारखान्यांमध्ये पाहिले आहे की, किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळत नसेल तर शासन त्यांच्यावर गुन्हे दाखल करते पण सरकारी यंत्रणेमध्ये 20-25 वर्षे काम करणाऱ्यांना 900 रुपये वेतन मिळते. त्यांच्यावर गुन्हे दाखल करणार आहात काय ? तसेच त्या कर्मचाऱ्यांचे जे नुकसान झालेले आहे त्याची नुकसानभरपाई देणार काय याबाबत शासनाने सांगावे.

सभापती महोदय, यानंतर मला उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या पृष्ठ क्रमांक 167 वरील बाब क्रमांक 199 बाबत बोलावयाचे आहे. लघु,मध्यम, मोठे उद्योग आणि महामेगा प्रकल्पांना प्रोत्साहन रक्कम देण्याकरिता 200 कोटी रुपयांची पूरक मागणी केलेली आहे. केंद्र सरकारच्या 2006-07 च्या लघु व मध्यम उद्योगांच्या सर्वेक्षणात 37,525 उद्योग बंद पडल्याचे आढळून आले आणि त्यामध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे. एकेकाळी उद्योगाच्या बाबतीत पहिल्या क्रमांकावर असलेले राज्य आता उद्योग बंद करण्यामध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य झालेले आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. आता एक मोठा उद्योग चालू झालेला आहे. ठाणे, मुंबई, पुणे, डोंबिवली या ठिकाणी एमआयडीसी विभागामध्ये यापूर्वी आपण शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या त्यावेळी त्यांना सांगितले की, आपल्याकडे औद्योगिकीकरण वाढण्यासाठी जमिनी दिल्या पाहिजेत. शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यानंतर काही ठराविक वर्षे तो कारखाना चालतो आणि आपल्याला जास्त पैसे मिळत आहेत म्हणून तोच कारखाना बंद करुन त्या ठिकाणी मॉल, मल्टीप्लेक्स उभारण्यासाठी डोंबिवलीतील पुष्कळशा कंपन्या बंद करुन जागा विकण्याचा नवीन उद्योग चालू केलेला आहे. ज्यांच्या जागा घेऊन एमआयडीसी उभ्या राहिलेल्या आहेत त्या शेतकऱ्यांच्या जागा त्यांना परत देण्यात याव्यात आणि हा जो नवीन अवजड उद्योग चालू केला आहे तो बंद करावा. मी उदाहरण देऊ शकेन की, रेमंड, एमपीएम अशा काही कंपन्यांच्या संदर्भातील बाब मी माननीय कामगार मंत्र्यांच्या निदर्शनास वारंवार आणून दिलेली होती. हाच उद्योग आता मोठ्या प्रमाणावर चाललेला आहे. त्या ठिकाणी कोणताही नवीन उद्योग येत नाही. या सर्व गोष्टींचा विचार शासनाने करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या बाब क्र.411, पृष्ठ क्रमांक 442 वरील मागणीवर मी माझे विचार मांडत आहे. देवगड तालुक्यातील जामसंडे याठिकाणी शासनाने 1973 साली पाणीपुरवठा योजना केलेली आहे. देवगड सारख्या आंब्याच्या नगरीतील ही पाणीपुरवठा योजना खराब झालेली आहे. ती योजना ताबडतोब बदलण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी शासनाने या पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केलेली नाही. निदान पुढील वर्षी तरी पुरवणी मागण्यांमध्ये निधीची तरतूद करावी अशी मी यानिमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे कणकवली तालुक्यातील नाटळ या गावामध्ये सुध्दा 1997 साली पाणीपुरवठा योजना घेण्यात आली. ती योजना सुध्दा पूर्ण झालेली नाही. 2009 साली ती योजना पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले. या योजनेसाठी सब कॉन्ट्रॅक्टरची नेमणूक करण्यात आली आहे. मेन कॉन्ट्रॅक्टर दुसरे आहेत, त्यांना काळया यादीत टाकले पाहिजे.

सभापती महोदय, वैभववाडी गावामध्ये नळ पाणीपुरवठा योजना घेण्यात आली आहे. त्या योजनेवर 80-90 लाख रुपये खर्च झालेले आहेत. परंतु ती योजना देखील सुरु झालेली नाही. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये कंत्राटदाराची नेमणूक झाली की, तो कंत्राटदार दुस-या कंत्राटदाराकडून कमिशन घेऊन काम देतो. त्यामुळे तो कंत्राटदार निकृष्ट दर्जाचे मटेरियल वापरतो. याबाबत विभागाने पोलीस विभागाकडून चौकशी केली तरी भ्रष्टाचार बाहेर येऊ शकतो. उदा.1 लाखाचे काम असेल तर त्या कामावर केवळ 10-15 हजार रुपये खर्च केला जातो, बाकीच्या पैशामध्ये भ्रष्टाचार होतो. या दोन्ही योजनांमध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. म्हणून मुख्य कंत्राटदारांविरुध्द शासनाने कारवाई करावी अशी मी मागणी करतो आणि येथेच थांबतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2010-11 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पृष्ठ क्र.55, बाब क्र.75 वरील मागणी मांडण्यात आली आहे. प्राथमिक शाळांच्या 1478 वाढीव तुकडयांसाठी सुमारे 15.50 कोटी इतकी तरतूद केलेली आहे. परंतु त्यामध्ये माध्यमिकच्या वाढीव तुकडयांसाठी तरतूद केल्याचे आढळून येत नाही. त्याच्यामध्ये 750 वाढीव तुकडयांसाठी तरतूद व्हावयास पाहिजे होती, ती करण्यात यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.56, बाब क्र.78, तेराव्या वित्त आयोगानुसार येत्या पाच वर्षात प्राथमिक शिक्षणातील पायाभूत सोयींसाठी 744 कोटी रुपये मिळणार आहेत. त्यापैकी यावर्षी 131 कोटी रुपये मिळणार आहेत. हा केंद्र सरकारचा हिस्सा आहे, परंतु राज्य सरकारच्या तरतुदीचा या पुरवणी मागण्यांमध्ये कोठेही उल्लेख झालेला नाही. राज्य सरकार प्राथमिक शिक्षणापासून आपले अंग काढून घेत आहे आणि केंद्र सरकारच्या पैशावर प्राथमिक शाळांचा संसार महात्मा फुले यांचे नाव घेऊन करीत आहे. म्हणून शासनाने आपल्या हिश्याची तरतूद केली पाहिजे अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, यानंतर पृष्ठ क्र.57, बाब क्र.81 वर मी माझे विचार मांडतो. उच्च माध्यमिक पदांसाठी 2004-05 ते 2007-08 पर्यंत 748 जागांसाठी 682 कोटींची तरतूद केली होती. परंतु 2008-09 मधील तुकडयांचा त्यामध्ये समावेश केलेला नाही. या तुकडयांची माहिती आता संकलित झालेली आहे, त्यामुळे त्यासाठी तरतूद करणे आवश्यक होते, ती करण्यात यावी अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.57 वरील बाब क्र.82 वर मी बोलू इच्छितो. साक्षर भारत योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने 5.94 कोटींची तरतूद केलेली आहे. परंतु साक्षर भारत योजनेशी निगडीत असलेल्या निरंतर योजनेचा यामध्ये कोठेच उल्लेख केलेला नाही. केंद्र सरकारच्या निधीतून राज्यातील अनेक जिल्हयात साक्षर भारत योजना सुरु आहे. केंद्राचा पैसा

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.भगवान साळुंखे.....

आला तर ही योजना चालू राहते, नाही तर ठप्प होते. शासन तेवढयाच कालावधीसाठी आपला निधी वापरते आणि केंद्र सरकारकडून आलेला पैसा वळता करण्याचे सौजन्यही राज्य सरकार दाखवित नाही. त्यामुळे केंद्र सरकारची एक चांगली योजना अर्धांग वायू झालेल्या पेशंटसारखी रेंगाळते आहे.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे...

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या पान क्रमांक 58 वरील बाब क्रमांक 85 मध्ये राष्ट्रीय छात्रसेनेचा खर्च भागविण्यासाठी 22 लाखाची तरतूद केलेली आहे. एनसीसीसाठी केन्द्र सरकारकडून आलेले पैसे अजून राज्य सरकारने दिलेले नाहीत. हे पैसे एनसीसी युनिटला द्यावेत अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. महाराष्ट्र छात्र सेनेसाठी 1999पासून सरकारने कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. पूर्वी 9वी पर्यन्तचे विद्यार्थी छात्रसेनेमध्ये घेतलेले जात होते. आता 8वीच्या विद्यार्थ्यांचा देखील छात्रसेनेमध्ये समावेश केलेला आहे. या छात्रसेनेच्या विद्यार्थ्यांना बूट नाहीत, कपडे नाहीत. शिक्षक, कमांडर इत्यांदीच्या बाबतीत न बोललेले बरे. या छात्रसेनेसाठी तरतूद करण्याची नितांत आवश्यकता आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पान क्रमांक 422 वरील बाब क्रमांक 369मध्ये अशासकीय शिक्षण्शास्त्र महाविद्यालयांच्या व अशासकीय अनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या अध्यापक व अध्यापनेत्तर कर्मचारीवर्गाच्या वेतनाचा खर्च भागविण्यासाठी तरतूद केलेली आहे. महाराष्ट्रामध्ये 6 शारीरिक शिक्षण महाविद्यालये आहेत. या शारीरिक शिक्षण महाविद्यालयांसाठी देखील तरतूद करण्याची नितांत आवश्यकता आहे.

बाब क्रमांक क्रमांक 371मध्ये गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने होणा-या कार्यक्रमासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदय श्री. राजेश टोपे यांनी तंत्र विद्यापीठाची घोषणा केली होती. त्यासाठी देखील शासनाने तरतूद करावी, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, सन 2010-2011च्या पुरवणी मागण्यावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पान क्रमांक 452 वरील बाब क्रमांक 419मध्ये दर्शनिका विभागाच्या परिवास्तूच्या दुरुस्तीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. "दर्शनिका विभागाची परिवास्तू" या शब्दांचा अर्थ सांगितला तर बरे होईल. कारण हे शब्द समजण्यास फार अवघड आहेत. याच विभागाच्या बाब क्रमांक 427 ते 432मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीच्या अनुषंगाने मी सांगू इच्छिते की, पु.ल.देशपांडे अकादमीसाठी तरतूद केली ही चांगली गोष्ट आहे. ज्याप्रमाणे पु.ल.देशपांडे अकादमी सुरु करण्यात आली त्याप्रमाणे राम शेवाळकर अकादमी सुरु करण्यासाठी तरतूद करण्याची आवश्यकता आहे. राम शेवाळकर यांनी विदर्भासाठी आणि महाराष्ट्रासाठी मोठे योगदान दिलेले आहे. म्हणून पु.ल.अकादमीच्या धर्तीवर नागपूरमध्ये राम शेवाळकर अकादमी सुरु करावी अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करते.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य आणि आदिवासी विकास या तिन्ही विभागाच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, या विभागांसाठी पुरवणी मागण्याच्या माध्यमातून कोटयवधी रुपयांची तरतूद उपलब्ध होते. परंतु त्या विभागांच्या स्वत:च्या ज्या मालमत्ता आहेत त्या सुरक्षित आहेत की नाहीत हे पाहिले जात नाही. चेंबूर येथे सामाजिक न्याय विभागाचे भिक्षेकरी गृह ही वास्तू आहे. आज त्या भिक्षेकरी गृहाची जागा खाजगी विकासक आपल्या खिशात घालण्याचा प्रयत्न करीत आहे. त्या भिक्षेकरी गृहामध्ये राहाणा-या भिक्षेक-यांना, महिलांना हाकलून दिले जाते. तेव्हा याबाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी माझी सूचना आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी उल्लेख केलेला आहे. मनोरुग्णांचे पुनर्वसन करण्याकरिता वापरावयाची 5 एकर जागा पुण्याच्या जिल्हाधिका-यांनी एक तर्फी निर्णय घेऊन ज्ञानेश्वरी शिक्षण संस्थेला दिली.

..नंतर श्री. भोगले.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

मला वाटते महाराष्ट्रात किंवा देशात नव्हे तर मनोरुग्णांच्या नातेवाईकांनी पुण्यामध्ये प्रचंड मोर्चा काढला आणि आमच्या जमिनी बळकावल्या जाऊ नयेत अशी मागणी केली. आम्हाला संरक्षण द्या अशी मागणी केली. ही सरकारचीच जबाबदारी आहे.

सभापती महोदय, आदिवासी कल्याणाच्या संदर्भात बोलत असताना लवासा प्रकल्पामध्ये आदिवासींच्या जमिनी संपादित करुन त्या हस्तांतरित केल्या गेल्या. त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी कोणावर आहे? कोट्यवधी रुपयांची तरतूद केली जाते आणि योजना राबविल्या जातात. त्या योजनांमध्ये असे फेरफार करुन अनियमितता केली जाणार असेल तर आदिवासींचा कोणी वाली नाही. मुळशी तालुक्यातील आदिवासी झिरो होणार आहेत. त्यांच्याकडील जमिनींवर अतिक्रमणे होत आहेत. त्या जमिनींचे संरक्षण केले नाही तर विभागाचे मंत्री काय न्याय देणार?

सभापती महोदय, आदिवासी कल्याण विभागाच्या संदर्भात हवाई प्रवासी कक्ष यांच्यासाठी प्रशिक्षण देण्याची योजना पुन्हा सुरु करण्यात येत आहे. या योजनेचे आम्ही स्वागत करीत आहोत. परंतु देखरेख व्यवस्थित झाली पाहिजे. अन्यथा सौंदर्याच्या निकषामध्ये या आदिवासी मुलींना पुन्हा जंगलामध्ये पाठविण्याची वेळ येईल.

सभापती महोदय, कामगार विभागाच्या संदर्भात बोलत असताना बाल कामगार प्रथा आणि घरेलू कामगारांच्या संदर्भात मागील दोन वर्षे नागपूरच्या अधिवेशनात आश्वासने दिली गेली. महामंडळाची निर्मिती करु, कामगार कल्याणासाठी निधी देऊ असे सांगण्यात आले. परंतु प्रत्यक्षात एका पैशाची तरतूद केली गेली नाही किंवा अंमलबजावणी देखील झालेली नाही. कामगार कल्याण मंडळावर अद्याप नियुक्ती झालेली नाही. मंत्रीमहोदय याठिकाणी उपस्थित आहेत. त्यांचा होकार कळला हे ठीक झाले. घरेलू कामगारांच्या प्रश्नांसाठी तरतूद करणे गरजेचे होते.

सभापती महोदय, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये अनेक खेळाडूंनी चांगल्या प्रकारचे पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांचे संवर्धन करण्यासाठी क्रीडा मंत्र्यांनी लक्ष घातले पाहिजे. शासनाने राष्ट्रकुल स्पर्धांसाठी जो निधी दिला त्याचा हिशोब मागण्याची जबाबदारी तुमच्यावर आहे. अन्यथा ज्या चौकशा होत आहेत त्यामध्ये महाराष्ट्र शासनाने दिलेल्या पैशाचा हिशोब लागला नाही म्हणून शेवटी महाराष्ट्र सरकारची चौकशी होऊ शकते याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, महिला व बालविकास विभाग आता माननीय मंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्याकडे आलेला आहे. त्यांची कॅबिनेट मंत्री म्हणून निवड झाल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. तत्कालीन महिला व बालविकास मंत्री श्री.सुभाष झनक यांनी एक अत्यंत भयानक असा सैतानी निर्णय घेतला. 1500 कोटी रुपयांचा रेडिमेड फूड पुरविण्याचे कॉन्ट्रॅक्ट महिला बचत गटाऐवजी खाजगी पुरवठादारांना देण्याचा निर्णय घेतला. महिला संघटनांनी या निर्णयाविरुध्द कोर्टात धाव घेतली आहे. रेडिमेड फूड फक्त व्यापारीच चांगल्याप्रकारे बनवू शकतात म्हणून त्यांनी खाजगी व्यापाऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट दिले आहे. त्या संदर्भात चौकशी करुन हे कॉन्ट्रॅक्ट रद्द करावे आणि महिला बचत गटांना हे कॉन्ट्रॅक्ट मिळाले पाहिजे अशी मी मागणी करते.

महिला संरक्षण अधिकारी आऊट सोर्स करणार असे यापूर्वीच्या महिला व बालविकास मंत्र्यांनी जाहीर केले होते. 404 बाबीनुसार कौटुंबिक संरक्षण अधिकारी नेमण्याची तरतूद केली आहे. परंतु त्यांच्या प्रशिक्षणाची गरज आहे. माविमला बचत गटाची नोडल संस्था म्हणून जाहीर करण्याचे काम केले पाहिजे.

सभापती महोदय, ऊस तोड कामगारांसाठी सामाजिक न्याय विभागाने स्वयंसेवी संस्थांना अनुदान दिले आहे. फार मोठया प्रमाणात ऊस तोड कामगारांपर्यंत या स्वयंसेवी संस्था पोहोचू शकत नाहीत. त्यांच्यावर मर्यादा आहेत. ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी मोठया प्रमाणात वसतिगृहे काढणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, शाहीर विठ्ठल उमप यांचे नुकतेच नागपूर येथील दिक्षा भूमीवर निधन झाले. अधिवेशनात त्यांच्या निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव मांडला गेला नाही.

उपसभापती : याबद्दल गैरसमज नसावा म्हणून मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शाहीर विठ्ठल उमप यांच्या निधनाबद्दल जो शोकप्रस्ताव घ्यायचा आहे त्या संदर्भात पुढील कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे गैरसमज नसावा.

डॉ.नीलम गोऱ्हे : अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विषय उपस्थित झाला होता. शोक प्रस्तावाच्या वेळी वेगळे काही बोलावयाचे नाही म्हणून आम्ही शाहीर विठ्ठल उमप यांच्याबद्दल बोललो नाही तर आमचे कर्तव्य कमी पडले असा अर्थ होतो, त्यामुळे आमची नाराजी आहे. त्यांना श्रध्दांजली अर्पण करणे त्याचबरोबर शाहिरांबाबत जे अनिर्णित प्रश्न आहेत त्याकडे शासनाने लक्ष द्यावे, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करते.

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलत असताना प्रामुख्याने पान क्र. 50, बाब क्र. 73-मत्स्यव्यवसाय विकास विभागासंबंधी माझे विचार मी व्यक्त करीत आहे. आजच या सभागृहात अवकाळी पावसावर चर्चा झाली व त्या अनुषंगाने माननीय उप मुख्यमंत्र्यांनी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी 1000 कोटी रुपये देण्याची घोषणा केली. त्याच धर्तीवर मच्छिमारांचाही विचार होणे आवश्यक आहे. अवकाळी पावसामुळे राज्यातील शेतीचे नुकसान झाले ही गोष्ट खरी आहे परंतु त्याचबरोबर गेली पाच वर्षे सातत्याने मत्स्योत्पादन कमी कमी होत असल्याने मच्छिमारांचे सुध्दा मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. त्यांनी जिल्हा बँकेकडून जी कर्जे घेतली आहेत त्याचा भरणा करता आला नाही म्हणून त्यांना 101 च्या नोटिसा दिलेल्या आहेत. माझी मागणी अशी आहे की, संकटात सापडलेल्या मच्छिमारांना सुध्दा, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना मदत देण्याचे धोरण शासनाने घेतले त्यात या मच्छिमारांचाही समावेश करावा व त्यांची जुनी कर्जे माफ करावीत, चालू कर्जावरील व्याज माफ करावे व त्यांना दिलेल्या नोटिसांवरील कारवाई थांबवावी.

महोदय, पृ.क्र. 374, बाब क्र. 394-क्ष किरण यंत्रे खरेदी करण्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, "क्ष" किरण यंत्रे खरेदी करीत असताना त्यासाठी लागणारा टेक्नीकल स्टाफ सुध्दा भरण्याची गरज आहे. अशाच प्रकारचे सी.टी. स्कॅन मशीन चालविण्यासाठी रेडिऑलॉजिस्टची नेमणूक केली नसल्याने ते मशीन पडून आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रेडिऑलॉजिस्टचे पद नसल्याने सातत्याने मागणी केल्यानंतर आपण मंत्री असताना कोल्हापूरहून आठवड्याला एक दिवस रेडिऑलॉजिस्ट येईल असे आश्वासन दिले होते. तरी देखील तीन महिन्यांपासून हे मशीन बंदच आहे, कारण तेथे कोणी पेशंट जातच नाही त्यामुळे आरोग्य यंत्रणेचे तीन-तेरा वाजले. आमच्याकडे लेप्टोस्पायरेसिस नावाचा रोग गेल्या अनेक वर्षांपासून दरवर्षी येतो. खरे तर त्याबाबत संशोधन होणे आवश्यक आहे. हा रोग कोणत्या जनावरांमुळे होतो याचे संशोधन होऊन उपाययोजना करण्याची गरज आहे. कारण असा लेप्टोस्पायरोसिस आल्यानंतर तात्पुरती यंत्रणा पाठवून उपाययोजना केल्या जातात. मघाशी सांगितल्याप्रमाणे या जिल्ह्याचे सिव्हील सर्जन श्री. कुलकर्णी हेच या सर्व गोष्टींना कारणीभूत आहेत. जिल्ह्यात एकमेव ऑर्थोपेडिक तज्ज्ञ असल्याचे दाखवून आपण मोठे काही तरी करीत असल्याचा आभास ते निर्माण

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

करीत आहेत. आरोग्य यंत्रणेला जेथे वापरायला पाहिजे तेथे वापरले जात नाही, त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यांनी एका वृत्तपत्रात असे वृत्त दिले होते की, "सांगा, कसे चालवू जिल्हा रुग्णालय ?" असा लेख देऊन एक प्रकारे आरोग्य यंत्रणेची खिल्लीच त्यांनी उडविली म्हणून अशा अधिकाऱ्यांची ताबडतोब बदली केली पाहिजे. वास्तविक नियमानुसार तीन वर्षानंतर कोणत्याही शासकीय अधिकारी वा कर्मचाऱ्याची बदली केली जाते परंतु आमचे सिव्हील सर्जन मात्र 20 वर्षांपासून सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहेत, त्यांची बदली केली जात नाही. वास्तविक त्यांना सर्वच अधिकारी व डॉक्टर्स सुध्दा कंटाळलेले आहेत. त्यांची तीन वेळा बदली सुध्दा झाली परंतु तरीही ते तेथेच कार्यरत आहेत. अशा अधिकाऱ्यांना हाकलून दिल्याशिवाय आरोग्य यंत्रणेत सुधारणा होणार नाही. तसचे माननीय आरोग्य मंत्र्यांना माझी विनंती आहे की, जिल्हा रुग्णालयात रिक्त असलेली चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे ताबडतोब भरण्यात यावीत. ही पदे भरण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले पण अद्यापही ही पदे भरण्यात आली नाहीत, ती ताबडतोब भरावीत, अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर....

सभापती महोदय, जलस्वराज्याच्या संदर्भात बाब क्रमांक 411, पृष्ठ क्रमांक 442 वर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. जलस्वराज्याच्या प्रकल्पाबाबत सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक तक्रारी निर्माण झालेल्या आहेत. फोंडयामध्ये सुध्दा जलस्वराज्याच्या तक्रारी निर्माण झालेल्या आहेत. वरोडा येथे सुध्दा जलस्वराजाच्या तक्रारी आहेत. वैभव वाडीतील काळपे, आचिर्ने, नावळे, खांबाळे या गावातील जलस्वराज्याच्या कामामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात तक्रारी निर्माण झालेल्या आहेत. ब-याच ठिकाणी समितीच्या बैठका न होता पैसे काढले गेले असल्यामुळे यासंदर्भात सविस्तर चौकशी होऊन दोषींवर कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागावर मी आता माझे विचार व्यक्त करणार आहे. यवतमाळ जिल्हयातील आर्णी येथे शिरामजी मोघे आश्रम शाळेला अमरावतीच्या अप्पर आयुक्तांनी भेट दिली असता रात्रीच्या वेळी 357 मुलांपैकी केवळ 57 विद्यार्थी उपस्थित असल्याचे आढळून आले होते व 300 विद्यार्थ्यांचे अनुदान संस्था लाटत असल्याचे उघड झाल्यामुळे यासंदर्भातील शेरा अप्पर आयुक्तांनी शेरे बुकात लिहिला आहे. त्या ठिकाणचे गोडावून चेक केले असता त्या गोडावूनमध्ये धान्य नसल्याचे आढळून आले आहे. तसेच या आश्रमशाळेची इमारत योग्य नसल्याचा शेरा अप्पर आयुक्तांनी शेरे बुकात नोंदवला आहे. त्यामुळे याबाबत संपूर्ण चौकशी होऊन दोषींवर कारवाई होण्याची नितांत आवश्यकता आहे.

आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पुरवणी अर्थसंकल्पावर माझे विचार मांडत असतांना बाब क्रमांक 87, पृष्ठ क्रमांक 59 वर मी प्रथम विचार व्यक्त करीत आहे. राष्ट्रीय स्पर्धेत पद विजेत्यांना रोख रक्कम 2 कोटी 38 लक्ष, 19 हजार रुपये महाराष्ट्र सरकारने दिल्याबद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करतो. महाराष्ट्र सरकारने क्रीडा विषयाच्या संदर्भात तालुका आणि जिल्हा संकुलाचे धोरण जाहीर केले होते परंतु हे धोरण थंडया बस्त्यात पडलेले आहे. अनेक तालुक्यांना या बाबत निधी सुध्दा दिला गेला नाही. आमगाव तालुक्यात 1 कोटी 23 लक्ष रुपयांचे बजेट तयार झाले होते. या तालुका संकुलाला 10 लक्ष रुपयांचा निधी स्थानिक आमदार निधीतून देण्याचा मी प्रयत्न केला होता परंतु नियोजन अधिका-यांनी सांगितले की, अशा प्रकारचा निधी क्रीडा संकुलाला आपल्याला देता येणार नाही. स्थानिक आमदार निधी क्रीडा संकुलाला देता येत नाही ही खेदाची बाब आहे. गावापासून, तालुक्यापासून, राज्यापर्यंत खेळाडू निर्माण करण्यासाठी शासन योजना राबवते परंतु नियोजन अधिकारी आणि जिल्हाधिकारी म्हणतात की, स्थानिक आमदार निधीतून क्रीडा संकुलाला निधी देता येत नाही त्यामुळे माननीय क्रीडा मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, क्रीडा संकुलाला स्थानिक आमदार निधी उपलब्ध होण्यासाठी त्वरित जी.आर.काढण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 83, पृष्ठ क्रमांक 57, शालेय शिक्षणावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. विदर्भातील जिल्हयांतील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी 14 कोटी 18 लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. अनेक खेडया-पाडयात आपले विद्यार्थी शिक्षण धेत आहेत व त्यांना शिष्यृत्ती बँकेच्या माध्यमातून देत आहोत. परंतु गोंदिया जिल्हयातील 40 हजार विद्यार्थ्यांचे अद्याप बँकेत खाते उघडले गेले नाही. विना अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षकांना शिक्षण अधिका-यांनी आदेश दिले आहेत की, तुम्ही विद्यार्थ्यांचे खाते बँकेत उघडले नाही तर तुमचे वेतन थांबविले जाईल. सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांचे हे अधिकारी वेतन कसे काय थांबविणार आहे हे आम्हाला तरी काही कळत नाही. हा जो घोळ आहे तो आपण थांबवला पाहिजे. विद्यार्थ्यांना त्यांची शिष्यवृत्ती त्यांच्या खात्यापर्यंत पोहचविण्यासाठी काही

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

कालावधी लागण्याची शक्यता आहे कारण सर्वच खेडयापाडयांमध्ये काही बँकाची सोय नाही त्यामुळे यासाठी थोडा फार कालावधी लागणार आहे. परंतु सर्व विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडले जातील याची काळजी शासनाने घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 306, पृष्ठ क्रमांक 306, आरोग्य सेवेवर माझे विचार व्यक्त करणार आहे. 72 लक्ष रुपयांची तरतूद 2171 पदे भरण्यासाठी करण्यात आलेली आहे. गोंदिया नक्षलग्रस्त जिल्हा आहे. या जिल्हयाला अजूनपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक मिळालेला नाही. या ठिकाणी टेंपररी काम सुरु आहे. त्यामुळे गोदिया जिल्हयाला जिल्हा शल्य चिकित्सकाचे पद तातडीने भरले जावे अशी शासनाला विनंती करतो. या ठिकाणी श्रेणी 1 च्या 14 डॉक्टर्सचीपदे रिक्त आहेत.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

ही श्रेणी-1 मधील डॉक्टरांची 14 पदे तातडीने भरुन या नक्षलग्रस्त जिल्ह्यास न्याय द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आरोग्य सेविकांच्या मुलाखतींवर स्थगिती दिलेली आहे. या आरोग्य सेविकांची गरज असल्यामुळे त्यांच्या मुलाखतीवरील स्थगिती उठवून ती पदे लवकर भरण्यात यावीत अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 403, पृष्ठ क्रमांक 435-महिला व बाल विकास विभाग - शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहाकरिता स्वंयसेवी संस्थांना अतिरिक्त सहाय्य अनुदान देण्यासाठी 2 कोटी 67 लाख लाख इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. हे अनुदान मिळताना अनेक अडचणी येतात. शेतकऱ्यांच्या पाल्यांना डोमिसाईल सर्टीफिकेट सहज उपलब्ध होत नाहीत. यामुळे अनेक कुटुंबातील मुली या अनुदानापासून वंचित राहत आहेत. यासाठी तहसीलदार किंवा सक्षम ग्रामपंचायतीने डोमिसाईल सर्टीफिकेट दिले तर ते ग्राह्य धरुन संबंधितांना अनुदानास पात्र धरले पाहिजे. शेतकऱ्यांच्या पाल्यांना डोमिसाईल सर्टीफिकेट मिळविण्यासाठी किती त्रास होतो याची आपणा सर्वांना कल्पना आहे. महाराष्ट्राच्या सीमेला लागून मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, गुजरात व कर्नाटक या राज्यांचा सीमा आहेत. या सीमेनजिक राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या पाल्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. कारण अनुदानास पात्र होण्यासाठी नवरा-नवरी महाराष्ट्रातील असली पाहिजे अशी अट आहे. तेव्हा याबाबत देखील विचार विचार करुन ही अट शिथील करुन त्यांना देखील अनुदान द्यावे अशी माझी मागणी आहे.

बाब क्रमांक 376, पृष्ठ क्रमांक 424- उच्च व तंत्र शिक्षण विभाग - कला, विज्ञान, वाणिज्य व विधी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी 289 कोटी 20 लाख इतक्या रकमेची मागणी केलेली आहे. माध्यमिक विभागामध्ये 300 च्या मुली असतील तर त्याठिकाणी शारीरिक शिक्षण विषयासाठी महिला शिक्षिकेची नियुक्ती केली पाहिजे. युजीसीमध्ये देखील या गोष्टीचा अंतर्भाव व्हावा. शासनाने देखील ही बाब मान्य करावी. त्याचप्रमाणे अनेक मुली अर्थशास्त्र विषय घेतात आणि त्या विषयाचे प्राध्यापक महिलाच असते. तेव्हा त्याठिकाणी सुध्दा परिचारिकेचे पद महिलांसाठी राखीव ठेवावे अशी माझी मागणी आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.....

बाब क्रमांक 350, पृष्ठ क्रमांक 400-आदिवासी विभाग - शिष्यवृत्ती व विद्यावेतन देण्यासाठी रुपये 1,80,00,00,000 /- इतक्या रकमेची मागणी करण्यात आली आहे. राज्यातील इयत्ता पहिली ते दहावीत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीसाठी अनुदानाची तरतूद केलेली आहे. या योजनेनुसार पहिली ते चौथीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांला दरवर्षी एक हजार रुपये तर इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी दीड हजार रुपये तर इयत्ता आठवी ते दहावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याला दरवर्षी दोन हजार रुपये देण्यात येतात. माझी या निमित्ताने मागणी आहे की, त्याठिकाणी शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि त्यांना शिकविणारे शिक्षक यांच्या मूलभूत अडचणी विचारात घेतलेल्या नाहीत. त्यांच्या वेळापत्रकामध्ये बदल करावा असा आग्रह मी यापूर्वी वारंवार केलेला आहे. आदिवासी विभागाच्या मंत्रिमहोदयांनी ही मागणी मान्य करुन यामध्ये सुधारणा करण्यात येईल असे सांगितले होते. परंतु अद्यापपर्यंत कोणतीही सुधारणा झालेली नाही. तेव्हा त्यांच्या वेळापत्रकामध्ये दुरुस्ती करावी अशी माझी मागणी आहे. अत्यंत थोड्या वेळात मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, वस्त्रोद्योग विभागाच्या पुरवणी मागण्यांमध्ये बाब क्रमांक 363- रेशीम किडे कोश खरेदी करण्यासाठी व रोगमुक्त उबवणी पेट्या पुरविण्यासाठी 2 कोटी 10 लाख रुपयांची मागणी करण्यात आलेली आहे.

बाब क्रमांक 365 दिनदयाळ हातमाग प्रोत्साहन योजनेकरिता 16 लाख 23 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आलेली आहे.

बाब क्रमांक 366 केंद्र पुरस्कृत एकात्मीकृत हातमाग विकास योजनेसाठी 36 लाख 83 हजार इतक्या रकमेची मागणी करण्यात आली आहे.

वरील पुरवणी मागण्यांवर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी यंत्रमागचे प्रस्ताव केंद्र सरकारच्या एनसीडीसीकडे पाठविण्यात यावेत अशी मागणी केली. त्याबाबत सांगू इच्छितो की,राज्याचे वस्त्रोद्योग धोरण नजिकच्या भविष्य काळामध्ये जाहीर होणार आहे. तेव्हा तसा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणून....

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके ....

या संदर्भातील यंत्रमागासाठी ज्या काही योजना आहेत त्या पुन्हा नव्याने सुरु करण्याच्या बाबतीत निश्चितपणाने विचार केला जाईल. या व्यतिरिक्त इतर सन्माननीय सदस्यांनी या विभागाच्या पूरक मागण्यांवर आपले मत मांडलेले नाही तरी या विभागाच्या पूरक मागण्या मान्य कराव्यात अशी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय,पाणी पुरवठा स्वच्छताा विभागाच्या पूरक मागण्यांवर सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे विजय सावंत, परशुराम उपरकर यांनी आपले विचार मांडले आहेत. सन्माननीय सदस्या ॲड उषा दराडे यांनी वैयक्तिक शौचालयाबद्दल तसेच केज मधील पाणी पुरवठा योजनेबद्दल उल्लेख केला होता. सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी परळी वैजनाथ येथील मजीप्राच्या रखडलेल्या पाणी पुरवठा योजनेसंबंधी उल्लेख केला होता. याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, ही माहिती ताबडतोब तपासून घेऊन सध्या या योजनेचे काम कोणत्या स्टेजवर आहे त्यासबंधीची माहिती त्यांना देण्यात येईल.सन्माननीय सदस्य श्री. विजय सावंत यांनी देवगडच्या जुन्या पाणी पुरवठा योजनेसंबंधीचा उल्लेख केला होता. तसेच कणकवली पाणी पुरवठा योजनेमध्ये भ्रष्टाचार झ ाल्याचाही त्यांनी उल्लेख केला होता. ही बाब तपासून घेऊन निश्चितपणे योग्य ती कारवाई करण्यात येईल सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी जलस्वराज्य योजनेच्या समितीच्या मार्फत योजनेची कामे अनेक गावात काम पूर्ण होत नाहीत असा उल्लेख केला आहे याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, जलस्वराज्य योजना आता बंद झाली आहे. परंतु आपण सांगितल्याप्रमाणे काही ठिकाणी जर गैरव्यवहार झाला असेल तर ते मी स्वत: तपासून त्याची माहिती देईल आणि जर कोणी दोषी आढळून आला तर त्याच्यावर कारवाई करीन एवढी मी आपल्याला ग्वाही देतो.पाणी पुरवठा विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण व सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय,शालेय शिक्षण विभागाची बाब क्रमांक 75 ते 84 व 97 तसेच अल्पसंख्याक विभागाची बाब क्रमांक 433 ते 437 आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची बाब क्रमांक 306 ते 315, 322,323 या सर्व बाबींवर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी तसेच अन्य सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, तुकडयांचे अनुदान प्राथमिक स्तरावर देण्यात येते त्याप्रमाणे माध्यमिक स्तरावर देखील अनुदान देण्यात यावे.माध्यमिक शाळेला अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून त्यावरील प्रक्रिया पूर्ण् केली जाणार आहे. एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे. त्याचबरोबर उपस्थित भत्याच्या बाबतीत देखील या ठिकाणी विचारणा करण्यात आली आहे त्याबाबत मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, वित्त विभागाने मान्यता दिल्यानंतर उपस्थिती भत्ता देण्यात येईल. त्याचबरोबर सैनिकी शाळेत एमबीएसाठी 5 लाख रुपये देण्यात येतात ते अन्य सैनिक शाळांना सुध्दा देण्यात येणार आहे काय याबाबतीत देखील विचारण्यात आले आहे. ही धोरणात्मक बाब असल्यामुळे त्यावर विचार करण्यात येईल. विदर्भातील शेतक-याच्या किती मुलींना पैसे वाटण्यात आले आहे असे विचारण्यात आले आहे. त्याची माहिती देखील माझ याकडे आहे परंतु ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती महोदय, कळमनुरी येथील निवासस्थानासाठी निधी देण्यात यावा असे लेखी कळवून सुध्दा निधी देण्यात आला नाही असा सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यासाठी एक हजार रुपयाची टोकन ग्रॅट मंजूर करण्यात आली असून 2010-2011साठी राज्यासाठी जी तरतूद करण्यात आली आहे त्यातून या कामासाठी निधी देण्यात येईल. त्याचप्रमाणे त्यांनी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी रिक्त पदे भरण्यासबंधीचा मुद्दा उपस्थित केला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत मला त्यांना असे सांगावयाचे आहे, अनेक प्रकारची पदे रिक्त असून ....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा. फौजिया खान...

काही उमेदवारांचे एम.पी.एस.सी. कडे नॉमिनेशन करावयाचे होते तर काहींचे प्रमोशन करावयाचे होते. ही सर्व प्रक्रिया गतिमान करण्याचा प्रयत्न माझ्या विभागाकडून सुरु आहे. याबाबत सविस्तरपणे सभागृहामध्ये सांगणे शक्य नसले तरीसुध्दा हे काम वॉर फुटींगवर करण्याचा आपण प्रयत्न करीत असल्यामुळे ते काम लवकरात लवकर होईल.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी राजीव गांधी जीवनदायी योजनेबाबत विचारले होते. त्याबाबत प्रगती झाली असून दिनांक 5 मे 2010 च्या शासन निर्णयानुसार सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. त्याकरिता ओळखपत्र आणि हेल्थ कार्ड देण्याकरिता विमा कंपन्यांची नियुक्ती करण्यासंदर्भात जी.आर. काढण्यात आला आहे. तसेच, बीट डॉक्युमेंट तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. या मागण्यांवरील चर्चेमध्ये डॉ. दीपक सावंत यांनी अनेक मुद्दे उपस्थित केले असल्यामुळे त्या सर्व मुद्यांना मी उत्तरे देऊ शकत नाही. परंतु ज्यांच्या बाबतीत तक्रारी करण्यात आल्या आहेत अशा मुद्यांना मी उत्तरे देण्याचा प्रयत्न करते. यामध्ये त्यांनी आदिवासी विकास विभागाचा 38 कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक आरोग्य विभागाने खर्च केल्याचे म्हटले आहे. हा निधी संपूर्ण राज्यासाठी खर्च करण्यात आला आहे. या निधीच्या वाटपामध्ये काही कमतरता राहिली असेल तर त्याबाबतची माहिती घेऊन जरुर तपासणी करण्यात येईल.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लॅप्टो स्पायरोसिसच्या साथीबद्दल बरीच चर्चा करण्यात आली. शासनाच्या दृष्टीने हा गंभीर स्वरुपाचा मुद्दा आहे. शासनाने त्यासाठी खूप प्रयत्न केले आहेत. त्या जिल्हयाला अनेक लोकांनी भेटी दिल्या आहेत. मिरजच्या मेडिकल कॉलेजच्या टीमने भेट दिली आहे. तसेच, नॅशनल इंस्टिटयूट, पुणे यांनी सुध्दा भेट दिली आहे. नॅशनल कम्युनिकेबल डिसिज या संस्थेचे तज्ज्ञ सुध्दा भेट देणार आहेत. या सर्व डॉक्टर्सना त्याठिकाणी डेप्यूट करण्याचा आपण प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे त्याठिकाणी प्लेटलेट सेपरेशनची यंत्रणा लवकरात लवकर कशी स्थापित करता येईल यासाठी मी स्वत: आणि माननीय आरोग्य मंत्र्यांनी देखील बैठक घेतली आहे आणि याबाबत कायम स्वरुपी उपाय योजना करण्यासाठी आरोग्य विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे श्री. कुलकर्णी यांच्या बदलीबाबत विचारण्यात आले आहे. त्यांची 20 वर्षे सेवा झाली असेल तर नक्कीच त्यांची बदली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

प्रा.फौजिया खान....

करण्यात येईल. त्या संदर्भात माननीय सदस्य आग्रहपूर्वक सांगत असल्यामुळे नक्कीच त्यामध्ये सत्यता आहे असे समजून त्याबाबत निर्णय घेण्यात येईल. सभापती महोदय, ॲड. उषाताई दराडे यांनी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या संदर्भात त्यांच्या धारुर तालुक्यामधील विषय उपस्थित केला. त्याठिकाणी शाळा बंद करण्याचा प्रयत्न केल्याचे त्यांनी सांगितले आहे, त्याबाबत जरुर चौकशी करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. कुलकर्णी यांची सेवा 20 वर्षे झालेली आहे, असे माझे ठाम मत आहे. त्यामुळे त्यांची 20 वर्षे सेवा झालेली असल्यामुळे हे अधिवेशन संपण्यापूर्वी त्यांची बदली करण्यात येईल असे आपण ठामपणे सांगावे.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, होय. अल्पसंख्याक विभागाच्या संदर्भात दोन महत्वाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. याठिकाणी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे प्रकरण सांगण्यात आले. या महामंडळाकडून एकाच ठिकाणी जास्तीत जास्त प्रकरणे मंजूर करण्यात आली आहेत त्याबाबत चौकशी करण्यात येईल. त्या संदर्भात सचिवांमार्फत सर्व प्रकरणांची चौकशी केली जाईल. त्याचप्रमाणे् दोन-तीन माननीय सदस्यांनी वक्फ बोर्डाबाबत मुद्दे उपस्थित केले आहेत. वक्फ बोर्डाकडे मोठया प्रमाणावर जमिनीचे क्षेत्र आहे. जवळ जवळ 92 हजार एकर इतकी वक्फ बोर्डाच जमीन महाराष्ट्रामध्ये आहे. त्याबाबत माझ्या कार्यालयाकडे अनेक तक्रारी आलेल्या आहेत. त्यापैकी तीन ते चार फाईल्सवर चौकशी करण्याबाबत मी शेरे लिहिले आहेत. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी संयुक्त बैठक आयोजित करावी अशाप्रकारचे शेरे त्या फाईल्सवर लिहिले आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान . . ..

जर आपल्याला ही सर्व प्रकरणे हाताळावयाची असतील तर . . . .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे की, मघाशी असा उल्लेख करण्यात आला की, मंत्रिमंडळाची बैठक बोलवावी लागेल. परंतु त्याऐवजी "माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक" असे बोलावे. तेव्हा अशा प्रकारे सतत शब्दांचे जे वापर केले जातात, ते बरोबर नाही.

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते साहेब, मी आता मराठी बोलू लागले आहे, त्याचे आपण कौतुक केले पाहिजे. अशा वेळी माझ्याकडून एखादा शब्द आला तर ते काही गैर नाही असे मला वाटते. माझी मातृभाषा मराठी नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी वक्फ् बोर्डाच्या बाबतीत उल्लेख केला असून यासंबंधात त्यांच्याकडे असलेल्या फायली त्यांनी सांभाळून ठेवाव्यात. अशी विनंती आहे. आपण याबाबत चांगले काम करीत आहात.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ज्या फायलींबद्दल एन्डॉसमेंट झालेली आहे, त्याबद्दल मी सदनामध्ये सांगू इच्छिते की, प्रत्येक रेव्हीन्यू क्षेत्रामध्ये रेव्हीन्यू कमिशनरच्या माध्यमातून याची चौकशी करण्यात येईल. ज्या-ज्या ठिकाणी अशा प्रकारे वक्फ बोर्ड जमिनीच्या बाबतीत तक्रारी येत आहेत, त्याबाबत चौकशी करणे गरजेचे आहे आणि आम्ही तशी चौकशी गठित करणार आहोत.

श्री.सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदया ने अभी यहां पर वक्फ् बोर्ड के बारे में बताया. मैं कहना चाहूंगा कि हमारे भूतपूर्व मुख्यमंत्री श्री विलासराव देशमुख साहब ने सदन में बताया था कि वक्फ् की बहुत सारी जमीन पर एन्क्रोचमेंट हो गया है, लोगों ने गलत तरीके से कब्जा कर लिया है. उन्होंने कहा था कि यदि आवश्यकता पड़ेगी तो कानून बनाकर वक्फ् की जमीन वापस लेंगे. माननीय मंत्री महोदया इस बात का कॉग्नीजन्स लेंगी, ऐसा मेरा अनुरोध है.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, इव्हिक्शन ॲक्टमध्ये तशी तरतूद करण्यात आलेली आहे.पण त्याबाबत माहिती मिळण्यासाठी म्हणजे नेमकी किती जमीन आहे, किती अतिक्रमण आहे हे पहाण्यासाठी एक समिती देखील स्थापन केली होती. पण त्यामध्ये देखील काही झालेले नाही. मात्र आता या क्षेत्रात जर काही तक्रारी असतील तर त्याची रेव्हीन्यू कमिशनरच्या माध्यमातून चौकशी करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, मराठवाडयामध्ये सगळयात जास्त वक्फची जमीन आहे आणि आता उपलब्ध असलेल्या शासनाच्या रेकॉर्डनुसार चौकशी करणार असाल तर त्यामध्ये एवढया प्रमाणात खाडाखोड झालेली आहे की आपण त्याची कल्पना करु शकत नाही. जर मूळ रेकॉर्ड जुन्या हैद्राबाद राज्यामध्ये असेल तर तेथील रेकॉर्ड आणून त्याची येथील रेकॉर्डबरोबर तुलना केल्याशिवाय याठिकाणी नेमकी जमीन किती होती आणि संबंधितांनी किती जमीन हडप केली हे समजणार नाही.सध्या आहेत त्या लोकांना विचारले तर तुम्हाला माहिती मिळेल.माझ्या गावाच्या बाजूला एका मंदिराची जमीन आहे. श्री.मारुती महादेव या व्यक्तीने मंदिराची जमीन हडप केली म्हणजे महादेवने मुलाचे नाव मारुती ठेवले आणि हे असेच होत आहे.तेव्हा देवळाच्या सगळया जमिनी अशाच पध्दतीने हडप केलेल्या आहेत. त्यामुळे मूळ रेकॉर्ड उपलब्ध झाल्याशिवाय काही कळणार नाही. म्हणून जुन्या हैद्राबाद शहरामध्ये असलेले मूळ रेकॉर्ड आणणार आहात काय? जर ते रेकॉर्ड आणणार असाल तर ते कधी आणणार आणि त्यानुसार चौकशी करणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय,याबाबतीत संपूर्ण सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात येतील. पण मी जे बोलते, ते तक्रारींबाबत आहे. ज्याठिकाणी जमिनींच्या बाबतीत घोळ झालेला आहे. त्याबाबत कमिशनरच्या माध्यमातून चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल एवढेच मला सांगावयाचे आहे आणि या विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या मांडण्यात आलेल्या आहेत, त्या मंजूर कराव्यात अशी विनंती करते.

. . . .5 ए-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (जलसंधारण राज्यमंत्री) : सभापती महोदय,जलसंधारण, पशुसंवर्धन, दुग्धविकास, मत्स्यव्यवसाय आणि रोजगार हमी योजना या विविध विभागाच्या संबंधातील पुरवणी मागण्यांच्या संदर्भात बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जलसंधारण विभागाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे साहेबांनी सूचना केली की,सांगली जिल्ह्यामध्ये कायम दुष्काळ असतो आणि तेथे जे लघु पाटबंधारे तलाव,के.टी.वेअर बांधण्यात आलेले आहेत. त्यामध्ये मोठया प्रमाणात गाळ साचलेला आहे. त्यामुळे त्यातील गाळ काढण्यात यावा,त्यांची दुरुस्ती करण्यात यावी.मी आपल्याला सांगू इच्छितो की,आरके-विवा या योजनेमधून आम्ही ट्रिपल-आर म्हणजे रिपेअर्स्, रिस्टॉरेशन आणि रिन्युएशनची जी योजना आहे, त्या दोन्ही योजनांच्या माध्यमातून या कामांना निश्चितपणे गती देण्याचे काम करीत आहोत.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : माननीय मंत्री महोदयांनी कवठे-महांकाळ तालुका बाबत सांगावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, तो तालुका घेतलेला आहे. तसेच आपण शेळी-मेंढी महामंडळास साडेतीन कोटी रुपयांचा निधी देण्याच्या संदर्भात उल्लेख केला आहे. याबाबत सांगावयाचे तर आज पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून साडेतीन कोटी रुपयांची तरतूद शेळी महामंडळासाठी करीत आहोत.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे): साडे तीन कोटी रुपयाची मागणी नाही. साडेतीन कोटी रुपयाचे नियोजन केलेले आहे.

श्री. गुलाबराव देवकर : साडे तीन कोटी रुपयाची या विभागासाठी तरतूद करण्यात येत आहे आणि यामधूनच शेळयांचे गट वाटप वगैरेसाठी चांगल्या प्रकारची तरतूद करण्यात येत आहे.

तालिका सभापती : मराठवाडा विकास महामंडळाला लाभार्थींना कर्ज वाटप करण्यासाठी आता पर्यंत निधी दिलेला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : शेळयांचे गट वाटप करण्यासाठी एक योजना शासन करीत आहे त्यामध्ये यासाठी तरतूद करण्यात येणार आहे.

तालिका सभापती : ती तरतूद मराठवाडा विकास महामंडळाच्या अंतर्गत येते. सर्वसामान्य लाभार्थ्यांना कर्जाचे वाटप करण्यासाठी अधिकचा निधी देता येईल काय?

श्री. गुलाबराव देवकर : शेळयांचे गट वाटप करण्यासाठी अधिकच्या निधीची तरतूद यातूनच करण्यात येत आहे.

सभापती महोदय, मत्स्य उत्पादन कमी होत आहे त्यामुळे कोकणात यासंदर्भात देण्यात आलेल्या कर्जाचे व्याज माफ करावे असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी याठिकाणी केलेला आहे. कोकणात जवळपास 4.50 लाख मेट्रीक टन मत्स्य उत्पादन होत असते आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जवळपास 20 हजार मेट्रीक टन मत्स्य उत्पादन होते. त्यामुळे मत्स्य उत्पादन कमी झालेले आहे असे या ठिकाणी दिसून येत नाही. परंतु त्यासाठी सुध्दा निश्चितपणाने उपाययोजना करण्याच्या संदर्भात विभागाकडून लक्ष घातले जाईल आणि त्यांना मदत केली जाईल.

सभापती महोदय, कोकणात पशुधन कमी होत आहे. महाराष्ट्राच्या तुलनेने कोकणातील पशुधन वाढविण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहिजेत अशा प्रकारची सूचना सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी केलेली आहे. महाराष्ट्रात जवळपास 1, 61,83,527 गाईंचे पशुधन आहे. त्यामध्ये कोकणात 13,32,000 इतके पशुधन आहे. म्हणजे जवळपास 8.23 टक्के इतके गाईंचे पशुधन कोकण विभागात आहे. त्याच पध्दतीने म्हशींचे 6.92 इतके पशुधन आहे. पोयट्री जवळपास 4.65 टक्के आहे. त्यासाठी सुध्दा विशेष तरतूद करण्याच्या संदर्भात लक्ष दिले जाईल.

सभापती महोदय, कोकण कृषी विद्यापीठाने कोकण कन्या ही एक शेळीची सुधारित जात विकसित करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ KGS/ MMP/ KTG/

श्री. गुलाबराव देवकर....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी आदिवासी शहीद गोवारी शेळी व मेंढी विकास महामंडळाची जागा वर्ग करण्याच्या संदर्भात आणि निधी देण्याच्या संदर्भात उल्लेख केलेला आहे. आदिवासी शहीद गोवारी संस्थेची जागा महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेली आहे. परंतु आदिवासी शहीद गोवारी संस्थेकडे बँकेचे कर्ज थकित आहे. या कर्जाची वसुली केल्या शिवाय त्या जमिनीचा ताबा घेता येत नाही. ताबा घेतल्यानंतर जवळपास 103 एकर जमिनीचा विकास करण्यासाठी वित्त व नियोजन विभागाच्या माध्यमातून निधी देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

तालिका सभापती : त्या जागेचा ताबा महामंडळाकडे दिलेला आहे.फक्त ती जमीन डेव्हल करावयाची राहिली आहे.

श्री. गुलावबराव देवकर :सभापती महोदय, या संस्थेवर बँकेचे कर्ज असल्यामुळे त्या जागेचा फायनल ताबा घेण्याचे राहिलेले आहे. जवळपास ही 103 एकर जमीन आहे. ती पूर्ण जमीन ताब्यात घेतल्या नंतर या जमिनीचा विकास करता येईल.

सभापती महोदय, मी या ठिकाणी सभागृहाला विनंती करतो की, जलसंधारण विभागाच्या बाब क्रमांक 206,208,213,217,221 च्या एकूण 120.26 कोटी रुपयांच्या मागण्यांना मंजुरी द्यावी.

सभापती महोदय, त्याच पध्दतीने पशुसंवर्धन दुग्ध विकास आणि मत्स्य व्यवसाय या विभागाच्या बाब क्रमाक 64 ते 68 आणि 68 ते 74 च्या एकूण 45.2 कोटी रुपयांच्या मागण्यांना आपण मान्यता द्यावी.

यानंतर श्री. बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर .....

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात या ठिकाणी विशेष सूचना आलेल्या नाहीत. या विभागासाठी बाब क्रमांक 251, 252, 253 यामध्ये राज्य योजनेतून 254 कोटी 34 लाख रुपये आणि घटक योजनेतून 48 कोटी 32 लाख 90 हजार रुपये एवढ्या रकमेला सभागृहाने मंजुरी द्यावी अशी मी आपल्या माध्यमातून विनंती करतो

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KGS/ MMP/ KTG

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी महिला व बाल विकास विभागाची मंत्री झाल्यानंतर प्रथमच आलेल्या पुरवणी मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, श्री. विनोद तावडे, ॲड. उषा दराडे, डॉ. दीपक सावंत, प्रा. सुरेश नवले, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. केशवराव मानकर इत्यादी सन्माननीय सदस्यांनी या मागण्यांच्या संदर्भात आपले मौल्यवान मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानू इच्छिते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आणि 500 कोटी रुपयांचा भ्रष्टाचाराचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, प्रत्येक तालुक्याला एक बाल आश्रम दिला पाहिजे असा नियम आहे. पण महाराष्ट्र बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण नियम, 2002 हा जो कायदा आहे त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यामध्ये 1 बालगृह असावे असा कायदा आहे. पण या विभागाच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्याला कमीतकमी 1 बालगृह असावे असे नियोजन करुन आपण त्याचा एक आराखडा तयार केला. त्यासंदर्भातील फाईल वित्त व नियोजन विभागाला पाठविली. त्या विभागाकडे फाईल गेल्यानंतर त्या विभागाने या अनुषंगाने त्यांचे विचार मांडले, त्यांचे काही मुद्दे आणि अभिप्राय मांडले. त्याचा पूर्ण विचार करुन आता आमच्या विभागाने पुन्हा वित्त व नियोजन विभागाला फाईल सादर केलेली आहे. मला या निमित्ताने सांगितले पाहिजे की, या सगळ्या बाबतीत आता आम्ही नवीन वेगळी भूमिका घेणार आहोत. बालगृह असो, निरीक्षण गृह असो किंवा महिलांच्या संस्थांच्या बाबतीत असो किंवा महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बाबतीत असो त्यांच्या बळकटीकरणाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला त्याबाबत मी नंतर बोलणार आहे. या सगळ्या बाबतीमध्ये या विभागाच्या माध्यमातून विचार केला जाईल. आजची परिस्थिती जर बघितली तर शासकीय स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविली जाणारी 1143 बालगृहे आहेत आणि शासकीय बालगृहे 46 आहेत आणि एकूण स्वयंसेविका 1097 आहेत.

सभापती महोदय, दुसरा एक महत्वाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, चिल्ड्रन एड ही जी संस्था आहे त्या बालगृहातील कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग मिळालेला नाही. या निमित्ताने मी सांगू इच्छिते की, मंत्रिमंडळाने या चिल्ड्रन एड सोसायटीच्या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग दिनांक 1.4.2000 पासून लागू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड .....

केला होता आणि वित्त विभागाच्या मान्यतेने जिल्हा परिविक्षा व प्रादेशिक परिविक्षा अनुरक्षण संघटनेतील कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग दिनांक 1.1.1996 पासून सुरु झाला. या फाईलवर आता वित्त विभागाचे जे अभिप्राय आले ते असे आहेत की, "Fifth Pay Salary has been made applicable to this institution only recently." म्हणजे आताच त्यांना पाचवा वेतन आयोग दिलेला असल्यामुळे सहावा वेतन आयोग त्यांना देऊ शकत नाही. जरी त्यांचे असे अभिप्राय असले तरी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जी अपेक्षा व्यक्त केली की, आपण पुन्हा गेले पाहिजे, आपली बाजू मांडली पाहिजे त्याप्रमाणे आम्ही पुन्हा जाऊ आणि आमची बाजू मांडण्याचा प्रयत्न करु असे मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छिते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. उषाताई दराडे यांनी सांगितले की, अंगणवाड्यांचा इमारतींचा प्रश्न आहे त्या इमारती बांधल्या गेल्या पाहिजेत. आम्हीही त्या बाबतीत सहमत आहोत. या वर्षी 2010-2010 मध्ये नाबार्डतर्फे आम्हाला एकूण 200 कोटी रुपये मिळालेले आहेत. आणि डीपीडीसीच्या अंतर्गत जिल्हा निहाय योजनेतून आम्हाला 143.52 कोटी रुपये मिळालेले आहेत. अशी एकूण आम्हाला 342.52 कोटी रुपये एवढा निधी मिळालेला आहे. या निधीतून 4 लाख रुपये अशा तरतुदीप्रमाणे पुढच्या काळामध्ये अंगणवाड्यांच्या इमारती बांधणार आहोत आणि साधारणत: 8582 अंगणवाड्या आम्ही या काळामध्ये बांधणार आहोत. मला मान्य आहे की आमचे 60 ते 65 हजाराचे उद्दिष्ट आहे पण सुरुवात झालेली आहे. पण 8500 अंगणवाड्या या वर्षामध्ये पूर्ण करण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले साहेबांनी असा प्रश्न उपस्थित केला की, जी बालगृहे असतात त्यांचे अनुदान तुटपुंजे असते. त्यांनी सांगितले की, ते अनुदान 950 रुपये इतकेच आहे. मला मान्य करावयास पाहिजे की, परिपोषण व इतर खर्च यावर दरमहा प्रती विद्यार्थी 950 रुपये आम्ही स्वयंसेवी संस्थांना देतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड....

परंतु चिल्ड्रेन एड सोसायटी अशा सारख्या संस्थांच्या कर्मचा-यांच्या वेतनावरील 100 टक्के खर्च शासन करीत आहे. त्या संस्थेतील प्रती विद्यार्थ्यांसाठी 635 रुपये दिले जातात ही आजची परिस्थिती आहे. म्हणून यात सुधारणा झाली पाहिजे अशी मागणी केली जाते. शासनाची अशी अपेक्षा आहे की, ज्या स्वयंसेवी संस्था आहेत त्यांनी समाजाकडून जास्तीत जास्त फंड मिळविला पाहिजे. कारण या संस्थांकडे पाहण्याचा समाजाचा वेगळा दृष्टीकोन आहे. या ज्या संस्था आहेत त्यांना जास्तीत जास्त निधी मिळाला पाहिजे आणि तो निधी कसा मिळू शकेल यासाठी शासनाचा अभ्यास सुरु आहे. या संस्थांचे बँकेत अकाऊंट नसते, त्यामुळे लोक त्यांना चेक देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्या संस्थांना देण्यात आलेली मदत डायरेक्ट शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होते. म्हणून त्यांना वेगळे अकाऊंट काढून देता येईल काय याबाबत विचार सुरु आहे. एखाद्या व्यक्तीची बालगृहाला किंवा भिक्षेकरी गृहाला मदत करण्याची इच्छा असेल तर ती डायरेक्ट मदत करु शकेल का यादृष्टीने विचार सुरु आहे. जेणे करुन त्या संस्थेला जास्तीत जास्त मदत मिळू शकेल. स्वयंसेवी संस्थांकडून शासनाची अशी अपेक्षा आहे की, त्यांनी जास्तीत जास्त निधी गोळा करावा.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी महिला आयोगाला अध्यक्षा नाहीत असे सांगितले. मी त्यांना या फ्लोअरवरुन आश्वासन देऊ इच्छिते की, महिला आयोगाला लवकरात लवकर महिला अध्यक्षा कशा मिळतील यादृष्टीकोनातून मी 100 टक्के प्रयत्न करीन. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी चेंबूर येथील भिक्षेकरी गृहाचा मुद्दा मांडला होता. हा विषय सामाजिक न्याय विभागाचा आहे. परंतु ती जागा महिला व बालविकास खात्याकडे असली तरी ती सा.बां.विभागाच्या नावावर असल्यामुळे तो विभाग त्या जागेचा पुनर्विकास करीत आहे. सामाजिक न्याय विभागाचा व महिला व बालविकास विभागाचा समावेश त्यांनी त्यांच्या योजनेत केलेला आहे हे मी सांगू इच्छिते.

सभापती महोदय, याठिकाणी 'टेक होम रेशन' या नवीन योजनेचा येथे उल्लेख करण्यात आला. या योजनेमध्ये भ्रष्टाचार झाला आहे असेही सांगितले गेले. केंद्र सरकारने या योजनेबाबत मार्गदर्शक तत्वे घालून दिलेली आहेत. त्यांच्याकडून पूरक पोषण आहाराचा दर व

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

त्या आहारामध्ये काय असले पाहिजे याबाबतचे पत्र शासनाला दि.24.2.2009 रोजी प्राप्त झाले आहे. केंद्र सरकारच्या 2009 च्या पत्रानुसार सर्व राज्यांनी अंमलबजावणी केली पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाचे निदेश प्राप्त झाले आहेत. त्या निदेशानुसार 'टेक होम रेशन' यामधील ज्या वस्तू आहेत त्या सहा महिन्यांपासून 3 वर्षांच्या मुलापर्यंत, गरोदर मातांना, स्तनदा मातांना दिल्या जातात. त्याच्या व्यतिरिक्त जी कुपोषित बालके आहेत ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी केला आहे त्यांनाही दिल्या जातात. 'सॅम' आणि 'मॅम' या योजनेतून या मुलांना आहार दिला जातो. त्याची प्रोसिजर जशी व्हायला पाहिजे होती तशी झ ालेली आहे. परंतु काही लोक हायकोर्टात गेले, तेथे काही केसेस फेटाळल्या गेल्या. सर्वोच्च न्यायालयामध्ये त्याबाबतच्या केसेस प्रलंबित जरी असल्या तरी मला सांगितले पाहिजे की, त्याबाबतचे प्रोसिजर संपूर्णपणे केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार झालेले आहे. केंद्र सरकारची अशी इच्छा आहे की, सूक्ष्म पोषक पध्दतीने ते जेवण तयार केले जावे. त्यात उपमा, शिरा, सुकडी, सातूचे पीठ असणार आहे. हे जेवण बनविण्याची एक पध्दत असणार आहे आणि ते काम टेंडरिंग करुन दिलेले आहे. पुरवठादारांना एक वर्षासाठी पुरवठयाचे आदेश दिलेले आहेत. त्यामध्ये सुध्दा नवीन काही करु शकतो काय यादृष्टीने प्रयत्न केला जाईल. महिला व बालविकास विभागाचा कारभार कसा पारदर्शक होईल आणि आमच्या विभागाच्या योजना खालच्या लोकांपर्यंत, गरीब मुलांपर्यंत कशा जातील, महिला आर्थिक विकास मंडळाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण कसे होईल यासाठी आम्ही प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहोत. मला सर्व सन्माननीय सदस्यांचे नेहमीच मार्गदर्शन मिळालेले आहे ते तसेच मिळत राहो अशी अपेक्षा व्यक्त करते आणि महिला व बालविकास विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करते.

डॉ.नीलम गोऱ्हे : मी मघाशी म्हटल्याप्रमाणे शासनाने कौटुंबिक संरक्षण अधिकाऱ्यांचे पद निर्माण केले आहे. हे पद आऊटसोर्सिंग करुन भरले जाईल असे यापूर्वीच्या मंत्री महोदयांचा विचार होता. त्यानुसार हे पद भरण्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद केली आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताईंना मी सांगू इच्छिते की, त्यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे, त्यामुळे हे पद लवकरात लवकर भरले जाईल अशी मी खात्री देते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र गावित (आदिवासी विकास, कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, कामगार विभागाच्या मागण्यांसंबंधी याठिकाणी चर्चा करण्यात आली आहे. या विभागावर केवळ सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी घरेलु कामगारासंबंधी सूचना करताना असे म्हटले की, त्यांना योग्य प्रकारे न्याय द्यावा.

यानंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र गावित...

त्याचप्रमाणे कामगार कल्याण मंडळाच्या अंतर्गत सदस्यांची नेमणूक झालेली असली तरी अजून काही मंडळाची स्थापना केलेली नाही असे सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी सांगितले. ती स्थापना लवकरात लवकर करण्याचा प्रयत्न करु असे मी आश्वासन देतो. सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे विभागाला योग्य त्या सूचना देण्यात येतील. कामगार विभागाच्या बाब क्रमांक 185 ते 193 आणि 200 व 201 अशा एकूण 11 पुरवणी मागण्यांमध्ये 2 कोटी 63 लाख 95 हजार रु.ची मागणी केलेली आहे. या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे (पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागाच्या बाब क्रमांक 419 ते 429 अशा 11 मागण्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे आणि सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी सांस्कृतिक कार्य विभागाच्या मागण्यासंदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. आपल्या राज्याने या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सांस्कृतिक धोरण जाहीर केलेले असून राज्यात विविध उपक्रम राबविले जात आहेत. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी काही सूचना केलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या सूचनांचा निश्चितच विचार केला जाईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी दर्शनिका विभाग म्हणजे काय अशी विचारणा केली. दर्शनिका विभाग म्हणजे गॅझेटियर. या गॅझेटियरमध्ये जिल्ह्याची माहिती संकलित केली जाते. त्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी मागणी केलेली आहे. मी विनंती करतो की, 16 कोटी 42 लाख 76 हजाराच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण, विशेष सहाय्य राज्यमंत्री) :सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण आणि विशेष सहाय्य विभागाच्या मागण्यावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. रामनाथ मोते, विनोद तावडे, सुरेश नवले, धनंजय मुंडे, भगवान साळुंखे आणि केशवराव मानकर इत्यादी सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन आपापली मते नोंदविली. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आर्टस्, सायन्स आणि कॉमर्स कॉलेजांना गेल्या पाच वर्षात शंभर टक्के अनुदान मिळूनही ते वितरित झाले नाही असे सांगितले. मी आपल्याला सांगू इच्छितो की, दिनांक 7.6.2005 ते दिनांक 30.6.2010 या कालावधीत एकूण 30 आदेशाद्वारे 68 तुकड्या अनुदान तत्वावर आणल्या गेल्या. परंतु यासाठीची निधीची मागणी ऑक्टोबर 2010मध्ये आली आणि त्याची तरतूद या पुरवणी मागण्यामध्ये करण्यात आली आहे. तसेच दिनांक 27.1.2010 ते 8.7.2010 या कालावधीत 11 आदेश काढण्यात आले आणि त्यासाठी 2 कोटी 41लाख 96 हजार रु.ची पूरक मागणी सादर केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी तालुक्यामध्ये एक अनुदानित महाविद्यालय सुरु करण्याच्या संदर्भात वैभववाडीचा उल्लेख केला. मी आपल्याला सांगू इच्छितो की, राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक विद्याशाखा अनुदान तत्वावर असावी असे ठरवून ज्या तालुक्यामध्ये अशी विद्याशाखा अनुदान तत्वावर नाही ती अनुदानावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला. आतापर्यन्त 68 शाखांना अनुदान मंजूर केलेले आहे. उर्वरित विद्याशाखांच्या बाबतीत मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यानी असे सांगितले की, राज्यामध्ये अनेक ठिकाणी क्वॉलिफाईड प्राध्यापक आहेत, नेटसेटधारक आहेत, पीएच.डी.धारक आहेत. परंतु त्यांना अल्प पगारावर नोकरी करावी लागते. याचे कारण राज्यात कायम विनाअनुदानित महाविद्यालये कार्यरत आहेत. हा "कायम" शब्द काढण्यासंबंधी शासनापुढे अजून कोणताही प्रस्ताव नाही.

...नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत.....

माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी गोंडवाना विद्यापीठाच्या संदर्भात 1 कोटी रुपयांची तरतूद अपुरी असल्याचा मुद्दा मांडला आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्हयासाठी नव्याने गोंडवाना विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय शासनाने 26 मे, 2010 रोजी घेतला आहे. या विद्यापीठासाठी पुढील पाच वर्षात प्रतिवर्षी 5 कोटी रुपये याप्रमाणे 25 कोटी रुपयांची तरतूद आदिवासी उपयोजनेंतर्गत मंजूर करण्यात येणार आहे. त्यानुसार सन 2010-2011 करिता 5 कोटी रुपयांची रक्कम पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर करण्याचे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु ऑगस्ट महिन्यामध्ये पुरवणी मागणी सादर करण्यात आल्यामुळे यावर्षी फक्त 1 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. 2011-2012 मध्ये या वर्षीचे 4 कोटी व पुढील वर्षाचे 5 कोटी अशी एकूण 9 कोटी रुपयांची मागणी आदिवासी उपयोजनेंतर्गत करण्यात येऊन हे विद्यापीठ लवकर कार्यान्वित करण्यात येईल.

सभापती महोदय, तंत्रशिक्षण विद्यापीठाची स्थापना झाली पाहिजे असेही माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी सांगितले. याकरिता अनेक बाबी तपासून पहाव्या लागतील. त्याची आवश्यकता किती आहे, इतर राज्यात अशी किती विद्यापीठे आहेत, हे विद्यापीठ कोणत्या ठिकाणी व्हावे यासाठी डॉ.गुपचुप यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची नियुक्ती केली होती. त्या समितीच्या अहवालाबाबत विचार केला जाईल आणि यासंबंधी योग्य तो निर्णय घेण्यात येईल हे या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी संजय गांधी योजनेचे गठन करण्यासंबंधी विलंब होत असल्याचे सांगितले आहे. नुकताच शासनाने निर्णय घेतला आहे. या समितीचे अध्यक्ष आमदार असणार नाहीत. या संदर्भात विधानसभेच्या माननीय अध्यक्षांनी वेगळी बैठक घेण्याचे आश्वासित केले आहे. त्यामुळे मी या विषयावर अधिक भाष्य करणे उचित होणार नाही. माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांनी शारीरिक शिक्षण महाविद्यालयांसाठी सुध्दा तरतूद करावी अशी विनंती केली आहे. शिवाजी विद्यापीठाचा सुवर्ण महोत्सव पुढील वर्षी असल्यामुळे विशेष तरतूद करण्याचा मुद्दा त्यांनी मांडला आहे. या संदर्भात विचार केला जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.डी.पी.सावंत.....

माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी महिला शारीरिक शिक्षकांची नेमणूक करावी असे सांगितले आहे. मी सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा प्रामुख्याने विचार केला जाईल.

श्री.चंद्रकांत पाटील : विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची 100 कोटी रुपयांची थकबाकी आहे.

श्री.डी.पी.सावंत : सहाव्या वेतन आयोगाचे एरियर्स दिलेले आहेत. 1997 पासूनची जी थकबाकी आहे त्यासाठी वेगळा विचार केला जाईल. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मागण्या क्रमांक 369 ते 399 व विशेष सहाय्य विभागाच्या मागण्या क्रमांक 241 ते 244 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, क्रीडा विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक 85 ते 96 संबंधी माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, ॲड.उषा दराडे, सर्वश्री सुरेश नवले, एस.क्यू.ज़मा, भगवानराव साळुंखे, चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, केशवराव मानकर यांनी वेगवेगळे मुद्दे उपस्थित केले आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी ठाणे जिल्हा क्रीडा विभागातर्फे ठाणे जिल्हयातील शाळांमध्ये प्रोत्साहनपर अनुदान दिले गेले नाही असा मुद्दा मांडला आहे. निश्चितपणे या विषयाची माहिती घेतली जाईल. विभागामार्फत नियमितपणे अनुदान पाठविण्यात येत असते. रक्कम शिल्लक राहिली असेल तर त्या संस्थेबद्दल कारवाई केली जाईल.

माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी महाराष्ट्र रायफल असोसिएशनचा कारभार कसा चालतो हे पहावे असे सांगितले आहे.

नंतर 5जी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी .....

महाराष्ट्र रायफल्स असोशिएशन ही महाराष्ट्र राज्य स्तरावरील एक प्रमुख संघटना असून त्या संघटनेमार्फत विविध जिल्ह्यांच्या संघटनांचे काम चालते. तरी सुध्दा त्यासंबंधी सन्माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर त्यांचीही दखल घेतली जाईल. सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी जिल्हा क्रीडा अधिकारी, लातूर यांच्याकडे बरेच प्रस्ताव प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित केला. अनेक एनजीओज किंवा क्रीडा संस्थांचे खास करुन व्यायामशाळा व इतर बाबतीतील या प्रस्तावांना खरे तर डीपीडीसी मार्फत निधी दिला जातो. त्यासाठी डीपीडीसी आपले अधिकार वापरते. तरी देखील काही अडचणी असतील तर क्रीडा अधिकारी, लातूर यांना तसे कळवून सूचना देण्यात येतील. त्याचबरोबर केंद्रशासनामार्फत जो निधी यायचा आहे तो उपलब्ध झाल्यानंतर तसे प्रस्ताव येतील तसतसा विचार करता येईल.

सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी 100 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा शिक्षक नेमण्यात यावा अशी मागणी केली आहे. शासनाच्या निकषानुसार 250 विद्यार्थ्यांमागे एक शारिरीक शिक्षक नेमण्याची तरतूद आहे असे मी त्यांना सांगू इच्छितो. दुसरा एक मुद्दा येथे उपस्थित करण्यात आला तो म्हणजे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या खेळाडुंना सध्या 1 लाखाचे अनुदान किंवा मदत दिली जाते. मला मान्य आहे ही रक्कम अत्यंत कमी आहे परंतु टोकन स्वरुपात ही रक्कम आपण देत असतो व यामध्ये आपण 5 लाख एवढी भरीव मदत करणार आहोत, असे मी सांगू इच्छितो. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी राज्यस्तरावर क्रीडा विभागाचे एक क्रीडा विद्यापीठ असावे अशी मागणी केली. हे आम्ही तत्वत: मान्य केले असून ते कोठे घ्यावे एवढाच प्रश्न आहे. त्यानुसार प्राधान्याने ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होईल तेथे असे विद्यापीठ घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी कोल्हापूर येथे क्रीडा विद्यापीठ घेण्याची मागणी केली आहे. खरे तर कोल्हापूर जिल्हा हा क्रीडा आणि चित्रपटाच्या बाबतीत सुध्दा नावाजलेला आहे. ठाणे येथे जलसंपदा विभागाने 70 एकर जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी देखील जेथे प्राधान्याने जागा मिळेल तेथे असे विद्यापीठ घेण्याचा विचार करण्यात येईल. कोल्हापूरला देखील अशी व्यवस्था होत असेल तर तसा विचार करता येईल. त्याचबरोबर क्रीडा संकुलाच्या बाबतीत शासनाच्या क्रीडा धोरणानुसार तालुक्याला एक कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी 16 कोटी आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पद्माकर वळवी .....

विभागीय क्रीडा संकुलासाठी 24 कोटी एवढी मदत देण्यासंबंधीचा निर्णय सन 2009 मध्ये झाला व तसे शासनाचे धोरण आहे. त्याचबरोबर ज्या ज्या ठिकाणची मागणी येईल तेथे तेथे अशी मदत देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. तसेच सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करुन निधी उपलब्ध करुन दिला जाईल. मागील बजेटमध्ये आपण क्रीडा विभागासाठी 36 कोटीची तरतूद केली होती. त्यापैकी 18 कोटी रुपये अगोदरच वितरित केले असून 3 कोटी रुपये मागील आठवडयात दिले आणि उर्वरित 15 कोटी एवढा निधी अद्याप वर्ग करावयाचा आहे.

सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू.जमा यांनी नागपूरला क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्याची मागणी केली. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, सर्वसाधारणपणे राज्यात 11 क्रीडा प्रबोधिनी सध्या कार्यरत आहेत. त्यात नागपूर शहरात सुध्दा एक क्रीडा प्रबोधिनी असून त्या प्रबोधिनीच्या माध्यमातून फुटबालचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच त्यासाठी कोचेस कमी पडत असतील तर तशीही तरतूद केली जाईल, असे मी सांगू इच्छितो. त्यानंतर राज्य क्रीडा विकास निधी स्थापन करण्याबाबतची सूचना देखील सन्माननीय सदस्यांनी केली. त्यात विधानसभा, विधान परिषद, राज्यसभा आणि लोकसभेचे माननीय आमदार व खासदार यांच्या निधीतून ही गुंतवणूक करावी. वास्तविक हा निधी माननीय आमदार व खासदारांचा असतो व त्यावर त्यांचा अधिकार असतो. तरी देखील दोन्ही सभागृहे तसेच राज्यातील लोकसभा व राज्य सभा सदस्यांना हे मान्य असेल तर क्रीडा विभाग त्याचे स्वागतच करील.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी मा. उपसभापती)

श्री. पद्माकर वळवी...

कारण क्रीडा विभागाला निधी कमीच पडत असतो. राज्य क्रीडा विकास निधीला आम्ही नवीन क्रीडा धोरणात प्राधान्य देणार आहोत. आता राष्ट्रीय क्रीडा निधी धोरणात राज्याला साधारणत: 1 कोटी रुपये निधी येत असतो तरी सुध्दा राज्याच्या क्रीडा निधीमध्ये 6 कोटी रुपये आहेत. त्यामुळे आम्ही निश्चितपणे राज्य क्रीडा निधी उपलब्ध करुन देऊ. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अशी सूचना केली आहे की, आमदार निधीतून क्रीडा संकुलाला निधी देता येईल. यासाठी आम्ही नियोजन विभागाशी संपर्क करणार असून त्यांची मंजुरी घेऊन आमदार निधीचा निधी क्रीडा विभागाला मिळाला तर चांगलेच होईल.

सभापती महोदय, या ठिकाणी क्रीडा, कल्याण विभागाच्या पुरवणी मागण्या बाब क्रमांक 85 ते 96 ला सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो.

धन्यवाद.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते (आदिवासी विकास मंत्री) : सभापती महोदय, आदिवासी कल्याण विभागाच्या 346 ते 360 या 15 मागण्यांची एकूण रक्कम 385 कोटी 4 लक्ष 64 हजार रुपये असून आदिवासी विभागाच्या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती करतो तसेच या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या लेखी सूचना केल्या आहेत त्या सदस्यांना लेखी उत्तरे पाठविले जातील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, सामाजिक न्याय विभागाच्या जवळ जवळ 18 मागण्या असून त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, सुभाष चव्हाण, धनंजय मुंडे, चंद्रकांत पाटील, श्रीमती उषा दराडे तसेच श्रीमती नीलम गो-हे यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

सभापती महोदय, आमच्याकडे 7 महामंडळे आहेत. या 7 महामंडळापैकी 6 महामंडळाला 39 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या राज्यामध्ये 10 लक्ष घरे बांधण्यात येणार आहेत. यामध्ये आमच्या विभागाकडून 68 हजार घरे बांधणार होतो परंतु मा. मुख्यमंत्र्यांनी घरांचा कोटा वाढविण्याची सूचना केल्यामुळे या सप्लीमेंटरीमध्ये 50 हजार अधिक घरे जास्त बांधणार असून त्यासाठी 85 कोटी रुपयांची तरतूद देखील करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, अपंग माणसाकडे साधारणत: दुर्लक्ष होत असते. 10-15 वर्षापूर्वी ज्या अपंगाचे उत्पन्न 6 हजार होते त्यांनाच कर्ज उपलब्ध करुन दिले जात असे. परंतु आम्ही ही 6 हजाराची मर्यादा वाढवून ती 1 लक्ष रुपये केलेली आहे. अपंगाला अगोदर 25 हजार रुपये कर्ज मिळत होते परंतु आता आम्ही कर्जाची मर्यादा दीड लाख रुपये केली असून त्यामध्ये 20 टक्के सबसीडी सुध्दा दिलेली आहे. सबसीडीसाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी आग्रह केल्यामुळे 5 कोटी रुपयांची तरतूद सबसीडीसाठी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आपण ब-याच शाळांना आणि कॉलेजेसला फी देऊ शकत नव्हतो. परंतु प्लॅनिंग सबकमिटीमध्ये राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शिक्षण फी, परीक्षा फी आणि वेद्या वेतन यासाठी 240 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शिक्षणाच्या दृष्टीने खूप मोठे काम झालेले आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, आपल्याकडे ज्या काही आश्रमशाळा आहेत त्यांना फी दिली जात नव्हती, इलेक्ट्रिकचे बिल भरले जात नव्हते 21 कोटी रुपये यासाठी मान्य झालेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आणि मा.मुंडे साहेबांनी ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी शाळा काढण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. 8 वर्षापासून यासंदर्भात केवळ दोनच शाळा होत्या व त्यांना पोस्ट बेसीक देखील मिळत नव्हते परंतु आम्ही दोघानाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे....

पोस्ट बेसीक शाळा दिल्या आहेत तसेच 6 कोटी रुपयांची तरतूद देखील केलेली आहे. पुढील काळात कमीतकमी 5 नवीन आश्रमशाळा देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भातील पाठपुरावा जोरात सुरु ठेवणे आवश्यक आहे असे मला सूचवावयाचे आहे.

सभापती महोदय, आम्ही एक नवीन योजना आणणार आहोत. आतापर्यंत शहरातील मुलांनाच नोक-या मिळत होत्या परंतु आता आम्ही अशी योजना आणणार आहोत की, जे विद्यार्थी ग्रामीण भागात पास झाले असतील किंवा सी क्लास नगरपरिषदेमधून पास झाली असतील अशा मुलाकरिता स्पर्धा परीक्षेसाठी जाहिरात काढणार आहोत. राष्ट्रीयकृत बँकेत लिपिकाच्या लाखो पदांसाठी जाहिराती निघत असतात परंतु ग्रामीण भागातील मुलांना त्यासंदर्भात काहीही माहिती नसते त्यामुळे आम्ही त्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे 4 ते 5 हजार रुपये खर्च करुन 3 महिन्याचे ट्रेनिंग देणार आहोत. त्यामुळे स्पर्धेमध्ये आमच्या ग्रामीण भागातील मुले सुध्दा टिकतील या दृष्टिकोनातून आमचे प्रयत्न राहणार आहेत.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

सभापती महोदय, आम्ही ई-स्कॉलरशीप चालू केली. ई-स्कॉलरशीपमुळे विद्यार्थ्यांच्या बँक अकाऊंटमध्ये थेट पैसे जमा होतात. मागील वर्षी 32 लाख विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप दिली, त्यासाठी 1800 कोटी रुपये खर्च केले. ई-स्कॉलरशीपसाठी विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडावे लागते. कॉलेजच्या प्राचार्यांवर ही जबाबदारी दिलेली आहे. विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडले नाही तर महाविद्यालयाला शिक्षण आणि एक्झामिनेशन फी दिली जाणार नाही. जितक्या विद्यार्थ्यांचे खाते उघडण्यात येईल तेवढीच त्यांना फी दिली जाईल असे त्यांना सांगितलेले आहे. ही गोष्ट मान्य झाली तर खूप मोठे काम या राज्यात होईल...

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, वसंतराव नाईक भटक्या विमुक्त महामंडळामार्फत सर्व जातीच्या लोकांना लोकसंख्येच्या प्रमाणात कर्ज वाटप करावे अशी मागणी आहे...

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मागणीचा जरुर विचार करण्यात येईल.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, विमुक्त / भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय कल्याण आणि व्यसनमुक्ती कार्य विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

उपसभापती : सन 2010-2011 खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभा□ह□पुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह□ची बैठ□ आता स्था□□त होऊ□ मंगळवार, दिनांक 7 डिसेंबर, 2010 रोजी दुपारी 1.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□ह□ची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□ 31 मि□□टां□, मंगळवार, दि□□ 7 डिसेंबर 2010 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्य□त स्था□□त झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही